## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/१२/२०१८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/१२/२०१८ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

६

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दिनांक २०/१२/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती पंचम उमेश कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. पंचम उमेश कालानी—— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी—— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३५ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३७ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३८ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३९ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४० | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ९ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४१ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १० | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४२ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| ११ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४३ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १२ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४४ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १३ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४५ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १४ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४६ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४७ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १६ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ४८ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४९ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १८ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ५० | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| १९ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५१ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २० | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५२ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २१ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५३ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २२ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५४ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २३ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २४ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५६ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २५ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५७ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २६ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५८ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५९ | श्री. विजय चाहु पाटील |
| २८ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६० | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २९ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६१ | श्री.विकास परशुराम पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६२ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३१ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६३ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३२ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६४ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३३ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६५ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती आशा नाना बिराडे, २. श्रीमती मिना कुमार आयलानी, ३. डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी, ४. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमार), ५. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, ६. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ७. शुभांगी मनोहर बेहनवाल, ८. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), ९. श्री. सुमित सागर सोनकांबळे, १०. श्रीमती ज्योन्स्ना सुरेश जाधव, ११. श्री. रमेश महादेव चव्हाण, १२. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १३. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, १४. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), १५. श्री. आकाश परशुराम पाटील, १६. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. अच्युत हांगे, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
४. श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
५. श्री. महेश सितलानी, प्र. नगररचनाकार
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
७. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
९. श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
१०. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
११.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१२. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
१३. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१४.श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१५.श्री. दत्तात्रय जाधव, प्र. सहाय्यक आयुक्त
१६. श्री. जितू चौइथानी, प्र. उप अभियंता
१७. श्री. संदिप जाधव, प्र. उप अभियंता
१८.श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता
१९.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
२०. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
२१. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता
२२. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२३. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक
२४. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
२५. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
२६. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
२७. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक
२८. श्री. रहेजा, शाखा अभियंता, पा.पु.वि.
२९. श्री. ठाकरे, शाखा अभियंता, पा.पु.वि.
३०. श्री. डी.एस. पाटील, शाखा अभियंता, पा.पु.वि.

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१.श्रीमती मनिषा महाजन, लिपीक

सायंकाळी ४.२५ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव:—</u>विषय क्र. १ प्रश्नोत्तरे आहेत.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>मॅडम पहीले हे प्रोजेक्ट दाखविण्यात यावा, परवानगी देत आहे.

<u>महापालिका सचिव:—</u>ठिक आहे, मा. पिठासिन अधिकारी यांनी एक प्रोजेक्ट दाखवण्याची परवानगी दिली आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>यांना माईक दिले जावे.

या वेळी मा. सदस्यांना एक प्रोजेक्ट दाखवण्यात आला.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> आमच्या शहरामध्ये काही रोड आहेत, २५ ते ३० वर्षे जुने आहेत, ते सिमेंटचे रोड आहेत. आता त्यांची अवस्था खराब झाली आहे, काय गेले आहे, मातीमध्ये गेले आहेत, साईटची हाईट वाढली आहे. तर त्याच्यावर सुध्दा हे रोड बनवू शकतो का?

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> सर त्याचे वर्किंग पिरीयड किती आहे? दुसरे म्हणजे आपण सिमेंट, कॉंक्रेटचे बनवतो ते खुप कालावधी पर्यंत टिकतात.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>तुम्ही हे रोड पहीले कुठे बनवले आहे का?

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>ही जी तुमची टेक्नालॉजी आहे, ठाणे, अंबरनाथमध्ये हे जे रोड बनवतात त्यांच्यामध्ये आणि याच्यामध्ये काय अंतर आहे? एम. ६० युज करीत आहेत, तर मला तुम्ही सांगा की, इथे जे एम.एम.आर. ओसीनेशनमध्ये ठाणे महानगरपालिका, कल्याण महानगरपालिका, अंबरनाथ नगरपालिका आणि बदलापुर नगरपालिकेमध्ये या प्रणालीचा उपयोग केला आहे आणि जर याचा उपयोग केला आहे, तुम्ही त्याचे नाव सांगितले की, व्हाईट टाप परंतु ते बोलतात की, यु.टी.डब्लू सी. असे त्यांनी रोडचे नाव दिले आहे आणि दुसरे म्हणजे आपणजे ग्रुप करीत आहेत, छोटे छोटे ग्रुप करण्याचा काय फायदा आहे? तिथे जे ग्रुप आहेत, ते पाच मिटर एक एक पेस पास करीत आहेत. तर जास्त ग्रुप करण्याचा फायदा काय होतो? अनुमान बघितले आहे की, सिमेंट कॉंक्रिटमध्ये जो आर. एम.सी. चा मटेरियल युज केला जातो, त्यामध्ये एअर क्रश लवकर पडतात. तो हायवे असेल किंवा मोठमोठे हायवे असतील त्यांना क्रॅश पडतात. तुमच्या प्राजेक्टमध्ये क्रॅशची पोझिशन काय आहे? क्रॅशचा जो संबंध आहे, तो गरमीमुळे आहे, जास्त उष्णता मिळते, क्युरीचा पिरीयड सगळेच करतात, माझा शेवटचा प्रश्न आहे, आपण या कॉंक्रिटमध्ये सबमिट होते मुंबईमध्ये, मी तिथे गेलो होतो, त्यांनी सांगितले होते की, आता कॉंक्रिटमध्ये बर्फाचा प्रयोग केला जातो. तर आपण या कॉंक्रिटमध्ये अशा गोष्टी करतात का? तुमचे म्हणणे आहे की, तुम्ही एम.एम.आर. रिझनमध्ये कोणतेही काम केले नाही. ही न्यु टेक्नॉलॉजी आहे, जो आमचा एम.एम.आर. रिझन आहे, त्याला एम.एम. आर. रिझन म्हटले जाते, त्यामध्ये मुंबई, ठाणे परंतु तुमच्याकडून व्हाईट टॉपिंग ऐकले नाही, व्हाईट टॅब आम्ही पहील्यांदा ऐकत आहेत, सर पहीले डांबरला ब्लॅक टॉपिंग बोलत होते, आता आपण याला व्हाईट टॉपिंग बोलत आहेत.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> सर इन टू कॉल यु वेरी सुन फरदर येस.

<u>महापालिका सचिव:—</u> प्रश्नोत्तराचा तास सुरू होत आहे, ४.५० मिनीटे झाली आहेत, प्रलंबित प्रश्न २४ हा श्रीम. सुनिता बगाडे यांचा आहे. पण त्या उपस्थित नाहीत, म्हणून या प्रश्नाची नोंद घेऊन विषय संपवण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. २४ :—</u> माहे जून २०१७ च्या सर्वसाधारण महासभेच्या कामकाजा मध्ये खालील प्रश्नांचा समावेश करून सविस्तर उत्तर मिळणेस विनंती आहे.

१) सैनिकी बॅरेक साठी शासना कडून तयार करण्यात आलेले सरकारी शौच्छालय व स्नानगृह पालिका प्रशासना कडे मा. प्रशासक उल्हासनगर यांनी हस्तांतरीत केल्या बाबत च्या कार्यवाही संदर्भात माहिती उपलब्ध करून दयावी.
**अ)** उल्हासनगर कॅम्प नं. १ ते कॅम्प ५ मध्ये सरकारी छावणी साठी एकूण किती सरकारी शौच्छालय व स्नानगृहे तयार करण्यात आली होती? सदरची शौच्छालय व स्नानगृहे पालिका प्रशासना कडे हस्तांतरीत करण्या बाबत कधी आदेशित करण्यात आले आहे.
**ब)** विदयमान स्थिती मध्ये किती सरकारी शौच्छालय अस्तित्वात आहे. आणि किती सरकारी शौच्छाल — यावर अतिक्रमण करण्यात आले आहे.?
**क)** मा. प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत यांचे कार्यालया कडून सरकारी शौच्छालय व स्नानगृहे हस्तांतरणा बाबतची कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास त्या ठिकाणी करण्यात आलेल्या अतिक्रमणा साठी जबाबदार कोण आहे?

<u>उत्तर :—</u> १) शासनाकडून पालिका प्रशासनाकडे शौचालय व स्नानगृह हस्तांतरीत केल्याबाबतच्या कार्यवाही संदर्भातील माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २०१७ साली सार्वजनिक शौचालये मालमत्ता विभागात त्यावेळेस आस्तित्वात असलेल्या शौचालयांच्या यादीसह हस्तांतरीत केली आहेत. त्याचा तपशिल या कार्यालयाकडे उपलब्ध आहे.
अ) सदरहु माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.
ब) सार्वजनिक आरोग्य विभागाने या विभागाकडे सादर केलेलया अहवालानुसार एकूण ३७८ सार्वजनिक शौचालये. आहेत. तथापी १४ सरकारी शौचालयाच्या जागी अतिक्रमण झाले असून ते हटविण्यासाठी संबंधित प्रभाग अधिकारी यांना आदेशित करण्यात आले आहे.
क) मा. प्रशासक, उल्हासनगर शहर वसाहत यांचे कार्यालयाकडून सरकारी शौचालय व सरकारी स्नानगृहे हस्तांतरणाबाबतची कार्यवाही पूर्ण झाली नाही तरीसुध्दा सदर ठिकाणी सरकारी शौचालय असल्याबाबतची माहिती प्राप्त झाल्यास व सदर ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आणून दिल्यास सदर ठिकाणचे अतिक्रमण काढून टाकण्याची जबाबदारी महापालिकेची राहिल.
१) शासनाकडून पालिका प्रशासनाकडे शौचालय व स्नानगृह हस्तांतरीत केल्याबाबतच्या कार्यवाही संदर्भातील माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.

तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २०१७ साली सार्वजनिक शौचालये मालमत्ता विभागात त्यावेळेस आस्तित्वात असलेल्या शौचालयांच्या यादीसह हस्तांतरीत केली आहेत. त्याचा तपशिल या कार्यालयाकडे उपलब्ध आहे.
अ) सदरहु माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही..
ब) सार्वजनिक आरोग्य विभागाने या विभागाकडे सादर केलेलया अहवालानुसार एकूण ३७८ सार्व शौचालये. आहेत. तथापी १४ सरकारी शौचालयाच्या जागी अतिक्रमण झाले असून ते हटविण्यासाठी संबंधित प्रभाग अधिकारी यांना आदेशित करण्यात आले आहे.
क) मा. प्रशासक, उल्हासनगर शहर वसाहत यांचे कार्यालयाकडून सरकारी शौचालय व सरकारी स्नानगृहे हस्तांतरणाबाबतची कार्यवाही पूर्ण झाली नाही तरीसुध्दा सदर ठिकाणी सरकारी शौचालय असल्याबाबतची माहिती प्राप्त झाल्यास व सदर ठिकाणी अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आणून दिल्यास सदर ठिकाणचे अतिक्रमण काढून टाकण्याची जबाबदारी महापालिकेची राहिल.

**महापालिका सचिवः—** प्रलंबित प्रश्न क्र.२७ हा श्री. सुनिल सुर्वे यांचा आहे, पण त्याचे उत्तर अद्याप प्राप्त नाही.

**प्रश्न क्र. २७:—**अ)उल्हासनगर महानगरपालिकेतील आस्थापनेत सद्या किती उप—आयुक्त कार्यरत आहेत व किती उप—आयुक्तांची आवश्यकता आहे?

ब)उल्हासनगर महानगरपालिकेतील आस्थापनेत सद्याकिती अभियंते संबंधीत विभागात (सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पूरवठा विभाग,नगररचनाविभाग,मलनिस:रण विभाग) कार्यरत आहेत व किती अभियंतांची आवश्यकता आहे?

क)उल्हासनगर महानगरपालिकेतील आस्थापनेत सद्या किती सहा. आयुक्त कार्यरत आहेत व किती सहा. आयुक्तांची आवश्यकता आहे?

ड)महापालिका प्रशासनाने महाराष्ट्र शासनाकडे आता पर्यत किती अधिकारी/अभियंता/कर्मचारी यांची महानगरपालिकेत नियुक्ती करणेची मागणी केलेली आहे व त्यान्वये अद्याप पर्यंत किती अधिकारी/अभियंता/कर्मचारी यांची नियुक्ती महानगरपालिकेत झालेली आहे?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** उत्तरे कधी मिळतील?

**सदस्या, श्रीम. कांचन लुंड:—**मी ही महासभा सुरू होण्याच्या पहीले मला काही सांगायचे आहे, आता काही कालावधीपुर्वी पाण्याच्या बाबतीत एक मॅसेज आला आहे, २५ टक्के ते ३० टक्के पाण्याची कपात केली जात आहे, तर ही खुप त्रासदायक गोष्ट आहे, पहीलेच आमच्या कॅम्प नंबर ४ च ५ मध्ये ४५ ते ५० एम.एल.डी. पाणी मिळत आहे आणि आता तीन दिवस पहीले पाणी मिळत नाही, तर आपण गुरूवार पासून पाणी बंद केले तर कसे चालणार?

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—**महापौर मॅडम, आयुक्त साहेब, काही वेळेपुवी आमच्या एच.ओ.डी. ग्रुपने श्री. सेलवनजी यांनी एक पत्र पाठवले की, महाराष्ट्र सरकारकडून आले आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** मॅडम आपण पहीले प्रश्नोत्तरे घेऊ त्याच्या नंतर त्याच्या नंतर हा विषय घेऊ.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** महापौर मॅडम, पाण्याची समस्या गंभीर आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—**आज पासून सुरूवात होणार आहे, असे लिहीले आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**पाण्याची समस्या गंभीर आहे, त्याच्यावर चर्चा होऊ दया,

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—**बिलकुल सर

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**प्रश्नोत्तरे होत राहतील, एका प्रश्नाचे उत्तर दोन दोन वर्षे मिळत नाही.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—**त्याच्या नंतर तुमचा हा विषय घेण्यात येईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**किती दिवस झाले प्रश्न विचारला आहे, अजून सुर्वेच्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. प्रश्नोत्तरे होत राहतील, पाण्याचा विषय खुप गंभीर आहे. त्याच्यावर चर्चा होऊ दया.

**सदस्या, श्रीम. कांचन लुंड:—**मॅडम पाण्याचा विषय खुप गंभीर आहे, हे २५ टक्के ते ३० टक्के कपात होणार आहे.

**सदस्य, श्री. शंकर लुंड:—**मॅडम, आज एक तासापुर्वी दिले आहे, सायंकाळी ६.०० वाजे पर्यंत पाणी बंद होणार आहे.

<u>सदस्या, श्रीम. कांचन लुंड:—</u>६.०० वाजे पासून बंद होणार आहे. आमच्या इथे पाणी ६.०० वाजताच येत असते.

<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:—</u>आमची वेळच ६.०० वाजेची आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>३०, ३० तास पाणी बंद केले आहे आणि रोजची कपात चालू आहे, ती जास्त आहे. खरे तर मला असे वाटते की, मॅडम यासाठी एक स्पेशल मिटींग बोलवा. एक दिवसासाठी स्पेशल मिटींग बोलवा आणि त्यामध्ये एम.आय.डी.सी. ला पण बोलवा आणि २४ तासासाठी मिटींगची व्यवस्था करा.

<u>सदस्या, श्रीम. कांचन लुंड:—</u>वरतून मॅसेज आला आहे, जनता त्रस्त झाली आहे,जर जनतेचे कोणालाच काहीच वाटत नसेल तर ही सभाच कॅन्सल करा, नाही तर मी सभा चालू देणार नाही.

**यावेळी सदस्या श्रीमती कांचन लुंड आणि श्रीमती ज्योती चैनानी हया व्यासपीठासमोरील मोकळया जागेत येवुन बसल्या.**

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u> बरोबर, एकदम बरोबर.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>विषय असा आहे की, पाठबंधारे विभाग जो आहे, महाराष्ट्र शासनाचा त्यांची दादागिरी चाललेली आहे. तिथुन एम.आय.डी.सी. पाणी उचलत असते, त्या पाण्यासाठी एम.आय.डी.सी.ची दादागिरी चाललेली आहे. एम.आय.डी.सी. महानगरपालिकेला पाणी पुरवठा करते, त्याच्या नंतर आपल्याकडून ते पैसे घेतात, त्याच्या नंतरही त्यांची दादागिरी चालते. त्यांना जेव्हा पाहीजे तेव्हा पाणी देणार आणि जेव्हा पाहीजे तेव्हा बंद करणार. ही दादागिरी लवकरच संपली पाहीजे. मी या बाबतीत खुप वेळा आयुक्तां बरोबर बोललो आहे. पहीले आयुक्त होते, ते प्रत्येक सोमवारी एम.आय.डी.सी. च्या अधिका—यांना मिटींगसाठी बोलवत होते आणि आम्ही सर्व तिथे उपस्थित राहत होतो आणि त्यांना प्रश्न विचार होतो. तर ते घाबरत होते, जर आजचे आयुक्त त्यांच्यावर प्रेशर टाकतील, त्यांच्याशी बालेतील, चर्चा करतील तर ते लाईनवर येतील, त्यांना महानगरपालिकेची दहशत राहीली पाहीजे.

<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:—</u>आज आमचे शहर संपुर्ण भोगत आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>एम.आय.डी.सी. वाले आपल्यावर मेहरबानी करीत नाहीत, आपण त्यांना पैसे देतो, ते आपल्याला पाणी देतात आणि त्यांची दादागिरी चाललेली आहे.

<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:—</u>त्या मधून पण पाणी कमी देतात.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>दोन वर्षे होतील आपण मिटर लावण्यासाठी त्यांना पैसे दिले आहेत, मिटर लावण्याचे काम हे आयुक्त साहेब आल्या नंतर झाले आहे. हे आम्ही मान्य करतो, त्याच्या नंतर मिटर लावले आहेत. जिथे लावायचे होते, तिथे मिटर लावले नाहीत. जेव्हा मिटर लावले जातील तेव्हा त्यांची चुक समोर येतील. त्यामुळे ते मिटर लावत नाहीत, असे आमचे आरोप आहेत. परंतु हे मिटर जिथे लावायचे होते, तिथे लावले नाहीत, तर ते दुस—या जागेवर लावले आहेत. आजची स्थिती एम.आय.डी.सी. ची मी जर बोललो तर त्यांची दादागिरी चाललेली आहे. प्रत्येक गोष्ट आमच्या पाणी पुरवठयाच्या अधिका—यांना माहीती आहे, एम.आय.डी.सी. चे अधिका—यांना फोन करतो, रोज सायंकाळी पाणी लवकर सोडा, एक तासभर, एका तासामध्ये आमची पाण्याची टाकी भरली जाईल. ओल्ड एम.बी.आर.

ची टाकी लवकर भरल्यामुळे आम्हांला पाणी लवकर येईल. जर टाकी भरली नाही तर लोकांना पाणी मिळायला उशिरा मिळतो किंवा लोकांना पाणी मिळत नाही. उंचीचा भाग असल्यामुळे आमच्या एरियामध्ये पाणी जात नाही. त्यामुळे आम्ही रोज फोन करीत असतो, आपले अधिकारी इथे असतील तर आपण त्यांना विचारू शकतात. अशी परिस्थिती नगरसेवकांना का येईल? आज पासून आम्हांला न विचारता पाणी कपात केले आहे. पहीले २४ तास होते, आता ३० तास केले आहे. तर याला जबाबदार कोण? ठिक आहे, सर्व ठिकाणी चालले आहे, तर चालू दया. परंतु त्यांची दादागिरी आम्ही सहन करणार नाही. आम्ही जेव्हा दादागिरी करतो, एकदा आम्ही स्वत: जावून एम.आय.डी.सी. चे ऑफिस तोडले होते. आमच्यावर एफ.आय. आर. पण दाखल झाले होते. आम्हांला एम.आय.डी.सी. ला सांगायचे आहे की, एम.आय.डी. सी. दादागिरी करीत असेल तर आम्हांला पण दादागिरी करायला येते. ही महापौरांची जबाबदारी आहे, जबाबदारी घ्यायला पाहीजे, महापौरांनी बोलायला पाहीजे. जर तुम्ही बोलत नाहीत, आयुक्त साहेब एम.आय.डी.सी. ला दाबत नसतील तर त्यांची दादागिरी चालू आहे. तर एक दिवस बंद असते, ठिक आहे सर्व ठिकाणी बंद केले आहे. आम्ही मान्य केले आहे, आम्ही काहीच बोललो नाही. परंतु यांची दादागिरी २४ तास बंद केले, ३६ तास बंद केले. इरीगेशन विभागाच्या बाबतीत मी सांगतो की, इरीगेशन विभागाकडून जे पाणी येते उल्हास नदीमधून तिकडे एवढे रिसॉर्ट आहेत आणि जेवढया बिल्डर लोकांची कामे चालू आहेत, ते पाणी चोरी करून घेतात आणि एक रूपया पण देत नाहीत. त्यांना हे इरीगेशन विभागाचे अधिकारी आहेत, त्यांना काहीच बोलत नाहीत, त्यांच्यावर काहीच कारवाई करीत नाहीत आणि आम्ही पैसे देवून पाणी घेतो आणि आमच्यावर दादागिरी करतात. तर त्यांच्यावर काय कारवाई करायला पाहीजे, ती तुम्ही करायला पाहीजे.

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, पाण्याचा विषय एवढा गंभीर आहे, पण पाणी विभागाचे एक पण अधिकारी इथे उपस्थित नाहीत. मागच्या महासभेत आपण सांगितले होते की, ज्या ज्या विभागाचा विषय राहील, त्या विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित राहतील. तुम्ही आदेश दिल्या नंतर आपले आदेश कुठे आहेत, मा. महापौरजी आणि दुसरी गोष्ट म्हणजे आमच्या इथे पाच दिवसापासून पाण्याचा प्रॉब्लेम आहे. महापौरजी आपण दोन मिनीट ऐका, आयुक्त साहेब, पाच दिवसापासून पाणी नाही. पाच दिवसापासून साहेब पाणी नाही, आज लाईट गेली होती, आज पण पाणी नाही. साहेब तुम्ही त्या दिवशी मिटींग घेतली काम चालू केले मिटर लावायचे ते झाले. तुम्ही सांगितले परंतु आज पर्यंत पाण्याचा एक थेंब पण वार्डमिध्ये गेलेला नाही. आता ६.०० वाजल्याच्या नंतर पाणी बंद होणार. महापौरजी आम्ही पाणी कसे पिणार सांगाा तुम्ही? आणि आपण ज्या सुविधा आहेत, त्या पण बंद केल्या आहेत. पाच दिवसापासून महापौरजी वार्डमध्ये पाणी नाही, आयुक्त साहेबांनी मिटींग घेतली होती, आयुक्त साहेबांनी स्वत: सांगितले होते की पाणी आम्ही देवू. आज लाईट नसल्यामुळे आमच्या इथे पाणी येत नाही, तसे तर पाणी येतच नाही. तर पाण्याचा मुद्दा गंभीर आहे, जर पाणीच मिळणार नाही तर महापौरजी सभा चालवून आपण काय करणार? सांगा तुम्ही.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>मा. महापौरजी, माझे निवेदन आहे की, आपण एरीगेशन डिपार्टमेंट, एम.आय.डी.सी. आणि उल्हासनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग आणि

सर्व पक्षाच्या गट नेत्यांना, आयुक्तांना आपल्या कार्यालयामध्ये उप महापौर यांना बोलावून एक मिटींग घेण्यात यावी. आपल्याला काय काय गरजेचे आहे. ते करण्यात यावे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:—</u>महापौर मॅडम, जो पर्यंत आज सायंकाळ पर्यंत पाणी बंद करणार तर आमच्या पॅनलमध्ये पाणी येण्याची वेळ ६.०० वाजल्या पासून सुरूवात होते. तर संपुर्ण कॅम्प नंबर ४ चा एरिया ड्राय राहणार आहे, आणि त्याच्या नंतर उद्या पण पाणी येणार नाही आणि शनिवारी तर आम्हांला पाणीच मिळत नाही. एक दिवस २४ तास कपात केल्यामुळे आम्हांला शनिवारी पाणी मिळतच नाही. तर आज पण आम्हांला पाणी मिळणार नाही, आठवडयातून आम्हांला तीन दिवस पाणी मिळणार नाही. तर आमची जनता कुठे जाणार? त्यामुळे मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्यांनी त्यांच्या लेवलवर तिकडे बोलून योग्य तो निर्णय घेण्यात यावा, अचानक आमच्यावर हा निर्णय लादू नका.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>मा. आयुक्त साहेब, आता आपण नगरसेवकांचा क्रोध बघितला आहे, क्रोध म्हणण्या पेक्षा त्यांना रोज जे झेलावे लागते, त्यांनी ते तुमच्याकडे सांगितले. त्या दिवशी आपण तुमच्याकडे मिटींगला बसलो होतो. एम.आय.डी.सी. आपल्याकडे जो पाण्याचा कोठा आहे, बंद आहे, ते त्यांचे ठिक आहे. वरूनच बंद आहे तर आपण वरच्या लेवलला लढू. परंतु आपल्याला पालेवरून ४५ एम.एल.डी. यायला पाहीजे होते, मी त्या दिवशी पण तुमच्या निदर्शनास आणले की, त्याच्या ऐवजी आपल्या ३८, ४० एम.एल.डी. मिळते, पाच एम.एल.डी. कमी मिळते. इथे पण ओल्ड एमबीआर, न्यु एमबीआर १०५ एम.एल.डी. मिळायला पाहीजे. ते मिळत नाही आतच जे श्री. चौधरी साहेबांनी सांगितले की आपण गेले होते, मला पण समजले त्यांच्याकडून मिटर लावून घेतले. त्या बददल तुमचे धन्यावाद. त्या नंतर विषय हा जो महत्वाचा आहे, एम.आय.डी.सी. च्या लोकांना आपण बोलवा, आपण फुकट पाणी घेत नाही. नाही तर माझी आपल्यांना सर्वांना विनंती अशी आहे की, पाणी अजीबात उचलू नका. पाणी नसेल तर शहरामध्ये कोणालाही नको, लोक रस्त्यावर उतरले पाहीजेत. शासनाला कळेल आणि इथे काय होते? एखादयाला पाणी मिळते, एखादयाला पाणी मिळत नाही आणि ज्याला मिळत नाही, त्याला काहीच मिळत नाही. आमचा मागचा पुर्ण आठवडा खराब गेला. तरी आम्ही तुम्हांला त्रास दिला नाही, कारण तिकडेच वारंवार त्रास चालू होता. त्यामुळे बंद करायचा तर संपुर्ण शहराचा बंद करा.

<u>सदस्या, श्रीम. कांचन लुंड:—</u> सर आपण सांगा.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>आम्ही त्या निषेधार्थ खाली बसत आहेत, एकदा निर्णय होऊन जाऊ दया, आमची तुम्हांला विनंती आहे, प्लीज.

**या वेळी सदस्य श्री. सुनिल सुर्वे व्यासपीठासमोरील मोकळया जागेत येऊन बसले.**

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u> मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर साहेब, या ठिकाणी उपस्थित सर्व सभागृह, कृपा करून गंभीर विषय आहे आणि मी सभागृहाला एक माहीती पाण्या बदलची देण्यासाठी इच्छुक आहे. कृपा करून आपण शांततेने ऐकावे कारण दैनंदिनचा हा प्रॉब्लेम आहे. नेमके काय झाले? पाणी कुठे जाते हे आपल्या सभागृहाला माहीती असणे गरजेचे आहे. मला वाटते मागच्या आठवडयामध्ये सुर्वे साहेबांनी विनंती केली होती की, आमच्या वार्डामध्ये गंभीर

प्रश्न आहे आणि श्री. अरूण आशान तुमच्या ग्रुपचे दोन तीन लोक होते. त्या वार्डमध्ये आपण बैठक घेतली आणि त्या वेळी बैठकीमध्ये आपल्याला बरीचशी माहीती मिळाली पाणी किती येते, कोणाला उशिरा पाणी येते, कोणाला लवकर येते. तर मी सभागृहाला एक महत्वाची माहीती देवू इच्छितो की, आपल्याकडे तीन ठिकाणावून पाणी येते. एकाच एस.आर.मधून म्हणजे एम.आय.डी.सी. चा हनुमान टेकडीवरती जो जी.एस.आर. आहे, त्या ठिकाणावून आपल्याला १०५ एम.एल.डी. पाणी, त्याच्या नंतर ११ एम.एल.डी. दुस—या जी.एस.आर. मधून येते आणि त्याच्या नंतर अंबरनाथकडे जी नविन लाईन आहे, पाले गावातून आपल्याला ४५ एम.एल.डी. पाणी येते. असे आपल्याला १६१ एम.एल.डी. पाणी कपात न करता येते. म्हणजे आज येत नाही आणि ख—या अर्थाने आपल्या शहराची लोकसंख्या जी पाच लाख, सहा हजार लोकसंख्या आहे आणि टोटल पॉप्युलेशन जरी पकडले, सहा लाख जरी पकडले तरी आपल्याला १३५ लिटर पर डे, पर हेड या कॅलक्युलेशन प्रमाणे हे फक्त ८१ एम.एल.डी. पाणी लागायला पाहीजे. परंतु आपल्याला डबल पाणी येते. मग हे पाणी जाते कुठे हा फार गंभीर प्रश्न आहे. त्याच्यामुळे आता कपात करून जे पाणी आपल्याला येत आहे, तर ते एकाच एस.आर. मधून आपल्याला १०५ एम.एल.डी. ऐवजी ९० एम.एल.डी. पाणी येत आहे. दुस—या एस.आर. मधून ११एम.एल.डी. ला ११ एम.एल.डी. येत आहे आणि पाले गावातून जे ४५ एम.एल.डी. यायला पाहीजे तिथून आपल्याला फक्त ४० एम.एल.डी. पाणी येते. असे आपल्याला १४१ एम.एल.डी. पाणी येते. आता आपण जरी कागदोपत्री क्यालकूलेशन करून म्हणटले की, ८० एम.एल.डी. पाणी या शहराला भरपूर आहे. मी म्हणतो की १०० एम.एल.डी. पाणी आपल्याला भरपूर आहे. परंतु बाकी लिकेजचे प्रमाण या शहरामध्ये भरपूर आहे आणि लिकेज काढण्यासाठी आपण ४ प्रभागामध्ये ४ ग्रुप आपण तयार केले आहेत, ४ ग्रुपकडून लिकेज काढण्याचे काम पण चालू आहे. तर एवढया मोठया प्रमाणामध्ये लिकेज आहेत. तर ते एकदम एका महीन्यामध्ये काम होणार नाही. तरी आपण हळूहळू हे लिकेज काढत आहोत. तर सगळयात महत्वाचा मुद्दा जो आहे, तो आपण १ कोटी ३५ लाख रूपये काही तरी १० महीन्यापुर्वी किंवा १ वर्षापुर्वी आपण भरले होते. त्याच्या नंतर मी आल्या नंतर दोन पत्र दिले, इथला पाण्याचा गंभीर प्रश्न आहे, हे लक्षात आल्या नंतर पहीले पत्र दिले त्याचा काही रिसपॉन्स मिळाला नाही, दुसरे पत्र दिल्या नंतर सुध्दा रिसपॉन्स नाही. मी स्वत: त्यांचे जे कार्यकारी अभियंता आहेत, त्यांना बालला की, आमच्याकडे एवढा गंभीर प्रश्न असतांना तुम्हांला सहा मिटर लावण्यासाठी विनंती केली आहे आणि पैसे भरल्या नंतर सुध्दा तुम्ही आम्हांला रिसपॉन्स देत नाहीत. तुम्ही मिटर आज लावतो, उद्या लावतो, पण लावत नाही. मग माझी फोनवर बरीच बाचाबाची झाली. नंतर त्यांना जाग आली आणि मी स्वत: काल चारही जी.एस.आर. ला भेट दिली आहे. काल दुपार पासून दुसरे काहीही काम केले नाही. सकाळी १०.०० वाजता निघाल्या नंतर सर्व जी.एस.आर. वर जाऊन तिथे काय परिस्थिती आहे, हे बघीतल्या नंतर आपला जो हनुमान टेकडीचा जी.एस.आर. आहे, त्या ठिकाणी दोन मिटर लावलेले आहेत. त्याचे रिडींग रूम पण तयार करण्याचे काम चालू आहे. एका ठिकाणी दुसरे मिटर लावलेले आहे, त्या ठिकाणी मिटर रिडींगचे रूम सुध्दा तयार झालेले आहे आणि त्यांनी आपल्याला पाणी जे त्यांना येते, मी म्हणटले की, मला ते चालणार नाही.

मला तुम्ही आऊट लेटला मिटर लावला पाहीजे. तुमच्याकडे पाणी किती येते? ते आम्हांला देणेघेणे नाही. तुम्ही आम्हांला पाणी किती देतात? हे आम्हांला कळायला पाहीजे. त्याच्यामुळे पाले गावाला दोन मिटर लावले आहेत, तिथे एक एम.आय.डी.सी. चा फरक आहे. मी म्हणटले भाऊसाहेब १ एम.एल.डी.चा एक दिवसाला आहे. म्हणजे मला महीन्यातून ३० एम. एल.डी. पाणी कमी देतात. मी आल्यानंतर दोन पत्र दिले की इथे पाण्याचे गंभीर प्रश्न आहे आणि लक्षात आले नंतर पहिले मी एक पत्र दिले त्यांचे काही उत्तर मिळाले नाही परत दुसरे पत्र दिले तरी त्यांचे काही रिसपॉन्स मिळाला नाही. मी स्वत: म्हणजे त्यांचे जे कार्यकारी अभियंता आहे त्यांना मी बोललो की आमच्याकडे पाण्याचे एवढी गंभीर समस्या असताना तुम्हाला आम्ही सहा मिटर लावण्यासाठी विनंती केलेली आहे आणि पैसे भरल्यानंतर तुम्ही आम्हाला रिसपॉन्स देत नाही. तुम्ही मिटर आज लावतो उदया लावतो म्हणता पण लावत नाही आणि माझी फोनवर वरच वाचावाची झाली त्याच्या नंतर मग त्यांना जाग आली आणि मी स्वत: काल चार ही जी.एस.आर ला पहाणी करून आलो आणि काल दुपारपरंत काही दुसरे काम केले नाही. सकाळी १०.०० वाजता निघाले नंतर सर्व जी.एस.आरवर जाऊन तिथे काय परिस्थिती आहे ते बघितले आहे तर आपली जी हनुमान टेकडी आहे तिथे दोन मिटर लावलेले आहे आणि त्याचे मिटर रिडींगरूम पण तयार करणेचे काम चालू आहे. मी म्हणटले की मला ते चालणार नाही मला ते आउटलेटला मिटर लागले पाहिजे. म्हणजे तुमच्याकडे किती पाणी येते याचे मला देणें घेणे नाही. तुम्ही आम्हाला पाणी किती देतात हे आम्हाला कळले पाहिजे. त्यामुळे दोन मिटर जे पाले गावमध्ये लागले आहे तिथे एक एम. एल.डी च्या डिफरेंट आहे मी म्हणटले भाउ एक एम.एल.डी एक दिवसाचा आहे.म्हणजे मला महिन्यातून तुम्ही ३० एम. एल.डी पाणी कमी देता त्याच्यामुळे तुम्ही आम्हाला किती पाणी कमी देता आणि आमच्याकडून किमी पैसे घेतात त्याच्या काही हिशोबच नाही. कारण की माझ्या शहराला पाणी लागते किती? ८६ एम.एल.डी लागते.मी असे गृहित धरतो की १०० एम.एल.डी पाणी लागणार. पण ४० एम.एल.डी पाणी कुठे जाते? माझा एक अंदाज असा आहे की जरी समजा १० टक्के लिकेज असेल डबल पकडू २० टक्के २० एम. एल.डी पाणी दररोज कुठे जाते? म्हणजे याच्यामध्ये अनाधिकृत नळजोडण्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्याच्या बददल मी कालच आदेश काढले आहे. की अशा प्रकारचे काही कनेक्शन असतील तर त्याच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करायचे आणि कनेक्शन कट करायचे.त्याचे शिवाय आपल्याला शहरात पाणी मिळणार नाही. त्याचा शोध म्हणून मोहिम आणणेची आखली आहे आणि ते चालू करून ज्या ठिकाणी बोगस कनेक्शन मिळेल त्याच्यावर कडक कार्यवाही करण्यात येईल. त्याचे शिवाय आपल्याला पाणी मिळणार नाही. माझी तरी प्रथमदर्शनी ही भावना झाली आहे. एवढे पाणी आपल्याला येते तर जाते कुठे? म्हणजे हा एक संशोधनाचा विषय बनला आहे. त्याच्यामुळे या शहरात पाणीची दयनीय दशा आहे. जसे समजा ३,४,५ मध्ये पाण्याची गंभीर अवस्था आहे. तसा १,२ आणि ३ मध्ये आहे.म्हणजे १,२ मध्ये गंभीर प्रश्न आहे.आणि बाकीचे झोनमध्ये पाणी येते. काही ठिकाणी २४ तास पाणी येते. काही ठिकाणी भरपूर पाणी आहे आणि त्याच्या बाजूच्या प्रभागामध्ये पाणी नाही. मग हे बरोबर करण्यासाठी आपल्या जे मागे जवाहरलाल नेहरू पुर्नोत्थान योजनेमध्ये जो काही राहिलेली कामे

आहे ५०, ६० कोटीच्या की ज्या ठिकाणी जी. आय पाईप लाईन टाकली त्याच्या फिलिंग राहिली आहे ते ५०,६० कोटीच्या काम केले नंतर जुनी लाईन कट करता येईल. आणि नविन लाईनमध्ये आपल्याला व्यवस्थित पाणी देता येईल.ते काम देखिल करणे गरजेचे आहे. त्याच्या नंतर जूनी लाईनमध्ये पण पाणी आणि नविन लाईनमध्ये पण पाणी चालू राहिल. अशा प्रकारे चालू असल्याप्रमाणे पाणी कुठे जाते माहिती पडत नाही. तर त्याच्या शोध घेणेसाठी आम्ही पथक नेमलेले आहे काल तसा आदेश काढलेला आहे ज्या ठिकाणी बोगस कनेक्शन मोठया प्रमाणात आहे त्याच्या शोध घेणेसाठी आम्ही मोहिम घेणार आहोत आणि त्याच्यामध्ये बिल असे मिळेल मला असे वाटते. आता आपल्या सभागृहाची भावना लक्षात घेवून मा. महापौरांनी अशी घोषणा केली आहे की सर्व पक्षाचे जे पदाधिकारी आहे म्हणजे आपल्या महानगरपालिकेचे मा. महापौर, उपमहापौर, सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते, सभापती आणि प्रत्येक पक्षाच्या एक प्रतिनिधी या सर्वांना बोलून सोमवारी आपण सर्व आणि एम.आय.डी.सी त्याच्या अधिका—यांना आजच पत्र देऊन आणि आपले अधिकारी असे सर्व मिळून बसून चर्चा करू त्याच्यावर काय नेमके केले पाहिजे? आणि एरिगेशन डिपार्टमेंटचे लोकाना पण तिथे बोलावून घेवु कारण की हा प्रश्न दैनंदिनचा आहे त्याच्यामुळे हा प्रश्न एकदम गंभीर प्रश्न आहे आणि तो सुटला पाहिजे. आणि आपल्याला हक्काचे पाणी मिळाले पाहिजे. आपल्याला पाणी येते पण मिळत नाही त्याच्यामुळे आपण सोमवारी बैठक लावू मा. महापौर मॅडम आपल्या सोयी प्रमाणे जौ वेळ देतील त्यावेळेमध्ये बैठक लावू. मी आज सर्व अधिका—यांना पत्र काढतो आणि त्याना बोलून घेतो. श्री. सेलवन आणि श्री. सोनावणे हे दोन अधिकारी हया सभागृहात उपस्थित नाही मी सभागृहात माहिती देऊ इच्छित होतो की मा. मंत्रीमहोदयांचा  काल फोन आला होता श्री सेलवन यांना त्वरित तिकडे बोलावल्यामुळे ते सभागृहात नाही आणि आपल्याकडे इथे १०० कोटीच्या वॉटर ट्रीटमेंट प्लान पाण्याचा चालू आहे. हेच अगोदर पाणी पुरवठाच्या अधिकारी इकडून रिलिव्ह झालेले आहे. सेलवनाला पण रिलीव्ह करा म्हणून फोन आला होता मी म्हणटले साहेब आमची अशी अशी परिस्थ्‍िती आहे आमच्याकडे एकही इंजिनियर नाही ते म्हणतात आमच्या जीवावर तुमची नगरपालिका चालली आहे का तुम्ही त्यांना रिलिव्ह करा,असे मला त्यांच्याकडुन आदेश येत आहे,काल मी कल्पना दिली आहे महापौर मॅडम व श्री राजेश वधारीया यांना त्यांनाा सांगितले आहे की अशी परिस्थिती आहे आपल्याला काही तरी करावे लागेल त्यांना ५ वर्ष झाले त्यांना रिलीव्ह केल्याशिवाय गत्यंतर नाही,एकाला कुणाला तरी ठेवू एकाला कुणाला तरी रिलीव्ह करु,म्हणजे अशी बेकार परिस्थ्‍िती झाली आहे.त्यामुळे आपल्याला पाणी पुरवठा एवढी मोठी स्कीम १०० कोटीची आहे, संताजीनगरला युध्द पातळीवर काम चालू आहे मी जॉइन झालो तेव्हा १० टक्के होते आता ४० टक्के काम होत आहे, आणि आपल्याला वेळेतच म्हणजे जानेवारी पर्यत एक स्कीम पूर्ण करायची आहे. दुसरी स्कीम आपल्याला मे जूनमध्ये पूर्ण करायची आहे. त्यामुळे विहित वेळेत काम पूर्ण केले नाही तर पुन्हा ते काम केल्याचे फलीत मिळणार नाही. त्यामुळे सभागुहाला मी विनंती करतो की हा ठराव घेवून शासनाला कळवू या काय करायचे ते तुम्ही ठरवा.अशी मी आपल्याला विनंती करतो धन्यवाद.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** मा. महापौर जी हे पहा आयुक्त साहेब आम्ही सप्टेंबर महिन्यात एक ठराव पास केला आहे ज्यात अग्निशमन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पाणी पुरवठा विभाग, विधुत विभाग ज्यामध्ये अभियंतांची कमतरता आहे ते पद तात्काळ भरण्यासाठी प्रशासनाकडून प्रस्ताव होता की इतकी पदे आता भरा आम्ही त्यांना परवानगी दिली आहे हा मुददा मा. मुख्यमंत्री याच्याकडे उपस्थित झाला होता. त्याची परवानगी अजून ही आपल्याला मिळानी नाही. तर आपण आपल्या स्तरावर नगरविकास विभागाकडे पाठपूरावा करून आपल्याला मंजूरी दयायला सांगा. पाणी पुरवठा विभागात पाच अभियंता आहे, पाच सार्वजनिक बांधकाम विभागात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे दोन व पाणी पुरवठाचे दोन अभियंता गेले तर काम ठप्प होवून जाईल. त्यापेक्षा चांगले आहे की आता वेळ आहे की भरती करण्याची भरती नाही झाली तर आज ना उदया अभियंता सेवानिवृत होणार किंवा कोणी स्वेच्छानिवृती घेणार आणि यांचे बदलीचे आदेश आहे म्हणून लवकरात लवकर भरती झाली पाहिजे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—** साहेब या संदर्भात मी आपल्याला माहिती देवू इच्छितो हा माझा २७ नं. चा प्रश्न होता हा ९/६/२०१७ चा प्रश्न होता आपल्या आस्थापनेवर किती पदे आहे उपायुक्त किती आहे? इंजिनियर किती आहे? आणि शासनाकडे आपण किती मागितले आहे? याचे उत्तर अदयाप मिळाले नाही. आणि अजून आपण आपल्या स्तरावर काही करत नाही शासनाकडे काय मागणार मागितली माहिती आता दयायला तयार नाही ९/६/२०१७ आपण कृपया पहा प्रश्न काय आहे? तुमचा लक्षत येईल किती सक्षम आहे.

**सदस्य श्री. जमनादास नुरस्वानी:—** मा. महापौर जी, मा. उपमहापौर जी, आयुक्त जी

**सदस्य श्री. धनंजय बोडारे—** सभागृह नेता जी, मा. आयुक्त साहेब या प्रश्नाचे उत्तर सर्वसामान्य जनता आम्ही लोक प्रधिनिधी आहोत आम्ही देवू शकत नाही. प्रशासनाचे काम आहे मी वारंवार प्रश्न उपस्थित केला की हे पाणी जाते कुठे? मुरते कुठे? राजकीय हस्तक्षेप असेल तर सांगा त्यांचे काय करायचे आहे ते सांगा सर्वसामान्य लोकांना माहित नाही की २४ तासाचे ३० तास म्हणजे आज संध्याकाळी ६ वाजल्या पासून पाले पासून म्हणजे बदलापुर पासून साधारण ६ वाजता बंद होणार लोकांना सागायचे काय? आता पासून फोन येत आहे पाणी येत नाही म्हणजे खरोखर समस्या सोडवायचे आहे का? मी शासन आणि प्रशासनाना दोघांना बोलतो विरोधी पक्ष नेता भुमिकेतून बोलत आहे समन्वय आहे तो पर्यत ठीक आहे.इथे शासन करते काय? शासनाची जबाबदारी आहे की नाही महापौर, उपहापौर, सभागृह नेता यांना माहिती पडत नाही का? लोकांना उत्तर दयायचे आहे. आयुक्त तुम्हाला तरी माहित होते का? की ६ वाजल्या पासून पाणी बंद होणार आहे असे चालणार आहे का? आमच्या चौधरी साहेबांना विचारले लोकांना काय सांगायचे कुटे २४ तास पाणी आहे कुठे २८ तास आहे ३० तास पाणी असेल माहित नाही,कुठे अर्धा तास पाणी मिळते त्यात सुध्दा दोन दिवस नाही आधी माहित असते तर त्यांनी तयारी करुन ठेवली असती म्हणजे मागच्या आठवडयापर्यंत शुक्रवार रात्री १२ वाजेपर्यंत पाणी मिळणार नाही याचा परीणाम पुढच्या रविवारपर्यंत चालणार म्हणजे गुरुवारी पाणी भरुन ठेवायचे रविवारपर्यंत चालवायचे ती लोक आमच्याकडे येतील आम्ही काय सांगायचे म्हणून कंचन लुंड मॅडम म्हणाल्या आमच्याकडे पण तोच प्रॉब्लेम आहे.माझा वार्ड

टेलएन्डला आहे,तुम्ही तिन्ही सोर्स सांगितले आहे डीएमबीआर आणि पाले एकदम शेवटचे टोक आहे चार चार पाच पाच दिवस पाणी मिळत नाही आहे,आता संध्याकाळी उत्तर काय दयायचे हा प्रश्न आहे बर सांगायला जावे तर अधिकारी कुणीच नाही तुम्ही आता सांगितले हिरे साहेब असताना आम्ही एक प्रस्ताव पारीत केला आहे,महापालिकेचे अभियंते घ्यावे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता सितलानी आहेत शेवकानी जितू असे चार पाच, नगरपालिका असताना दहा दहा बारा बारा अभियंते होते कार्यकारी अभियंता होते आता चार पाचच आहेत एमजेपी चे अभियंते सेलवन व सोनावणे आपलयावर मेहरबानी करतात कारण त्यांना नोटीस आली आहे,तरी ते इथे थांबलेले आहेत त्यांच्या मनात आले तर ते उदया सुध्दा जाउ शकतील महापालिकेची अवस्था काय असणार आम्हाला खरोखर महापालिकेचा विचार करायचाा की नाही की आहे त्यावर खुष राहयचे आमची सत्ता आहे आम्ही नगरसेवक आहोत शहराचा विचार कधी करणार आम्ही नगरसेवक आहोत इंजिनियर भरतीबाबत  प्रशासनाने का पेंडीग ठेवले आहे हिरे साहेब असताना ते गेले निंबाळकर आले ते गेले आम्ही निविदा काढली आहे म्हणजे परमनंट भरती करेपर्यंत आम्ही ठेकेने घेणार महापालिकेचे इंजिनियर अशा भुमिका घेणार का? पुन्हा तोच प्रश्न उरतो की महापालिकाचे काम नक्की चाललय काय? नगररचना विभाग एकदम ठप्प आहे करवसुलीसाठी तुम्ही मोहिम राबविली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग तेथे इंजिनियर नाही. परवा मी चौकशी केली शेवकानी सुटटीवर सितलानी रजेवर अश्विनी आहुजा कुठे बाहेर बसले होते या महापालिकेचा सार्वजनिक बाधकाम विभाग एवढा भरलेला असायचा. एक इंजिनियर नव्हता. पाणी पुरवठा विभागाची तीच अवस्था आहे, रामभरोसे चालले आहे. सेलवनना काही पडले नाही. आज कोणत्या विभागात किती पाणी येते हे त्याना माहिती नाही. इजिनियरनां सुध्दा माहिती नाही वॉलमनच्या भरवशावर चाललय आहे काधी लाईट बंद होतात कधी पंप बंद होतात काल रमाबाई टेकडी येथिल पंप बंद झाला होता पाणीच आले नाही. परवा मराठा सेक्शनच्या येथिल गेट पडले इजिनियर लोकांना माहिती नाही. गेट पडले म्हणून पाणी नाही, पंप बंद म्हणून पाणी आणि आज एम आय डी सी ने अजिबात बंद केले. म्हणून पाणी नाही या शहरातील लोकानी बघायचे कुणाकडे? आयुक्त, महापौर, उपमहापौर, सभागृहनेता लोक कोणाकडे जाणार नगरसेवक काय उत्तर देणार ही परिस्थिती आहे लोक करणार काय? आणि उदया परवा पाणी बंद म्हणजे लातुर नगरची लोक ग्रामीण भागामध्ये पाणी नाही म्हणून इथे आले ते म्हणतात तिकडे बरे इकडे असे आहे. चार पाच दिवस झाले पाणी नाही सहाव्या दिवशी पाणी येईल याची खात्री नाही ही आमची महापालिका आहे. सर्वाजण कधी विचार करणार की नाही जबाबदारीने, आम्ही फक्त नगरसेवक आहोत, सभागृहनेता आहोत, विरोधी पक्ष नेता आहोत, प्रशासनाने यावर गंभीरपणे विचार करावा. हे तातडीने करावे मी महापौर, उपमहापौर यांना विनंती करतो. महापौर अपेक्षा पाटील, राजश्री चौधरी होत्या, निर्मलाताई होत्या, आशान मॅडम होत्या लगेच आमचे तातडीने हालचाल होती. मंत्री पासून अधिका—यांपर्यंत सर्वानां हलवायचे आहे. ही मनमानी चालणार आहे का? म्हणन चौधरी साहेब रोष व्यक्त करत होते. मनात आले की पाणी बंद अगोदर पुर्व सुचना दिली पाहिजे नगरपालिकेला कळवले पाहिजे महापालिकेने नगरसेवकांना आणि लोकाना हेच मनात आले पाणी बंद, मॅसेज पाठवतात आता फोना फोनी सुरू झाली लोक विचारतात पाणी आले

नाही आम्ही काय उत्तर दयायचे. काल सांगितला गेट पडले.परवा मोटर बंद होती आज काय उत्तर देऊ. लोक वाट बघतात पाण्याची म्हणून त्या दोंघी बसल्या. सर्व नगरसेवकांची भुमिका ही उत्तर काय दयाचे लोकांना. या बाबतीत प्रशासन आयुक्त साहेब तुम्ही तातडीने उपाययोजना करतात ही तुमची ख्याती आहे. मी तुम्हाला सांगितले आहे तिघांची हिरे साहेबांने प्रस्ताव घेतला होता आणि मान्यता दिली होती की लवकरात लवकर इंजिनियर भरा.जाहिरात काढा. नंतर पाणी कुठे मुरते माहिती नाही. अग्निशमन बाबतीत तेच आहे अग्निशमन सुध्दा कसे चालते तिथे पण ठेकेदार पध्दीने आहे जर ते म्हणाले आम्ही येणार नाही आणि बाहेर कुठे आग लागली तर महानगरपालिका आपले काही करते का, एक ही सेवा नाही न परिवहन ,न नगररचना न सार्वजनिक बाधकाम कुठले काम होत नाही. पाणी पुरवठा विभागात सुध्दा कामाचे नाही पाणी पुरवठा फक्त फक्त वॉलमनचा आधारावर चाललेले आहे.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे—** वॉलमनला इथे १४ हजार पगार जातो त्यांच्या हातात ७ हजार रूपये अरे काय किती कहर आहे बोलायला पण लाज वाटते.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे—** आज पाणी येईल की नाही अचानक तातडीने पाणी बंद केले आहे.

**सदस्या श्रीम. मिना सोनेजीः—** वॉलमन वेळेवर येत नाही. नगरसेवकाला वॉलेमन बनून वॉल उघडावा लागतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे—** आज काय करणार? मी पूर्ण उल्हासनगर विषयी बोलत आहे. आज ४ वाजता पाणी जाणार आहे आपण काय उपाययोजना करणार? तुम्हाला माहित नाही तो पर्यत ठीक आहे आता तुम्हाला माहित पडले आहे. त्यानंतर तुम्ही काय केले? प्रशासन म्हणून शासन म्हणून तुम्हाला माहित नाही तो पर्यत ठीक आहे ६ नंतर पाणी नाही तुम्ही एम आय डी सी ला जाऊन विचारले काय? इरिगेशनला जाऊन विचारले का? हे काम तुमचे आहे. माझ असे म्हणणे आहे की जोपर्यत निर्णय होत नाही तोपर्यत सभा स्थगित करा. एम आय डी सी ला इरिगेशनला फोन केला का? अशी मनमानी चालणार नाही. दादागिरी खपवून घेणार नाही.

**सदस्य श्री. अरूण आशान—** पाणी नाही तर सभा नाही. दोनजण खाली बसली आहे. सर्वानी खाली बसले पाहिजे. आयुक्त साहेब हा शहराचा गंभीर विषय आहे. पाणी नाही तर सभा नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**— मा. महापौरजी, मा आयुक्त साहेब आज सभागृहात दोन नगरसेविका खाली बसल्या आहेत, कंचन लुंड व चैनानी मॅडम आज जो मुददा सभागुहात उपस्थित केला आहे मा आयुक्त साहेब लहान लहान गोष्टींमुळै पाण्यावर श्वेतपत्रिका पण काढली परंतु आपली पाणी वाटप सिस्टम जी आहे.

**इकडे काही सदस्य पाणी दया पाणी दया ओरडत होते.**

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—** चौधरीजी खुलासा तर करु दया एम आय.डी.सी इरिगेशन विभागा व्यतिरिक्तही बोलू तर दया चर्चा तर करु दया.

**यावेळी श्री. अरुण आशान, श्रीम. राजश्री चौधरी, श्रीमती वसुधा बोडारे, श्री. शंकर लुंड, श्री. चंद्रशेखर यादव, श्रीमती सुरेखा आव्हाड, श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती ज्योत्स्ना जाधव, श्रीमती ज्योती गायकवाड, श्रीमती अंजना म्हस्के, श्रीमती चरणजितकौंर सिंह, श्रीमती अंजली साळवे, श्रीमती शितल कदम, श्री. राजेश वानखेडे, श्री. प्रमोद टाले, श्री. अजित गुप्ता हे सदस्य खाली जमिनीवर व्यासपीठासमोरील मोकळया जागेत जावुन बसल. व जोर जोरात पाणी दया पाणी दया ओरडत होते.**

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी— अरुणजी बोलण्यापेक्षा आपण आयुक्तांकडून उत्तर तर मागू ना मा आयुक्त साहेब सभागृहात एक मोठा मुददा उपस्थित झाला आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:— पाण्याचा गंभीर विषय आहे पाण्यावर बोलू दया

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— मी पाण्यावरच बोलत आहे ना

**यावेळी सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, श्री. सुरेंद्र सावंत, श्री. कलवंतसिंह सोहता, श्री. स्वप्नील बागुल, श्री. राजेंद्र चौधरी, श्री. धनंजय बोडारे हे व्यासपीठासमोर येवुन उभे होते.**

**इकडे काही सदस्य पाणी दया पाणी दया ओरडत होते**

सदस्य श्री प्रमोद टाले:— आयुक्त साहेब शहराची मध्ये जी पाणी टंचाई झाली त्याचे आणखी एक कारण म्हणजे सेलवन हा जो कार्यकारी अभियंता आहेत त्यांच्याखाली ६ सेक्शनल इंजिनियर आहेत त्यामध्ये तो एकाही इंजिनियरला एकही जबाबदारी देत नाही. जेवढे प्रोजेक्ट आहे तो एकटाच हॅडल करतो कुणाला देत नाही. कुठल्याही शाखा अभियंत्याला काम करु देत नाही. त्याच्यामुळे आज ही परिस्थिती निर्माण झाली.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— बोडारेजी तुम्ही सभा स्थगित करायला सांगत आहात ते करु पण तोपर्यंत चर्चा तर करु . दोन मिनिटे शांत बसलो तर या सभेत आपण जर चर्चा केली नाही तर कसे चालेल.

सदस्य श्री. धनंजय बोडारे— एम.आय.डी.सी वाल्यांशी बोललो ते म्हणतात इरिगेशन विभागाने बंद केले आहे इरिगेशन मंत्रीशी तुम्ही बोलून घ्या. आजचे शट डाऊन बंद करा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— तुम्ही आधी बोलू तर दया फक्त गोधळ घालून समस्या सुटणाार आहे का? सभा स्थगित करुन समस्याचे समाधान होणार आहे का? आपण शांत बसा आपण शांत बसणार नाही आणि बोलणार

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:— आपण समाधान करा ना त्यांचे ते खाली बसलेत

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— बसू दया ना त्यांना कोणी उठा म्हणत नाही आहे.मी बसेन तुमच्यासोबत

सदस्य श्री. धनंजय बोडारे— तुम्ही त्यांना बसा म्हणताय.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— मी बसेन तुमच्यासोबत

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:— तुम्ही नेहमी असेच करता

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— आपण फक्त ओरडणार अजून पाण्याविषयी काय काय तक्रारी आहेत. आयुक्तांशी चर्चा करणार नंतर सभा संपवु मा. महापौर मॅडम

<u>**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी**</u> :— मा. सभागुह नेताजी लक्ष दया आमच्या शहरात पाण्याची समस्या आहे. आपल्याकडे दोन मोठी पदे आहेत भाभी ज्योती कालानी मा आमदार आहेत आपली महापौर साहेबा त्याचा परीवारातील आहे. एक त्यांच्या फोन केलयाने शहराला पाणी मिळू शकते का नाही आपण त्याचा फायदा घ्यायचा हे तुम्ही का विसरता शहराची पूर्ण बागडोर त्यांच्या हातात आहे. मा. महापौरजी मला एक मिनिट विनंती करण्यासाठी परमिशन दया तुम्हा सर्वांना माहित आहे उल्हासनगर ४ व ५ यात अनेक प्रभाग त्यात आहे. पॅनल न १७ काही भाग आमच्या ४ नंबर मध्ये येतो ४ नंबर आणि ५ नंबर सोबत आहे.जसे शेरीसाहेबांनी सांगितले अचानक पणे पाणी विभाग आदेश न देता आशान साहेब जरा बोलू दया

<u>**सदस्य श्री. विजय पाटील**</u> :— मा. महापौर मॅडम आयुक्त साहेब आपणच आता म्हणालात बाकीच्या भागात २४ तास पाणी आहे. आपणच म्हणालात

<u>**सदस्य श्री. अरुण आशान**</u> :— साहेब आपण सांगितले २४ तास पाणी आहे आम्हाला एक तास तरी दया तुम्ही नंबर दिला आहे फोन करा अभिनव योजना आहे फोन करा पाणी मिळवा.

<u>**सदस्य श्री. विजय पाटील**</u> :— हे बघा आपल्या अधिकारींना याचा अर्थ माहित आहे की २४ तास कुठे पाणी चालू आहे मग सिस्टीम का बनत नाही जरा बोलू दया जेव्हा आपणच म्हणता एका बाजूला २४ तास पाणी आहे तर एका बाजूला अर्धा तास सुध्दा मिळत नाही. त्यांच्यावर कारवाई कोण करणार आहे. आपणच करणार आहात बर आतापर्यंत कारवाई केली का त्यांच्यावर,? बर जेवढया बिल्डिंग आहेत त्यांच्याकडे २४ तास आहे. का झोपडपटटीत २४ तास आहे का चाळीत २४ तास आहे. आणि दोन दोन चार चार लाईनी कुणाच्या घरात आहेत. या चेक कुणी करायच्या आणि आपणच म्हणता एका बाजूला २४ तास पाणी आहे मग हे चेक कुणी करायचे आम्ही. की आपण? मग आपले अधिकारी काय करत आहेत? त्यांना माहित आहे याचा अर्थ आपले अधिकारी का गप्प आहे? काय तरी गडबड आहे ना ? काहीतरी आहे जर एकाकडे चार चार लाईनी असतील दोन दोन असतील तर कट का करीत नाही? म्हणजे कुठेतरी पाणी मुरते हे खर आहे. पाणी जाते कुठे? पाणी जाते याची चौकशी करा आपल्या अधिका—यांना लावा कामाला. ज्याच्या घरी चार चार लाईनी आहेत त्या कट करायला लावा पहिले. बर बिल्डिंगमध्ये पाणी कसे दिले पाहिजे त्याला काही असेल ना ४० घर जर एका बिल्डिंग मध्ये असतील तर त्यांना कसे पाणी दिले पाहिजे याचा नियम असेल त्याला टाकी पाहिजे कुठलीही इमारत घ्या त्याला चेक करा सगळयांच्या घरी दोन दोन लाईनी असतील ते चेक करुन कट कोणी करायच्या जा ना इमारतीत चेक करा ना. डायरेक्ट लाइन आहे की नाही बघा २५ प्लॉटची जर इमारत असेल तर त्याच्या बिल्डीगमध्ये ५० कनेक्शन असतील. लिहून देतो साहेब मी तुम्हाला ५० कनेक्शन असणार चेक करा. किती दिवसात अधिकारी चेक करणार तेवढे तरी सांगा. याच्यासाठी तुमची टीम कधी लावणार ते तरी सांगा. महापौर मॅडम उत्तर दयायचे नसेल तर आम्ही बोबलायचे कशाला? कधी पासून चालू करणार ते मराठीतून समजत नाही तर मी सिंधीमध्ये बोलतो. (येथे सिंधीमध्ये सदस्य बोलले) म्हणजे एखादा नगरसेवक बोबलतो तुम्ही उत्तरच देणार नाही हा काय प्रकार चालला आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>ः— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब सभागृहात आज सर्व सदस्यांनी पाणीच्या विषयावर चर्चा केली आहे आमचे विरोधी पक्ष नेता श्री घनंजय बोडारेजी यांनी क्त्यिेक विषय सांगितले आहे आज मी आहे बोडारेजी आहे आम्ही १९९७ पासून महानगरपालिकामध्ये आहोत त्यात सार्वजनिक बांधकाम विभाग आहे, पाणी पुरवठा विभाग आहे, नगररचना विभाग आहे,सर्व विभागात इंजिनियरची कमतरता आहे त्याविषयावर त्यांनी लक्ष केन्द्रीत केले. आज पाण्याची जी समस्या आहे तुमच्या सांगितलया प्रमाणे ९० एम.एल. डी. किंवा १०० एम.एल.डी. पाण्याची पुर्तता होवू शकते परंतु आम्हाला १४०एम.एल.डी. मिळून पण पाण्याची समस्या आज परत झाली आहे. सर्व शहरामध्ये या पूर्वी पण आयुक्त आले त्यांनी श्वेतपत्रिका जाहिर केली परंतु काही समाधान झाले नाही. मा. आयुक्त साहेब पाण्याच्या विषयावर जे आमचे सन्माननीय सदस्य बोलतात यात पाणी पुरवठा विभाग, एम. आय. डी सी व इरिगेशन विभाग असून पण जे आम्ही करू शकतो ते पण पुर्ण केले नाही. मा. महापौरांना विनंती करेन की आपण मा. मंत्री श्री. गिरीष महाजन यांचा वेळ घ्या. आपण आपले पालक मंत्री यांना पण सोबत घेऊन जावू शिवसेनेचे पदाधिकारी चलतील. पाण्याची कपात किती टक्के झाली पाहिजे कधी झाली पाहिजे या गोष्टीचा खुलासा झाला पाहिजे. आयुक्त साहेब आम्ही आपल्याशी किती वेळा यावर बोललो. महापालिका जे काम त्वरित करू शकते त्या कामाकडे पण आपले लक्ष वेधले आहे ती काम पण आजपर्यत झाली नाही. जसे तीन वर्षापूवी पाण्याची खूप मोठी समस्या झाली होती. त्यावेळी प्रत्येक प्रभागात बोरींग लावल्या होत्या. हॅन्डपंप, बोरींग रिपेरींगचे काम अर्धवट राहिले आहे. मा. आयुक्त साहेब खूप ठिकाणी जिथे लाईटचे मीटर लावले आहे पाण्याचे बोरीगमध्ये महानगरपालिकेने लाईटचे बिल भरले नाही म्हणून मीटर घेवून गेले त्यामुळे टंचाईच्या वेळी बोरींग वापरली जाते ते पण मीटर काढून घेतल्याने चालू नाही. आपण आपल्या अधिका—यांना बोलवा जे लाईटचे मीटर आपण बोरीगवर लावले आहे ते मीटर विधुत विभागाने का काढले आहे. दुसरे आम्ही म्हणालो होतो की पाणी वितरण बरोबर नसल्याने काही ठिकाणी आपण टॅकरने पाणी देत होतो. ते पण आपण सुरू केले नाही. लिकेजचा जो विषय आहे आपण व्हॉटसअप ग्रुपवर पहा लिकेजचा पण मोठा विषय झाला आहे वेगवेगळया प्रभाग समितीत अनेक लिकेज आहे पाणी खूप सारे वाहत आहे सर्वांची भावना पाहून कोणी असो मी असो, शहर असो सर्वाना पाण्याचा त्रास आहे लाईटचे जे मीटर काढून नेले आहे ते लगेच लावले पाहिजे. इरिगेशन एम.आय.डी.सी पाणी पुरवठा विभाग याची बैठक सोमवारी मा. महापौर लावत आहे ती सोमवारी ठेवून मंगळवार किवा बुधवारी आपण मा. मत्री श्री. गिरीष महाजन यांचा बैठकीसाठी वेळ घ्या.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>— आपण आधी एम.आय.डी.सी वाल्याशी बोला. आम्ही पण बोलतो तुम्ही पण बोला. मी आजचे बोलत आहे. आज जर झाले नाही तर मे पर्यत असेच राहिल. आणि हयाच्यापेक्षा अजून हालत खराब होईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>ः— सदस्यांचे जे म्हणणे आहे व्हॉटसअपवर जे आले आहे चर्चा करून सभा स्थगित करण्या विषयी बोलू तो निर्णय महापौर घेतील मा. महापौर आपल्या दालनात आयुक्त, उपमहापौर, विरोधी पक्ष नेता मी असे मिळून चर्चा करू की आज जी समस्या झाली आहे त्याचे निवारण कसे करता येईल? ते आपण फोनवर बोलून की जावे

लागेल तिथे ते बघावे लागेल आपल्याला पाणी मिळत नाही त्यासाठी मा. आयुक्त साहेब आपण सभागृहाला खुलासा करा. की आजच्या समस्येसाठी त्वरित काय निर्णय घेता येईल. आताचा आता काय निर्णय घेवू शकतो?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>— ठीक आहे हेच निर्णय होणार की आयुक्तांचे नेतृत्वमध्ये डोंबिवलीला जाऊ. तिथेच आपण जाऊ चला. मा महापौरजी आपण आदेश दया.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>:— मा. महापौरजी आज अचानक जी समस्या निर्माण झाली आहे आधी पण ही समस्या निर्माण व्हायची. तेव्हा सांगायचे की पाणी उदया पाणी येणार नाही परंतु आजचे आज लगेच पाणी बंद केले आपण लाईट बंद होते पंपींग नाही झाले म्हणून पाणी दिले नाही आज आपले तीन पंप खराब झाले म्हणून पाणी दिले नाही. ही समस्या गंभीरपणे घेतली पाहिजे. मा. आयुक्त साहेब इतर विषय सोडून मी आपल्याला विनंती करेन की आपण यावर उत्तर दयावे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>— चला आपण जाऊया ६ वाजले ७ पर्यत थाबूंया येऊ दया न शहराला रस्तयावर काय वारंवार मा. महापौरजी फार वाईट परिस्थिती आहे आदेश पण करत नाही म्हणजे पाणी तुमच्याकडे येते याचा अर्थ.

**यावेळी सदस्य श्री. भगवान भालेराव यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:</u>— पाणी जर नाही आले तर रस्त्यावर उतरावे लागेल. आंदोलन करावे लागेल का बंद केले हे विचारावे लागेल. त्यांना जर वरून आदेश आहेत तर आम्ही रस्त्यावर उतरू आंदोलन करू हा संदेश वरिष्ठापर्यत जाईल. मग ते सरळ होतील. असे मला वाटते.

<u>सदस्य श्री.विजय पाटील:</u>— त्यांच्याकडे २४ तास पाणी जाते मला असे वाटते ते काही बोलत नाही आहे. नुसत ऐकत आहेत. आणि ज्याला पाणी मिळत नाही त्याला कोणी उत्तर देत नाही. ते कमी बोलतात त्यांना उत्तर ही देत नाही. ना शासन ना प्रशासन

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी:— </u>सर सर

<u>सदस्य श्री.विजय पाटील:</u>— इथे फक्त चालत ते मोठया लोकांचे चालत जे खुर्चीवर बसलेत त्याना जर मिळत असेल तर आमच्या लोकांनी आम्हाला निवडुन कशाला दिले आम्ही इथे आलो कशाला? आम्हाला प्रश्नाच उत्तर मिळत नसेल तर आम्ही इथे यायचे कशाला?

**यावेळी सदस्या श्रीमती लक्ष्मी सिंग, सदस्य श्री. महेश सुखरामानी सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:</u>— शेम, शेम, शेम

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी:— </u>सर मराठी येत नाही सिंधीमध्ये बोला मराठी येत नाही.

<u>सदस्य श्री.विजय पाटील:</u>— मगाशी सांगितल ना सिंधीमध्ये मॅडम तुम्हाला.

<u>सदस्य श्री.राजेंद्र चौधरी:</u>— महाराष्ट्रात राहून मराठी येत नाही मराठी आली पाहिजे.

<u>सदस्य श्री.विजय पाटील:</u>— आपल्याकडे जेवढे पाणी आहे त्याचे वाटप बरोबर झाले पाहिजे बरोबर जर झाले तर ७५ टक्के समस्या सुटेल.

**<u>आयुक्त श्री.अच्युत हांगे:—</u>** मा. महापौर, उपमहापौर सन्माननीय सर्व सभागृह, पाण्याचा विषय गंभीर झालेला आहे मला असे वाटते की पाटील साहेब आपण मी सुरूवातीला विनंती केली आहे तुम्ही म्हणाला की कार्यवाही कधी करणार? कार्यवाहीच्या आदेश कालच मी केलेला आहे आपल्या सभागृहाची भावना लक्षात घेवून मी हा विषय अतिशय गंभीरतेने घेत आहे. आपल्या सर्वांचे सहकार्य जिथे आवश्यकता पडेल तिथे १०० टक्के आपण सहकार्य करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि आता एम.आय.डी.सी चे ऑफिस बंद झाले असेल सुर्वे साहेब आता म्हणाले की आता जाऊ.

**<u>सदस्य श्री.राजेंद्र चौधरी</u>**:— साहेब मॅसेज काय आल त्याच्याकडे? की लोक आमचाकडे आले होते.

**<u>आयुक्त श्री.अच्युत हांगे:—</u>** एक मिनिट साहेब, यानी जो मॅसेज आपल्याकडे आलेला आहे की पाणी कशामुळे बंद आहे ? का केल? त्याच्या सभा संपल्यानंतर आपण मा. महापौर मॅडमचा दालनामध्ये किंवा माझ्या दालनामध्ये बसून आपण एम.आय.डी.सी अधिका—या बरोबर बोलू मी आपल्या भावनाशी सहमत आहे आणि सभागृहाची भावना लक्षात घेऊन आपण तातडीने जे काय करता येईल की कशामुळे बंद केले त्याची चौकशी करू आणि परत चालू करणेसाठी त्याना विनंती करू. तरी आपण प्रशासनातर्फे सभागृहाला जे खुलासा सुरूवातीला सविस्तर केला आहे आणि हा विषय गंभीरपणे घेत आहोत. त्याच्यामध्ये जास्तीचे जास्त आपण कष्ट घेऊन आपण सर्व शहराला पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी मला वेळ दयावा. अशी मी आपल्याला विनंती करतो. घन्यवाद.

**<u>सदस्य श्री.सतरामदास जेसवानी</u>**:— महापौर मॅडम मी बराच वेळे पासून उभा आहे. मी अर्धवट बोललो आहे कृपया बोलण्यासाठी वेळ मिळाला तर मेहरबानी होईल.

**<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी:—</u>** बोला दादा बोला.

**<u>सदस्य श्री.सतरामदास जेसवानी</u>**:— जो पाणी पुरवठा विभाग आहे. जिथून आपल्याला पाणी मिळते माझ्या मते असे आहे की ते लोक नियमाच्या विरोधात जाऊन काम करत आहे कारण की तेव्हा पाणी बंद करतात तेव्हा २४ तास आधी वेळ दिली पाहिजे सुचना दिली पाहिजे २४ तासाची वेळ देणार नाही तर कसे चालणार? ज्या लोकांनी आज संध्याकाळी पाणी भरण्यासाठी विचार केला असेल आणि सहा वाजता पाणी बंद होणार तर ते लोक पाणी कुठुन भरणार? ते लोक काय करणार? महापालिका जेव्हा जेव्हा पाण्याचा त्रास शहरात होत होता तेव्हा २४ तास आधी सुचना दयायचे आणि सर्व लोक पाणी भरून ठेवायचे परंतु जो पाणी पुरवठा विभाग आहे ते नियमाचे उल्लंघन करीत आहे. मी मा. महापौर साहेबाना विनंती करते की कृपया या विषयावर कठोर निर्णय घ्यावा जसे की आजच पाणी चालू झाले पाहिजे. काल सकाळी यानी शुक्रवारी पाणी बंद करणार तर करू दया चालेल. परंतु आज अचानक बंद करणार तर सर्व ४ नं व ५ नं मध्ये समस्या वाढेल. या विषयावर तुम्ही पण लक्ष देवुन आणि भाभीजी कडून विनंती करून समस्याचे समाधान करून घ्या. तेवढी मेहरबानी होईल. जसे आपले जमनादास भाई ने सांगितले आहे. तुम्हालापण सर्व माहिती आहे. जो बोरवेल शहरात लागलेला आहे तो जर बंद आहे आणि त्यांच्या घरी मिटर लावलेला आहे. तो लवकरात लवकर चालु होईल. काही एक वर्षापुर्वी आपल्याला भारत सरकार कडून पत्र आले होते. की रेनवॉटर हारवेस्टींग

योजना राबविण्यात यावी. त्या विषयावर कोणी लक्ष देत नाही. भविष्यामध्ये पाण्याची समस्या होणार नाही. जमिनीमध्ये भरपुर पाणी गेले पाहिजे. कारण जेव्हा पाण्याचा त्रास होणार तेव्हा आपण बोरवेलने पाणी घेवु शकतो. त्या विषयावर पण लक्ष दया. जसे की आज शहराला पाणी मिळु शकेल. या विषयावर पण लक्ष दया. शहराकडून तुमचे आभार मानले जाईल.

आयुक्त श्री. अच्युत हांगे :– मा. महापौर मॅडम , सन्मानानिय सभागृह, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून रात्री उशिरा आपल्याकडून मॅसेज आलेला आहे. हे सर्व अधिकारी तिकडे गेलेले आहे. आणि हा पुर्ण ठाणे जिल्हयासाठी धोरणात्मक निर्णय आहे. आता राज्यामध्ये शासनाने जो निर्णय घेतला आहे. तो फक्त उल्हासनगर महानगरपालिकासाठी नाही. ठाणे जिल्हयामध्ये जी २४ तास पाणी अगोदर कपात होती. ती ३० तासावर गेलेली आहे. म्हणजे पुढची परिस्थिती गंभीर आहे. पुढे भविष्यात जास्त त्रास होवु नये. त्या दृष्टीकोनातुन शासनाने निर्णय घेतलेला आहे. तेव्हा तो निर्णय फक्त उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नाही. तो निर्णय घेतलेला आहे तो पुर्ण ठाणे जिल्हयासाठी निर्णय घेतलेला आहे. म्हणुन आता जे सभागृह नेता बोडारे साहेब यांनी बोलले आहे. त्या प्रमाणे मा. पालक मंत्री आणि आपण याठिकाणी मा. आमदार एखादे शिष्ट मंडळ घेवुन इथली जो काही परिस्थिती आहे. त्या बद्दल हा धोरणात्मक निर्णय आहे. त्यामुळे आपण जरी काही बोललो तरी काही करणार नाही. तर आपल्याकडून जर त्यांना उल्हासनगर ला सुट दिली आपल्या पातळीवर कारण या सभागृहामध्ये शिवसेनेचे पण सर्व नगरसेवक आहे, बी.जे.पी चे आहे, शिवसेना आणि बी.जे.पी चे राज्यात सत्ता आहे. त्यामुळे आपण त्यामध्ये आपण आपल्या साठी सुट मिळवुन घ्यावी. आणि हा राजनैतिक प्रश्न आहे. त्याच्यामुळे आपण व्यवस्थित हाताळावे सहकार्य करावे. सर्व ठाणे जिल्हयासाठी कपात आहे. फक्त एकटे उल्हासनगरसाठी नाही.

सदस्या श्रीमती.मिना सोनेजी :– सर जी हा राजनीतिक मुद्दा नाही आहे. हा पब्लीक मुद्दा आहे. सर,

**यावेळी सदस्य श्री. महेश सुखरामानी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.**

आयुक्त श्री. अच्युत हांगे :– हा पब्लीक मुद्दा आहे मॅडम, परंतु शासनाने जे धोरण निश्चित केलेले आहे ते एकटे उल्हासनगरसाठी नाही, सर्व ठाणे जिल्हयासाठी आहे.

सदस्या श्रीमती.मिना सोनेजी :– ठिक आहे सर, आम्ही आमचे पब्लीक आणणार तुमच्याकडे आणि तुमच्याकडे सागंणार. आम्ही थोडी ठाणे महानगरपालिकेत जावुन सांगणार.

आयुक्त श्री. अच्युत हांगे :– तुम्ही आमच्याकडे येवुन सागंणार जो शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. तो ठाणे जिल्हयासाठी घेतला आहे.

सदस्या श्रीमती.मिना सोनेजी :– तुम्ही जसे बोलत आहे जसे तुम्ही बोलत आहे. तो धोरणात्मक निर्णय नाही तो राजनैतिक मुद्दा आहे.

आयुक्त श्री. अच्युत हांगे :– धोरणात्मक निर्णय कोण घेतो. तो मंत्रालयातूनच निर्णय झाला असेल ना. त्यांची अमलबजावणी करायचे खालच्या अधिकाऱ्याचे काम आहे म्हणुन त्यांनी निर्णय घ्यावा.

**<u>सदस्या श्रीमती.मिना सोनेजी :</u>**— सहा वाजता जर पाणी बंद होणार त्याच्यासाठी आपण काय करू शकतो सर ?

**<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे :</u>**— धोरणात्मक निर्णय आहे त्यांच्यात मी निषेध करतो. धोरणात्मक निर्णय अगोदर तरी महानगरपालिकाला पुर्वी कळविले पाहिजे. रात्री उशिरा कळवतात. आणि लोकांना कधी कळवणार तुम्ही. ? उदया पाणी बंद आहे. शनिवारी पाणी मिळणार नाही मनमानी आहे ना. एम.आय.डी.सी असु दे इरिगेशन असुदे एम.आय.डी.सी काय? एरिगेशन काय? हे अगोदर कळविलेल पाहिजे होते. मी तुम्हाला परिस्थिती सांगितली होती की परवा वॉल बिघडला. काल पंप बिघडला पाणी बंद आणि आज एम.आय.डी.सी चे बंद म्हणुच हा जो मॅसेज आहे. प्रत्येक महानगरपालिकेत हेच चालले असेल. कल्याण महानगरपालिकेच्या सभेत सुध्दा हाच गोंधळ चालला असेल. आपल्याला माहित नाही. आमचा मॅसेज तिथ पर्यंत गेला पाहिजे. हि अशी मनमानी चालली आहे नक्की काय आहे आम्हाला कळत नाही. लोंकाना समजावून सांगा तुम्ही. लोक तशी तयारी करतील.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :</u>**— शासन कोणतेही असु दया, शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला असेल. परंतु लोकांना त्रास दयायचा धोरणात्मक निर्णय शासन कधीही घेवु शकतो. आणि लोकांचा विचार न करता शासन कधीही निर्णय घेवू शकतो.

**<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे :</u>**— आजची महासभा स्थगित करून शासनाला याचा मॅसेज जावु दया. की असे कधीही चुकीचे चालणार नाही. जेव्हा मनात आले तेव्हा कपात चालु करतात. मागच्या वेळी पण असे झाले.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :</u>**— शासनचा पण निषेध करावा लागेल तर आपण करणार. या लोकांच्या विषय आहे. राजनैतिक विषय नाही.

**<u>सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी :</u>**— मा. महापौर मॅडम, उप—महापौर, सत्तापक्ष आहे किंवा विरोधी पक्ष आहे. सर्वांची भावना ही आहे. पाणी सर्वांना मिळाले पाहिजे. आता तुम्ही सांगितले आहे की, शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे. परंतु आपल्या विरोधी पक्षाने सांगितले आहे. की काल पंप बंद होता. जर काल पंप बंद होता आणि धोरणात्मक निर्णय शासनाचा आहे की पाण्याची कपात ३० तास होणार. परंतु काल जे आपल्याला पाणी मिळाले नाही. ते आज पण आपल्याला पाणी मिळणार नाही. आपला पंप खराब होता. परंतु आपली कपात आहे. जे पाणी काल आम्ही घेवू शकलो नाही. ते आज घेवून जनतेला देवू शकत नाही का.? का नाही देवू शकतो? माझे म्हणणे असे आहे की धोरणात्मक निर्णय आहे असे समजु शकतो. परंतु या निर्णयाचा विरोध आम्ही करणार. त्याच्यात आपले पालकमंत्री आहे. मा. श्री. एकनाथ शिंदे जी, मा. श्री. गिरीष महाजन जी राजनैतिक स्तरावर आम्ही सर्व गोष्टी बोलणार. परंतु इथे सदस्यांची जी भावना आहे. की आज संध्याकाळी लोकांना पाणी मिळणार नाही. त्याचे काय? आम्हाला जे काल पाणी मिळाले नाही. ते आज का नाही मिळाले पाहिजे.? ठिक आहे धोरण आहे. त्यांना धोरण मध्ये ३० तास बंद करायचे आहे. आम्हाला काल पाणी मिळाले नाही तर आज पाणी मिळाले पाहीजे. याच्यासाठी आज आम्हाला प्रयत्न करायला पाहिजे. कालचे पाणी आज लोकांना देणार. सर्व सदस्य आणि सर्व पार्टी चे एक गटनेता आणि पार्टी चे सर्व नगरसेवक असणार तुमचे किंवा तुमचे दालनामध्ये किंवा महापौरांच्या दालनामध्ये बसुन जेवढे पाण्याची

कपात आहे. त्या व्यतिरिक्त आपल्याकडे कमी वस्तू आहेत. त्याचे धोरण पण आपल्याला निश्चित करावे लागेल. सर्वांत आधी तुम्हाला हे करावे लागेल. काल जे पाणी ४ आणि ५ नं मध्ये मिळाले नाही. ते पाणी आज देणार आणि पाणी संध्याकाळी ६ वाजता बंद होणार नाही. त्या नंतर सर्व लोक मिळुन निर्णय घेणार.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:— इथे आता पाणी बंद करायचा विषय चालू आहे. परंतु जे रोजच पाणी मिळत आहे. ते कमी मिळत त्या बद्दल तुमचे अधिकारी का नाही सांगत आहे.? माझे म्हणणे असे आहे की रोजचे १०५ एमएलडी आहे तर १०५ एमएलडी दया ना. जे कपात करित आहे त्यात पण तुम्ही ९० एमएलडी देत नाही. ज्या दिवशी बंद आहे. लोकांना माहिती आहे. सर्व शहर बंद आहे. पाणी मिळणारच नाही. पण जे मिळेल ते कमीत कमी पुर्ण क्षमतेने देवु शकू ना. भरून पाणी ठेवू शकू ना. या गोष्टीवर कोणाचे लक्ष नाही. आपल्याकडे डील कितीचे आहे. १६० एमएलडीचे ना.? आपल्याकडे मागतो कितीचा डील.? येतात कीती? काल मिटर आपण बसवले. शनिवार रविवार चे मिटरमध्ये किती फरक आहे. आजची जी स्थिती आहे. जी रोजचे पाणी आहे आपले. ते तर कमीत कमी मिळाले पाहिजे. आज रोष अशामुळे आहे कपात आहे तर लोकांना कळते. आणि नागरिक त्यांना सहयोग पण करतात. परंतु अचानक जर कपात झाली तर. समजा जिथे ५० एमएलडी पाणी देणार होत तिथे ४० एमएलडी पाणी दिल. कुठे तरी कमी पाणी गेल. मग कमी पाणी गेलेल्या माणसाच म्हणणे असे आहे. काल पाणी कपात केले आणि आज बंद. त्याला काय जवाब दयायचा.? विषय हा आहे. आज सकाळी लाईन नाही आमच्याकडे सकाळ पासून लाईट नव्हती. आज जी परिस्थिती आहे ना ती हे लक्षात घ्या. आणि साहेब मघाशी तुम्हाला जे प्रश्न दिला. त्या प्रश्नामध्ये पण आहेत की आपल्याकडे इंजिनियर नाही.

श्री सोनावणे पाणी पुरवठा प्र. कार्यकारी अभियंता:— साहेब शहाडला जावुन आलो मी. तिथे इंगळे साहेबांना भेटलो. त्यांनी सांगितले १० च्या ऐवजी १२ ला बंद करत होते. आज म्हणजे शुक्रवारी १० पर्यंत चालू ठेवायला सांगितले आहे. विनंती केली जावुन आलो मी.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:— साहेब विनंती तुम्ही करून आला. ऐकून घ्या. ते विनंतीला मानणार का.? तो महत्वाचा भाग आहे. साहेब लक्षात घ्या. आमचे म्हणणे काय आहे.

श्री सोनावणे पाणी पुरवठा प्र. कार्यकारी अभियंता:— हो साहेब करतो आहे. मान्य केले आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:— आणि पाले वरून.

श्री सोनावणे पाणी पुरवठा प्र. कार्यकारी अभियंता:— पाले ते साहेब तो एकदम निर्णय घेणार नाही.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:— ते पण लिहुन दया ना. आजच्या दिवस जा तुम्ही. पुढच्या गुरूवारी काय करणारच तुम्ही. काय नाही. आम्ही आठवडाभरचा शेडयुल ठेवू ना. आजच्या दिवशी १२ वाजेपर्यंत आम्हाला पाणी दया.

सदस्य श्री. विजय पाटील:— साहेब पालेचा एक दिवस देतात. ५ नंबर ला पण एक दिवस देता. दुसऱ्या दिवशी ४ नंबर ला देता.

<u>आयुक्त श्री. अच्युत हांगे :</u>— मी आपली बैठक संपल्यानंतर मी स्वत: जाऊन संबंधित अधिकारीशी बोलुन विनंती करायला जातो. विषय काय आहे .?


<u>सदस्य श्री. धंनजय बोडारे:</u>— सभा संपवा.

<u>सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—</u> साहेब आताच बोला त्यांच्याशी नाहीतर निघुन जाणार ते लोक.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:</u>— सर विषय असा आहे. ८ वाजता सभा संपणार आणि ६ ला पाणी मिळणार.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>— पाणी बंद केल तर ते लोक निघुन जातील.

**यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व श्री. राजेश वदारिया सभागृहातुन बाहेर गेले.**



<u>सदस्या, श्रीमती मिना सोनेजी:—</u> आपण बोलुन घ्या साहेब. नाही तरी ६ नंतर पाणी बंद करून निघुल जातील. काही फायदा नाही साहेब.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>— चलाना साहेब आता चलाना. साहेब ६ वाजता पाणी बंद करून टाकतील ते. माझी विनंती काय आहे. पाणी बंद करू नये. आणि ६ वाजता ते पाणी बंद करून निघुन जातील. बोलुन घ्या ना साहेब बोलुन घ्या.

<u>सदस्य श्री. विजय पाटील :</u>— पालेचा विषय पहिले आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>— पालेचा विषय पण आहे ना. बोलुन घ्या.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:</u>— एक दिवस ४ नंबर ला पाणी मिळत. एक दिवस ५ नंबरला पाणी मिळत. आठवडयातुन एक दिवस पाणी मिळत साहेब आम्हाला. पालेचा तरी पहिला विषय आहे.

<u>सदस्या. श्रीमती. वसुधा बोडारे:—</u> मिटींग सपल्यानंतर जे करणार ते आता करून घ्या साहेब. तेव्हा आम्हाला ७ ते १२ पाणी मिळेल. ६ चे पाणी ७ ला चालु होईल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>— आजच्या दिवस तर सांगा बोला ना साहेब.

<u>सदस्य श्री. अरूण आशान:</u>— आयुक्त साहेब बघा आम्ही खाली बसलो तर पाणी नाही. बाकीकडे नाष्टा दिला इकडे नाष्टा पण नाही. किती अन्याय करता. पाणी दया.

<u>सदस्य श्री विजय पाटील:</u>— साहेब परवा मोठा सन आहे. दत्त जयंती आहे. आज पाणी नाही मिळणार तर लोक घरचे साफसफाई कसे करणार.? लोक पाणी कुटुन भरणार.?

<u>सदस्य श्री विजय पाटील:</u>— भेद भाव भेद भाव.

<u>सदस्या, श्रीमती. मिना सोनेजी:—</u> अरूण भाऊ तुम्हाला पाणी पाहिजे की नाष्टा.

<u>सदस्य, श्री शेखर यादव:</u>— साहेब २२ तारखेला दत्त जयंती आहे. लोक घरी साफसफाई कसे करणार? उल्हासनगरमध्ये २३ तारीख ला उल्हासनगर ते शिर्डी पालखी जाणार.

<u>आयुक्त श्री. अच्युत हांगे :</u>— मा. महापौर मॅडम आणि सर्व सन्मानिय सदस्य मी नन्नावरे साहेबांशी आता फोनवर बोललो आहे. त्यांच्या बरोबर कोणते आधिकारी आहे. ते सांगितले आहे ५ मिनीटात फोन करून तुम्हाला सांगतो. मी सांगितले आहे की सभागृहामध्ये एकदम

बेकार परिस्थिती आहे. पाण्याचा गंभीर प्रश्न झालेला आहे. आजचा दिवस आणि काल एक पंप बंद होता. एक चालु होता ते काल चे पाणी आम्हाला आजच्या दिवस दया. तुम्हाला जरी शासनाचा आदेश आला तरी आजच्या दिवस पाणी दया. उदया काय धोरणात्मक निर्णय काय आहे ते नंतर बघु. ठिक आहे ५ मिनीटात आपल्याला फोन करून सांगतो.

सदस्या, श्रीमती. मिना सोनेजीः— ठिक आहे आम्ही ५ मिनीटे वाट पाहतो. ३ दिवस आमची राहण्याची सोय करा. सोय इकडे करा. कारण पब्लीक घरी पोहचणार.

सदस्या. श्रीमती. वसुधा बोडारेः— साहेब नाही तरी आम्हाला इथेच रहावे लागणार.

सदस्य श्री भगवान भालेरावः— मिना मॅडम गोवा जायचे आहे गोवा.

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः— मा. महापौर, काही सदस्य आपले म्हणतात काल मोदी जी आले होते म्हणुन आज पाणी बंद झाले.

सदस्य श्री. विजय पाटील :— ओ काही पण बोलु नका.

सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी :— हे बघा असे काय पण बोलणे चुकीचे आहे. चेष्टा पण करू नका. आदरणीय पंत प्रधान आहे आमचे. अशी चेष्टा करू नका. पाण्याच्या विषयवर.

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः— काल माननीय प्रधानमंत्री मोदी जी असे बोललो मी. लक्षात घ्या.

सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी :— आमचे म्हणजे आमचे तुम्ही पण आमचे.

महापालिका सचिवः—प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. सभा स्थगित करण्याआधी लक्षवेधी स्विकाराव्या लागेल.

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः— तुम्हाला विनंती केली आहे की सभा संपली आहे.

महापालिका सचिवः— सभा अजुन संपली नाही आहे. मा. महापौर तथा पिठासन अधिकारी यांनी लक्षवेधी घ्यायला सांगितली आहे.

**यावेळी सदस्य श्री. जमनरादास पुरस्वानी, श्री. राजेश वदारिया यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.**

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः— चला चला खाली बसुया.

महापालिका सचिवः— लक्षवेधी सुचना क्रमांक १

सदस्य श्री. धंनजय बोडारेः—महापौर मॅडम तुम्हाला पाण्यात स्वारस्य नाही. सभा चालवण्यात स्वारस्य आहे. उल्हासनगर शहराचे नागरीक त्रस्त झाले तरी चालणार आहे.

महापालिका सचिवः— सभा स्थगित करण्याच्या आधी लक्षवेधी स्विकाराव्या लागतील.

सदस्य श्री. चंद्रशेखर यादवः— आयुक्तांनी सांगितले पाच मिनीटे थांबा. तुम्ही कशाला विषय वाचता.

इथे काही सदस्य पाणी दया पाणी दया असे ओरडत होते.

सदस्य श्री. चंद्रशेखर यादवः— आयुक्त बोलतील आता. पहिले आयुक्तांना बोलू दया. पाण्याच्या विषयावर मग तुम्ही विषय घ्या. नाही नाही पहिले पाणी मग लक्षवेधी.

इथे यावेळी काही मा. सदस्य व आयुक्त मंचाजवळ आपसात चर्चा करीत होते.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—सत्ता तुमच्या हातात आहे ना.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर आता पाण्यावर भरपूर चर्चा झाली आहे. आयुक्ताची पण बोलणे सुरू आहे. मी मा. गिरीष महाजन याच्याशीही बोललो आहे. त्यांनी बुधवारी भेटावयास बोलविले आहे. ही महासभा सुरू करावी. बुधवार पर्यंत आपण काही करू शकत नाही.

<u>सदस्या, श्रीमती. वसुधा बोडारे :—</u> आधी तुम्ही लोकांना जावुन उत्तर दया मग सभा सुरू करा. तुम्ही काही सुचना न देता पाणी बंद केलेले आहे. रिक्षा देखिल फिरवली नाही. आमची गाडी जाऊ शकत नाही.

यावेळी सदस्य श्री. सुरेंद्र सावंत सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्या, श्रीमती. राजश्री चौधरी :—</u> जो पर्यंत पाणी देत नाही तो पर्यंत सभा चालणार नाही.

<u>सदस्या, श्रीमती. वसुधा बोडारे :—</u> प्रशासनाला विचारले नाही पाहिजे का. अचानक पाणी बंद करतात.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u> मा. महापौर, इरिगेशन विभागाने एम.आय.डी.सी ला आदेश दिलेले आहेत. पाणी जास्त कपात करण्यासाठी म्हणून एम.आय.डी.सी ने सर्व महानगरपालिकांना पत्र दिलेले आहेत. की तिन तास पाणी कपात करण्यात येणार आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> राजेश भाई आमचे हेच म्हणणे आहे. तो पत्र देतो पाणी कपात करा पाणी कपात करा. पण तुम्हाला माहीत आहे. उल्हास नदी अंबरनाथ बदलापूरून येते. त्या नदीतुन कितीजण अनाधिकृत पाणी उचलतात. त्यांच्यावर ते कार्यवाही करतात का? त्यांच्याकडून हप्ता घेतात. आणि आम्ही पैसे भरतो लोकांना पिण्यासाठी मागतो. ते पाणी देत नाही. त्यावर पण काही मार्ग निघाला पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u> ते पहा इरिगेशन विभाग त्यांचे मंत्री आहे. मा. गिरिष महाजन जी. त्यांच्याशी आता श्री. जमनदास पुरूस्वानी बोलले. त्यांनी बुधवारी वेळ दिला आहे. त्यामध्ये इरिगेशन विभागाचे अधिकारी असतील. एम.आय.डी.सी चे अधिकारी असतील. उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी असतील. आपले जे पदाधिकारी आहेत. मा. महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व पक्ष गटनेते मिळून तिथे निवेदन देवुन त्यांच्याशी बोलू या. आपल्याकडे जे पुरावे आहेत. कुठे इलिगल कनेक्शन झाले आहे कुठे वैयक्तिक पाणी घेतले जात आहे. हे घेऊन चला त्यांच्याशी आपण बोलू.

<u>सदस्या, श्रीमती. वसुधा बोडारे :—</u> मा. महापौर उप—महापौर माझे एवढेच म्हणणे आहे. आज संध्याकाळी ज्यांना पाणी येईल. त्यांनी जाऊन उत्तरे दयावीत. आम्ही आज जाऊ शकत नाही प्रभागामध्ये. तिथे सहा नंतर पाणी येते आणि ते अचानक बंद झाले. तुमचे सर्व पाणीपुरवठा विभागाचे जेवढे लोक असतील. त्यांना तिथे पाठवा उत्तरे दयायला.

यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा व श्रीमती अर्चना करनकाळे सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— मी सर्व सभागृहाला विचारतो की आजची सभा स्थगित करून फायदा काय आहे. ते तुम्ही सांगा.

**यावेळी सदस्या श्रीमती कविता पंजाबी, श्रीमती इंदिरा उदासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

सदस्य, श्री. रमेश चव्हाण:— हा मॅसेज बाहेर गेला पाहिजे की, पाण्यामुळे सभा झालेली नाही. आपल्याला पाण्याची काय गरज नाही वाटते.

सदस्या, श्रीमती. वसुधा बोडारे :— जो पर्यंत त्यांना कळणार नाही की,पाणी कधी येणार तो पर्यंत ही सभा होणार नाही.

**यावेळी सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी पाण्याच्या बाटल्या व्यासपीठासमोरी मोकळया जागेत फेकल्या व पाणी दया, पाणी दया म्हणुन ओरडत होते.**

सदस्य श्री. राजेश वदारिया :—हि सभा पुढे सुरू करावी.

महापौर तथा पिठासन अधिकारी:—सचिव मॅडम लक्षवेधी घ्या.

महापालिका सचिव:— मा. पिठासन अधिकारी यांनी मला लक्षवेधी वाचण्याचे आदेश दिले आहेत.

सदस्या, श्रीमती. राजश्री चौधरी :—महापौर मॅडम आधी पाणी दया. मग सभा चालवा. पाणी नाही लोकांना पिण्यासाठी.पहिले पाणी दया मग सभा चालवा.

**यावेळी मा. महापौर हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**त्यांच्या जागी उप—महापौर श्री. जीवन इदनानी हे आसनस्थ झाले.**

महापालिका सचिव:— हि सभा स्थगित करावयाची असेल तर आधी लक्षवेधी स्विकारावी लागेल. मला मा. महापौराचे आदेश ऐकावे लागतील. आधी लक्षवेधी स्विकारा मग सभेचा निर्णय घ्या.

लक्षवेधी सुचना क्र. १ सुचकाचे नाव श्री. भगवान भालेराव

विषय :—कोहीनूर बिल्डींग जवळील मोठा नाला बळविण्याचे (डायव्हरशन) कामाबाबतची लक्षवेधी सूचना

इथे काही सदस्य राजेश वदारिया हाय हाय व महापौर हाय हाय म्हणून घोषना देत होते.

सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:— दलाल लोक हाय हाय. राजेश वदारिया हाय हाय.

**यावेळी सदस्या श्रीमती शुभांगीनी निकम सभागृहातुन बाहेर गेल्या.**

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— महापौरचा दलाल राजेश वदारिया हाय हाय.

सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहटा:—चालणार नाही चालणार नाही दलाल गिरी चालणार नाही. सचिव मॅडम दादागिरी करू नका. विषय वाचू नका. उप—महापौर जी काय करत आहात आपण. उप—महापौर जी दलाल लोकांना साथ देवू नका. शहरातील जनता पाहात आहे.

सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:—उप—महापौर जी शहरातील जनता पहात आहे. यांना सहकार्य करू नका.

<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहटा:—</u> सचिव मॅडम आयुक्त साहेब काही तरी बोलत आहे. लक्ष दया.

**यावेळी सदस्या श्रीमती कविता पंजाबी, श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती शुभांगिनी निकम यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.**

<u>सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:—</u> कधीची सुचना आहे. कधीचा प्रस्ताव आहे. चला उत्तर दया.

**यावेळी मा. महापौर यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला व त्यांच्या स्थानी आसनस्थ झाल्या.**

<u>आयुक्त श्री. अच्युत हांगे:—</u>मा. महापौर सन्मानिय सर्व सदस्य आता आपल्याला. फोन वरती मॅसेज आला आहे. शहाडचे जे पाणी सहा वाजता बंद केले होते. दहा वाजेपर्यंत चालू ठेवले आहे. बरोबर आहे का. आता वारके साहेबाचा फोन आला. सभागृहाची नोंद गांभिर्याने घेतली आहे. परंतु आपल्याला उदया सकाळी शिष्ट मंडळ ठरवून आता जमनू साहेबांनी महाजन साहेबाकडून वेळ मागून घेतला आहे. पण उदयाच्याला गांभिर्याने आपल्याला मा. पालक मंत्री व अजुन संबंधित मंत्र्याकडे जावुन आपली समस्या तिथे मांडू अशी सभागृहाला विनंती आहे. सहाचे आता दहा वाजेपर्यंत चालू ठेवले आहे.

**यावेळी सदस्या श्रीमती अर्चना करनकाळे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>सदस्य, श्री. चंद्रशेखर यादव:—</u> आयुक्त साहेब तुमचे म्हणणे मान्य आहे. फक्त तुमचे अधिकारी सहा ते बारा वाजेपर्यंत आमच्याकडे पाठवा. कोणताही संबंधित अधिकारी आमच्यासोबत राहू दया लोकांना उत्तर दयायला. आयुक्त साहेब सात ते दहा वाजेपर्यंत कोणी तही अधिकारी राहू दया आमच्याजवळ बोला त्यांना. पाटील साहेबांना राहू दया त्यांना कळेल. आमच्या बरोबर बारा वाजेपर्यंत राहू दया.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u> सचिव जी महापौर मॅडम ने आपल्याला आदेश दिले आहे.

<u>महापालिका सचिव:—</u> मा. आयुक्त साहेब बोलत होते म्हणून थांबले होते.

आता लक्षवेधी सूचना क्र.२

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

**विषय** :—शहराची परिसिमा, मालमत्ता कराबाबत नागरीकांना एकाच ठिकाणी मिळणा—या सेवा या बाबी विचारात घेता कर विभागाचे कामकाजाचे विकेंद्रीकरण न करता कर विभाग मनपा मुख्यालयात कार्यरत ठेवणेबाबतची लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्र. ३

सुचकाचे नाव :— डॉ. प्रकाश नाथानी

अनुमोदकाचे नाव:— श्रीमती गिता साधनानी

श्री. राजेश वदारिया

**विषय** :—उल्हासनगर—१ येथिल गोलमैदान मधील मॅकडॉल हॉटेलसमोरील गार्डनची जागा हॉलीबॉल व बॅडमिंटन खेळण्यासाठी राखीव ठेवण्याबाबतची लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्र. ४

सुचकाचे नाव :— श्रीमती दिप्ती दुधानी
अनुमोदकाचे नावः— श्रीमती इंदिरा उदासी

**विषय** :— मालमत्ता कर वसुली होणेकरीता विना दंड कर भरणा करुन घेणेसाठी “अभय योजना” लागू करण्याकरीता लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्र. ५

सुचकाचे नाव :—श्री. चंद्रशेखर यादव

**विषय** :—व्हि.टी.सी. मैदान, इंदिरा गांधी भाजी मार्केट, बोट क्लब विकसित करणेसाठी बांधा वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर विकसित करणेबाबतची लक्षवेधी सूचना

सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहटाः— सचिव मॅडम आपणास महापौर मॅडम आदेश दिले आहेत का. महापौर मॅडम ने आदेश दिले आहे की सुपर महापौर आदेश देत आहे. आपण त्यांचे ऐकले आम्ही पाहत आहे.

महापालिका सचिवः—मा. महापौरानी आधीच आदेश दिले होते. मा. आयुक्त साहेब बोलत होते म्हणून थांबले होते.

सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहटाः— आधी मा. महापौरांना आदेश करू दया.

महापौर तथा पिठासन अधिकारीः— मी त्यांना आधीच आदेश दिले होते.

सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहटाः—आम्ही पाहात आहोत इथुन कोणी पण उठुन आदेश देणार का सचिव मॅडमना. तुम्ही पिठासन अधिकारी आहेत तुम्ही आदेश दया.

महापौर तथा पिठासन अधिकारीः— मी त्यांना बोलले म्हणून त्या बोलल्या.

सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहटाः— मॅडम आम्ही पाहत होतो. तुम्ही फोनवर बोलत होता. आणि इथे खाली बसुन कोण बोलणार सभा सुरू करा. हे तुम्ही तुमच्या दालनात चालवा. कृपया करून सभागृहात असे चालवू देवू नका, सुपर महापौर राजेश वदारिया.

महापौर तथा पिठासन अधिकारीः— तुम्ही सर्वजण स्वतःला सुपर महापौर समजून वागलातर या शहराचे काम त्वरीत होईल.

सदस्य, श्री. राजेश वदारियाः— मा. महापौर आपण ज्या वेळेला उपस्थित नव्हता त्यावेळी जीवण इदनानी बसले होते. त्यांनी सचिवाना विषय वाचण्याचे आदेश दिले होते.

सदस्य, श्री राजेंद्र चौधरीः— जसा आपल्याला सुपर महापौरचा आधिकार दिलेला आहे तसा सर्वांना देतील.

महापौर तथा पिठासन अधिकारीः— आपल्याला देखिल अधिकार आहे.

महापालिका सचिवः— लक्षवेधी सुचना क्र ६

सुचकाचे नाव :— श्रीमती रेखा ठाकुर

**विषय** :—पॅनल नं. ६ मधील नेहरु चौक ते शिरु चौक येथील ट्रफिक समस्येबाबतची लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्र. ७

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव:–श्री. शंकर लुंड

**विषय** :–महापालिका सदस्यांच्या अर्जानुसार वर नमुद केलेल्या रस्ते, चौक व प्रवेशद्वारास तदर्थ समितीची बैठक घेण्यात आली नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना

मा. महापौर यांनी श्री. राजेश वदारिया व श्री. किशोर वनवारी यांची लक्षवेधी स्विकारली आहे. लक्षवेधी क्रमांक ३ चे सुचक श्री. प्रकाश नाथानी परंतु श्री. राजेश वदारिया अनुमोदक उपस्थित आहे.

लक्षवेधी सूचना क्र. १ श्री. राजेश वदारिया यांची लक्षवेधी सूचना आहे.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचकाचे नाव :– डॉ. प्रकाश नाथानी
अनुमोदकाचे नाव:– श्रीमती गिता साधनानी
श्री. राजेश वदारिया

**विषय** :–उल्हासनगर–१ येथिल गोलमैदान मधील मॅकडॉल हॉटेलसमोरील गार्डनची जागा हॉलीबॉल व बॅडमिंटन खेळण्यासाठी राखीव ठेवण्याबाबतची लक्षवेधी सूचना

उपरोक्त लक्षवेधीद्वारे लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर शहरात स्पर्धकांकरीता खेळांचे मैदान उपलब्ध नसल्याने स्पर्धेकांना इतर ठिकाणी शहराबाहेर जावे लागत आहे. उल्हासनगर–१ येथिल मॅकडॉल हॉटेल समोरील गार्डनच्या जागेवर गेल्या अनेक वर्षापासून त्या ठिकाणी हॉलीबॉल व बॅडमिंटर खेळण्यासाठी स्पर्धक येत असतात व तेथे खेळत असतात परंतू त्या जागेवर महापालिका फनफेअर व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता देत असल्याने त्या उदयान नादुरुस्त होत आहे.

तरी उल्हासनगर–०१ येथिल मॅकडॉल हॉटेल समोरील गार्डनच्या जागेवर हॉलीबॉल व बॅडमिंटन व इतर खेळ खेळण्याकरीता शहरातील स्पर्धकांना उपलब्ध करण्याकरीता आरक्षित करण्याबाबतचा विषयावर चर्चा होवुन निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

---

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:</u>–मा. महापौर गोल मैदान येथे मॅकडोनॉल्ड हॉटेलसमोरील गार्डनची जागा हॉलीबॉल व बॅडमिंटन खेळण्यासाठी राखीव ठेवण्यात यावी. कारण उल्हासनगर शहरात स्पर्धकांकरीता खेळांचे मैदान उपलब्ध नसल्याने स्पर्धेकांना इतर ठिकाणी शहराबाहेर जावे लागत आहे. उल्हासनगर–१ येथिल मॅकडॉल हॉटेल समोरील गार्डनच्या जागेवर गेल्या अनेक वर्षापासून त्या ठिकाणी व्हॉलीबॉल व बॅडमिंटर खेळण्यासाठी स्पर्धक येत असतात व तेथे खेळत असतात परंतू त्या जागेवर महापालिका फनफेअर व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता देत असल्याने ते उदयान नादुरुस्त होत आहे. तर त्या ठिकाणची जागा व्हॉलीबॉल व बॅडमिंटन खेळण्यासाठी राखीव ठेवावी, ही विनंती.

**इकडे काही सदस्य राजेश वदारिया हाय हाय अशा घोषणा देत होते. पाणी दया पाणी दया. राजेश वदारिया हाय हाय.**

<u>महापालिका सचिव:</u>–लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. किशोर वनवारी

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव:—श्री. शंकर लुंड

**विषय** :—महापालिका सदस्यांच्या अर्जानुसार वर नमुद केलेल्या रस्ते, चौक व प्रवेशद्वारास तदर्थ समितीची बैठक घेण्यात आली नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना

येत्या महासभेमध्ये खालील नमुद केलेल्या विषयावर लक्ष वेधु इच्छितो की, सदरील विषयावर चर्चा करणेत येवून प्रभावि तोडगा काढण्यात यावा. सदरचे विषयी खालीलप्रमाणे.

महानगरपालिकेची नविन सदस्यांची निवड सन २०१७ मध्ये झालेली आहे. त्यास फेब्रुवारी, २०१९ मध्ये दोन वर्षे पुर्ण होणार आहेत गेल्या दोन वर्षात रस्ते, चौक, प्रवेशद्वार यांना मयत व्यक्तींची नांवे देण्यात येतात. महापालिका सदस्यांच्या अर्जानुसार वर नमुद केलेल्या रस्ते,चौक व प्रवेशद्वारास तदर्थ समितीतच्या बैठक घेण्यात आलेली नाही. तसेच सदरील विषय महासभेसमोर आलेला नाही. त्याबाबत जबाबदार कोण आहे? याबाबत मा. महासभेत चर्चा होवून निर्णय घेवुन संबंधितांना आदेश देण्यात यावे.

त्री याबाबत महासभेमध्ये चर्चा होवून ठोस तोडगा काढण्यात यावा ही विनंती.

---

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौर जी पूर्ण सभागृहात पाण्याविषयी समस्या आहे. त्यासाठी सर्वजण सहमत आहे. आपले आयुक्त साहेब म्हणाले की, १,२,३ मध्ये सहा वाजता पाणी बंद होणार होते ते आता दहा वाजता बंद होईल. आणि पाले कडून जे पाणी येते त्यासाठी देखिल आम्ही शिष्ट मंडळ घेवून जावू आणि ते देखिल दहा वाजेपर्यंत करण्याचा प्रयत्न करू अशी सर्वांची भावना आहे. उदया चौथा शनिवार आहे तरी आम्ही वेळ घेवून जाऊ. शुक्रवार आहे जाऊ या.

<u>सदस्य श्री सुनिल सुर्वे:—</u>मा. आयुक्त साहेब तुम्ही वेळ ठरवा आम्ही सर्व यायला तयार आहोत.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u> सुनिल भाऊ पूर्ण वेळ तुम्हीच बोलता आम्हा सत्ता धा—यांना बोलू दया. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे. सत्ताधारी असो वा विपक्ष असो ज्यांना पाण्याचा त्रास आहे. ते सर्वांनी यावे. हा आवाज विपक्षातून नव्हता. आधी सत्ताधारी पक्षाची आमची बहिन श्रीमती कंचन लुंड यांनी हा विषय घेतला. त्यांचा जो त्रास आहे तो फक्त त्यांना नाही पूर्ण शहरास आहे. मा. सदस्य जे म्हणत आहे. की सभा स्थगित करा. आमचे म्हणणे हे होते की, आधी लक्षवेधी समाविष्ट करू दया. माझा जी लक्षवेधी मंजूर केली ती अशी आहे. ती सर्व सदस्यांना मान्य असेल. दोन वर्ष होत आहे निवडून होवून आज पर्यंत रोड चौक प्रवेशव्द्ार या बाबत एकही तदर्थ समितीची सभा झाली नाही. सर्व सदस्यांनी यासाठी पत्र दिले आहे हा एक मुद्दा आहे आणि दुसरा मुद्दा आहे श्री. राजेश वदारिया यांचा

<u>मा. सदस्य श्री. अरूण आशान:—</u> मा. महापौर हे सांगा आधी ही सभा चालू आहे का. आयुक्त साहेब पाणी नाही सभा कशी चालवता.

<u>सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—</u> पाणी दया पाणी दया.

**इकडे काही सदस्य राजेश वदारिया हाय हाय अशा घोषणा देत होते. पाणी दया पाणी दया. राजेश वदारिया हाय हाय.**

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> मा. महापौर जी मी आपली लक्षवेधी मांडली आहे.

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u> सभागृहाची भावना लक्षात घ्या.

<u>सदस्य. श्री. सुनिल सुर्वेः—</u> राजेश वदारिया हाय हाय.

<u>सदस्य. श्री. चंद्रशेखर यादवः—</u>वनवारीकडे पाणी कुठुन आले.

इकडे विरोधी पक्षाचे काही सदस्य राजेश वदारिया हाय हाय अशा घोषणा देत होते.

<u>सदस्य. श्री. कलवंत सिंग सोहटाः—</u>नाही चालणार नाही चालणार.

<u>सदस्य. श्री. राजेद्र चौधरीः—</u> दादागिरी नाही चालणार.

<u>सदस्य. श्री. कलवंत सिंग सोहटाः—</u>दलालोकी दलालगिरी नही चलेगी. हे बघा महापौराना शिकवत आहे सुपर महापौर सभा कशी चालवायची ते.

<u>सदस्य. श्री. शंकर लुंडः—</u> मा. महापौर मुलांना व्हॉलीबॉल खेळण्यासाठी मैदान नाही. गोलमैदान येथे ........

**इकडे सदस्य पाणी दया पाणी असे ओरडत होते. त्यामुळे नेमके कोण काय बोलत ते समजत नव्हते. महेश सुखरामाणी जी पाणी दया.**

<u>सदस्य. श्री. राजेंद्र चौधरीः—</u> महापौर मॅडम ही सभा पाणी नाही म्हणुन सभा तहकूब करा.

<u>सदस्य. श्री. अरूण आशानः—</u> महापौर मॅडम आम्ही तुमच्या सोबत आहे. पण पाण्यासाठी ही सभा तहकूब करा. आपण विसरला म्हणुन सभा चालवत आहात. विनंती आहे सर्व शहरातर्फे आयुक्त साहेब. सभा महत्वाची नाही पाणी महत्वाचे आहे. तुम्ही विसरलात आम्ही तुम्ही बोलला म्हणून एकदा पाण्यासाठी सभा तहकूब केली होती. पण आम्ही विसरलो नाही. आम्ही तुमच्या सोबत इथे होते. आपण याकडे लक्ष दया. प्लीज सभा महत्वाची नाही पाणी महत्वाचे आहे. आमची भावना लक्षात घ्या. आमच्या बरोबर प्रभागात चला.

<u>सदस्य. श्री. राजेंद्र चौधरी/ श्री. कलवंतसिंग सोहटाः</u>— पुन्हा सुपर महापौर आले.

<u>सदस्य. श्री. चंद्रशेखर यादवः—</u> यांचे ऐकाल तर शहराचा विकास कधीच होणार नाही.

<u>सदस्य. श्री. अरूण आशानः—</u> महापौर आमच्या सोबत आहे. पाण्यामुळे सभा तहकूब.

<u>सदस्य. श्री. कलवंतसिंग सोहटाः—</u> अपनी बात मन की बात.

<u>सदस्य. श्री. सतरामदास जैसवानीः—</u>धन्यवाद दया त्यांनी चार तास पाणी वाढवुन दिले.अजुन थोडा दबाव दिला तर पाणी मिळेल.

<u>सदस्य. श्री. सुनिल सुर्वेः—</u> पाच नंबरचे पाणी नाही वाढले.

<u>सदस्य. श्री. किशोर वनवारीः—</u> सतरामजी चे आधी ऐका. पाले येथील पाणी सोडा. त्यांना धन्यवाद करू दया.

<u>सदस्य. श्री. सुनिल सुर्वेः—</u> सतरामदास जी तिथले चालु झाले नाही.

<u>सदस्य. श्री. सतरामदास जैसवानीः—</u> मी कुठे काय बोललो. तिथे पाणी पाहिजे. कुणाला बघु नका पाणी दया.

यावेळी सदस्या श्रीमती कविता पंजाबी, श्रीमती इंदिरा उदासी सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य. श्री. धंनजय बोडारे:—</u> राजेश जी तुम्ही जर लक्षवेधी चालवली तर महासभा चालवली तर यापुढे जी पाणी कपात होईल याला तुम्ही जबाबदार असाल.

<u>सदस्य. श्री. चंद्रेशखर यादव:—</u>महापौर मॅडम तुम्ही सभा तहकूब केली त्याबददल धन्यवाद.

<u>महापालिका सचिव:—</u> मा. महपौरानी दोन्ही लक्षवेधी ऐकले आहे. आणि मा. आयुक्त साहेबांना यावर निर्णय घ्यायला सांगितले आहे. आणि विषय क्र २ सुरू करायला सांगितला आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २ :—</u>दिनांक २०/७/२०१८ (त्यात १६/८/२०१८, ४/९/२०१८, १५/९/२०१८ व १९/१०/२०१८), दिनांक २०/८/२०१८ (त्यात ४/९/२०१८, १५/९/२०१८ व १९/१०/२०१८), १५/९/२०१८ आणि २८/९/२०१८ तसेच विशेष महासभा दिनांक २०/१०/२०१८ आणि २/११/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य. श्री. कलवंतसिंग सोहटा:—</u> सचिव मॅडम तुम्ही पुन्हा विषय सुरू केला.

**यावेळी सर्व विरोधी पक्षातील सदस्य उभे राहुन पाणी दया पाणी दया सभा तहकूब करा अशा घोषणा देत होते. हाय हाय हाय पाणी दया पाणी दया असे ओरडत होते.**

<u>सदस्य श्री राजेश वदारिया/श्री किशोर वनवारी:—</u> पास पास इतिवृत्त पास.

<u>सदस्य. श्री. प्रमोद टाले:—</u>मला इतिवृत्तात दुरूस्ती सुचवायची आहे. माझा विषय क्र. ५ वर मी विरोध केला होता. तो लिहीला नाही.

<u>सदस्य. श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> इतिवृत्तात चुका आहेत. माझे मत आहे २ नंबर विषय पास मानला जाणार नाही. मला अपसेंट दाखवले आहे. मी त्या दिवशी बोललो आहे. ते आले. परंतु मला गैरहजर दाखवले आहे.

<u>सदस्य. श्री. राजेश वदारिया:—</u> इतिवृत्त पास झाले आहे.

<u>सदस्य. श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> नाही नाही मला अपसेंट दाखविले आ़हे. करेक्शन आहे.

<u>सदस्य. श्री. राजेश वदारिया:—</u>यांची दुरूस्तीची नोंद घ्या.

<u>सदस्य. श्री. चंद्रशेखर यादव :—</u> फक्त राजेश वदारिया म्हणाले म्हणुन पास झाले का.

<u>सदस्य. श्री. राजेंद्र चौधरी:—</u> सुपर महापौर एकटे पास म्हाणु शकत नाही.

<u>सदस्य. श्री. राजेश वदारिया:—</u>मी एकटा म्हणालो नाही. आमच्या येथुन पास पास म्हणाले.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> मागील सभेचे इतिवृत्त श्री. प्रमोद टाले व श्री. प्रदिप रामचंदानी या सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २** :—दिनांक २०/७/२०१८ (त्यात १६/८/२०१८, ४/९/२०१८, १५/९/२०१८ व १९/१०/२०१८), दिनांक २०/८/२०१८ (त्यात ४/९/२०१८, १५/९/२०१८ व १९/१०/२०१८), १५/९/२०१८ आणि २८/९/२०१८ तसेच विशेष महासभा दिनांक २०/१०/२०१८ आणि २/११/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

महासभा ठराव क्र. ४२ अ दिनांक : २०/१२/२०१८

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या तसेच श्री. प्रमोद टाले व श्री. प्रदिप रामचंदानी या सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह दिनांक २०/७/२०१८ (त्यात १६/८/२०१८, ४/९/२०१८, १५/९/२०१८ व १९/१०/२०१८) पृष्ठ क्र. १ ते १५८ पर्यंतचे, दिनांक २०/८/२०१८ (त्यात ४/९/२०१८, १५/९/२०१८ व १९/१०/२०१८) पृष्ठ क्र. १ ते ६६ पर्यंतचे, १५/९/२०१८ पृष्ठ क्र. १ ते १८ पर्यंतचे आणि २८/९/२०१८ पृष्ठ क्र. १ ते ४ पर्यंतचे तसेच विशेष महासभा दिनांक २०/१०/२०१८ पृष्ठ क्र. १ ते ६ पर्यंतचे आणि २/११/२०१८ पृष्ठ क्र. १ ते ४३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.**

**सदस्य. श्रीम. वसुधा बोडारे:—** मॅडम तुम्ही अर्ध्या तासासाठी कशाला सभा चालवता.

**सदस्य. श्री. अरूण आशान:—** जमनूजी महापालिकेच्या टाकीत खाली पाणी नाही.

**महापौर तथा पिठासन अधिकारी:—** मी बोलू का जरा. विषय क्र १ व २ मंजूर झाले आहेत. पुढील सभा विषय क्र. ३ पासुन घेण्यात येईल. सभा स्थगित करीत आहोत. पुढील आठवडयात पुढची सुचना मिळेल. ठिक आहे सर.

**सदस्य. श्री. अरूण आशान:—** तो पर्यंत काय. पाण्याचे काय.

**महापालिका सचिव:—** मा. महापौर मॅडम यांनी आदेश दिले आहे.

**सदस्य. श्री. कलवंतसिंग सोहटा:—** सचिव मॅडम घाई करू नका.

**सदस्य. श्री. अरूण आशान :—** महापौर मॅडम तुम्ही जरा गार्भियाने घ्या. तुम्ही आमच्या सोबत आहात. का सुपर महापौरच्या

**महापौर तथा पिठासन अधिकारी:—** मी सर्वा सोबत आहे.

**इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.**

**सदस्य. श्री. भगवान भालेराव:—** महापौर मॅडम लक्षवेधी एक सत्ताधारीची घेतात एक विपक्षाची घेतात. तुम्ही दोन्ही सत्ताधारीच्या घेतल्या.

<u>महापौर तथा पिठासन अधिकारी:—</u> तुम्ही नव्हता त्याअधीच लक्षवेधी स्विकारल्या.

<u>सदस्य. श्री. भगवान भालेराव:—</u>नाही मी इथेच होतो.

<u>महापौर तथा पिठासन अधिकारी:—</u> आपण नंतर आलात. मी आधीच सांगितले होते.

<u>सदस्य. श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> जेव्हा मॅडम ने निर्णय घेतला तेव्हा तुम्ही नव्हता.

<u>सदस्य. श्री. भगवान भालेराव:—</u> अरे पण लक्षवेधी आता आली ना.

<u>सदस्य. श्री. किशोर वनवारी:—</u> लक्षवेधी वाचली तेव्हा तुम्ही नव्हता.

<u>महापालिका सचिव:—</u> मा महापौर मॅडम यांनी सभा स्थगित करायला सांगितले आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सदरची सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

---

सूचकाचे नांव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. राजेश वदारिया

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक २०/१२/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ४२ ब</u> <u>दिनांक : २०/१२/२०१८</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २०/१२/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ६.३५ वाजता महापौर श्रीमती पंचम ओमेश कालानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२/१/२०१९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २/१/२०१९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## ६—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक २०/१२/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित झाल्याने सदर सभा बुधवार दिनांक २/१/२०१९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सदर सभेत महापौर, श्रीमती पंचम ओमेश कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/ होत्या.

१. श्रीम. पंचम ओमेश कालानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३३ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३४ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ५ | श्रीमती मिना कौर अजितसिंग लबाना | ३५ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ६ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ३६ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ८ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३८ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ९ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३९ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १० | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ११ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४१ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १२ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४२ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १३ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४३ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १४ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४४ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४५ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १६ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४६ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १७ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ४७ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १८ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४८ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| १९ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४९ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २० | श्री. भगवान शंकर भालेराव | ५० | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २१ | श्रीमती चक्रवर्ती उर्फ अडसुळ छाया सुजित | ५१ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २२ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५२ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २३ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५३ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २४ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५४ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २५ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ५५ | श्रीमती मिनाक्षी रवि पाटील |
| २६ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५६ | श्री. विजय चाहू पाटील |
| २७ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५७ | कु. कविता सुरेश गायकवाड |
| २८ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ५८ | श्री. विकास परशुराम पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | श्रीमती इन्दिरादेवी जमनादास उदासी | ५९ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३० | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३१ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६१ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३२ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे | ६२ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीमती आशा नाना बिराडे, ४. श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड, ५. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ६. श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी, ७. श्रीमती जया प्रकाश माखिजा, ८. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ९. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, १०. श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता उर्फ पप्पू गुप्ता, ११. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १२. श्री. दीपक लक्ष्मणदास सिरवानी, १३. श्री. चंद्रशेखर केशव यादव, १४. श्रीमती शीतल चंद्रकांत कदम, १५. श्री. धनंजय बाबूराव बोडारे, १६. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), १७. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, १८. श्री. आकाश परशुराम पाटील, १९. श्रीमती आशा जीवन इदनानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.
१. श्री. अच्युत हांगे, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
५. श्री. अशोक जाधव, सहा. मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. वानखेडे, उप लेखा परिक्षक
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. महेश सुखरामानी, प्र. शहर अभियंता
९. श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता, विदयुत
१०.श्री. सोनवणे, प्र. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
११.श्री. पाटील, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१२. श्री. रहेजा, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१३. श्री. ठाकरे, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
१४. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१५. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१६. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. सहा. आयुक्त
१७. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१८. श्री. संतोष लोणे, क. अभियंता, नासुके
१९. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२०. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
२१. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, आरोग्य
२२. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२३. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२४. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२५. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२६. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
२७. श्रीमती अलका पवार, अधिक्षक, महिला व बालकल्याण समिती
२८. श्रीमती निलीमा कदम, लिपिक, शिक्षण मंडळ

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान

सायंकाळी ४.२८ वाजता वंदे मातरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u>ही दिनांक २०/१२/२०१८ रोजीची स्थगित सभा आहे.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—**सर्वांना नविन वर्षाच्या शुभेच्छा।

**सदस्य श्री. अरुण आशान :—**मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे गटनेता व आमचे नगरसेवक श्री. भारत राजवानी यांची लहान बहिण सुनिता नरेश पंजाबी यांचे दिनांक २२/१२/२०१८ रोजी निधन झाले आहे. तर त्यांना श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**त्याचबरोबर प्रसिध्द अभिनेता श्री. कादर खान यांचे सुध्दा निधन झाले आहे त्यांना सुध्दा श्रध्दांजली वाहण्यात यावी.

---

सुचकाचे नाव :— श्री. अरुण आशान

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

## शोक प्रस्ताव

राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे गटनेता व नगरसेवक श्री. भारत राजवानी यांची लहान बहिण सुनिता नरेश पंजाबी यांचे दिनांक २२/१२/२०१८ रोजी निधन झाले आहे.

तसेच प्रसिध्द अभिनेता श्री. कादर खान यांचे सुध्दा निधन झाले आहे.

वर उल्लेखलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ४२ क** **दिनांक:— २/१/२०१९**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती सुनिता नरेश पंजाबी व श्री. कादर खान यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३:—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीमती आशा दिपक लोखंडे यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पास.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीमती आशा दिपक लोखंडे यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार मुळ नोकरदार कै. दिपक बबन लोखंडे, सेवा निवृत्त सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांची पत्नी श्रीम. आशा दिपक लोखंडे, यांनी अर्ज सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिाक्षण निरंक असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

''लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी''.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्रीम. आशा दिपक लोखंडे, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने, उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ४३ **दिनांक:— २/१/२०१९**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीमती आशा दिपक लोखंडे यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

➪ **विषय क्र.** ४ :— उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. विष्णु बाबु मगरे यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—** सर्व विषय ज्यात शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करायची आहे ते सर्व विषय क्र. ३ ते १० हे इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**महापालिका सचिव :—**विषय तर वाचावे लागतील ना.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**हो विषय वाचावेत.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ४:— उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. विष्णु बाबु मगरे यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार मुळ नोकरदार श्रीम. वत्सला बाबु मगरे, सेवा निवृत्त सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. विष्णु बाबु मगरे, यांनी अर्ज सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण २ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

''लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी''.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. विष्णु बाबु मगरे, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने, उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ४४ दिनांक:—२/१/२०१९

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. विष्णु बाबु मगरे यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. रवि करतारसिंग चौटले यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

———————————————————————————————————————

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. रवि करतारसिंग चौटले यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार मुळ नोकरदार कै. माया करतारसिंग चौटोले, दिवंगत सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. रवि करतारसिंग चौटोले, यांनी अर्ज सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण निरंक असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

''लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी''.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. रवि करतारसिंग चौटोले, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने, उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४५ <u>दिनांक:—२/१/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. रवि करतारसिंग चौटले यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :— उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीमती विमल श्यामलाल भगुर यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

---

<u>**काही सदस्य :—**</u>पास—पास......

<u>**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६**:— उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीमती विमल श्यामलाल भगुर यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार मुळ नोकरदार श्री. श्यामलाल छोटू भगूर, सेवा निवृत्त सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांची पत्नी श्रीम. विमल श्यामलाल भगूर, यांनी अर्ज सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण निरंक असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

''लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी''.

लाड कमिटीचा मुळ उद्‌देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्रीम. विमल श्यामलाल भगूर, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने, उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ४६ दिनांक:—२/१/२०१९

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्रीमती विमल श्यामलाल भगुर यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७** :—उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. अमर श्रीपाल राठी यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ७:— उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. अमर श्रीपाल राठी यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार मुळनोकरदार श्रीम. क्रांति श्रीपाल राठी, सेवा निवृत्त सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. अमर श्रीपाल राठी, यांनी अर्ज सादर केला आहे. त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण ३ री पास असे आहे. उल्हासनगर

महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये खालिलप्रमाणे नमुद आहे.

''लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी''.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. अमर श्रीपाल राठी, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने, उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४७ <u>दिनांक:—२/१/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. अमर श्रीपाल राठी यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८** :— उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. सचिन राहु बहनवाल यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ८:—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. सचिन राहु बहनवाल यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार कै. राजु फुलसिंग बहनवाल, दिवंगत सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. सचिन राजु बहनवाल, यांनी प्रस्ताव सादर केला आहे त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण २ री पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे.

लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भसल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. सचिन राजु बहनवाल, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ४८ दिनांक:—२/१/२०१९

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. सचिन राहु बहनवाल यांची शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ९ :—** कु. संगिता श्रीराम गोसावी, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

---

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—नियमाप्रमाणे देण्यात यावे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ९:—** कु. संगिता श्रीराम गोसावी, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

**कु. संगिता श्रीराम गोसावी**, लिपिक, यांना त्यांच्या स्व:ताच्या वैदयकिय उपचारासाठी आयुष हॉस्पिटल, कल्याण येथील खाजगी रुग्णालयात दिनांक १८/९/२०१७ ते दिनांक २३/९/२०१७ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये २,०२,४६३/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी १६/११/२०१७ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. आयुष हॉस्पिटल, कल्याण हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ७५ टक्के व ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) ह्दयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक ह्दयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, **कु. संगिता श्रीराम गोसावी**, लिपिक यांच्या स्व:ताचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार—परिशिष्ट १ अ.क्र ५ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,७४,८२७/— इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४९ <u>दिनांक:—२/१/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कु. संगिता श्रीराम गोसावी, लिपिक यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,७४,८२७/— इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १० :—** श्री. गोपाल नाथ जोगी, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>नियमाप्रमाणे...

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १०:—** श्री. गोपाल नाथ जोगी, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

**श्री. गोपाल नाथ जोगी**, लिपिक, यांना त्यांच्या स्व:ताच्या वैदयकिय उपचारासाठी आयुष हॉस्पिटल, कल्याण येथील खाजगी रुग्णालयात दिनांक २०/८/२०१७ ते दिनांक २६/८/२०१७ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये २,७०,८३०/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी २६/१०/२०१७ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. आयुष हॉस्पिटल, कल्याण हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ७५ टक्के व ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) हृदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, **श्री. गोपाल नाथ जोगी**, लिपिक यांच्या स्व:ताचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार—परिशिष्ट १ अ.क्र ५ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. २,३३,५०८/— इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणत येत आहे.

<u>**महासभा ठराव क्र:**</u> ५० <u>दिनांक:—२/१/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. गोपाल नाथ जोगी, लिपिक यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये २,३३,५०८/— इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**</u> श्री. सुमित सोनकांबळे यांना त्यांच्या पायाच्या ऑपरेशनसाठी मदत म्हणुन पैसे दयायचे आहेत.

<u>**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**</u>पैसे दिले आहेत त्यांना

<u>**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**</u>दिलेत?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>होय दिले आहेत, रुबी हॉस्पीटल. दिले आहेत ना साहेब?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>होय दिले आहे, चेक दिला आहे. आपले आयुक्त साहेब चांगले काम करतात.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>ठिक आहे, धन्यवाद।

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

—————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ११** :— महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये निळकंठ मंदिर ते किशन आहूजा माजी नगरसेवक, धनगुरु किराणा स्टोअर्सपर्यंतचा रस्ता ६०'फुट करणेकामी अंशत: फेरबदल करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करणे.

—————————————————————————————————————————

प्रशासनाकडुनच प्रस्ताव आला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>त्याची माहिती कोण देईल?

<u>महापालिका सचिव :—</u>नगररचनाकार साहेब.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, आपण मागील कित्येक महासभेमध्ये...

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>आपण प्रशासनाचे अधिकारी आहात काय? प्रशासनाचे अधिकारी उत्तर देतील ना ज्यांनी हा विषय आणला, आपण का बोलता.?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>त्या अधिका—यांना येवु दया त्यांना बोलु दया.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>प्रशासनाचे अधिकारी नाही आलेत तेच मी बोलण्यास जात आहे आपण बोलु तर दया. मागील कित्येक महासभेमध्ये आम्ही पाहिले आहे की सर्व विभागप्रमुख महासभेमध्ये व स्थायी समितीच्या सभेमध्ये उपस्थित राहत नाहीत व हे आयुक्तांचे कर्तव्य असते की त्यांची उपस्थिती येथे असली पाहिजे असे ठरविले पाहिजे. त्याकरीता नगररचना विभागाचे जे ३—४ विषय आहेत ते आम्ही वगळतो.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, श्री. वदारिया साहेब जे म्हणत आहेत त्यामध्ये तथ्य आहे. तत्पुर्वी माझी एक विनंती आहे मा. महापौरजी, आपण महापौर झाल्यापासुन व आयुक्त महोदय आपण येथे असल्यापासुन आपले सर्वांनी अभिनंदन सुध्दा केले पाहिजे की आपल्याकडील उल्हासनगरमधील अपंग व्यक्तींना जे अस्थिव्यंग आहेत त्यांना जे धनादेश प्राप्त केले, त्यांच्यातर्फे अभिनंदनाचा म्हणजे संबंधीत विभागाचा, आमचे जे साहेब आहेत त्या साहेबांचे सुध्दा अभिनंदन केले पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>श्री. सुर्वे, एक मिनिट, ११ नंबर विषयाचे काय झाले? ते होवु दया ना आधी.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>मा. महापौर महोदया, ११ नंबर विषय जो आहे त्याबद्दल माहिती देण्यासाठी मी उभा आहे. आज सकाळी मा. राज्य मंत्री महोदयांची कॉन्फरन्स होती. त्यांनतर पाणी पुरवठयाची आमची महत्वाची बैठक होती. त्यानंतर महासभा होती. आज मंत्रालयात मुख्यमंत्री महोदयांनी नगररचनाकार व मला बोलाविले होते, मी डेप्युटी सेक्रेटरी यांना सांगितले की, आमच्याकडे तीन बैठका असल्यामुळे मी येवु शकत नाही. त्यासाठी माझा प्रतिनिधी म्हणुन मी नगररचनाकार यांना पाठवत आहे. तर त्याकामासाठी मा. राज्य मंत्री महोदयांकडे तारीख असल्यामुळे ते तेथे गेलेले आहेत. तर या विषयाची सर्व प्रस्तावना आपण डिटेलमध्ये लिहिलेली आहे. काही शंका असेल तर मला विचारावी. आता श्री. सुर्वे साहेबांनी विचारले की कोठुन कोठपर्यंत घेणार आहेत, डीपीमध्ये जेवढे आहे तेवढेच घेणार. जास्त

कमीचा काही विषयच नाही. आणि हा प्रस्ताव आपण ४० फुटाचा ६० फुट करत आहोत. अगोदरचा ६० फुट आहे पुढचा ६० फुट करायचा आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—साहेब, बरोबर आहे ६० फुट करत आहोत. श्री. सुर्वे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे, परंतु १ नंबर ते बिर्लागेट हाही रस्ता ४० फुटचा आहे. या कामाची एमएमआरडीएने वर्कऑर्डर आणुन दिली आहे. तर तो रस्ता सुध्दा ६० फुट झाला पाहिजे ना. तुमच्या मताशी आम्ही सहमत आहोत.

सदस्य श्री. रविंद्र बागुल:—साहेब, बाहेर फटाके फुटत आहे ते बंद करा.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—फटाके वाजत आहेत तोपर्यंत सभा बंद ठेवा. मग आपले फटाके फोडु.

सदस्या श्रीमती ज्योती गायकवाड:—निळकंठ मंदिरापासुन जो रस्ता आला आहे तो रस्ता पास झालेला आहे. तो ६० फुट झाला पाहिजे. ४० फुट तो आता आहे पण आम्हांला ६० फुट पाहिजे, वाढवुन फायदाय नाही. तेथे ट्रॅफिक एवढी जाम होते तेथे २—२ तास ट्रॅफिक राहते.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, हा विषय क्र. ११ जो आला आहे, नविन डीपी आराखडा शासनाने जो पारीत केला आहे त्यामध्ये हा रस्ता ४० फुटाचा आहे परंतु शासनाने तेथे ट्रॅफिक समस्या होवु नये म्हणुन एक नविन ६० फुटाचा डीपी रस्ता काढला आहे व त्याच्या समान जो जात आहे तर डीपी रस्ता काढल्याने येथे १०० टक्के ट्रफिकचे समाधान होवु शकते. वनवे होवु शकतो तेथे आणि तेथे कोणाच्या रस्ता रुंदीकरणाची सुध्दा अडचण नाही. तर हा ४० फुट डेव्हलोपमेंट प्लानमध्ये रस्ता आला आहे तो उचित आहे त्यास ६० करायची आवश्यकता नाही त्यासाठी या प्रस्तावास सर्वसंमतीने रिजेक्ट करण्यात यावे.

सदस्य श्री. ज्योती गायकवाड :—हा रस्ता मोठा करण्यात येवु नये. तेथे रस्ता बनवायचा आहे, तेथे पायवाट सुध्दा नाही. तेथे गरीब लोकांचे घरे तुटतील.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—आता सभागृह नेत्याने जे सांगितले की तेथे जो समान रस्ता जात आहे तो बनविल्यानंतर तेथे जी लोक राहतात त्यांचे घर, दुकान वगैरे सर्व जाणार आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—तो रस्ता हरमन मोहता कंपनीतुन जात आहे जी जुनी आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—त्याच्या आजुबाजुला रस्ता आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—एक सुध्दा नाही. बॅरेक नं. १ जो आहे तेथुन रस्ता निघतो तर सरळ निळकंठ मंदिराकडे निघतो आणि तेथे एक सुध्दा घर नाही संपुर्ण मैदान आहे. ६० फुट बनवायचे आहे. श्री. भुल्लर महाराज यांना सुध्दा माहित असणार. धनगुरु किराणा स्टोअर्स ते हरमन मोहता.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—ऐकुन घ्या हरमन मोहटाचे जे गेट आहे ते गेट व आजुबाजुचे ५० घरे आहेत.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—हरमन मोहटाचे संपुर्ण प्लान जे आहे, आपणांस डीपीप्रमाणेच मंजुर आहे. डीपी विरुध्द काम नाही करणार.

सदस्या श्रीमती ज्योती गायकवाड :—हरमन मोहटा येथुन जे गेट आहे तेथे बरीच घरे आहेत. गरीब लोकांचे नुकसान होणार.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—त्या प्रभागाच्या नगरसेविका सांगत आहेत. मग आपण कोण आहेत बोलणारे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>त्या रस्त्यावर २०० दुकानदार आहेत, तेथे एक सुध्दा दुकानदाराने मागणी केली नाही की ६० फुट करा.

<u>सदस्या श्रीमती ज्योती गायकवाड :–</u>त्या दुकानदारांचे घरे तुटतील म्हणुन आपणांस त्या गरीब लोकांचे घरे तोडुन रस्ता बनवायचा आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मा. आयुक्त साहेब, कोणता रस्ता आहे की यामध्ये लोकांचे घरे जाणार नाहीत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आज जो प्रस्ताव आला आहे तो रस्ता जर आपण ४० फुट डीपीला ६० फुट करणार तर १०–१० फुट ३०० दुकानदार बाधित होतील. जो ६० फुटाचा नविन रस्ता शासनाने दिला आहे आणि हरमन मोहटा कंपनीच्या आतुन दिला आहे. धनगुरु किराणा स्टोअर्स ते तेथुन पंचायती हॉल, पंचायत हॉलपासुन संपुर्ण प्लॉटच्या मधील रस्ता.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>त्या प्लॉटमधुन झोपडे व घरे किती आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>कंपाउंट वॉल आहे एक सुध्दा घरे नाहीत.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>महाराज यांना तुम्ही विचारले तर त्यांनी ते सांगितले. लोकांची घरे तुटणार ते चालतील परंतु रस्त्यावर जो ४० फुट आहे त्यास ६० नाही करायचे. ज्यास चालायला जागा नाही तेथे ६० फुट काढा ना.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>डीपी रस्ता ४० फुट आहे व ४० फुटाची मागणी आहे लोकांची.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>२० फुटाचा होता तर मग एमएमआरडीने ६० फुटास मंजुरी का दिली. वर्कऑर्डर आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>वर्कऑर्डर आहे तर बनवा ना मग.

<u>सदस्य श्री. अरुण आशान:–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सेक्शन ३७ (१) मध्ये प्रस्तावित केलेला रस्ता.

<u>सदस्या श्रीमती ज्योती गायकवाड:–</u>६० फुट रस्ता पास झालेला आहे.

<u>सदस्य श्री.अरुण आशान:–</u> मामी जरा बसा. साहेब, प्रस्ताव ६० फुट होता नंतर ४० फुट झाला परंतु ४० फुटवर ६० फुटची मागणीच होती, हा रस्ता ६० फुट करतांना तेथे काही लोक बाधित होतात परंतु तेथे दुकाने डबल करु शकतो. जर आपण केबी रस्ता तोडु शकतो तर मग येथे दुकानदाराचे काय? ते दुकानदार नव्हते का? हा रस्ता ६० फुटासाठी प्रस्तावित केलेला आहे ३१ (१) प्रमाणे तेथे आधिच ४० फुट रस्ता आहे त्यास आपण ६० फुट करत आहोत. म्हणजे १०–१० फुट तोडणार आहोत. पण मा. सभागृहनेता म्हणतात की तेथे असंख्य झोपडया बाधित होतात, त्यांच्या पुनर्वसनाचे काय? ते म्हणालेत की मधला रस्त्यात काहीच नाही पण पुढचा रस्ता मागचा रस्ता, तेथे तर चालायला जागा नाही, आणि प्रापर्टीमध्ये तुमच्याकडुन अजुन मॉब झालेला नाही आणि अशा वेळेस तुम्ही तो रस्ता करतात आणि ३१ (१) खाली तुम्ही घेत नाहीत. आयुक्त साहेब, तुम्ही सांगितले होते की मागच्या महासभेमध्ये तुम्ही प्रस्तावित करा. १०० फुटाचा रस्ता तयार आहे, तुमचे प्राकलन तयार आहे, फक्त काम करायचे आहे, असे असतांना सभागृह नेता सांगतात, हे चुकीचे आहे. मा. सभागृह नेता हे पहा, वाचा, श्री. राजेश वदारिया हे पहा आणि वाचा, काहीही नाही सांगत.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. आयुक्त साहेब, मला वाटते नगररचना विभागाचे कोणीही नाही तर हा विषय डिफर करा. पुढच्या महासभेत हा विषय ठेवा जेणेकरुन विभागातील लोक राहतील आणि आयुक्त साहेब, बाधित किती आहेत हे ही सांगावे. याची माहिती सुध्दा आली पाहिजे, श्री. जमनादास पुरस्वानी सांगत आहेत तसेच श्री. अरुण आशान सुध्दा सांगत आहेत.

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, जेव्हा हा ४० फुटाचा रस्ता डीपीमध्ये आला होता तेव्हा कोणी हरकत घेतली नव्हती की यास ६० फुट करण्यात यावे. अचानक या रस्त्यास ६० फुट का करण्यात यावे, शहरात आधीच त्रास होत आहे, एकतर रस्ते बनत नाहीत, डीपी रस्ता आधीच ४० फुट आहे, जर ४० चे ६० करणार तर लाखो लोक बेघर होतील. व्यापा—यांना काय त्रास देणार? आपण शहर वाचवु इच्छिता की उजाडु इच्छिता. आज कल्याण अंबरनाथ रस्त्याची हालत काय झाली आहे, रोज अपघात होतात. तो रस्ता मृत्युचा घाट झाला आहे तर मग हा रस्ता सुध्दा मृत्युचा घाट बनविणार काय? आज तो रस्ता ६० फुट करण्याची गरज नाही. माझे सुध्दा तेथे हॉस्पीटल आहे. मी तोडण्यास तयार आहे पण माझे मागे आहे. काहीच फरक पडणार नाही. तेथे ४० वर्षापासुन माझे हॉस्पीटल आहे. तो रस्ता ६० फुट करण्याची गरज नाही. ४० फुट बरोबर आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>जास्त न बोलता....

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी यावर मतदान घेतले जावे.

<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>आधी बोलु तर दया. मग मतदान घ्या. महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो रस्ता आहे तो महामार्गाला जोडणारा रस्ता आहे. उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. १ मधुन बाहेर पडणारा रस्ता आहे. आजही महापालिकेची बससेवा नसल्यामुळे तेथे कधी कधी बसेस येतात सुध्दा. हा जुना बसस्टॉप आहे. तेथे आवश्यक आहे. तो ४० फुट झाला म्हणुन ३७ (१) प्रमाणे प्रस्तावित केलेले आहे. एमएमआरडीएने मान्यता दिली आहे. प्रस्तावित केलेले आहे महानगरपालिकेने मी काय माझ्या घरुन आणलेले नाही. तुम्ही ऐकतच नाही. मतदान घ्या बरोबर आहे पण प्रथम ऐकुन तर घ्या. ही मागणी ४० फुटाचा रस्ता तुमचा ६० आधीच होता, महापौरजी आधी होता त्यानंतर आता प्रस्तावित दिला आहे. जेथे रस्ता नाही तेथे बनविण्यासाठी अग्रेसर आहे, साहेब आपण एवढे रस्ते कटिंग केले मग हा रस्ता का नाही?

<u>सदस्य श्री. महेश सुखरामानी:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मी अरुण आशान यांना सांगु इच्छितो की शहरात डेव्हलपमेंट प्लान पास झाला आहे त्याप्रमाणे कार्य केले पाहिजे. तो शहराच्या हिताचा आहे.

<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>बरोबर आहे, बरोबर आहे, मग मागच्या वेळेस तुम्ही रस्ता डेव्हलप करायला घेतला तो डेव्हलपमेंट मधुन का गाळला? चुकुन आपण रस्ता बदल केला मग हा सुध्दा चुकुन ४० चा ६० झाला आहे. तेच मला म्हणायचे आहे आपण जर चुक केली आहे तर ही सुध्दा चुक आहे आपली. महापौरजी, आपण चुक सुधारली आहे तर मग ही सुध्दा चुक आहे ना.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>एक मिनिट, आपण त्या एरियाच्या नगरसेविका कोण आहेत त्यांना बोलु दया.

<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>महोदया, याचा अर्थ बाकीच्या लोकांनी बोलायचे नाही असे आहे का?

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>नाही तसे नाही.बोला ना आपण बोला पण त्या विभागाच्या नगरसेविका कोण आहेत हे मला विचारायचे आहे. मी विचारु नाही शकत का.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>या सभागृहात फक्त अरुण आशान यांना बोलण्याचा अधिकार आहे.

<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>आपणांस सुध्दा आहे ना, आपणांस मागील वेळेस पदवी सुध्दा दिली आहे.

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—</u>महापौरजी, माझे हॉस्पीटल आहे त्या रस्त्यावर.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>डॉ. साहेब उत्तर दया तेथे हॉस्पीटलच्या जागी पाणीपुरीची दुकान उघडली आहे.

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—</u>तेथे येवुन पहावे आपण.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>चला चला.

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—</u>हो चला.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>चला सोबत आत काय होत आहे ते पहा, मी काल संध्याकाळी पाहुन आलो. आताच चला. दवाखान्यात पाणीपुरी....

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>मा. महापौरजी, सदस्य श्री. महेश सुखरामानी यांनी सांगितले की, डीपी प्लानप्रमाणे शहराचा विकास झाला पाहिजे. तर शहराचा नविन डीपी लागु झाला आहे काय? रिंगरुट जे काही आहे ते १२० फुट झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>त्यामुळे लोकांना त्रास होईल, रस्ते कमी होतील.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>लोकांना त्रास होईल पण बनविणार नाही नविन डीपीप्रमाणे...

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय म्हणत होते हे समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री. महेश सुखरामानी :—</u>माझे म्हणणे आहे की लोकांना तेथे त्रास आहे. जनतेचे ऐकले पाहिजे. नविन डीपीप्रमाणे चालले पाहिजे. येथे सभागृह नेता यांनी स्वत: सांगितले की तेथे १२० फुट या गोष्टीची गरज नाही. नविन डीपीप्रमाणे पाहिजे, पब्लीकची डिमांड आहे तेथे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>आधी आम्हांला बोलु दया मग आपण बोला. येथे आपणांस जास्त बोलु देतात. आम्ही सुध्दा तेच इच्छितो जे त्यांनी सांगितले. हरमन मोहता येथुन रस्ता होणार आहे तो सुध्दा महासभेत रद्द करण्यासाठी आणा. लाखो लोकांचे झोपडे तुटतील असे आमच्या नगरसेवकाने सांगितले. त्या विभागाचे नगरसेवक आहेत. तेथे श्री. कुमार आयलानी यांचा प्लाट आहे म्हणुन तुमची भुमिका आहे का?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>रद्द करा आमची सहमती आहे परंतु ४० चा ६० नाही करु देणार.

यावेळी काही सदस्य जोर—जोरात एकत्र बोलत असल्याने कोण नेमके काय म्हणत होते हे समजुन येत नव्हते.

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u>टाका प्रस्ताव टाका.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>प्रशासनाचे काय आहे? जो प्रशासनाने आणला आहे त्याप्रमाणे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>मा. महापौरजी, येथे सभागृहात फार विचारविमर्श झाला, एकुण मिळनु सर्व लोकांची भावना ही आहे की कोणत्या गरीब लोकांची झोपडी तुटु नये. कोणत्या दुकानदाराचे दुकान तुटु नये जे ब—याच वर्षापासुन तेथे आहेत. सर्वांची चिंता तीच आहे. डेव्हलोपमेंट विषयी सांगतो की असे डेव्हलोपमेंट झाले पाहिजे जेथे तो बसत आहे त्याची रोजीरोटी तुटली नाही पाहिजे. आपण शहराचा विकास करु इच्छितो. आता येथिल विरोधाभास काय आहे की, रस्ता हा ८० फुट झाला पाहिजे. आपणासोबत आम्ही सुध्दा आहोत, आम्हांला सुध्दा वाटते की ८० फुट झाला पाहिजे. १२० फुटाचा ८० फुट झाला पाहिजे असे आमचे मत आहे. जेथे जेथे लोकांचे नुकसान होणार, जे काही विपक्षांकडुन प्रस्ताव येईल किंवा सत्तापक्षाकडुन येणार तर आम्ही त्या गोष्टी कमी करण्यास तयार आहोत. मला माफ करावे आपला जो प्रस्ताव आहे तो उजाडण्यासाठीचा आहे. व्यापारी लोकांना आपण उजडु देणार नाही कारण की आपण एक रस्ता १०० फुट करण्यासाठी घेतला जोपर्यंत तो पुर्ण होत नाही व त्या रस्त्याचा जोपर्यत निर्माण होत नाही तोपर्यंत या शहराच्या रस्त्यास वाढवुन, काही ठिकाणी ४०

फुट झाला आहे डीपीमध्ये तर वाढविण्याचा प्रश्नच उरत नाही. सत्ताधारी असो किंवा विरोधीपक्ष असो त्यांनी हा विचार केला पाहिजे जे मोठे रस्ते आहेत त्यांना कमी कसे करणार?

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सचिव मॅडम, मतदान घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. पीठासीन अधिकारी यांनी मतदान घ्यायला सांगितले आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>मा. महापौरजी एक मिनिट बोलु इच्छितो की विषय असा आहे की आमचे मित्र श्री. प्रदिप रामचंदानी यांनी चांगली गोष्ट सांगितली आहे. आमचा सुध्दा तोच मुद्दा आहे. आमचा व्हीनस टॉकिज येथुन जो रस्ता गेला आहे तो स्टेशन ते लालचक्कीपर्यंतचा रस्ता आहे. तेथे दुकानदार, कारखानदार यांचे नुकसान कमी होती परंतु लोकांचे जे घर जात आहे ते उध्दवस्त होत आहे, संपुर्ण इमारत तुटत आहे. त्याचा सुध्दा प्रस्ताव आला पाहिजे, जे ८० फुट आहे ते ६० फुट झाले पाहिजे.

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—</u>शहरास वाचवा.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>लोकांची घरे उजडली नाही पाहिजे.

**यावेळी सदस्या श्रीमती चंद्रावती सिंग सभागृहातुन बाहेर गेल्या.** 

<u>सदस्य श्री. महेश सुखरामानी :—</u>मा. महापौर, उप—महापौरजी, माझे मित्र श्री. राजेंद्र चौधरी यांनी जो मुद्दा मांडला की कमी केले पाहिजे आणि गरीबांचे घरे तुटली नाही पाहिजे, नुकसान झाले नाही पाहिजे. त्याचप्रकारे डॉल्फिन क्लब रस्त्यावर रोड कटींग झाले आहे, २००२ मध्ये झाली आहे, त्यापुर्वी सुध्दा झाली आहे, तेथे तोडफोड झाली आहे. परंतु आता नविन डिपीमध्ये १२० फुट रस्ता दाखविला आहे. तर त्यास सुध्दा ८० फुट करण्यात यावा, अशी सभागृहास विनंती आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे, मा. महापौरांनी मतदान घ्यायला सांगितले आहे, जो हा प्रस्ताव अमान्य करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>सर्वसंमतीने अमान्य करा.

<u>महापालिका सचिव :—</u>सर्वसंमतीने हा प्रस्ताव अमान्य झाला आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ११:—** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये निळकंठ मंदिर ते किशन आहूजा माजी नगरसेवक, धनगुरु किराणा स्टोअर्सपर्यंतचा रस्ता ६०'फुट करणेकामी अंशत: फेरबदल करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करणे.

<u>प्रस्तावना</u>

मुळ मंजूर विकास योजनेनुसार हा रस्ता ६०' फुट रुंद प्रस्तावित होता. सुधारीत विकास योजना शासनाने दि. २१.०४.१७ रोजी भागश: मंजूर केली. त्यामध्ये निळकंठ मंदिर ते किसन आहूजा, धनगुरु किराणा स्टोअर्सपर्यंतचा रस्ता ४०' रुंद प्रस्तावित आहे. नियोजनाच्या दृष्टिकोनातुन व रस्त्यावर आज रोजी होणारी वाहतुक कोंडी विचारात घेता हया रस्त्याची रुंदी ४०' ऐवजी ६०' रुंद करणे योग्य होईल. याचा विचार होता सुधारीत मंजूर विकास योजनेमध्ये ४०' रुंद रस्ता ६०' रुंद करण्यासाठीचा शासकिय ठराव शासनास सादर करावा, असे सदस्या श्रीम. ज्योती गायकवाड यांनी सादर केला आहे.

सबब निळकंठ मंदिर ते किशन आहूजा, धनगुरु किराणा स्टोअर्सपर्यंतचा रस्ता ४०' फुट ऐवजी ६०' फुट रुंद करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे

कलम ३७(१) अन्वये किरकोळ फेरबदलाबाबतची कार्यवाही प्रस्तावित करावी लागेल. यासाठी मा. महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

तसेच महासभेची मंजुरी घेतल्यावर वरील बदलाबाबत लोकांकडुन सुचना व हरकती मागविण्यासाठी अधिसूचना प्रसिध्द करावी लागेल व ३० दिवसापर्यंत प्राप्त होणा—या सूचना व हरकतीसह सदरहू किरकोळ फेरबदल प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर करावा लागेल यासाठी मा. महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

सबब वरील प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५१ <u>दिनांक:—२/१/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये निळकंठ मंदिर ते किशन आहूजा माजी नगरसेवक, धनगुरु किराणा स्टोअर्सपर्यंतचा रस्ता ६०'फुट करणेकामी अंशत: फेरबदल करणेचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

—————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १२** :—महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये चंद्रमणी बुध्द विहार ते स्टेशन मार्गे विर सावरकर पुतळयापर्यंतचा रस्ता ६० फुट रुंद करण्यासाठी किरकोळ फेरबदल करुन शासनास प्रस्ताव सादर करणे.

—————————————————————————————————————————

**यावेळी सदस्य श्री. सुमित सोनकांबळे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**यावेळी सदस्या श्रीमती सुनिता बगाडे, श्रीमती सुमन सचदेव हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>—मा. महापौरजी, आता एक बाजु नाण्याची आता आपल्या नगरसेवकांचे म्हणणे आपण ऐकले, मा. आयुक्त साहेब. त्या म्हणण्याप्रमाणे गेल्या आठ महिन्यापुर्वी आपण जिजामाता उदयान ते उल्हासनगर स्टेशन ते स्वतंत्र्यवीर सावरकर पुतळा या रस्त्याला आपण महासभेचे मान्यतेने केले होते. त्याप्रमाणे चारही बाजुने त्यांना मार्किंग देण्यात आल्या होत्या. परंतु मागच्या २२ डिसेंबरला आमच्या जिजामाता उदयानाला, मनसे सदस्य सचिव उपोषणाला बसल्यानंतर, आताची जी परिस्थिती आहे ती लक्षात आणुन देतो तो विषय वेगळा आहे आणि हा विषय वेगळा आहे. तुम्ही सदस्यांनी माझी गोष्ट समजुन घ्यावी. उल्हासनगर स्टेशनच्या बाहेर पडल्यानंतर, कृपया माझी गोष्ट समजुन घ्या. तेथे नविन डीपी मध्ये जुना रस्ता ४० फुट आहे, तसाच ठेवलेला आहे, त्याच्यावर काही निर्णय घेतलेला नाही. परंतु बुध्दविहारापासुन ते जिजामाता उदयानापर्यंतचा जो रस्ता आहे. तो ६० फुट केलेला आहे, प्रत्येकाला तेथे माहित आहे की रिक्षाच्या दोन दोन रांगा असतात. आता तो २२ ते २३ व २५ फुटापर्यंत आहे काही ठिकाणी. तो ४० फुट आपण मान्य केला होता त्याप्रमाणे मार्किंग सुध्दा झाली आहे. माझी आयुक्तांना विनंती आहे की, सर्व नगरसेवकांची भावना लक्षात घेता,

४० फुटापर्यंत त्यांना देण्यात काही हरकत नाही ४० फुटापर्यंत जर होत असेल तर हा ६० चा प्रस्ताव आणण्यात काही अर्थच नाही. जर आयुक्त साहेब तो ६० फुट करायचे म्हणत असतील तर तो खाली सुध्दा ६० फुट होणे गरजेचे आहे. कारण जेथे गरज आहे तेथे आपण ४० करतो आणि जेथे गरज नाही तेथे ६० करतो तर मग या उल्हासनगरची कोणतीच जनता आपणांस माफ करणार नाही. माझी विनंती हीच आहे की ४० फुटच झाले पाहिजे, आताच्या परिस्थितीमध्ये. जेव्हा केव्हा रस्ता ६० फुट होईल, डीपीमध्ये येईल त्याप्रमाणे पुढील अंमलबजावणी करा, सभेचे कामकाज थांबले आहे. मा. महापौरजी, मी आयुक्तांना विनंती करतो, आपण सुध्दा समजुन घ्या, ४० फुट रस्ता यामध्ये सर्वांचा फायदा आहे. ४० फुटावर कोणाचे नुकसान जास्त नाही. सर्व सदस्यांची भावना आपल्या लक्षात येईल. मला वाटते आयुक्त साहेब आपण तो रस्ता ४० फुट करावा आजच्या या महासभेत मी विनंती करतो. ४० फुटाची मार्किंग दिलेली आहे त्याप्रमाणे लवकरात लवकर कटिंग चालु करण्यात यावे. प्रभाग अधिकारी सर्व येथे बसलेले आहेत, त्यांनी लोकेशन सुध्दा पाहिजे आहे आपले हे काम उदयाही चालु होवु शकते. मी पाहिले म्हाडाला आयुक्तांनी २ तासात रस्ते करुन घ्या असे केले आहे. हा रस्ता सुध्दा पास आहे, त्याप्रमाणे आपण ४० फुट मान्य केलेला आहे. त्या ठरावाप्रमाणे आपण लोकेशन इश्यु केलेले आहेत. त्याप्रमाणे सुरु झाले तर फार उत्तम होईल आणि जर ४० फुट होत नसेल तर स्टेशनला ६० फुट झाल्याशिवाय या रस्त्याला हात लावु नये अशी माझी या सभागृहाला, सर्वांना विनंती आहे. तुम्ही भावना समजुन घ्या, आम्हांला अधिकार मिळाले म्हणुन त्या अधिकाराचा गैरवापर करणे ते मा. प्रशासनाला असेल आणि आम्हां शासनाला असेल, जे अधिकार मिळाले ते अधिकार सरकारला किंवा आपल्या संविधानाला याकरीता दिलेले आहेत लोकोपयोगी, लोकहिताचे असे निर्णय झाले पाहिजे. कायदा पाळलाच पाहिजे. परंतु त्या कायदयामुळे जर जास्तीचे नुकसान होत असेल, आणि एखादयावर न्याय आणि एखादयावर अन्याय असे जर होत असेल, कारण की आपण सर्वांनी तो रस्ता पाहिला आहे, स्टेशनला काय परिस्थिती आहे. आणि स्टेशनपासुन पुढे काय परिस्थिती आहे. माझी सर्वांना विनंती आहे की, ४० फुटच तो रस्ता करण्यात यावा. त्याप्रमाणे काम चालु करण्यात यावे. त्याचे लोकेशन प्रोसेस चालु आहे. माझी आयुक्तांना या निवेदनाद्वारे विनंती आहे. त्यांनी कृपया संबंधितांना आदेश देवुन काम चालु करावे. धन्यवाद।

**यावेळी सदस्या श्रीमती कविता बागुल, श्रीमती अंजली साळवे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

सदस्य श्री. विजय पाटील:—महापौर महोदया, आयुक्त महोदय, थोडीसी माहिती पाहिजे आपणाकडुन रिंगरोडबद्दल आपण बोलत आहोत. रिंगरोड १२० फुटाचा आहे, कैलास कॉलनीपासुन नविन प्लानमध्ये १२० फुटाचा अर्धा दिलेला आहे.

**यावेळी सदस्या श्रीमती सुमन सचदेव व श्रीमती सुनिता बगाडे यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.**

आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—आता हा विषय नाही.

सदस्य श्री. विजय पाटील :—नाही, नाही विषय नसेल फक्त माहिती पाहिजे साहेब. जर रिंगरोड चालु झालाच.....

**यावेळी सदस्य श्री. भगवान भालेराव व श्री. शंकर लुंड यांनी सभागृहात प्रवेश केला.**

आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—मा. महापौर महोदया, सभागृहामध्ये जे विषय पटलावर आहेत, त्याविषयीच बोलावे. कारण तुम्ही कुठलीही माहिती मागणार आणि अधिकारी नसतील, नस्ती नसतील तर तुम्हांला माहिती कशी देणार? जो विषय सभा सूचनेवर आहे त्याबद्दल काय माहिती पाहिजे ती मी दयायला तयार आहे.

सदस्य श्री. विजय पाटील:—असेल तर दया नसेल तर चालेल, पटलावर नाही ना चालेल. माहिती नाही म्हणुन सांगितले तर विषय संपला.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>कोणत्याही सभागृहामध्ये कोणत्याही सदस्याने जे पटलावर विषय आहेत त्याबद्दलच तुम्ही बोलावे.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:—</u>मला समजते, पण ज्याच्याकडे सनद आहे आणि ज्याच्याकडे सनद नाही, कर पावती आहे आणि आता रस्ता २० फुट आहे आणि १२० फुटाचा होणार आहे मग त्यामध्ये जेवढी घरे जाणार आहेत, बाधित होणार आहेत तर महापालिकेतर्फे कर पावतीवाल्यांना काही मोबदला देणार आहेत की नाही. एवढेच विचारायचे होते आणि ज्यास सनद आहे किंवा नाही, कर पावती आहे किंवा नाही त्यास देणार आहेत की नाही एवढेच मला विचारायचे होते. आपण म्हणतात ते बरोबर आहे परंतु उल्हासनगरची सर्व लोक घाबरलेली आहेत. त्यात सर्वांची घरे बाधित होत आहेत, सर्वांची म्हणजे जेथे २० फुट रस्ता आहे तेथे १२० फुट रस्ता झाला तर किती घरे जातील याकडे जरा आपण थोडेसे लक्ष दया. फक्त माहिती मिळावी की त्यांना मोबदला देणार आहोत की नाहीत. एवढेच म्हणणे होते माझे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, हे फक्त लोकेशन मला प्रॉपर पाहिजे होते कोठुन कोठपर्यंत आहे ते. कोण सांगेल ते.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>मी सांगतो ना.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>सांगा ना.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>तुमची एवढीच मागणी आहे ना.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>लोकेशन पाहिजे होते.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>हो पण बाकीचे जे बोललेत त्यांना सुध्दा उत्तर दयायचे आहे, तर मग तुमची एवढीच मागणी आहे ना.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण:—</u>होय. आपण सांगितले तर मग मी बोलेन ना.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>मा. महापौर महोदया, मा. उप—महापौर, सन्माननिय सभागृह, डीपी प्लान मुळामध्ये, मला वाटते श्री. सुर्वे साहेब जुने आहेत. सभागृहामध्ये बरेच जुने सदस्य आहेत परंतु जे सन्माननिय नगरसेवक नविन आहेत, त्यांच्यासाठी मी थोडक्यात जरा माहिती सांगु इच्छित आहे. आपल्या शहरामध्ये १९७४ मध्ये जुना डीपी मंजुर झाला होता. आणि त्यानंतर प्रत्येक १० वर्षांनी डीपी रिवाईज्ड व्हायला हवा होता. पण का झाला नाही मला माहित नाही. परंतु गेल्या १० वर्षापासुन डेव्हलपमेंट प्लान मंजुर झाला की तो २० वर्षानंतर रिवाईज्ड होतो, आणि नंतर २०१७ मध्ये आपल्या शहराचा विकास आराखडा मंजुर झालेला आहे. आणि हा विकास आराखडा मंजुर होत असतांना त्याला एक विहित मार्ग आहे. विहित मार्ग म्हणजे टाउन प्लॅनिंग विभाग आमच्या सुपरविजन खाली शहराचा जुना नकाशा काय होता, नविन काय आहे हे करत असतो. प्रशासनाने प्रस्ताव केल्यानंतर डीपी मा. महासभेपुढे येतो. मा. महासभेमध्ये त्यावरती सांगोपांग चर्चा होते. चर्चा झाल्यानंतर हा डीपी आम्ही टाउन प्लॅनिंग विभागाला सादर करतो. त्यानंतर टाउन प्लॅनिंग विभाग पुण्याहुन मुंबईला मुख्यमंत्री कार्यालयामध्ये नगरविकास विभागाचे मा. मुख्यमंत्री असल्यामुळे त्यांच्या विभागात सादर केला जातो. त्यावर हरकती सुचना वगैरे सर्व प्रोसिजर होते. आणि त्यानंतर हा डीपी मंजुर होतो. हा डीपी काय रात्रीतुन मंजुर होत नाही. जनरल मी आपणांस माहिती देत आहे. आता आपणाकडे दोन प्रस्ताव आलेत, एकामध्ये म्हटले आहे की ४० चे ६० करायचे आहेत, दुस—यामध्ये म्हटले आहे अर्धा रोड, श्री. सुर्वे साहेब, मी आपणांस म्हणत आहे. स्टेशनपासुन बुध्दविहारापर्यंत ४० फुटाचा रस्ता आहे आणि तिथपासुन जिजामाता उदयानापर्यत ६० फुटाचा आहे. आता श्री. चौधरी साहेब म्हटले की फलनाफलना रस्तापण असा झाला पाहिजे. आपण पत्र दया, आपण सन्माननिय सदस्य आहात, तुम्ही आम्हाला पत्र दिले. त्यामध्ये श्री. सुनिल सुर्वे यांचे पत्र आहे दिनांक २१/२/२०१८, त्यानंतर सन्माननिय नगरसेवक श्री. चंद्रशेखर यादव यांचे पत्र आहे २१/९/२०१८, त्यानंतर मा. महापौर श्रीमती पंचम ओमेश कालानी यांचे पत्र आहे ३/१०/२०१८, त्यानंतर श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड यांचे पत्र आहे ११/१०/२०१८ या सन्माननिय सदस्यांच्या पत्राला मान देवुन प्रशासनाने आणले आहे आणि

त्याप्रमाणे येथे प्रस्ताव आणलेला आहे. आता हा प्रस्ताव मंजुर करायचा की नामंजुर करायचा हा आपला विषय आहे. आपण जर मंजुर केला तर आम्ही शासनाकडे पाठविणार, आपण नामंजुर केला तर तो धुळ खात पडेल येथे. विषय असा आहे की आपल्या शहरातील लोकसंख्या किती आहे, आपल्या शहरामध्ये रस्ते किती आजच्या तारखेस आहे. आणि तो रस्ता कधीपासुनचा आहे, ५० वर्षापुर्वी रस्ता तोच होता. आज लोकसंख्या काय आणि पन्नास वर्षापुर्वी काय, रस्ता तोच होता, कमाल आहे की त्याने ही लोकसंख्या पेलली. प्रशासन कधीही मोठा रस्ता छोटा करा असा प्रस्ताव आणत नाहीत किंवा आणणार नाही आपल्या माहितीस्तव डीपी प्लानमध्ये जी विड्थ आहे तेवढी घेणे मला बंधनकारक आहे. जर समजा यामध्ये मला तडजोड करण्याचा अधिकार असता. तर आपला जो अंबरनाथला रस्ता होत आहे तो पाच फुटासाठी थांबलेला आहे. सुप्रिम कोर्टापर्यंत प्रकरण गेलेले आहे आता मुरबाड रोडचे गेले होते प्रकरण त्यामुळे महापालिका जिंकलेली आहे. पंधरा तारखेपर्यंत त्यांना सांगितले आहे की तुमची घरे.........

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>तो १२० फुटाचा रस्ता होता ना.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>नाही, त्यावेळी तो १०० फुटच होता. तो नविन डीपीमध्ये झाला त्यावेळी त्याचे सर्व झालेले होते, त्यावेळी आपण लोकांची बैठक घेवुन सुध्दा सांगितले आहे, कारण तुमचे काही नुकसान होवु नये. सुप्रिम कोर्टाने दिले आहे त्यामुळे रस्त्याचे काम तर थांबणार नाही. तो नॅशनल हायवे आहे तो आपल्या गावातुन जात आहे त्यामुळे तो मोठा झालाच पाहिजे. आम्ही तेथुन जातो, नागरीक जातात ठिक आहे काही मिळण्यासाठी काही हरवावेच लागते. काही लोकांना नुकसान सोसावेच लागेल परंतु लाखो लोकांना त्याचा फायदा होईलच ना. ५० लोकांचे नुकसान झाले तरी लाखो लोकांना त्यामध्ये समृध्दी होणार आहे. त्यामुळे आपण श्री. चौधरी साहेब जे बोललात, तुम्हांला इच्छा आहे तर तुम्ही प्रस्ताव आणा मंजुर झाला तर आपण पुढे पाठवु, नाही मंजुर झाला तर आमचा नाईलाज आहे. सभागृहामध्ये मी बोलु शकत नाही पण माझे मत मी मांडु शकतो. आम्ही मत मांडु किंवा सभागृहाला सांगु इच्छितो आपल्या शहराच्या हिताचे सांगतो मंजुर करायचे की नाही हा आपला विषय आहे. मंजुर करावे न करावे मतदान करावे न करावे हा तुमचा विषय आहे. त्यामुळे या विषयाबद्दल मी तुम्हांला सांगु इच्छितो की चर्चा झालेली आहे सभागृहात पास करणे, नापास करणे हा तुमचा विषय आहे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, मी तुम्हांला प्रश्नच वेगळा विचारला होता. तुम्हांला सांगितले की संविधान हे लोकांच्या फायदयासाठी आहे. संविधान बनविले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी. त्या गोष्टीचा विचार केला तर प्रशासनाने शासनाला सांगितले आहे. मागच्या महासभेत आम्ही सांगितले की जेथे गरज आहे, लोकांची गरज आहे तेथे ४० फुट आणि जेथे गरज नाही तेथे ६० फुट करायचे असेल, त्यामध्ये बाधित होणारे २०० दुकाने १५ घरे, ९ इमारती, जिजामाता टाकी, छत्रपती शिवाजी उदयान, त्यासोबत ३ मंदिर या इतक्या गोष्टी बाधित होत असतील, शासन कधी असे म्हणत नाही की एकाला एक न्याय व दुस—याला दुसरा न्याय दया. मी तुम्हांला एकदम साधी गोष्ट विचारली जो पुतळा सावरकर पुतळयापासुन स्टेशनमार्गे, जिजामाता उदयान आणखी एक रस्ता आहे तो नविन डीपीमध्ये ६० फुट झालेला नाही. आणि कालच्या डीपीमध्ये अजुन त्याचा निर्णय आलेला नाही. परंतु आता कामाची निकड पाहता, ३१ मार्चला ते काम सुरु झाले पाहिजे. त्यात ५ कोटीचा निधी आणि आता आपण दिड कोटी निधी मंजुर केले. ४० फुटाचे लोकेशन सर्व झालेले आहे. तर मग मी तुम्हांला विनंती हीच केली की आता ६० फुट करणेस जेव्हा स्टेशन डेव्हलपमेंटचा विषय येईल, आणि त्यावेळेस तो रस्ता येईल तर तो वरचा ६० पाहुनच येईल ना. त्यांनी डीपीमध्ये आणलेला नाही तो ईपीमध्ये ठेवला आहे. आता ईपीचा मला लॉग फार्म माहित नाही मी कमी शिकलो आहे. परंतु फॅक्ट अशी आहे मला जे डोळयाने दिसते, शासन आणि प्रशासनाला समजायला लोकांच्या समस्या पाहिजे. त्यामुळे तो आपल्यासमोर मांडत आहे. आणि मा. महापौर महोदयांना सुध्दा विनंती केली होती. महापौर आमच्या प्रभागात येवुन लोकांना आश्वासीत केले होते की ६० फुटाचे ४० फुट करण्यासाठी आम्ही आयुक्तांना सांगु. मा. महापौरजी, त्या ज्या गोष्टी आहेत ते आपण आयुक्त महोदयांना मराठीमध्ये सांगा असे माझे म्हणणे आहे. धन्यवाद। जय हिंद। जय महाराष्ट्र।

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>साहेब, मी विचारले त्यावर तुम्ही अजुन सांगितले नाही. आरोबी जो आहे ना.

**यावेळी सदस्या श्रीमती संगिता सपकाळे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>आरोबी कुठला जो डीपी प्लानमध्ये जेवढी विड्थ आहे तेवढी विड्थ आणि जेवढी लांबी आहे तेवढी लांबी. नेमके कोठे ते मी साईटवर गेल्यावरच सांगेन येथे सांगु शकत नाही.

**यावेळी श्रीमती कविता बागुल, श्रीमती अंजली साळवे यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.**

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>पण सांगणारा विभागच नाही ना.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>मी आहे ना.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मग सांगा ना आरोबी कुठला?

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>एक मिनिट, या विषयामध्ये दोन आरोबी येत आहेत. यांचे म्हणण्याचा अर्थ असा आहे की तुमच्या या प्रस्तावनेत दोन महत्वाचा आरोबी कुठला. तुमच्या या प्रस्तावनेत आरोबीचे लोकेशन चुकीचे आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>आरोबी दोन आहेत, एक पवईचा आरोबी आहे, एक उड्डानपुल, तर कुठपर्यंत असा विषय आहे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>आपणांस जर बघायचे असेल तर मी दाखवितो.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>आरोबीचा विषय घेतला असता तर हा विषय राहिला नसता. तो प्रस्ताव तुम्ही आणला त्यावर नकाशा सुध्दा लावला नाही. एक नकाशा आणला असता तर बरे झाले असते.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>साहेब, आरोबी कुठला ते फक्त सांगा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, नावाचा उल्लेख केला असता ना तर हा विषय राहिलाच नसता. मला वाटते तुम्ही प्रस्ताव आणला तर त्याच्यावर नकाशा......

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>जिजामाता उदयानापासुन बुध्दविहार, बुध्दविहारापासुन जिजामाता मंदिरापर्यंत असे आपण त्यामध्ये बोललो आहे. डीपीमध्ये जेवढी लांबी, रुंदी असेल तेवढीच घेणार एक इंच सुध्दा जास्त कमी घेणार नाही. मला त्यात कमी जास्त करण्याचा अधिकार नाही.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण:—</u>छत्रपती शाहु महाराज उड्डानपुल तर नाही ना आरोबीमध्ये.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी</u> :—यामध्ये आरोबी कुठला आहे, दोन आरोबी आहेत.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मी आपणांस वाचुन सांगतो पॅरा नं. २ रा त्याची तिसरी ओळ तसेच उल्हासनगर स्टेशन ते आरोबी उल्हासनगर—४ पर्यंत ४० फुट रुंद प्रस्तावित आहे. तसेच उल्हास स्टेशन ते आरोबी यांज समांतर रस्ता आहे. हे दोन रस्ते आहेत ना त्यामध्ये तर.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>कोणते दोन रस्ते आहे ते तर सांगा.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>यामध्ये दोन रस्ते आहेत. रस्ते तर मी पाहिले नाही. त्यांना मी तेच विचारत होतो की हे दोन रस्ते आहेत की एक रस्ता आहे याबाबत खुलासा करा. त्यांच्याकडुन श्री. रमेश चव्हाण खुलासा मागत आहेत की तो एक रस्ता आहे की दोन रस्ते आहेत याबाबत खुलासा करावा. मी खुलासा करत नाही तर त्यांना सांगत आहे खुलासा करा म्हणुन.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—आता यांना सुपर आयुक्तांचे सुध्दा नाव दयायला पाहिजे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—साहेब, कोण उत्तर देणार? दोन आरोबी आहेत.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—यामध्ये सोबत जोडलेल्या सुधारीत मंजुर नकाशाचा भाग नकाशा, जिजामाता उदयान ते चंद्रमणी बुध्दविहार हा रस्ता ६० फुट रुंद प्रस्तावित आहे. पुढील चंद्रमणी बुध्दविहार ते उल्हास स्टेशन, उल्हास स्टेशन ते आरोबी उल्हासनगर—४ पर्यंतचा रस्ता ४० फुट रुंद प्रस्तावित आहे. उल्हास स्टेशन ते आरोबी यास समांतर अस्तित्वात रस्ता....

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—साहेब, दोन्ही आरोबी हे ४ नंबर मध्येच येतात. एक छत्रपती व दुसरा जिजामाता उदयान आहे, शाहु महाराज उड्डान पुल आहे तेच आम्हांस नेमके विचारायचे आहे की आरोबी नेमका कुठला?

आयुक्त, श्री. अच्युत हांगे :— दोन्ही आरोबी आहेत. त्यामध्ये ए,बी,सी,डी असे म्हटले आहे. ए,बी,सी,डी म्हणजे दोन्ही आरोबी एकमेकांना जोडुन ए ते बी, बी ते सी, आणि सी ते डी असे आहे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—नाही, नाही डीपीमध्ये तो ४० फुट आहे, ४० फुटच असला पाहिजे.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—नाही, डीपीमध्ये जे असेल तेच होईल ना.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—४० चे ६० नाही झाले पाहिजे. तुमच्याकडे तर ४० चा ६० करण्यासाठी आला आहे.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—तुम्हीच ठरवायचे आहे ते की ४० चा ६० करायचे आहे की नाही आहे ते.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—साहेब, मी त्या प्रभागाचा नगरसेवक आहे हे करतांना तुम्ही थोडेफार विश्वासात तर घेतले पाहिजे होते. याबाबत मी चार चार पत्र दिले आहे. जे डीपीमध्ये होते त्या डीपीमध्ये तसाच झाला पाहिजे.

सदस्य श्री. किशोर वनवारी :—श्री. अरुण आता किती एज पर डीपी ना. ६० नको ना.

सदस्य श्री. अरुण आशान:—नाही, नाही, नाही, बोलु तर दया ना.

सदस्य श्री. किशोर वनवारी :—तुम्हीच तर बोलत असतात आम्ही कोठे बोलतो. मा. महापौर फक्त हेच बोलत असतात.

सदस्य श्री. अरुण आशान :—ज्या प्रभागात आम्ही आहोत तर बोललेच पाहिजे ना.

सदस्य श्री. किशोर वनवारी :—४ नंबर आपले आहे तर आम्ही यास होय करु.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—श्री. अरुणजी, यापुढे आपण फक्त आपल्या प्रभागासाठीच बोलणार याचे वचन दया.

सदस्य श्री. अरुण आशन :—नामनिर्देशित सदस्यांना परिसिमा नाही ना.

सदस्य श्री. किशोर वनवारी :—आम्ही श्री. चव्हाण साहेबांशी सहमत आहोत.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—श्री. आशान साहेब, आपणांस मी विनंती करते की, कोणी बोलत असतांना मध्येच बोलु नये, कारण आपण थकणार, आपण उभेच राहतात म्हणुन म्हणते.

<u>सदस्य श्री. सु निल सुर्वे:</u>—साहेब, सर्वांचे मत आणि मतांतरानंतर एकच गोष्ट आहे, ४० चे ६० करता येईल पण आपण डीपी येईल तोपर्यंत काम नाही चालु करु शकत का? ६० करु की ४० करु असे चालणार आहे का? सदरचा रस्ता हा ४० फुट सभा सूचनेवर आला आहे. आता आदेश देवुन ४० फुट करुन घ्या.

<u>सदस्य श्री. अरुण आशान :</u>—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, विषय बघा काय आहे, विषय ३७ (१) खाली प्रस्तावित केला आहे तो सभागृहामध्ये मांडला आहे. उल्हास स्टेशन ते आरोबी, आरोबी ते समांतर रस्ता तेथुन कोयना पुतळा ते जिजामाता उदयान, आमचा विषय काय आहे, श्री. सुनिल सुर्वे जरा ऐका. आरोबी असा होता की जो बोटल नेक आहे स्टेशनचा तेथुन तो ६० फुट आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—मा. महापौरजी, चर्चा खुप झाली. मा. महापौरजी, श्री. सुर्वे यांनी जो प्रस्ताव आणला आहे त्यामध्ये त्यांनी ४० चे ६० करण्यास सांगितले आहे तो प्रस्ताव ते मागे घेत आहेत व दुरुस्त करुन नंतर दुसरा प्रस्ताव घेवुन येतील. त्यात सहमती करुन जसे आपणांस आणायचे आहे, तर हा प्रस्ताव रिजेक्ट करु या.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :</u>—मा. महापौर महोदय, प्रशासनाने प्रस्ताव आणला आहे. ते परत घेणार नाहीत, तुम्ही रिजेक्ट करा की मंजुर करा.

यावेळी सदस्य एकत्रितपणे जोरजोरात बोलत असल्याने कोण नेमके काय म्हणते ते समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री. अरुण आशान :</u>—आयुक्त साहेब हे बरोबर आहे. हे लोक ऐकु देत नाही प्रथम प्रस्ताव काय आहे ते पहा.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :</u>—मा. महापौर महोदया, मला एक मिनिट बोलायचे आहे, एज अ टिपी चेअरमन माझी सर्वांना एकच विनंती आहे, शहरात वाहतुकीची समस्या सर्व ठिकाणी होतच आहे. टीपी चेअरमन म्हणुन विनंती करते की रस्ता ६० फुटाचा करावा. कारण की शहराचा विकास तेथेच दिसतो जेथे ही लक्षणे असतील.

<u>सदस्या श्रीमती ज्योती गायकवाड:</u>—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आता श्रीमती सोनेजी महोदयांनी सांगितले आहे की ट्रफिकची समस्या आहे, रस्ते मोठे केले पाहिजे परंतु मला हे नाही कळत की रस्ते मोठे करुन तेथे रिक्षा, ट्रक, टॅम्पो, टुव्हिलर, फोरव्हिलर असे पार्किंगची जागा उपलब्ध केली पाहिजे. रस्ते कितीही मोठे केले तरी पार्किंगची समस्या होते, गाडया कश्या पध्दतीने ठेवायला पाहिजे तेच समजत नाही. रिक्षा लाईनीत उभ्या असतात, तीन तीन लाईनी असतात, रिक्षावाल्यास जेथे जागा मिळेल तेथे गाडया लावत असतात. टुव्हिलर असो, फोरव्हिलर असो, लोकांचे घरे व दुकाने तोडुन रस्ते रुंदीकरण करायचे हे काय चालले आहे ते मला समजत नाही. प्रथम तर महापालिकेने ते नियोजन केले पाहिजे की गाडया कश्यापध्दतीने पार्किंग करावेत. रस्ता रुंदीकरण करुन जर गाडया पार्किंगसाठी जागा करत असाल तर हे जनतेला फसविण्यासारखे आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, एका प्रश्नाचे मला उत्तर दयावे. हा प्रस्ताव प्रशासनातर्फे आला आहे आणि या रस्त्यासाठी वर्कऑर्डर सुध्दा झाले आहे. हा प्रस्ताव आपण रिजेक्ट करु या. सेक्शन ३७ (१) मध्ये आम्ही कोणत्या प्रस्तावास ६० चे ४० केले किंवा ४० चे ६० केले आणि डीपीमध्ये तो ४० आहे आणि त्यास ४० चे ६० केले. तर सेक्शन ३७ (१) मध्ये येथुन प्रस्ताव झाल्यानंतर शासनाकडे जाणार परंतु शासनाकडुन ३ वर्ष, २ वर्ष, ४ वर्ष मंजुरी होवुन येते की नाही येत परंतु त्या वेळेस ३ वर्ष किंवा ४ वर्ष असो त्या रस्त्याचे काम होईल किंवा ते काम पास होतील तर तो रस्ता आज कोणत्या मार्किंगने बनविणार सेक्शन ३७ (१) मध्ये ४० आहे आपण ४० चे ६० केले तर तोपर्यंत आपण ४० ने बनविणार की ६० ने एवढे फक्त उत्तर मिळावे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :</u>—याचे उत्तर मी दिले आहे परत देतो, आपला २०१७ ला डीपी मंजुर झाला, एक ५० टक्के रस्ता ४० फुट आहे, ५० टक्के रस्ता ६० फुट आहे. प्रस्ताव आज आलेला आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>तुम्ही उत्तर देतांना चुकत आहात ५० टक्के डीपी पास आहे, १०० टक्के पास नाही, तर जो पास आहे ते म्हणा.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :–</u>एक मिनिट पहा, डीपी प्लानमध्ये जो रस्ता १०० टक्के मंजुर झालेला आहे, ईपीमध्ये ज्या गोष्टी आहेत, ईपीमध्ये मंजुरीचे १३७ होते ईपीसुध्दा मंजुर झालेत. आदेश येण्याची फक्त वाट पाहत आहोत. आणि आता डीपी रुल्स मंजुर होवुन १५ तारखेपर्यंत येणार आहे आणि सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे या डीपीमध्ये रस्ता तुम्ही ६० फुट करायचा की ४० फुट कि १० फुट करायचा हा सभागृहाचा निर्णय आहे. माझ्या डीपीवर आज जे शासनाने मंजुर केले त्यावर ६० फुट आणि ४० फुट असा आहे. त्यामध्ये कमीत कमी ४० फुट चे ६० फुट केले तरी शासनाकडुन मंजुरी होवुन येईपर्यंत मला तेथे काम करता येणार नाही. जेवढे ४० फुट आहे तेवढे ४० फुट करणार आणि ६० फुट करण्याची वाट पाहत बसणार तोपर्यंत मला मार्किंग करता येणार नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>या प्रस्तावास सर्वसंमतीने रिजेक्ट करु या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>ऐकुन घ्या, ऐकुन घ्या, साहेब यापुर्वी आमचा ४० फुटाचा रस्ता मान्यता आहे आपण तो शासनाकडे पाठविला नाही येथेच केला त्याप्रमाणे मार्किंग दिलेली आहे. ८–९ वर्षापुर्वी हा प्रस्ताव पास आहे ४० फुटाचा. ८–९ वर्षापुर्वी प्रस्तावाची सूचना झाली.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :–</u>एक मिनिट जरा ऐका, तुम्ही जो ४० फुट रस्त्याचा विषय घेतला तो अशासकिय ठराव आहे आणि त्याची मार्किंग केलेली आहे. तुम्ही मी आल्यावर म्हणालात की वरचा रस्ता व खालचा रस्ता सुध्दा ४० फुट करा. पण डीपीमध्ये तो ४० फुट आहे व बाकी ६० फुट आहे. नंतर ६० चे ४० करायचे आणि ४० चे ४० करायचा असा ठराव घेतला, तो अशासकिय ठराव आहे. त्या ठरावाप्रमाणे शासनाने मंजुर केलेल्या डीपीमध्ये मी बदल करु शकत नाही. मी नाही करु शकत, ज्याने कोणी केली असेल त्याने केले असेल. मार्किंग दिली असेल ती चुक की बरोबर मला माहित नाही. डीपीमध्ये जेवढी विड्थ आहे तेवढी मला कमी करुन घेण्याचा अधिकार नाही. उदया माझ्यावर फौजदारी गुन्हा दाखल होवु शकतो. उदया माझी पेन्शन सुध्दा भेटणार नाही, त्यामुळे मी ती रिस्क घेणार नाही. जी डीपीमध्ये विड्थ आहे त्यास मी बांधिल आहे. तुम्हांला जर ६० चे ४० करायचे आहे तर हा ठराव पास करा. शिवसेना, बीजेपीचे शासन आहे, लवकरात लवकर मंजुर करुन आणु. मंजुरीप्रमाणे विड्थ घेवुन तुमचे मी काम करुन देतो.

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :–</u>आयुक्त महोदय, धन्यवाद आपले एक्सप्रेशन खुप चांगले होते.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :</u>–साहेब, डीपीमध्ये जे ६० फुट आहे तर त्यास ६० चे ४० करु शकतात काय?

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :–</u>मी सांगितले तुम्हांला, हे शिवसेनेचेच नगरसेवक आहेत, श्री. सुर्वे आहेत, श्रीमती ज्योती गायकवाड आहेत, त्यानंतर श्री. चंद्रशेखर यादव आहे, ते आपल्याच गटाचे लोक आहेत ना, मग यांनी तुम्हांला का विचारले नाही. तुमचा मान ठेवायचा म्हणुन मी प्रस्ताव आणला पास करायचा की नाही हे तुम्ही ठरवा.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> आरोबी तो नाही. तुम्ही आता स्पष्ट करा की आरोबी कोणता आहे. नाही तर माझा विरोध आहे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:–</u>तुम्हांला सांगितले आहे ना. तुम्ही प्रस्ताव मंजुर केल्याशिवाय आम्ही शासनास पाठविणार नाही, तुम्ही प्रस्ताव मंजुर करायचा की नाही हे तर ठरवा.

<u>सदस्य डॉ.प्रकाश नाथानी :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आपण जे एक्सप्लेशन केले त्यामध्ये माझी एक क्युरी आहे. सभागृहात सदस्यांनी म्हटले की ४० चे ६० करायचे आहे. तर आपण ४० आहे आणि ४० करुन घेवुन परंतु माझा एक प्रस्ताव येणार आहे, आता ४० फुट आहे, आणि डीपीमध्ये ६० आला आहे. ३७ (१) मध्ये मी टाकणार आहे

आणि ६० चा ४० करणार आहे. तेथे लाखो लोकांचे घर जाणार आहे, तर मग मी पत्र देणार तर त्याच्यावर काय आपण कारवाई करणार काय? ६० चे ४० करणार काय? जोपर्यंत शासनाकडुन येत नाही. तोपर्यंत आपण त्यास करणार नाहीत ना. आम्हांला याबाबत आपणाकडुन स्पष्ट उत्तर पाहिजे.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—यांचे म्हणणे आहे की, ६० फुटाचा रस्ता आहे डीपीमध्ये तर तो मी ४० फुटाचा करणार आहे, त्यासाठी प्रस्ताव आणणार. शासनाकडुन यायला १० वर्ष लागतील, म्हणजे तुम्ही तो प्रस्ताव पाठविला आणि १० वर्ष तो प्रस्ताव येईल की नाही ते मी सांगु शकत नाही. परंतु डीपीमध्ये आज जी विड्थ आहे ती मी घेणार. तुम्ही काय हटकुन पडणार काय?

सदस्य डॉ.प्रकाश नाथानी:—३७ (१) मध्ये काय? म्हणजे नाही येणार तर मग काय बुलडोझर लावणार काय?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौरजी, त्या रस्त्यास बनविणे अथवा न बनविणे ते प्रशासनाचे काम आहे आणि आपण व शासन मिळुन काम करत आहोत. कोणते रस्ते कोणत्या वर्षात घेत आहोत. याचा अर्थ असा नाही की संपुर्ण शहरात डीपी लागु झाला, आपण त्यास एका वर्षात बनवु असे नाही दोन रस्ते या वर्षी घेणार, दोन रस्ते त्या वर्षी घेणार, आपण जर ३७ (१) मध्ये ६० चे ४० करण्यास पाठविले आहे, तर आपण ते करणार नाही ४—५ वर्ष शासनाकडुन करुन आणु.

सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—आयुक्त महोदय, तेच पाहिजे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—या प्रस्तावास अमान्य करा.

महापालिका सचिव:—ठिक आहे, हा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—एक मिनीट महोदया, तुम्ही कोणीच गांर्भीय घेत नाहीत. मी जे सांगत आहे त्याचे गांर्भीय आयुक्त साहेबांच्या लक्षात आले, आयुक्त साहेब, कायदयाने कडक आहेत. मी वारंवार सांगतो, संविधान कशासाठी बनविला लोकांच्या फायदया करीता. तुम्ही हा रस्ता करु नका आम्हांला काही घेणे देणे नाही. रस्ता रद्द झाला तरी चालेल. एक रस्ता तुम्ही ६० करत आहात एक ४० करत आहेत.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—नाही हे मी करत नाही, आता डॉ. नाथानी यांनी जे म्हटले की तुम्ही हा रस्ता करणार काय? तुम्ही १२० करणार का? बाजारात तुरी आणि भट भटणीला मारी असे म्हणतात, आमच्याकडे. अशी परिस्थिती आहे तर सभागृहामध्ये आलेल्या विषयावर चर्चा करावी. बाकीच्या विषयावर फाफट चर्चा केली तर काहीतरी वेगळा त्यास फाटा फुटत जातो.

सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—येथे ४०, ६०, ६० ४० चा प्रश्न होत आहे.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—ज्या विषयावर विषय आला त्यावर सभागृहात बोलणे योग्य आहे. मा. श्री. सुर्वे साहेब आपण जे संविधान संविधान म्हणत आहेत आणि महानगरपालिकेच्या महासभेचा विषय, तुम्ही स्थानिक स्वराज्य संस्थेचे मालक आहात.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—माझे म्हणणे माझी रिक्वेस्ट तीच आहे. ४० फुट आहे तर ४० करा, एक तर ६० फुटाचा असेल तर सर्व ६० करा, जोपर्यंत डीपी मंजुर होवुन येत नाही तोपर्यंत. साहेब, समजुन घ्या माझी विनंती एकच आहे. डीपी मंजुर होईतोपर्यंत हा रस्ता ६० तोडुन १४० तसाच ठेवणार हे नाही पाहिजे मला. जर हा रस्ता चौडा आहे तर मग स्टार्ट टु एंड एकच ठेवायचा आहे. हीच माझी विनंती आहे, धन्यवाद।

महापालिका सचिव :—विषय क्र. १३.......

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—या विषयाचे काय झाले?

महापालिका सचिव :—अमान्य केला आहे ना.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १२:—** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये चंद्रमणी बुध्द विहार ते स्टेशन मार्गे विर सावरकर पुतळयापर्यंतचा रस्ता ६० फुट रुंद करण्यासाठी किरकोळ फेरबदल करुन शासनास प्रस्ताव सादर करणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयान्वये चंद्रमणी बुध्द विहार ते स्टेशन मार्गे विर सावरकर पुतळयापर्यंत चा रस्ता ६० फुट रुंद करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये किरकोळ फेरबदल करुन शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत पत्र दिलेले आहे.

सोबत जोडलेल्या सुधारीत मंजूर विकास योजनेच्या भाग नकाशाचे अवलोकन व्हावे. जिजामाता उद्यान ते चंद्रमणी बुध्द विहार हा रस्ता ६०'०० रुंद प्रस्तावित आहे. पुढील चंद्रमणी बुध्द विहार ते उल्हास स्टेशन तसेच उल्हास स्टेशन ते ROB, उल्हासनगर — ४ पर्यंत रस्ता ४०'०० रुंद प्रस्तावित आहे. तसेच उल्हास स्टेशन ते ROB यास समांतर अस्तित्वातील रस्ता आहे. (ABCD)

रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता सदरच्या रस्त्यांचे रुंदीकरण ४०'०० फुट ऐवजी ६०'०० फुट प्रस्तावित करण्याबाबत मा. महापौर, माननीय नगरसेवक श्री. सुनिल सुर्वे, मा. नगरसेवक श्री. चंद्रशेखर यादव आणि मा. नगरसेविका ज्योती दिलीप गायकवाड यांनी पत्र दिलेले आहे. तरी सदरचे रस्ते सोबत जोडलेल्या नकाशानुसार ६० फुट रुंद करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही प्रस्तावित करुन प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास पाठवावा लागेल. यास मा. महासभेची मंजूरी आवश्यक आहे.

मा. महासभेने मंजुरी दिल्यास वरील बदलाबाबत लोकांकडुन सुचना व हरकती मागविण्यासाठी अधिसूचना प्रसिध्द करावी लागेल व ३० दिवसापर्यंत प्राप्त होणा—या सूचना व हरकतीसह सदरहू किरकोळ फेरबदल प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर करावा लागेल यासाठी मा. महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५२ दिनांक:—२/१/२०१९

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये चंद्रमणी बुध्द विहार ते स्टेशन मार्गे विर सावरकर पुतळयापर्यंतचा रस्ता ६० फुट रुंद करण्यासाठी किरकोळ फेरबदल करणेचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १३ :— प्रस्तावाची सूचना

शहराची परिसिमा, मालमत्ता कराबाबत नागरीकांना एकाच ठिकाणी मिळणा—या सेवा या बाबी विचारात घेता कर विभागाचे कामकाजाचे विकेंद्रीकरण न करता कर विभाग मनपा मुख्यालयात कार्यरत ठेवणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**पास, पास.

**<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>**पास करा, पास करा.

**<u>महापालिका सचिव :—</u>**ठिक आहे, म्हणजे प्रशासनास निर्देश देत आहे असे लिहिते.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. १३ : <u>प्रस्तावाची सूचना</u>

शहराची परिसिमा, मालमत्ता कराबाबत नागरीकांना एकाच ठिकाणी मिळणा—या सेवा या बाबी विचारात घेता कर विभागाचे कामकाजाचे विकेंद्रीकरण न करता कर विभाग मनपा मुख्यालयात कार्यरत ठेवणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ १३ चौ.कि.मी. असून येथिल शहरातील मिळकतींवर कर विभागाकडुन कर आकारणी वसुली करण्यात येते. त्यानुसार सदर आकारणीचे जुने अभिलेख व संगणक नोंदी या महानगरपालिका मुख्यालयात ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे नागरीकांना कर आकारणी, कराचा भरणा करणे, नाव हस्तांतरण, कर आकारणीच्या तक्रारी वगैरे सेवा एकाच ठिकाणी मनपा मुख्यालयात मिळत आहेत.

सद्यस्थितीत कर विभागाचे प्रभाग समिती कार्यालयात विभागणी करण्याची कार्यवाही सुरु आहे. यामुळे कर विभागातील कामकाजाच्या अनुषंगाने संबंधित पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांना बोलाविल्यास ते वेळेत उपलब्ध होवु शकणार नाही. परिणामी नागरीकांना तसेच महापालिका सदस्यांना नाहक त्रास सहन करावा लागून प्रभाग समिती कार्यालयात खेटे मारण्याची वेळ येणार आहे.

प्रभाग समिती कार्यालयात अनधिकृत गांधकामे व साफसफाईच्या कामाचा बोजा असल्याने त्यांना सतत क्षेत्रिय स्तरावर उपस्थित रहावे लागते. त्यामुळे कर विभागाशी संबंधित कामकाजाबाबत नागरीकांना संबंधित सहाय्यक आयुक्तांना वेळ देणे अशक्य होईल. सबब नागरीकांच्या तक्रारींचे निराकरण वेळेत होणार नाही अथवा अडचणीचे होईल. परिणामी कर वसुलीस अपेक्षित प्रतिसाद प्राप्त होणार नाही.

मालमत्ता कर हा मनपाच्या आर्थिक उत्पन्नाशी निगडित आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार कर आकारणी व वसुलीसंदर्भातील अधिकारी उप—आयुक्त/ कर निर्धारक व संकलक यांना प्रदान करण्यात आले आहेत. अधिकाराचे सहाय्यक आयुक्तांना विकेंद्रीकरण केल्यास कामात एकसुत्रता राहणार नाही अथवा अधिकाराचा नियमबाहय वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी शहराची परिसिमा, मालमत्ता कराबाबत नागरीकांना एकाच ठिकाणी मिळणा—या सेवा या बाबी विचारात घेता कर विभागाचे कामकाजाचे विकेंद्रीकरण करु नये. तसेच कर विभाग मनपा मुख्यालयात कार्यरत ठेवणेबाबतचा प्रस्ताव महासभेत मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र:</u>** ५३ <u>दिनांक:—२/१/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शहराची परिसिमा, मालमत्ता कराबाबत नागरीकांना एकाच ठिकाणी मिळणा–या सेवा या बाबी विचारात घेता कर विभागाचे कामकाजाचे विकेंद्रीकरण न करता कर विभाग मनपा मुख्यालयात कार्यरत ठेवणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

⇨ **विषय क्र. १४ :– प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मंजूर सेवा प्रवेश नियमावलीमध्ये विदयुत अभियांत्रिकी विभागात येणा–या पदाचा सेवा प्रवेश नियमावलीमध्ये महासभा ठरावाने सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती व सुधारणा करुन त्यास मंजुरी मिळण्याबाबत पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापालिका सचिव :–**पास, पण ठराव दया मला काय आहे तो. ठरावात आपण बदल केला तो वाचुन दाखवावा लागेल.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**ठराव देतो.

**महापालिका सचिव :–**ठराव दया मग मी करेल तसे. ठराव दिला आहे, ठरावात बदल सुचवत आहेत की, एक अभियांत्रिकी आहे पुर्वी नामनिर्देशनाने ५० टक्के व पदोन्नतीने ५० टक्के तर त्यांनी आता १०० टक्के पदोन्नतीने सांगितले आहे. आणि आता पदव्युत्तर पदवी आता समकक्ष पदावरील आहे तर त्यांनी महापालिका आस्थापनेवरील कार्यरत अभियंता या पदावरील ३ वर्षाचा अनुभव असा बदल केला आहे.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–**हे बरोबर आहे साहेब, आधीच आपणाकडे विदयुत विभागात आधीच जे कनिष्ठ अभियंता आहेत, त्यामध्ये आपण विदयुतचे जे कनिष्ठ अभियंता घेतले आहे त्यात नामनिर्देशन १०० टक्के केलेले आहे. जर साहेब आपण २५ टक्के आणि ७५ टक्के करणार तर साहेब, आधीच ते तेथे काम करत आहेत तर त्यांनाच देण्यात यावे. त्यांच्याकडे अनुभव आहे आणि काम करण्याचे माहित आहे. व जे नविन येतील त्यांना ती लोक चांगले प्रशिक्षण देवु शकतील साहेब.

**सदस्य श्री. अरुण आशान:–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आता जो श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव आहे ते तो मांडत आहेत, परंतु आयुक्त महोदय मला एक खंत वाटते सभागृहामध्ये चर्चेचा विषय आहे म्हणुन सांगतो जेव्हा आरआर बनतो, सेवाजेष्ठता नियमावली बनते. आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेत आता भरती झालेली आहे त्यात जे कर्मचारी आहेत त्यांना प्रभारी चार्ज दिलेला आहे. ते अधिकारी आपण प्रभारी म्हणुन नियुक्त केलेले आहे. तर मला वाटते जेव्हा आरआर बनतो तेव्हा प्रशासनाने त्या त्या विभागाकडुन कोण कोण किती किती वर्षापासुन आहेत आणि आपण किती किती पदांना कोठे काय देतो याची प्रथम माहिती घ्यायला पाहिजे होती. हा जो डायरेक्ट आरआर १०० टक्के गेला कोठे, खरे म्हटले तर उल्हासनगर महानगरपालिकेची परिस्थिती अशी आहे. बाहेरुन जर आपण लोक भरली तर आपणाकडे त्याचा क्लॉज लागला असेल तर तो शेवटपर्यंत राहील. नियमावलीत बदल करतांना आपण जर शैक्षणीक पात्रता पाहुन आपण त्यांना प्रभारी पद देतो. आता आपणाकडे ०७ पदे कनिष्ठ अभियंताचे असतांना आता आपणाकडे फक्त ०२ च पदे आहेत विदुयत विभागामध्ये आणि ०१ प्रभारी तुम्ही भरले आहे. ०४ पदे रिक्त आहेत तर असे असतांना जेव्हा जेष्ठता यादी बनते त्यावेळेला प्रशासनाने जर का संबंधीत विभागाकडुन माहिती

मागविली असती तर मला वाटते हा विषय चर्चेला आला नसता. बोलायला भरपुर आहे, मा. महापौर म्हणतात की बोलायला बसले की भरपुर बोलतात, प्रत्येक विभागाचे सभागृहात बोलायचे असेल तर बोलतो नाहीतर बोलत नाही. आपली जी नियमावली आहे, आपले जे कर्मचारी आहेत त्याचे जे खच्चीकरण होणार, त्या बिचा—यांना कधी वाटणार नाही की आम्हांला कधी प्रमोशन मिळेल. त्यांना वाटते कधीतरी आम्हांस प्रमोशन मिळेल व वरची सिट् मिळेल. जर बाहेरुन लोक आले तर आपण त्यांना पद दिले तर आपले प्रभारी लोकांना खाली परत जावे लागेल. तर मा. महापौरजी, हा जो प्रस्माव आहे, १०० टक्के जो तुम्ही दिला आहे तो ७५ टक्के, ज्या ज्या प्रमाणे श्री. सुर्वे साहेबांनी बदल सांगितले आहे. त्या त्या प्रमाणे शैक्षणीक पात्रतेची अट शिथील करायची आहे, तर मला वाटते ती जर केली तर येणारा अधिकारी आहे, आपल्याला पण लोकांना प्रमोशन देणार तर ते उत्साहाने काम करतील. विदयुत विभाग असा आहे की तो एकदम व्यवस्थीतपणे कार्यरत आहे. श्री. आयलानी साहेब तेथे होते ते रजेवर असतांना प्रभारी चार्ज कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांना दिला होता. ते पद आधीच आपणाकडे रिक्त आहे. आयुक्त साहेब, त्यामुळे हे आरआरमध्ये जे डायरेक्ट पाठविले त्यामुळे हा जरा घोळ झालेला आहे. आता जे प्रस्तावित आहे तो प्रस्ताव मान्य करावा.

<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये एवढया वर्षापासुन १०—१५ वर्षापासुन कोणतीच भरती झालेली नाही. प्रत्येक वेळेस आम्ही पाहतो की ५० कर्मचारी सेवानिवृत्त झाले, १०० झाले, २०० झालेत परंतु त्या जागेवर अदयाप कोणालाच भरती केलेले नाही. आज अनुकंपाचे लोक आहेत ते १४० आहेत, जेव्हा त्यांना घ्यायचे होते तेव्हा ते कोणत्याही मावशी असोत, कर्मचारी असोत, त्यांचे जे वय होते तेव्हा त्यांना घेतले आणि आता नंतर त्यांना म्हणतात की तुमचे टाईमकबॉन्ड झाले वय वाढले, तर तुमच्या मुलाला दया. कोणी आपल्या मुलाला दिले आहे, कोणी मुलगी तर कोणी सुनेचा अर्ज दिला आहे. तर अदयापपर्यंत ते १४० अनुकंपावर घेतले नाहीत. महासभेत कोणाचाही असो सफाई कामगारांचा सुध्दा विषय आला त्यांचे वयाची अट असो, शैक्षणीक अर्हता असो त्यांना आपण रिलेक्शेसन देतो. शासनाचे मार्गदर्शन आहेत, मुख्यमंत्री यांचा जीआर आहे. त्याजीआरप्रमाणे त्यांना रिलेक्शेसन दयायचे आहे. श्री. चव्हाण हे जे अधिकारी आहेत ना त्यांची पध्दत चुकीची आहे, त्यांचा नाव आहे विकास चव्हाण पण ते विनाशाचे चिन्ह आहेत. तर ते विकास चव्हाण नाहीत तर विनाश चव्हाण आहेत. तर ज्या कोणत्या लोकांचे इन्टरव्हयु घेण्यात आले त्यांना आव्हान करतो की आपल्या लोकल कर्मचा—यांना त्यांनी जर मदत नाही केली तर येणा—या महासभेत मी जमिनीवर बसणार. श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी जसे आता सांगितले ७५ टक्के आपण जर भरती नाही करत तर १०—१५—२० वर्षापासुन जे काम करतात त्यांना २५ टक्के, जसे फायर ब्रिगेडवाल्यांसाठी म्हटले जाते. आयुक्त महोदय आपण लक्षात घ्या, आपले नाव आम्ही विकास पुरुष ठेवले आहे. आपण सर्वांचा विचार करावा, कर्मचा—यांचे भले व्हावे, कर्मचा—यांचा विकास व्हावा.

**यावेळी मा. महापौर हया सभागृहातुन बाहेर गेल्या.** 
**व त्यांच्या स्थानी उप—महापौर श्री. जीवन इदनानी हे आसनस्थ झाले.**

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>मा. महापौरजी, विदयुत विभागात जे लोक आहेत ते ब—याच वर्षापासुन काम करत आहेत व ते कुशल कर्मचारी आहेत ते चांगले काम करत आहेत. तो एकच विभाग आहे ते चांगले काम करत आहे. तर यांच्यावर अन्याय होवु नये येथे काम करणारे अधिका—यांवर अन्याय न होवो. बाकी महानगरपालिकेत नियम टाकले आहे, कोणावर अन्याय होता कामा नये. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>अनुकंपातत्वारील जी १४० लोक होते त्यांना आपण ठोक वेतनावर घेतले होते. त्या लोकांचा विचार आपण केला पाहिजे त्या लोकांना आपण ज्यावेळी ठोक वेतनावर कामावर घेतले तेव्हा त्यांचे वय कमी होते आणि आता त्यांचे जर वय वाढले असेल तर शासनाने भरतीमध्ये जे मागदर्शन तत्वे दिली आहेत त्यांना बसविण्यासाठी आणि त्यांचा भावनाचा आणि त्यांनी केलेल्या कामाचा त्यांना फायदा मिळायला पाहिजे. त्यासाठी शासनाच्या ज्या काही गाईडलाईन असतील त्याप्रमाणे त्यांच्या नातेवाईकांना आपल्याला घेता येईल त्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. एवढी एक अपेक्षा आहे.

<u>सदस्या श्रीमती कविता पंजाबी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त महोदय, शाळेत शिपाई सुध्दा नाहीत एवढी परिस्थिती खराब आहे. मी सांगते कमीत कमी एक शिपाई तर दयावा अशी मी आपणांस विनंती करते.

**यावेळी मा. महापौर यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला व त्यांच्या स्थानी आसनस्थ झाल्या.**

<u>सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>मा. आयुक्त साहेब, मा. महापौरजी, आज श्री. सुनिल सुर्वे यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे, श्री. सुनिल सुर्वे यांनी काउंटर प्रस्ताव आपणांस दिला आहे. यामध्ये पदोन्नतीसाठी जो क्रायटेरीया आहे त्यामध्ये अंशत: बदल करण्यासाठी आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>हा कांउटर प्रस्ताव नाही त्यांनी सभा सूचनेवर प्रस्ताव आणला आहे. ते ठराव देत आहे तो ठराव होईल.

<u>सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>त्यांनी जी सूचना दिली आहे त्यामध्ये अंशत: बदल केले आहे. उदाहरणार्थ उपअभियंता, विदयुत यामध्ये जी नियमावली आहे त्यामध्ये नामनिर्देशनाने ५० टक्के आणि पदोन्नतीने ५० टक्के आहे. पण यांनी जे सुचविले आहे त्यामध्ये १०० टक्के पदोन्नतीने व्हावे हा एक अंशत: बदल सुचविलेला आहे. बाकी सर्व गोष्टींसाठी कनिष्ठ अभियंता यांना मान्यता प्राप्त विदयुत विभाग शाखेची पदवी तथा समकक्ष शाखेची पदवी हा अंशत: बदल सुचविलेला आहे.  त्याचे नामनिर्देशन आता जे निकष त्यामध्ये १०० टक्के आहे. परंतु सुचविलेला बदल जो आहे तो नामनिर्देशन ७५ टक्के आणि पदोन्नतीने २५ टक्के आहे. हे जे बदल सुचविलेले आहे ते बदल महासभेने नमुद करावे असे मला वाटते. यामध्ये आपण बदल जे सुचविलेले आहे त्यामध्ये कार्यरत पूर्ण स्टाफ आणि नविन येणारे काही लोक याच्यामध्ये बॅलन्सींग करताना आपण कोणावरही अन्याय करणार नाही. त्यामुळे हा जो बदल आहे. हा आपण सर्वानी स्विकारावा.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> महापौर मॅडम, हा जो प्रस्ताव आणला गेला आहे. खूप चांगला प्रस्ताव आहे. यामध्ये सुनिल सुर्वे यांनी फक्त विदयुत विभागासाठी आणला आहे. मी आयुक्त महोदयाना विनंती करतो की पाणी पुरवठा आणि स्थापत्य मध्ये ही हीच पॉलीसी घेण्यात यावी. कारण की वर्षानुवर्षापासून ७५, २५ जी पॉलीसी आहे, ही बरोबर पॉलीसी आहे. आणि यांनी फक्त विदयुत चे आणले आहे. मी प्रशासनाकडे आग्रह करतो की, स्थापत्य आणि पाणी पूरवठा आणि बाकीचे जे  पदे भरावयाचे आहेत, त्या दिवशी मंत्रालयामध्ये गेले होते, तेथे असे सांगण्यात आले की अतिआवश्यक जे आपल्याला पदे भरावयाची आहेत त्यांची आपल्याला मान्यता मिळाली आहे. तर अतिआवश्यक जे पदांची भरती करण्यात येईल, तर याठिकाणी काही वर्षापासून जे काम करत आहेत, त्यांना पदोन्नती देणे हे आमचे कर्तव्य आहे. कारण की त्याच्याबरोबर आमची जी काही दिवसापासूनची, वर्षाची टयुनींग जोडलेली आहे. आणि आम्ही त्यांना सांगितले तर काम करतात. तर एक नैसर्गिक नियम सुध्दा सांगतो की त्यांना ती पदोन्नती मिळाली पाहिजे. आणि जर असेही आपण जर पाहिले तर त्यांच्याकडे पद नाही आहे परंतु ते प्रभारी पदाचे काम करत आहेत. केवळ त्यांना पदाचे नाव मिळेल. प्रभारी च्या रूपात तर ते काम करतच आहेत. प्रभारीचा जो त्याच्यावरचा ठप्पा प्र काढून खाली भारी राहतील, आणि प्र निघून जाईल आणि हा चांगला प्रस्ताव आहे. मी याचे समर्थन करत आहे आणि मला असे वाटते की हया प्रस्ताव आहे याचे जे मापदंड व्यापक करण्यात यावे. ज्यामध्ये स्थपत्य असेल पाणीपूरवठा असेल, आपले जेवढे लिपिक असतील जे पण योग्य लोक असतील त्यांना हा फायदा दिला जावा.धन्यवाद.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, जेव्हा ही महानगरपालिका १९९७ मध्ये बनली, त्यावेळी आम्हाला असे सांगितले होते की या शहरामध्ये बाहेरून उपायुक्त येणार आहेत. परंतु काही वर्षामध्ये आपल्याच अधिका—यांना प्रमोशन देवून उपयुक्ताचे पद देणार आणि ५० टक्के उपयायुक्त स्वत:चे याठिकाणी राहतील परंतु आज २२ वर्षझाल्यानंतर सुध्दा एकही अधिका—याला आपण उपायुक्ताचा अधिका—याच्या दर्जा दिलेला नाही. हया गोष्टीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. आणि मी सुनिल सुर्वेजी यांचे धन्यवाद  करत आहे. की हा एक चांगला प्रस्ताव हया सभागृहात आणला आहे. जे आमचे अधिकारी जे काम करत आहेत, जेसे की प्रदिप रामचंदाजीने सांगितले परंतु आपण त्यांना प्रमोशन देत नाही आहे. तर आपली जी पहिली सेवा प्रवेश नियमावली २०१५ पदोन्नती तांत्रिक करीता पध्दती जी आहे. यामध्ये थोडा फेरबदल करून, श्रेणीची जी अभियांत्रिक सेवा जी आहे. त्यामध्ये जे नामनिर्देशन ५० टक्के पदोन्नती आणि ५० टक्के बाहेरून. त्याला १००टक्के पदोन्नती भरण्यात

यावी. आणि श्रेणी ३ मध्ये नामनिर्देशन १०० टक्के, त्याला आम्ही ७५ आणि २५, बाकी श्रेणी ३ आणि श्रेणी, तांत्रिक सेवा श्रेणी ३ जी आहे, ७४ त्याला तशीच जे दिलेले आहे पहिले तसे करत आहे, आणि मी हा सुनिल सुर्वेचा प्रस्ताव आहे, त्याला सर्वसमितीकडून आम्ही सर्व मिळून मान्यता देत आहे, की जे आमचे अधिकारी जे आहेत त्यांची पदोन्नती होवून कार्य करावे. आणि मी महापौरजी आपल्याकडे निवेदन करत आहे की आपला कार्यकाळ जो आहे, हा सोनेरी अक्षरात लिहिला गेला पाहिजे. लोकानी सांगितले पाहिजे की एक पंचम कलानी महापौर आलया होत्या, ज्यांनी आपल्या अधिका—यांना पदोन्नती देवून कार्य वाढविले आणि आम्हाला भविष्यात आपले जे दोन उपायुक्त याठिकाणाहून नियुक्त केले पाहिजेत, आपल्या लोकांचे प्रमोशन देवून आपले दोन उपायुक्त असले पाहिजेत. कारण की जो आपला अधिकारी असेल तो कितीतरी वर्ष इथे राहणार असेल. आज आपल्याकडे श्री.अच्युत हांगे, आयुक्त आले आहेत, आम्हांला असे वाटते की त्यांनी तीन वर्षापर्यंत इथे राहावे. परंतु आम्ही मजबूर आहेत जो पर्यंत ते हया शहराला समजतील तो पर्यंत ते निघून जातील, परंतु आम्हांला असे वाटते त्यांनी इथे राहावे. परंतु आपला उपायुक्त जेव्हा असेल तर ते काही वर्षे इथे काम करत राहतील. तीन तीन वर्षामध्ये आपल्याकडील उपायुक्त निघून जातात, त्याचे आम्हाला दु:ख होत आहे, आपले काम अर्ध्योवरती राहून जाते. त्यामुळे हया प्रस्तावामध्ये जास्त चर्चा न करता सर्वसंमतीने पारीत करण्यात यावे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौरजी मी सगळयांना धन्यवाद देतो की, माझे सगळे सदस्य, म्हणून मी तुम्हाला सांगितले की हया सभागृहामध्ये भांडण जरी असेल ते लोकांकरता असते हे तुम्हाला निदर्शनास आणतो आणि आपल्या खास करून कर्मचा—याला, या विषयावरून विषय नाही आहे. तरी एक विनंती तुम्हाला करतो, की आपल्याकउचे अनुकंपाचे राहिले आहे तें ही तुमच्या कालावधी मध्ये व्हावे, आम्हाला तर वाटतें की तुमची दोन वर्षे वाढावी अजून, आणि ती वाढणार आहेत. आम्ही शासनाला आपल्याकउून विनंती पण करतो. हा तुम्ही ६० वर्षा पर्यंत आम्हाला सेवा दिली पाहिजे अशी आमची इच्छा आहे. कारण तुमचे पॉझीटीव्ह जे नेचर आहे, त्यामुळे आम्ही सांगतो की इतर विभागाचे पण आणा. आणि जी लोक खरोखरच वर्षानुवर्ष काम करत आहेत ते फक्त प्रभारी म्हणून त्यांना आपण आमची सगळयांचीच भावना ती आहे. आमच्यात एकही जण असा नाही आहे, आता मिनाजी अभ्यास करून बोलल्या. प्रत्येक गोष्टीत त्यांचा अभ्यास असतो. आणि आता सांगितले सोनेरी अक्षरात लिहीण्यासारखे हा कालावधी आहे. त्या कालावधी मध्ये आपण मदत करावी आणि सर्व व्यवस्थीत करावी याबदद्ल मी अजिबात शांशक नाही आहे. मला खात्री आहे तसेच लवकरात लवकर आमचे अनुकंपावाल्याचे पण घ्या साहेब, त्यांचे वय निघून जातात ते टेक्नीकल अडचणीत येतात. जे वयाच्या बाहेर आहेत ते आम्हाला पाठवा. आम्ही मान्य करून घेवू. ज्यांचे वयाचे बाहेर आहेत ते बिचारे बाहेर जाणार. हया अनुषंगाने मी एवढेच बोलतो कर्मचा—यांचा जेवढा होतो तेवढा फायदा होवू दया. तर ते आपल्या मनापासून काम करतील, आजही ते मनापासून काम करतात. पण त्यांना खरा अधिकार भेटला तर बर होईल. धन्यवाद जय हिंद जय महाराष्ट्र.

<u>सदस्य श्री. अरुण आशान:—</u> धन्यवाद महापौर मॅडम, खर म्हटले हा प्रस्ताव, एक मिनीट चांगली गोष्ट करत आहे, आणि खरी गोष्ट करत आहेत. प्रस्ताव पारीत झाला आहे आयुक्त साहेब, प्रस्ताव पारीत झाल्यानंतर तो आरआर पाठविल्यान्तर त्याचा पाठपूरावा साहेब कधी कधी होत नाही. २०१५, माझे म्हणणे एकच आहे की याचा पाठपूरावा केल्यानंतर याचे पुढे काय झाले याची सभागृहाला याची माहिती दयावी, जेणेकरून महापौर एवढे चांगले काम करतात, ते सभागृहामध्ये आणून आम्ही त्यांचे अभिनंदन करू शकतो. महापौरानी एवढे चांगले काम केले. आर आर वर जो बदल हेतो त्या बदला साठी २०१५ ला ठराव केला होता नंतर त्याचा प्रस्ताव शासनाकडे जावून पाठपूरावा करून हा जो प्रस्ताव आहे हयाच्यामध्ये काही बदल आहेत मॅडम ऐका ते बदल सुचवलेले जे बदल आहेत शैक्षणिक आर्हतेचे ते पण तसेच्या तसे त्या प्रस्तावामध्ये यावेत, हीच विनंती.

<u>सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u> आशान साहेब सुनिल सूर्वे यांनी सुचना दिलेल्या आहेत सुचवलेले आहे. पदोन्नती करण्यामध्ये ज्या ज्या कॅटगरी आहे, त्या चेंज करण्याबदलच्या सूचना केलेल्या आहेत. पण हा ठराव दिलेला नाही आहे. माझे म्हणणे असे आहे सुनिल सूर्वे साहेबांनी तो एक ठराव दयावा, इतिवृत्ताची वाट न पाहता करा.

<u>महापालिका सचिव.:—</u> ठराव मी वाचते पाहिजे तर ही महापालिका उल्हासनगरमहानगरपालिका अधिकारी कर्मचारी या संबंधी शानाकडून मंजूर होवून आलेल्या उल्हानगर महापालिका सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण नियम २०१५ मध्ये खालील फेरबदलाचा दुरूस्तीचा समावेश करून शासनाच्या मंजूरीच्या अधिन राहून अंतिम मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री. अरुण आशान</u> :— खालच्या सगळया सुचना आहेत त्या पास.पास.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. १४ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मंजूर सेवा प्रवेश नियमावलीमध्ये विदयुत अभियांत्रिकी विभागात येमणा—या पदाचा सेवा प्रवेश नियमावलीमध्ये महासभा ठरावाने सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती व सुधारणा करुन त्यास मंजुरी मिळण्याबाबत पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या नव्याने झालेल्या सेवा प्रवेश नियमावलीमध्ये तांत्रिक पदाच्या पदोन्नतीसाठी अहर्तेमध्ये बदल करण्यात आला आहे. सदर बदल केलेल्या नियमांचे आपण निरीक्षण केल्यास आपणास लक्षात येईल की, अनेक पदाच्या बाबतीत अंतर्गत पदोन्नतीस कोणत्याही प्रकारचे प्रावधान ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे अनेक वर्षाच्या कामाचा अनुभव गाठीशी असूनही सदर कर्मचारी पदोन्नतीस पात्र ठरत नसल्याने त्यांचेवर अन्याय होत आहे. त्या करीता सदर सेवा भरती नियमामध्ये अंशत: बदल करण्याकामी महानगरपालिकेत ठराव करण्यात आला होता. सदर बदल खालील प्रमाणे सुचविण्यात आला आहे. तसेच सुचविण्यात आलेले बदल इतर महानगरपालिका <u>( **उदा. पुणे, मिराभाईदर, कल्याण डोंबिवली, वसईविरार महानगरपालिका सेवा प्रवेश नियमावलीमध्ये विद्यृत अभियांत्रिकी विभागा करीता कनिष्ठ अभियंता या पदा करीता नामनिर्देशन ७५ टक्के व पदोन्ती २५ टक्के अशी ठेवण्यात आलेली असून उपअभियंता, (विद्यृत) यांना १०० टक्के पदोन्ती ठेवण्यात आलेली आहे. सदर नियमावलीची छायांकित प्रत सोंबत जोडत आहे )**</u> किंवा शासनाच्या सुसंगत असलेल्या उल्हासनगर महानगरपालिका सेवा भरती व सेवा वर्गीकरण नियम २०१५ मध्ये अंशत: बदल करण्यास विंनती प्रस्तावित करण्यात येत आहे. महापालिका अस्थापनेवर उच्चतम अहर्ता व विविध अभ्यासक्रम उत्तिर्ण केलेले कर्मचारी प्रभारी पदाचा कार्यभार धारण करून आपले काम यशस्वीरित्या जबाबदारीने पार पाडीत आहेत. परंतू सदर कर्मचारी महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमावलीमध्ये पदोन्नतीसाठी निश्चित असलेल्या अहर्तेमध्ये अंतर्गत पदोन्नती करीता प्रावधान न ठेवल्याने पदोन्तीस पात्र ठरत नाहीत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या विद्यृत अभियांत्रिकी विभागामध्ये शासनाकडून मंजूर होवून आलेला सेवा प्रवेश नियमावलीमध्ये काही पदांचा सेवा प्रवेश नियमावलीमध्ये दुरूस्ती करून त्या पदावर पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव तयार करण्याबाबत येत्या महासभेत चर्चा करून निर्णय होण्याबाबत विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५४ <u>दिनांक:— २०/१२/२०१८</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा उल्हासनगर महानगरपालिकेच्या विद्यृत अभियांत्रिकी विभागामध्ये शासनाकडून मंजूर होवून आलेला "उल्हासनसगर महानगरपालिका सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम २०१५" मध्ये तांत्रिक श्रेणीतील सेवा प्रवेश नियमावलीमध्ये खालील दुरूस्तीचा समावेश करून शासनाच्या मंजुरी अधिन राहुन मान्यता देत आहे.

| .क्र. | पदनाम | उल्हासनगर महानगरपालिका सेवाप्रवेश नियमावली २०१५ पदोन्नती तांत्रिक पदाकरिता अर्हता पध्दती | "उल्हासनसगर महानगरपालिका सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम २०१५" मध्ये तांत्रिक श्रेणीतील सेवा प्रवेश नियमावलीमध्ये दुरूस्तीचा समावेश करणेबाबत. |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ५५<br>**(श्रेणी—१ अभियांत्रिकी सेवा) उप अभियंता (विद्युत)** | **(१) नामनिर्देशन ५० %**<br>**अ)** मान्यता प्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा तत्सम समकक्ष शाखेची पदवी<br><br>**(२) पदोन्ती ५० %**<br><br>**अ)** पदव्युत्तर पदवी अथवा समकक्ष पदावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य महापालिका आस्थापनेवरील कार्यरत जेष्ठता व गुणवत्ता आधारे शाखा अभियंता या संवर्गात ५ वर्षाचा अनुभव अथवा कनिष्ठ अभियंता संवर्गात ८ वर्षाचा अनुभव | **(१) नामनिर्देशन —**<br>**(अ)** मान्यता प्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा शासनमान्य प्राप्त तत्सम समकक्ष शाखेची पदवी/पदविका ग्राहय<br><br>**(२) पदोन्नती —**<br><br>**(अ)** महापालिका आस्थापने वरील कार्यरत कनिष्ठ अभियंता या पदावरील संवर्गातील ३ वर्षाचा अनुभव.<br><br>**ब)** पदोन्नती — १०० % उप अभियंता (विद्युत) या पदावरील नेमणुक करिता महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत ज्येष्ठता व गुणवत्ता आधारे कनिष्ठ अभियंता (विद्युत) संवर्ग या पदावरील ५ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| २ | ५७<br>**(श्रेणी—३ अभियांत्रिकी सेवा) कनिष्ठ अभियंता विद्यृत** | **१) नामनिर्देशन १०० %**<br>**अ)** मान्यता प्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा तत्सम समकक्ष समतुल्य शाखेची पदवीका व ३ वर्षाचा अनुभव किंवा विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पदवी परिक्षा उत्तिर्ण ३ वर्षाचा संबधीत कामांचा अनुभव<br><br>**(२) पदोन्नतीसाठी ० %** | **१) नामनिर्देशन ७५ % —**<br>**अ)** मान्यता प्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा शासनमान्य प्राप्त तत्सम समकक्ष शाखेची पदवी/पदवीका ग्राहय<br><br>**(२) पदोन्नती २५ %**<br>**अ)** नामनिर्देशनासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील वीजतंत्री पदाचा किमान ०५ वर्षाचा कामाचा अनुभव असणे आवश्यक<br><br>**ब)** वरील अर्हता धारण करणारा आस्थापनेवरील कर्मचारी |
| ३ | ७३<br>**(श्रेणी—३ तारतंत्री सेवा) वीजतंत्री** | **१) नामनिर्देशन ७५ %**<br><br>**(अ)** उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण<br><br>**(ब)** शासन मान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे विजतंत्री अभ्यास क्रम पुर्ण केलेले प्रमाणपत्र<br><br>**(२) पदोन्नती २५ %**<br><br>**(अ)** उच्च माध्यमिक शालात्न परिक्षा उत्तीर्ण<br><br>**(ब)** शासन मान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे विजंतत्री अभ्यासक्रम पुर्ण केलेले प्रमाणपत्र<br><br>**(क)** महापालिका सेवेतील तारतंत्री पदावरील ३ वर्षाचा अनुभव | **१) नामनिर्देशन २५ %**<br><br>**(अ)** उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण<br><br>**(ब)** शासन मान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे विजतंत्री अभ्यासक्रम पुर्ण केलेले प्रमाणपत्र<br><br>**(२) पदोन्नती ७५ %**<br><br>**अ)** नववी पास परिक्षा उत्तीर्ण<br><br>**ब)** महाराष्ट्र शासनाच्या कामगार उद्योग उर्जा विभागाकडील पी डब्ल्यु डी चा तारतंत्री परवाना आवश्यक<br><br>**क)** नामनिर्देशनासाठी विहीत केलेली धारणा शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कामाचा ०५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ४ | ७४<br>(श्रेणी—३ तारतंत्री सेवा)<br>तारतंत्री | **१) नामनिर्देशन २५ %**<br><br>(अ) माध्यमिक शालात्न परिक्षा उत्तीर्ण<br><br>(ब) शासन मान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभ्यासक्रम पुर्ण केलेले प्रमाणपत्र<br><br>**(२) पदोन्नती २५ %**................................<br>अ) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण<br><br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा तारतंत्री या विषयाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br><br>क) संबंधित कामाचा नियमित सेवा करणारे वर्ग ४ चे कर्मचारी | **१) नामनिर्देशन**<br><br>(अ) माध्यमिक शालात्न परिक्षा उत्तीर्ण<br><br>(ब) शासन मान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभ्यासक्रम पुर्ण केलेले प्रमाणपत्र<br><br>**(२) पदोन्नती ७५ %**<br>अ) सातवी पास उत्तीर्ण<br><br>ब) महाराष्ट्र शासनाच्या कामगार उद्योग उर्जा विभागाकडील पी डब्ल्यु डी चा तारतंत्री परवाना आवश्यक<br><br>क) महानगरपालिका आस्थापनावरील सेवेतील विद्युत मदतनीस संवर्गातील पदावरील किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक |

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————

⇨ विषय क्र. १५ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६५ चे कलम ३७/१ अन्वये निळकंठ मंदिर ते किसन आहूजा माजी नगरसेवक, धनगुरु किराणा स्टोर्स पर्यंतचा व चंद्रमणी बुध्द विहार ते स्टेशन मार्गे विर सावरकर पुतळयापर्यंतचा रस्ता ६० फुटी करण्यासाठी तसेच मायनर मॉडीफिकेशन नुसार अंशत: फेरबदल करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत पालिका सदस्या श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

————————————————————————————————————

<u>महापालिका सचिव:—</u>हे जे दोन्ही प्रस्ताव निर्णय होवून गेलेले आहेत. त्यामुळे हा विषय संपुष्टात येत आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> हा विषय तुम्ही आणलाच कसा काय?

<u>काही सदस्य:—</u>इतिवृत्ताची वाट न पाहता

<u>महापालिका सचिव.:—</u>हा विषय मा. महापौरानी घेतला मी विषय आणत नाही.

<u>काही सदस्य :—</u>इतिवृत्ताची वाट न पाहता

**महापालिका सचिव:—** हा कसा इतिवृत्ताची वाट न पाहता, मागचा विदयुत विभागाचा विषय ना.

**काही सदस्य :—** होय.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १६ :— प्रस्तावाची सूचना

कुर्ला कॅम्प, उल्हासनगर—५ येथिल लाललोई उदयानात कबड्डीसाठी मैदान विकसित करण्याबाबतचा पालिका सदस्य श्री. सुमित सोनकांबळे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य श्री. सुमित सोनकांबळे:—** मॅडम याच्यात थोडासा फेरबदल करण्यात येत आहे. स्थानिक नगरसेवकांशी मी या बाबत चर्चा केली त्यांचे म्हणणे असे आहे की लाललोई गार्डन आहे त्याच्यामध्ये अगोदरच खेळाच्या मैदानासाठी विकसीत करण्यासाठी प्रस्ताव मंजुर केलेले आहे. तर त्यांच्याशी चर्चा झाल्यानंतर त्यानी मला असे सुचविले की जिजामाता उदयान, राजीव गांधी उदयान स्वारी, राजीव गांधी उदयानमध्ये हे जे खेळाडू लोक आहेत. हयाच्यासाठी पर्याप्त जागा आम्हाला उपलब्ध करून दयाल. हा प्रस्ताव पून्हा मी मागे घेत आहे मी परत नवीन प्रस्ताव तुम्हाला राजीव गांधी उदयानाचा मी तम्हाला प्रस्ताव देत आहे.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—** सर, याची एक नोंद घेण्यात यावी लालालोई गार्डन आणि राजीव गांध्याी गार्डन हे आजूबाजूला आहे,सर. आणि एक सिटीझन भागात आहे. तर आपण उल्हासनगर—५ मध्ये दुसरे गार्डन दयावे जसे की त्याठिकाणी खेळता यावे. सर रेसीडेन्शीअल भागात दुपारी आराडाओरडा होत असतो आणि राजीव गांधी गार्डन  एवढे मोठे नाही आहे की त्याजागीकबडड्ीचे स्पोटस लावले जातील.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—** महापौर मॅडम , आयुक्त साहेब, फक्त लालालोई गार्डन किंवा राजीव गांधी उदयानामध्येच जागा हवी आहे अशातला प्रश्न नाही आहे.

**सदस्य श्री. सुमित सोनकांबळे:—**आता प्रस्ताव परत घेतला आहे जेव्हा परत येईल तेव्हा चर्चा करणार.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—** सरजी सरजी, मला बोलू दया, बोलण्याचा हक्क सगळयांना आहे. शाळेतील विदयार्थी हे खेळतात, हे भविष्याचा प्रश्न आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** आपण प्रस्ताव मागे घेतला आहे किंवा नाही.

**सदस्य श्री. सुमित सोनकांबळे:—** ऐका मला शासनाला हे सांगायचे आहे, फक्त लालालोई किंवा राजीव गांधी उदयान  यांचा प्रश्न नाही आहे. ५ नंबरमध्ये कुठेही शासनामार्फत जर आम्हाला जागा मिळत असेल तर मुलांच्या भविष्यासाठी चांगली गोष्ट आहे.

**महापालिका सचिव:—**हा विषय मागे घेण्यात आला आहे.
विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १७ :— प्रस्तावाची सुचना

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत पाणी वितरण व्यवस्था पध्दतीत पाणी मिटर प्रणाली लागु करणेबाबत पालिका सदस्या श्रीमती अंजली साळवे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—** मा. महापौर मॅडम , मा. उपमहापौरजी, मा. आयुक्त साहेब उपरोक्त विषयान्वये आपणास सुचित करू इच्छिते की उल्हासनगर महानगरपालिकेचे स्वत:चे असे पाण्याचे स्त्रोत्र नाही आहे. आणि आपल्याला माहित आहे की पाण्याचा प्रश्न किती गहन

आहे. आपण सकाळपासून त्याच मिटींग मध्ये आहेत, मागील महासभा सुध्दा पाण्यावरूनच तहकुब झाली होती. म्हणून मी आपणास सांगू इच्छिते की दर वर्ष समाधान कारक पाउस होत नसल्याने व महानगरपालिकेची पाणी वितरण योजना पूर्णपणे सक्षम नसल्यामुळे दर वर्षी उल्हासनगर शहरातील नागरीकांना मोठया प्रमाणात पाणी समस्याना सामोरे जावे लागते. आज फक्त उल्हासनगर शहरापूरतेच नाही तर जगाच्या पातळीवर राज्य पातळीवर येणा—या पाणी समस्या ही मोठी ....थोडी शांतता राखा ना. विश्वपातळीवर देखील या गोष्टीचे गांर्भिय लक्षात घेवून पाणीयंत्रणकरता पणी वितरणाबाबतीत पाणी मीटर प्रणाली लागू करण्यात येत आहे. उल्हासनगर महानगरपालिका हद्द्तीतील शहरातील विशिष्ट नागरीकांचा विचार केला, तर आपणास असे लक्षात येईल की सर्वसामान्य नागरीकांना ठराविक मर्यादीत पाण्याची आवश्यकता असते. याउलट इमारतीमध्ये व वाणिज्य वापराकरता पाण्याचा गैरवापर तसेच ब—याच प्रमाणात पाणी वाया जाते. त्यामुळे दरवर्षी उल्हासनगर शहरातील नागरीकांना पाणी समस्येला सामोरे जावे लागते. जर आपण पाणी मीटर प्रणाली उल्हासनगर शहरात योग्य रीत्या लागू केली ती येत्या मे व एप्रील माहे मध्ये पाण्याचे गैरवापर अपव्यय आपण थांबवू शकतो. तरी भविष्यात पाण्याकरता दुरदृष्टी व पाण्याचा अपव्ययाबाबत धोरण ठेवून संपूर्ण उल्हासनगर शहरात पाणी मीटर प्रणली तातडीने लागू करण्याकरता ही प्रसतावाची सुचना.

<u>सदस्य श्री. सुमित सोनकांबळे:—</u> मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, उपमहापौर,हा त्याचाच विषय आहे. बोलेले तें बोलले.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u> ब—याच नागरीकांना मिटर दिलेले सुध्दा आहेत तात्काळ ती मीटर प्रणाली लागू करण्यात यावी असे माझे म्हणणे आहे.

<u>सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u> आयुक्त साहेब, विषय असा आहे. संपूर्ण उल्हासनगरमध्ये पाण्याची टंचाई आहे आणि ती तुमच्या लक्षात येते आहे. संपूर्ण नगरसेवक आणि सदस्य बसलेले आहेत सर्वांना लक्षात येते. आम्हाला असे वाटते की आमच्या इथे जरा जास्तच त्यांचा प्रभाव पडतो. कारण असे होते की १८ नंबर पॅनल आणि १३ नंबर पॅनल हयाच्यामध्ये बहुतांश: स्लम भाग आहे. जिथे आपण निळया लाईनी सुध्दा दिलेल्या आहेत आणि जुन्या लाईनी सुध्दा चालू आहेत. सध्या तरी असे आहे पाणीपूरवठा तिथे कमी होतो. आणि निळया पाईपलाईनीमध्ये पाणी पूरवठा होतोय, पण तिथे मीटर नाही आणि पाणी वाया जाते. आणि काही काही ठिकाणी ज्या निळया लाईनी आहेत त्या घरापर्यंत पोहचलेल्या नाही आहेत. लोकांनी दारापर्यंत सोडलेल्या आहेत कोणी घरात घेतले नाही आहेत तिथे मिटर घेतलेल्या नाही आहेत, एवढी म्हणजे तिथे पाणी वाया जात आहे नासाडी होत आहे. त्याच्यामुळे हा जो प्रस्ताव आलेला आहे त्याच्यामध्ये मी त्यांचे खरच कौतुक करतो आणि लवकरात लवकर पाण्याची जी समस्या आहे ती सोडवण्याचा प्रयत्न आयुक्त साहेब तुमच्या कालावधी मध्ये झाला पाहिजे अशी आमची मागणी आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौरजी हा जो विषय आला आहे. हा विषय जो आहे फार विचार करण्यासारखा आहे. मागच्या महासभेत सभागृहाचे पूर्ण ३ तास कोणकडे सुध्दा पाणी येत नाही ते ३ तास पूर्ण महासभेचे एक विषय दोन विषय चालले बाकीचे चालले नाही. सगळयाच्या या तक्रारी होत्या. उ.नगर—१ पासून ते उ.नगर—५ पर्यंत पाण्याची अडचणी आहेत. आणि जे आमचे मा. सदस्य, साळवे मॅडमनी जो मुद्द्ा आणला आहे. की पाण्याचे मीटर लावले पाहीजेत. उ.नगर १,२,३, मध्ये आजपर्यंत निळया पाण्याचे लाईन पडलेली नाही. जुन्या लाईनमधूनच पाणी चालू आहे. त्याचे ही या बजेट मध्ये रू. ५० करोड तरतूद करण्यात आले आहे.केवळ ही निळी लाईनी पडली त्यांनतर जुन्या लाईनी बंद होतील त्यानंतर हे संपूर्ण सीस्टीम चालू होणार. आणि उल्हासनगर— ५ मध्येही दुर्गापाडा गायकवाड पाडा येथे निळया लाईनी अजून टाकण्यात आल्या नाहीत. त्या ठिकाणी सुध्दा जुन्या पध्दतीने पाणी चालू आहे. तर आज जेव्हा आम्ही एका बाजूने आम्ही बालतो की शहरामध्ये पाणी नाही. आणि दुस—या बाजूने मीटर लावा. तर पाणी च येत नसेल तर मीटर कोणला लावणार. तर हे जे मीटरचे सीस्टीम आहे हे १नंबरपासून ५ नंबरपर्यंत जेव्हा सर्व उल्हासनगरमध्ये निळया लाईनी टाकण्यात येतील, लोकांना चांगले प्रकारे पाणी मिळू लागेल, आणि या मीटर सिस्टीमचे माहिती नाही आहे. मीटर सिस्टीम लागल्यानंतर रिडींगनुसार बीले चालू होणार आहेत. उल्हासनगरमध्ये मीटर सिस्टीम ९९ टक्के नाही १०० टक्के बाद झालेले आहें. आणि त्यावेळी आम्ही १९९७ मध्ये पहिल्या पहिल्या वर्षी मीटर सिस्टीम बाद करून ॲज पर एरिया लावला होता. त्यानंतर हायकोर्ट गेले होते. त्या ठिकाणाहून ऑर्डर आली होती.रू.१२००, ६००, १८०० आरसीसी ला

लावले होते. आणि ते वाढून ३६०० रूपये झाले आहे, आरसीसीचे आणि झोपडपटटीला १२०० रूपये आहे.आणि पत्रेचे आहे त्या २४०० रूपये आहे. तर हे फिक्स आहे. हे टॅक्स मध्ये जात आहे परंतु उल्हासनगरमध्ये कमर्शिअल आहेत. जेवढे पण होटलवाले आहेत, लॉजींग बोर्डीगवाले आहेत, उ.नगर १ ते ५ पर्यतचे त्यांना अॅज पर कंझमसन आहेत. त्याना मिटर लावलेले आहेत. फक्त घरांना झोपडपटटी आणि फ्लॅटला लावलेले नाही त्यांना फिक्स आहे, रू.३६०० आहे आरसीसीला रू. २४०० आहे पत्रेसाठी आणि १२०० रूपये आहे झोपडपट्‌टीमध्ये तर जोपर्यंत निळया लाईनची सिस्टम उन्हासनगर—१ ते ५ नंबरपर्यत लाईनी टाकल्या जाणार नाहीत,जे १,२,३, मध्ये अजून पडलेल्या नाही आहेत,गायकवाड पाडा दूर्गापाडामध्ये लाईनी आजून पडलेल्या नाही आहेत. समान वाटप जो पर्यंत होत नाही तो पर्यंत मीटर लावण्याचा फायदाच नाही आहे. अॅज पर कंझमसन बोलले जातील आणि लोकांमध्ये गोंधळ निर्माण होईल. एक तर पाणी देत नाही आणि बिले वाढविली जातात. तर हा जो प्रस्ताव आहे हा तेव्हा लावला पाहीजे जेव्हा उल्हासनगर १,२,आणि ३ मध्ये ब्लू लाईनी टाकल्या जातील, आणि ज्या ज्या भागामध्ये नाही आहेत त्याठिकाणी आणण्यात यावी. धन्यवाद.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u> कृपया सभागृह नेताजी याबाबत चा निर्णय देण्यात यावा.

<u>सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौरजी मा. आयुक्त साहेब,

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u> सभागृह नेते नंतर मी कसे बोलू साहेब.मा. महापौरजी, ही गोष्ट किशोर वनवारीजीने बरोबर सांगितली की ज्यावेळी जेएनएनयुआरम च्या प्रोजेक्टची शिल्लक राहिलेल्या लाईनी टाकण्यात येतील, आणि पाणी सर्व ठिकाणी येईल, त्यावेळी मिटर लावले पाहिजेत व चालू केले पाहिजे. प्रश्न असा निर्माण होतो की बाकी चे शिल्लक राहिलेले ज्या भागामध्ये त्या लाईनी कधी टाकण्यात येतील, या बजेटमध्ये आम्ही रू. १५ करोडची तरतूद केलेली आहे. अमृत योजनेमध्ये सुध्दा आम्ही पाठवण्याचे प्रयत्न केले. आणि अशा प्रकारे आम्ही योजना आणण्याठी प्रयत्न करत आहेत. परंतु माझी अशी सुचना आहे की एक एक जीएसआर किवा एक एक इएसआर याला टार्गेट केले तर आम्ही या प्रयत्नाकडे आज नाही तर उदया पोहचणार, मी याचे उदाहरण देत आहे बालकनजी बारी टाकी येथे कमीत कमी १६ वार्ड आहेत, १६ वार्ड पैकी १० वार्डामध्ये लाईन पडलेली आहे. आठ वार्डामध्ये लाईन टाकलेली नाही, त्यामुळे उल्हासनगरमधील जी सर्वात मोठी टाकी आहे, ७ लाख लीटरची टाकी, आज ५ वर्षापासून १०० टक्के त्याचा उपयोग होत नाही. तर उपयोग असा आहे की बाकीच्या लाईनी त्वरीत टाकण्यात याव्यात की बालकनजी बारी चालू होईल. आज गोल मैदानची जी टाकी आहे. या टाकीवरती सुध्दा ८ ते १० वार्ड आहेत, त्यापैकी ६ ते ७ वार्डमध्ये लाईन टाकलेली आहे, ३ ते ४ वार्डामध्ये लाईन टाकलेली नाही आहे. त्यांना टार्गेट केला पाहिजे. अशाप्रकारे आपल्या महानगरपालिकेच्या मागे टाकी आहे, त्यामध्ये ही १५ ते २० टक्के लाईन नाही आहेत. तसेच काही गॅप वर्क थांबलेले आहे. तर हे गॅप वर्क आणि ज्या लाईनी टाकलेल्या नाहीत ज्या पोर्शनमध्ये त्या त्वरीत टाकण्यात याव्यात. यामुळे दोन फायदे होतील एक जे लीकेजेस आहेत जे आपण वारवांर बद करत आहेत, इथे बंद केले तर दुसरीकडे लिकेज होते, दुसरा अनधिकृत नळजोडणी आहेत त्या आपोआप कट होवून जातील, कारण की अनधिकृत नळजाडण्या आहेत त्या पूर्ण जुन्या जीआय च्या लाईन वरती आहेत. एकीकडे ही लाईन कट होवून जाईल, आणि नवीन लाईनवरती त्यानंतर आजपण आपल्या लोकांचे त्यावर निर्बध पाहिजे. आणि एक पण अनधिकृत जोडणी झाली नाही पाहिजे.तेव्हा जेएनएनयुआरएमचा योग्य प्रकारे या शहरामध्ये उपयोग मिळेल. तिसरी गोष्ट जी आता लक्षात आली आहे, की इंजिनिअर जाणूनबुजून किंवा चूकीने डीआर लाईन जी जेएनएनयुआरएम मध्ये टाकलेली आहे. त्यावरती जीआय लाईनचे कनेक्शन देत आहेत. जसे की दोन इंच, तीन इंच, चार इंच हे अजिबात झाले नाही पाहिजे. आपलया ज्या पहिल्या पाण्याची लाईनी आहेत, दोन इंचची लाईन इकडे दिली , दोन इंचची लाईन तिकडे दिली, चार इंचची लाईन दिली, त्यामुळे असे झाली की इकडे ही पाणी पोहचले नाही आणि तिकडेही पाणी पाहेचले नाही. हायड्रोलीक त्याचे टेस्टींग करून की आपले पाणी कुठपर्यत पोहचत आहे, त्याच ठिकाणी पाहचले पाहिजे, बालकनजी बारीवार्डामध्ये एक लाईन येत आहे. जे डिस्ट्रीब्युशन महत्वाचे आहे. डिस्ट्रीब्युशन बेसवरती मध्येच तिन इंचचे दोन कनेक्शन दिले त्यावेळी मी विभागप्रमुख ग्रुपवरती तक्रार केली होती. आयुक्त गणेश पाटील ने पाणी पुरवठा विभागाला ऑर्डर दिली की ती लाईन कट करा. त्यानंतर दोन लाईनीमधून एक लाईन कट झालेली आहे, आणि एक लाईन आजपर्यंत कट झालेली नाही आहे. तर अशाप्राकरे जो डिस्ट्रीब्युशन ज्याठिकाणी पोहचायला पाहिजे,

त्याठिकाणी पोहचणार नाही. आणि दुसरीकडे कुठेतरी पोहचेल.आणि म्हणणार की साहेब पाण्याचे प्रेशर नाही आहे. नंतर मोटर लावा, मोटर लावणेसुध्दा एक प्रकारे गुन्हा आहे. कारण की हक्काचे पाणी मिळायला पाहिजे. मी पैसेवाला आहे मी एक इंचची मोटर लावू शकतो, तीन इंच ची मोटर लावू शकतो, मी ५ हार्सपॉवरची मोटर लावू शकतो तर मी जास्त पाणी खेचू शकतो. मोटर कोणत्याही परिस्थितीत ज्यादिवशी जेएनएनयुआरमची लाईन चालू होईल त्या दिवसापासून या शहरामधील सर्व मोटर असलेल्या लाईनी काढून टाकण्यात यावे. किंवा बंद केल्या जावे नाहीतर, ज्याच्याकडे जास्त मोटरी आहेत किंवा मोठया मोटरी आहेत, ते पाणी जास्त खेचणार. ज्याकडे पैसे नाही आहेत मोटर लावण्याची ताकत नाही आहे, लाईट बील भरण्याची ताकत नाही आहे. त्याला पाणी कमी मिळणार, तर त्यासाठी एक इक्वलीटी असायला पाहीजे. की पाणी सर्वांना बरोबर मिळाले पाहीजे. तर हे लवकरात लवकर पूर्ण करणे जरूरी आहे.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:—</u> महापौर मॅडम, उपमहापौर सर, आयुक्त सर, अंजली साळवे मॅडमनी एक खूप चांगला प्रस्ताव आणला आहे. मी किशोर वनवारीजी यांचा आदर करत आहे की वरीष्ठ सदस्य आहेत, त्यांचा सुध्दा आदर करत आहे. राजेश वदारीया साहेबांच्या गोष्टीमध्ये खूप विरोधाभास होता. ज्यांच्याकडे पैसे जास्ती असतील ते मोटर लावून पाणी जास्त खेचणार, पाणी जास्त घेतले तर मीटरचे रिडींग वाढेल आणि बिल जास्त दयायला लागेल. हे मीटर जे लावायचे आहेत, सभेचा निर्णय होईल पण मी चर्चा करत आहेत आहे. जे मीटर लावायचे आहेत ते एक दिवसात होणार नाहीत. ज्या ज्या ठिकाणी लाईनी टाकून झाल्या आहेत. ज्या ठिकाण ब्लू लाईनी टाकण्यात आलेल्या आहेत. टप्याटप्यानी मीटर लावले पाहिजेत. यामध्ये काय होते की असे म्हणले जाते की मोटर लावणे चूकीचे आहे. पैसैवाले आहेत ते मोठी मोटर लावून जास्त पाणी खेचणार आहे. जर त्याला समजले की मी जास्त पाणी वापरत आहे, आणि मीटर जास्त चालत आहे मला जास्त पेसे भरावे लागतात तर तो पाण्याची कमी वापर करेल. दुसरी गोष्ट अशी आहे की भरपूर काही अशा मालमत्ता आहेत  की त्यांच्याकडे कोणताही मीटर लावण्यात आलेला नाही आहे. नळाचे कनेक्शन सुध्दा नाही आहे. त्या मालमत्ता बंद पडलेल्या आहेत. ते सुध्दा पैसे भरत आहे पाण्याचा वापर न करता सुध्दा, इथे सिस्टीम बरोबर असली पाहिजे की जेवढा पाण्याचा वापर होईल, यामध्ये असे ही होवू शकते की थोडा वेळ लागेल. आज सन २००८ पासून जेएनएनयुआरएम योजना आलेली आहे. आज आपण १० वर्षापासून मीटर लावू शकलो नाही. एक अशी महानगरपालिका जी मुंबईपासून फार जवळ आहे.आणि एक औदयागिक नगर ज्यामध्ये आपण मीटर लावू पाहत नाही आहे. आणि मीटर लावले नाही पाहिजेत असे सांगण्यात येते. तर हे एक आपले दुर्भाग्य आहे. माझे आयुक्त महोदय यांना एक निवेदन आहे, की आपण एकदम नाही लावू शकत परंतु ज्या ज्या ठिकाणी त्याची सुरूवात व्हायला पाहिजे. असे माझे मत आहे धन्यवाद.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे</u> मा. महापौर मॅडम, याबदद्ल मला काही बोलायचे होते. एक सूचना दयायची , मला काही बोलायची मान्यता दयावी. आपल्या बाजूलाच मलंगगड आहे. मलंगगडच्या पायथ्याशीच कुशीवली धरण आहे. कुशीवली डॅम बनविण्याचे काम चालू आहे परंतु ते कोणाच्या अधिकारामध्ये येते ते काय मला माहिती नाही. त्याची मागणी आपण करू शकतो का? कारण प्रत्येक  महानगरपालिकेमध्ये , आता अंबरनाथ मध्ये, अंबरनाथला डॅम आहे. आपला स्वतंत्र, आपल्याला जर उल्हासनगरसाठी कुशीवली डॅम जर आपण त्याची मागणी केली आणि जर आपल्याला दिलं तर आपल्याला पाण्याचा नेहमीसाठी प्रश्न सुटेल. त्याच्यात आपण माहिती काढा. आता आपले शासन आहे. तर कुशीवली डॅमचे काम चालू आहे, रू. १८ करोडचे. त्याच्यासाठी महाराष्ट्र शासनाने खर्चही केलेला आहे. परंतु आपल्याला जर तो डॅम , नाही जिल्हा परीषदेचा नाही आहे तो. काम पूर्ण झालेले नाही म्हणजे ते काम सुरूवातचे आहे. त्याची आपण जरा पाहणी करा आणि बघा. मला नाही वाटत जिल्हा परीषदेला दिलेले आहे. जर दिलेले नसेल तर आपणास मागणी करता येते की नाही ते जरा आपण बघा. धन्यवाद!

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u> मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, विषय आलेला आहे मीटरचा, मला तर ऐकून सुख होते, दु:ख पण होते आणि खराब वाटते. हे कोणते शहर आहे.जोपर्यंत पाणी बरोबर प्रमाणात आलेले नाही आहे. ही एक योजना होती की जो र्प्यंत पाणी घ्रांध्रापर्यंत पोहचत नाही तो पर्यंत मीटर लागणर नाही. ही एक योजना होती, २४ तास घराघरांमध्ये पाणी. याकडे लक्ष असू दया सर, मी फार जूना नगरसेवक आहे. २४ तास पाणी आले तर मीटर लागणार. त्याचे आपण कितीही बील भरणार,  एक लाख येणार, दोन लाख

जेवढी माझी क्षमता असेल तेवढे मी वापर करेन, तेवढा मी मीटरचे पैसे भरणार. २४ तास पाणी येवू शकत नाही आपण आज पण माझे गोल मैदानाच्या टाकीतून १६ वार्डाना एक तास पाणी देवू शकत नाही, तर आपण मीटर कसे काय लावणार. इक्वल डिस्ट्रीबुसन झाले नाही, कनेक्शन झाले नाही. हे पूर्णपणे बाद झाले, यानंतर सुध्दा आपण विषय घेवून आले आहेत, आणि तो मीटरचा हा कोणता न्याय आहे. हि काय चालेले आहे सर, असे होत नाही आज पहिले त्या विभागांना पाठवा,... आजच्या तारखेला थंडी दिवसात आंघेळीसाठी दोन दिवस, तिन दिवस नाही, लोक आंघेळ करत नाही. त्यांना पाणी मिळत नाही. विजू पाटील च्या वार्डीत प्रत्येक तीन ते चार दिवसांनी पाणी मिळत आहे.अशा लोकांना कधी मिटर लावणार. ते पैसे भरण्यासाठी तयार आहेत. आपण म्हटले तर आज पण मी पैसे भरण्यास तयार आहे.मीटर लावून २४ तास पाणी देण्याची गॅरंटी घेताहेत का? जर आपण सक्षम असाल, पाणी पूरवठा विभाग सक्षम असेलतर २४ तास पाण देण्याची जेएनएनयुआरएम ची योजना होती सर, आणि त्यामध्ये शेवटचे फेज होते, आणि दोन टप्पे बाकी आहेत. एकटप्पा आहे फायनल कम्प्लीशन ऑफ द ब्लू लाईन कंडीशन एवरी पॉकेट, आणि दुसरा समान वितरण टु एन्टायर सिटी आणि तिसरे आहे २४ तास पाणी. यामध्ये कोणतीही मोटर वैगेरे लागणार नाही आहे. यामध्ये कोणीही सावकार गरीब होणारा नाही आहे. मीटरच बंद करणार, मी का म्हणून मोटर लावणार, तर तयासाठी मीटरची काही जरूरत नाही आहे. प्रश्न आहे तो अधिकृत आणि अनधिकृत, मला तर विचार करून दु:ख होत आहे, ज्या एमआयडीसीतून पाणी येते, तिथेच मीटर चालत नाही, कोणती मोटर चालत आहे, आतापर्यंत बिना रिडींगचे काही वर्षापासून चालले आहे. आणि आपण म्हणता याठिकाणी घरांमध्ये मीटर लावणार,एमआयडीसीतून सप्लाय होते तिथला तर मीटरच अजून पाहिलेला नाही. सरकारकडे गेल्यानंतर सरकार म्हणते आम्ही तुम्हाला १७५ एमएलडी पाणी देतो. मीटर आहे नाही कुठून आपल्याकडे येते पाणी, पम्पींग होत नाही कुठून पाणी येते. आपण स्वत: त्रासले आहेत, एक दोन वेळा भेटी दिल्या असतील किती मोटर चालतात, किती एमएलडी पाणी येत आहे, खरोखरच ऐवढे पाणी येते की नाही मीटरच नाही आहे तर यासाठी कोण्त्या मीटरची गरजच नाही आहे. धन्यवाद!

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u> सन्मानीय महापौर, उपमहापौर , आयुक्त साहेब, पाणी पूरवठा विभागाच्या मीटर लावण्याच्या संदर्भात माझा पूर्णपणे विरोध आहे. त्याची कारणे अशी आहेत, आता राजेश वदारियानी सांगितले बालकनजी बारीच्या टाकीवरून ८ ते १० वार्डांचे माझ्या वार्डाची परिस्थिती अशी आहे, का आझादनगर जर सोडला तर रमाबाई आंबेडकर नगर असेल, बौध्दनगर असेल, भयासाहेब आंबेडकर नगर असेल, हनूमान नगर असेल, दुर्गानगर असेल, या एकाही ठिकाणी एकही ब्लू लाईन टाकण्यात आलेली नाही. आणि माझे वार्डामध्ये जी ब्लू लाईन आझादनगरमध्ये जी थोडया प्रमाणात २ ते ३ टक्के टाकलेली आहे. त्या ब्लू लाईनला पाणीच येत नाही. मीटर लावणार कशाला आपण, त्या ब्लू लाईन मध्ये पाणीच येत नाही, आमच्या ज्या जुन्या लाईनी आहेत त्याच्यातूनच पाणी येते. म्हणजे अशी परिस्थिती असताना तुम्ही ब्लू लाईनीला मीटर लावण्याचा संबंघ काय? ज्या ठिकाणी ब्लू लाईनीवरून पाणी देत असतील, पाणी पुरवठा होत असेल तर तिथे मीटर लावणे आपण मान्य करू शकतो. पण ज्या लाईनी टाकलेल्या आहेत, पण त्याना पाण्याचा एक थेंबही आलेला नाही, त्याची चाचणी ही घेतलेली नाही कधी अशा ठिकाणी मीटर लावणे काय कारण आहे. आणि हा मीटर लावणार मीटर कोण लावणार, नागरीकांच्या पैसातून लावणार का महानगरपालिका स्वत: लावणार आहे. हयाचा पण विचार होणे गरजेचे आहे. कारण टापण एकतर नागरीकांना पाणी वेळेवर देत नाहीत. आणि मीटरसाठी हजार,पाचशे रूपये नागरीक कुठून आणणार. मग महानगरपालिका लावणार आहे का मीटर? आणि जिथे पाणी मिळत असेल तिथे मीटर तुम्ही मागेच सांगितले, आयुक्त साहेब आडात नाही तर तळयात येणार कुठून.पाणीच नाही तर मीटर लावणार कशाला. ज्या गोष्टीला पाण्याची आपण पाणीच देवू शकत नाही. एक तास मुबलक पाणी देवू शकत नाही. २४ तासाचा तर विषय सोडूनच दया. एक तासाचे पाणी आपण देवू शकत नाही आणि माझी एक दुसरी विनंती साहेब की आपण जे आता अमृत योजनेमध्ये नवीन प्रस्ताव त्या जेएनएनयुआर च्या संदर्भात टाकणार आहात तर साहेब, तुम्हाला एक विनंती आहेझोपडपटट्ी उल्हासनगरशहरामध्ये जवळजवळ ४५ ते ५० टक्के पेक्षाही जास्त प्रमाणात झोपडपटट्ी आहे. आणि हया ब्लू लाईनी कुठल्या ब्लू लाईनी झोपडपटट्ी विभागामध्ये टाकल्या गेलेल्या नाही आहेत. कमीत कमी तिथे लाईनी तर पडू दया.झोपडपटट्ीमध्ये १० बाय १० रूममध्ये १० लोक राहतात. ते पाणी दुस—याच्या नळावरून आणतात. तिथे पाणीही प्यायला त्यांना मिळत नाही. अशा ठिकाणी जर मिटरची योजना आली तर ती लोकांच्यावर अन्याय होईल आणि झोपडपटट्ीमध्ये पहिले ब्लू लाईनी टाका. आणि नंतर मिटरची सूरूवात करा.

**यावेळी मा. महापौर हया सभागृहातुन बाहेर गेल्या व त्यांच्या जागी उप—महापौर श्री. जीवन अदनानी आसनस्थ झाले.**

**<u>सदस्स, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u>** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सर्वात पहिले तर मी अंजलीजी साळवे यांचे खूप खूप धन्यवाद करत आहे, की त्यांनी हा विषय इथे आणला, पूर्ण महाराष्ट्रामध्ये उल्हासनगर ही अशी एक महानगरपालिका असेल, ज्यामध्ये आम्ही मालमत्ता करात आम्ही फिक्स पाण्याचे बील घेण्यात येते.सन १९९६ मध्ये ही जेव्हा नगरपालिका होती तेव्हा मीटर पध्दतीने सर्व ग्राहकांना बिले जात होती. सन १९९७ मध्ये जेव्हा महानगरपालिका बनली आणि आम्ही पण हया महानगरपालिकाचे सदस्य बनून आलो, तेव्हा हा प्रस्ताव आम्ही सर्व पक्षानी मिळून हा प्रस्ताव तयार केला होता. की आपण टॅक्समध्ये पाण्याचे बील लावण्यात यावे. आणि त्याचे पध्दतीने आपण टॅक्सचे बील घेतले जात होते. परंतु काळानुरूप सन २००१८ मध्ये एक अशी कल्पना आली, की परत मीटर पध्दती सुरू झाली पाहिजे. कारण की पाणी जे वाया जात आहे त्याची बचत होईल. आणि आम्ही जेएनएनयुआरएमचा प्रोजेक्ट आणला, आणि लोकांना सांगितले की जेव्हा हा आपला प्रोजेक्ट पूर्ण होईल, सन २०११ मध्ये आमची कल्पना होती, की आम्ही मीटर लावून मीटरप्रमाणे पैसेवसुल करण्यात येतील. जेव्हा जेएनएनयुआरएम चे कार्य चालू झाले ज्यांना पण ब्लू लाईनी मिळाल्या त्यांना सर्वाना मिटर लावलेले आहेत. आपण मिटर लावलेलेआहेत. परंतु दुर्भाग्य हे आहे की जेएनएनयुआरएम चे कार्य चालू झाले, त्याला रिवाईज एस्टीमेट करून सुध्दा कार्य पूर्ण करू शकलो नाही. आणि आज पण कमीत कमी रू. ६० करोड चे काम  थांबलेले आहे. आणि अशा प्रकारे अपू—या कामामध्ये मीटरद्वारा पैसे वसुल करणे, मीटर तर लागलेले आहेत. परंतु आपण मीटरच्या पध्दतीने बीले वसुल करत नाही. त्याचे कारण असे आहे की हा जेएनएनयुआरएमचा प्रोजेक्ट पूर्ण झालेला नाही. परंतु मी  अंजलीजी साळवे यांना धन्यवाद  देतो, की त्यांनी याकडे ध्यान आकर्षित केलेले आहे. हा त्यांचा जो विचार आहे तो आम्हा सर्वाचा विचार आहे. परंतु ज्याप्रकारे सभागृहाच्या सदस्यांनी सांगितले की जो पर्यंत आम्ही प्रत्येक घराघरांमध्ये पाणी देवू शकत नाही, जोपर्यंत आपली जेएनएनयुआरएम ची स्कीम पूर्ण होणार नाही, तोपर्यंत मीटर पध्दतीने पैसे घेणे योग्य होणार नाही. एकाबरोबर न्याय आणि दुस—याबरोबर अन्याय होईल. त्यामुळे सर्व समितीकडून सत्र समिती च्या सदस्यांची ही चर्चा ऐकल्यांनतर आणि अंजली साळवे मान्य देवून या प्रस्तावाला आम्ही अमान्य करत आहेत आणि भविष्यात अशी इच्छा करत आहे की लवकरात लवकर जेएनएनयुआरएमचा प्रोजेक्ट पूर्ण करावा व प्रत्येक घरामध्ये मीटर देवून नंतर मिटर पध्दतीने पैसे घेण्यात यावेत. धन्यवाद!

**यावेळी मा. महापौर यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला. व आपल्या स्थानी आसनस्थ झाल्या.**

**<u>महापालिका सचिव:—</u>** प्रस्ताव अमान्य, सर्वसमतीने.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १७ :— <u>प्रस्तावाची सुचना</u>

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत पाणी वितरण व्यवस्था पध्दतीत पाणी मिटर प्रणाली लागु करणेबाबत पालिका सदस्या श्रीमती अंजली साळवे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकाचे स्वत:चे असे पाण्याचे स्त्रोत नाही.  उल्हासनगर शहरातील सर्व नागरीक हे पाण्याकरीता एमआयडीसी वर सर्वस्वी अवलंबून आहेत.  मी आपणांस सांगू इच्छिते की, दरवर्षी समाधानकारक पाउस होत नसल्यामुळे व महानगरपालिकेच्या पाणी वितरण योजना पूर्णपणे सक्षम नसल्यामुळे दरवर्षी उल्हासनगर शहरातील नागरीकांना मोठया प्रमाणात पाणी समस्यांना सामोरे जावे लागते.  आज फक्त उल्हासनगर शहरापुरतेच नाही तर जगाच्या पातळीवर, राज्य पातळीवर येणा—या काळात पाणी समस्या ही मोठी समस्या उद्भवणार आहे असे स्वंयसेवी संसाि व पाणी तज्ञानचे म्हणणे आहे.  विश्वपातळीवर देखील हया

गोष्टीचा गांभिर्याने विचार करुन पाणी नियंत्रणाकरीता पाणी वितरण पध्दतीत पाणी मिटर प्रणाली लागू करण्यात येत आहे. उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील शहरातील विशिष्ट नागरीकांचा विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल की, सर्वसामान्य नागरीकांना ठराविक मर्यादित पाण्याची आवश्यकता असते. याउलट इमारतींमध्ये व वाणिज्य वापराकरीता पाण्याचा गेरवापर तसेच ब—याच प्रमाणात पाणी वाया जाते त्यामुळे दरवर्षी उल्हासनगर शहरातील नागरीकांना पाणी समस्यांना सामोरे जावे लागते. जर आपण पाणी म्टिर प्राणाली उल्हासनगर शहरात योग्यरित्या लागु केली तर येत्या मे व एप्रिल माह मध्ये पाण्याचे गैरवापर व अपव्यय थांबवू शकतो. तरी भविष्यात पाण्याकरीता दुरदृष्टी व पाण्याचे अपव्यय धोरण ठेवुन संपुर्ण उल्हासनगर शहरात पाणी मीटर प्रणाली तातडीने लागु करण्याकरीता ही प्रस्तावाची सूचना.

**महासभा ठराव क्र:** ५५ **दिनांक:— २/१/२०१९**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत पाणी वितरण व्यवस्था पध्दतीत पाणी मिटर प्रणाली लागु करणेचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८ :— प्रस्तावाची सुचना**

मालमत्ता कर वसुली होणेकरीता विना दंड कर भरणा करुन घेणेसाठी ''अभय योजना'' लागू करण्याकरीता पालिका सदस्या श्रीमती दिप्ती दुधानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्या श्रीम. दिप्ती दुधानी :—** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब एल.बी.टी बंद झाल्यानंतर कर हेच उत्पनाचे साधन उरले आहे. या माध्यामातून प्राप्त होणा—या करामधून आपला सार्वजनिक बाधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, विधुत विभाग तसेच इतर विभागाचे विकासाचे काम केले जाते. या वर्षाच्या सुरूवातीला मालमत्ता मिळकत करामधून चारशे पंचवीस करोड शहरवासियांकडे वसुलीच्या रूपात येणे आहे. ऐप्रिल ते डिसेंबर पर्यत ९ महिन्यात ४२ कोटी वसुल केले आहे. याच्या अर्थ तीनशे त्रयार्एंशी कोटी येणे आहे. यात शहरातील कित्येक गरीब वर्गाचा समावेश आहे. ते लोक महापालिकेमध्ये येऊन आम्हाला विनंती करतात. की अभय योजना सुरू करा जेणे करून विलंब शास्ती माफ होईल. कल्याण डोबिवली महापालिकेमध्ये पण नोव्हेबर पासून या योजना चालू केली आहे. ही अपेक्षा आपल्याकडून शहरवासियानां देखिल आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की आपल्या शहरात देखिल जानेवारी २०१९ पासून तीन महिन्यासाठी सुरू केली जावी. लोकाचा पण फायदा होईल आणि महापालिकेच्या पण खजिन्यात वाढ होईल जी विकास कामी येईल. आमचा प्रस्ताव असा आहे की १० जानेवारी ते १५ मार्च पर्यत १०० टक्के सुट देण्यात यावी. सभागृहाला माझी विनंती आहे की शहरवासियांना मंदीतून पॅनल्टी भरण्यात राहत मिळावी. आणि हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारित करावा. धन्यवाद.

**सदस्य श्री. विजय पाटील :—** मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब १२ महिने झाले असतील अभय योजना आपण चालू केली होती मला वाटते कित्येक वर्षात अभय योजना चालू करायची असेल तर राहिलेले आपले कर्मचारी कशासाठी आहे? आपण एक वर्षात कर भरतो आणि एक महिन्यात अभय योजना चालू करतो म्हणजे चाललाय काय हा प्रकार? मागच्या वर्षी चालू केली होती ना ही अभय

योजना आज तीन महिन्यात होईल म्हणजे प्रशासनाने त्यांच्यावर लक्ष दिले नाही का? वसुली करण्यासाठी, आणि प्रत्येक वर्ष अभय योजना लावू शकतो का?

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब विजय पाटीलांनी चांगला मुददा उपस्थित केला आहे.पण विषय असा आहे गेले २०१२ पासून नगरसेवक आहे. मार्चला जेव्हा तुम्ही पूर्ण ताकदीनिशी आर्थिक वर्षात पूर्ण ताकदीने वसुलीला लागतो तेव्हा कोणीतरी येउन अभय योजना लागू करायला सांगतो पण जी वसुली व्हायला पाहिजे ती होत नाही. अभय योजनेमध्ये परत येतात माझे असे म्हणणे आहे ठीक आहे तुम्हाला एक उदाहरण देतो एक शेतकरी नेहमी कर्ज भरतो आणि एक शेतकरी वारंवार कर्ज बुडवितो आणि मग कर्जमाफीची योजना येते सातत्याने गरीब लोक म्हणजे त्यांच्या झोपडपटटीतील ६० ते ६५ टक्के कर भरतात. मग झोपडपटटीतील माणूस आपला टॅक्स कसाही भरतो की एकदाच टेंशन मिटू दया आणि तुम्ही सर्वे करा ठीक आहे २० ते २५ टक्के लोक टॅक्स भरत नसतील आणि जे लोक प्रामाणिकपणे आपला कर भरतात आणि अभय योजना लागू होते. अभय योजना लागू झाल्यानंतर कुठलाही लाभ मिळत नाही तशा लोकांसाठी आपल्याला काय करावे लागेल. त्यांनाही सातत्याने माफी मिळाली पाहीजे काहीतरी जो सातत्यांने कर भरतो लोकांनाही कसल्याही प्रकारचा लाभ त्यांना मिळत नाही.आणि जे नेहमीच करबुडवे लोक असतात आणि त्यांना आपण लाभ देत असतो. पण जे भरणारे असतात ते पुढच्या वर्षी करबुडवे राहतात अशी जर पध्दत असेल दर दोन वर्षानी निंबाळकर असताना अभय योजना आली आणि आम्ही ठराव केला आहे ५ वर्ष अभय योजना परत येणार नाही. मग यावर्षी परत कशी काय आली. म्हणजे अशा पध्दतीची भूमिका असेल तर मला वाटते याचा लाभ मोठे लोक घेतात गरीब लोकांना त्याचा लाभ मिळत नाही आणि जर लाभ मिळत असेल तर त्यांना कर किंवा दंड लावू नका ना करच भरायला लावा.

**सदस्या श्रीमती मीना सोंनेजी:–** मा. महापौर उपमहापौर अभय योजना लागली पाहिजे ठिक आहे परतु ज्यांनी आता कर भरला त्यांना त्यांचे पैसे परत मिळणार का?

**सदस्य श्री अरुण आशान :–**मा महापौर आयुक्त साहेब आता टॅक्सवाले आत्महत्या करतील. कर ज्यांनी भरला ते आत्महत्या करतील. आणि ज्यांनी नाही भरला ते त्यांच्या मयतीला जातील. हे काय आहे एक महिन्यात असे काय होणार आहे महापालिकेमध्ये अब्जो रुपये येणार आहेत असे काय येणार आहे असा कोणता वेतन आयोग लागू झाला आहे की सर्वांच्या खात्यात पैसे जमा होणार आहेत. महापौरजी अभय योजनेमध्ये ज्या लोकांना संधी दिली आहे जे जाड कातडीचे लोक आहेत त्यांनीच पैसे भरले नाही त्यांना माहित होते की अजून एक अभय योजना लागू होईल परंतु जे लोक प्रामाणिक होते त्यांनी पैसे भरले. कारण की ५ वर्ष अभय योजना लागू होणार नाही पैसे नव्हते तरी पैसे भरले कर भरला आणि जर एका महिन्यासाठी अभय योजना लागली तर ज्या ज्या लोंकांनी कर भरले ते लोक आत्महत्या करतील. म्हणतील हे काय आहे आम्ही कर भरला की कारण की ५ वर्ष अभय योजना लागू होणार नाही. आणि काही लोकांना वाटले की आपण भरायचाच नाही म्हणजे हा असा प्रकार आहे की शेतकरी कर्ज भरतो तो बिचारा कर्ज मिळेल म्हणून शेती करतो आणि एखादा बघतो की माझे कर्ज माफ होईल आणि जो भरतो तो लटकेल पण इथे उलट आहे साहेब जो भरेल तोच लटकेल माझी विनंती आहे की एकदा महासभेने ठरविल्यानंतर अभय योजना ५ वर्ष येणार नाही असे म्हणटल्यानंतर जास्तीत जास्त लोकांनी कर भरला आणि आता काही लोकांकरीता ही अभय योजना लागणार असेल तर मला वाटते साहेब हि अभय योजना काही कामाची नाही.

**सदस्य श्री प्रमोद टाले :–** डॉ. साहेब एक मिनिट माझा एक प्रश्न आहे शासनाला.

**सदस्य श्री अरुण आशान:–** सभागृह नेता आम्हाला बोलायला मिळेल का मी परवानगी घेउन उभा आहे

**सदस्य श्री प्रमोद टाले:–** आयुक्त साहेब माझा एक प्रश्न आहे.

**सदस्य श्री सुनील सुर्वे:–** सुपर महापौरजी मला असे वाटते आपण थेट बोला ना ओ सुपर महापोरजी

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:–** महापौरजी ही काय खाजगी बैठक चालू आहे का? सभेत तुम्ही आदेश दया, यू आर दी बॉस ऑफ हाउस

**सदस्य श्री प्रमोद टाले:–** मा. महापौरजी, डॉ.जी माझा एक प्रश्न आहे शासनाला प्रश्न आहे. आयुक्तांना प्रश्न आहे. गेल्या वर्षी अभय योजना लागू झाली निबांळकर साहेबांनी केली. त्याच्या आगोदर हि एकदा अभय योजना सुरू केली. दोनदा अभय योजना सुरू केली. प्रशासनाचा असा कुठला नियम आहे का किंवा कायदा आहे का? किंवा आयुक्ताच्या अधिकारमध्ये परत परत अभय योजना लागू करू शकतात का?

**सदस्य श्री अरुण आशान:—** महासभेने ठराव पारित केल्यानंतर पाच वर्ष अभय योजना लागणार नाही. हा संपूर्ण महासभाने ठराव केला आहे. अस असतांना.....

**सदस्य श्री किशोर वनवारी:—** मा. महापौर जी, उप—महापौर जी, आयुक्त साहेब आणि सचिव मॅडम, सर्व सन्मानिय सदस्य आज इथे अभय योजनेचा विषय चालू आहे. शहरामध्ये तीन महिन्यापासून मॅसेज गेला आहे. अभय योजना चालू होणार आहे. हि गोष्ट लक्षात घेवुन पुर्ण शहरवासी कर भरत नाही. कल्याण—डोंबिवली महापालिकेने अभय योजना सुरू केली आहे. जर आपल्याला अभय योजना आणायची आहे तर, जे सन्मानिय सदस्य बोलत आहे, की मागच्या वर्षी ठराव पास केला होता, अभय योजना हि शेवटची आहे. सदस्य असे म्हणत आहे. ठरावात फेरबद्ल करावा लागेल. जर हे चालू करायची आहे तर, जर सदनाचा जर असा विचार असेल तर, त्या ठरावात फेरबद्ल करावा लागेल. आयुक्त साहेब दुसरी गोष्ट अशी आहे. इथे कोणताही आयुक्त पाच करोड ते पंधरा करोड पर्यंत डिसपुटेट केस आहे जो कोर्टात आहे ज्यांना डबल एन्ट्री आहे, ट्रिपल एन्ट्री आहे. एक एक प्रॉपर्टींना तिन तिन टॅक्स गेले आहे. असे दादा पाटिल शहर उपायुक्त होते त्यांनी पाच करोड ते पंधरा करोड पर्यंत निबांळकर साहेबांसमोर ठेवले होते. कि हे डब्लींग आणि ट्रींप्लींग प्रॉपटी आहे. आता मी पाच करोडचा प्रस्ताव पाठणार आहे. नंतर पाच करोडचा. मेहरबानी करून आपल्या कार्यकालमध्ये ज्यांचे डबल डबल ट्रिपल ट्रिपल एक प्रॉपटीचा टॅक्स येत आहे. आणि जे कोर्टात मॅटर आहे. असा ठराव झाला आहे. तुम्हाला महसूलमध्ये तोटा होतो. अस कोणाचे असेल तर स्थायी समितीमध्ये पाठवायचा असतो. असे बरेच ठराव पारित झाले आहे. ज्यांच्या दुबार नोंदी आहे त्यांना आम्ही रिवोक केले आहे. असे प्रस्ताव जे आपले एरियर्ससमध्ये दर वर्षी पन्नास कोटी शंभर कोटी लिहून येतात. परंतु जे डिसस्पुटेड केस आहे. ते पण मेहरबानी करून जागेवर तडजोड करून घ्या. जर तुम्हाला स्थायी समितीमध्ये पाठवायचे असेल तर सर्व सन्मानिय सदस्य तुम्हाला सहयोग करणार. राहिलेला पण निघुन जाईल. आणि जे डिसप्यूट मॅटर म्हणूण भरत नाही. ते पण भरायला सुरूवात करणार. समजा उदा. माझ्याकडे २० लाख रूपये राहिलेले आहे. मी ५ लाख भरायला तयार आहे. १५ लाखाचे वाद आहे. जर तुम्ही त्यांच्याशी तडजोड केले तर ५ लाख तो भरेल. आणि त्यांच्याकडे दैनदिन गाृहक होणार. दर वर्षी चालू वर्षाचे भरणार. तर मेहरबानी करून टॅक्सचा जो मुद्दा आहे. तो अभय योजनाच्या संबधित नाही. जो एरियरर्स आहे तो मोठा मुद्दा आहे. डबल डबल, ट्रिप्पल ट्रिप्पल, चौब्बल चौब्बल ज्यांच्याकडे टॅक्स जात आहे. त्यांचा पण आपण निर्णय घ्या. तर तो चालू वर्षाची कर भरायला सुरूवात करणार. जर सभागृहाचा असा निर्णय असेल की व्याज माफ करून टॅक्स घेणार असे आपल्या सदस्यांचे म्हणणे आहे की जे चार वर्षापासुन अभय योजना चाूल होत. त्याच्यामध्ये आपण चार वर्षापासुन कर भरत अहोत. आणि आता थोडे फार अभय योजनामध्ये टॅक्स भरणार राहिलेला असेल तर हा अभय योजना अंतिम चे अंतिम करून निर्णय घेवून लागू केला तर ५ टक्के किंवा १० टक्के राहिलेले लोक अभय योजनाचा लाभ घेवून टॅक्स भरणार. जर हया अभय योजनामध्ये टॅक्स नाही भरले तर त्यांची प्रॉपर्टी सिल करून जप्ती करून त्यांच्यावर कार्यवाही करावी, जर त्यांच्यामध्ये उल्हासनगर चे कोणतेही नगरसेवक त्यामध्ये येणार नाही. आणि तुम्हाला आश्वासन देत आहे की जर सभागृह या अभय योजनाला मान्यता देत आहे तरी तुमच्या सोबत अहोत. आणि जर मान्यता नाही दिली तरी मार्च पर्यंत प्रत्येक प्रभागात कॅम्प लावुन जसे की मागच्या वर्षी प्रभाग क्र. १९ मध्ये ३ करोड रूपये टॅक्स वसुली करून दिली होती तसे या वर्षी पण आम्ही वचन देतो जेवढे लोंकांकडे राहिलेले टॅक्स वसुल करून देणार. ३१ मार्च पर्यंत प्रत्येक प्रभाग मध्ये कॅम्प लावुन प्रत्येक नगरसेवक टॅक्स वसुलीमध्ये सहयोग करणार. कारण की तुम्ही आमचे काम करित आहेत. शहराच्या प्रती तुमचा विचार चांगला आहे. त्याच्यामुळे आपले पण कर्तव्ये आहे कि आम्ही सर्व सदस्य वसुलीच्या बाबतीत तुमच्यासोबत आहे.

**सदस्य श्री विजय पाटील:—** महापौर जी उल्हासनगरसाठी एक अफवा आहे की असे असे होणार आहे. आता हे सभागृह अफवावर चालणार आहे का.? आणि माझे मित्र माझे बंधू बोले की आता जास्तीत जास्त लोंकानी भरलेले आहे. २,३ आणि ५ टक्के असतील त्यांच्यासाठी कार्यवाहीचा आधार काढा. कशासाठी अभय योजना लागू करता तुम्ही. सर्वांनी भरलेले आहेत ना. जर सर्वांनी भरलेले आहे. कमी लोक आहे. कार्यवाही करा त्यांच्यावर. अभय योजना त्यांना कशासाठी पाहिजे?

**सदस्य श्री महेश सुखरामानी:—** मा. महापौर जी, भगवान भालेराव आणि विजय पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. माझे म्हणणे असे आहे की आपण आपसात बसुन आपले जनसंपर्क कार्यालय आहे आणि भगवान भालेरावचा पण प्रभाग माझ्या प्रभागाला लागुनच आहे. तिथे जेवढे झोपडपट्टी धारक व गरीब लोक राहत असुन त्यांनी सांगितले की त्यांना हयाचा कोणताही लाभ मिळत नाही. माझ्याकडे असा पुरावा आहे. त्यावेळी पण त्यांच्याकडे टॅक्स भरण्यासाठी पैसे नव्हते. लोक आमच्याकडे येत होते ते भरले नाही त्यांना माहिती नव्हते की प्रचार झाली नव्हती. याच्या बाबतीत मी बोलणार की त्यांच्याकडे पण थकबाकी अजुन आहे. ते एवढे सक्षम नाही. बरेच लोकांनी आपले दागिने गहाण ठेवले आहे टॅक्स भरण्यासाठी, अशी परिस्थिती पण आहे तर सर्व सभागृहाला माझी विनंती आहे की किशोर वनवारी जे बोलले आहे. जे बाधीत प्रॉपर्टी आहे त्यांचे पण निवारण

केले पाहिजे. माझा वैयक्तिक मुद्दा आहे की माझे प्रॉपटी टॅक्स पावती डबल येत आहे. याच्यामुळे मी गणेश पाटील साहेबांशी माझे बोलणे झाले होते त्यांनी सांगितले होते की सर्वांचे एकत्रित आले पाहिजे. तर हा विषय पण गंभीर पणे घेतला पाहिजे. जे पण बाधीत प्रॉपटीचे मुद्दे आहेत. त्यांच्यावर कार्यवाही केली तर आपल्या महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले. आणि शहरात एक चांगला मॅसेज पण जाणाार. या विषयावर एक समिती नेमली किंवा उपायुक्तला अेवरनेस करून त्यांना आदेश करून सर्व वादीत मुद्दे वर निवारण केले पाहिजे. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे. की अभय योजना लागु केली पाहिजे. त्यांचा लाभ नागरिकांना मिळाला पाहिजे. धन्यवाद...

यावेळी सदस्या श्रीमती अंजली साळवे हया सभागृहातुन बाहेर गेल्या._ 

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानीः—** कोणत्या वर्षी अभय योजना लागली नाही. सांगा मला. २०१४ मध्ये लागली. २०१५ मध्ये लागली, २०१६ मध्ये लागली, २०१७ मध्ये २०१८ मध्ये लागली, मी यांचे उत्तर देतो. या उल्हासनगर शहरामध्ये चांगल्या लोकांना अनाधिकृत करण्यासाठी मजबूर करत आहे.

**सदस्य श्री अरूण आशानः—** आत्महत्या करणार साहेब, आत्महत्या करणार. लोक १०० टक्के आत्महत्या करणार. माझ्या प्रभागात करणार.

**सदस्य डॉ. प्रकाश नाथानीः—** सन्मानिय सदस्य मला बोलू दया, हे तर असे झाले थुंकी चाटल्यासारखे. इत्रजे इमानदार लोक आहे दोन वेळेचे अन्न कमवुन येतात. जे अधिकारी, जे इंजिनियर आणि डॉक्टर, घरघुतीवाला बिचारा इमानदारीने टॅक्स भरत असतात. आणि आपल पुर्ण वर्षाचे शेडूल बनवितात. की मला या वर्षी एवढे कर भरायचा आहे. त्यांच्यावर किती अत्याचार आहे. जे डिफॉल्टर चोर आहे. डिफॉल्टर चे डिफॉल्टर राहणार. ते १०, २० हजार रूपये वाले चोर नाही. करोडो, लाखो रूपये वाले चोर आहे. त्यांच्यावर टॅक्स येत असते ३ लाख, ४ लाख. वर्षानुवर्ष वाट पाहत असतात कारण की व्याज कमी होणार आहे. ३, ४ लाखाचा धंदा करून घेणार मी टॅक्स बचत होणार. नाहीतरी काय होणार दुसऱ्यावर्षी येणार. एक दोन नगरसेवकांना पटविल. पत्र टाक. काय करायचे अभय योजना येणार. श्रीमंताची रोलींग फिरेल आणि गरीबांर लक्ष नाही. लोक उधारी घेतात. लोक भिशी उचलुन पैसे भरतात टॅक्स भरतात. इथे येवुन बघतात की अभय योजना. सर्व नगरसेवकांनी शपथ घेतली होती की पाच वर्षा अभय योजना येणार नाही. काय आहे? मला लाज वाटते नगरसेवक बोलायला ते काही लोकांसाठी ही अभय योजना चालू केली जात आहे. ज्यांचे १०लाख, २० लाख राहिलेला असेल कोणी १० २० हजार वाले राहिलेले नसेल. मा. महापौरजी मला बोलू दया मी पूर्ण उल्हासनगर शहराच्या हितासाठी बोलत आहे माझ्यासााठी नाही बोलत आहे. मला मजबूर केले जात आहे की ५ वर्षात टॅक्स तुम्ही पण भरू नये तुम्ही पण मार्चच्या शेवटी टॅक्स भरा. परंतु मी नगरसेवक आहे मला नो डयूज सर्टिफीकेट दयायचे असते नाहीतरी मी पण त्यामध्ये मोडणार. लोकांना मी बोलणार की तुम्ही पण ५ वर्षात कर भरू नये योजना येणार चिंता करू नये पैसे रोलिंग करा इमानदारांना तुम्ही बेइमान बनवतात सरकार असे करू नका. माझ्या सारखा सभ्य माणुस ऑक्टोबरमध्ये जातो लाइनमध्ये उभा राहिला की ५ टक्के सुट मिळेल. सर सेक्शन १४४ मध्ये तुम्ही अभय योजना आणू शकत नाही सर दुसरे सेक्शन १४० मध्ये असे आहे की तुम्ही वन टू वनमध्ये तुम्ही कोणाला कंसिडर करू शकत नाही. आणि तुमचा डाटा माझ्याकडे आहे तुम्ही वारंबार कंसिडर करायचे नसते. एवरी इयर अभय योजना आता तुम्ही मार्केटमध्ये फिरवले आहे अभय योजना येणार आहे. तुमच्या विभागामधले बोलतात. आयुक्त साहेब काय होत शहरामध्ये अफवा फिरवत आहे. मॅसेज जात आहे. लोक बोलत आहे. टेंशन नाही अभय योजना येत आहे. व्याज माफ होणार. व्याज माफ करू नका कोणाचे. जप्ती करा. कडक कार्यवाही करा. तुमच्याकडे शक्ती आहे. तुमच्याकडे ताकद आहे. का नाही करू शकत तुम्ही. मंदिरातुन चप्पल चोरी होवू शकत नाही. कर तुमच्या घरी देवुन जाणार. सर्व काही होवू शकते. आधीच्या काळात दुकानाच्या बाहेर फिरवत होते. तुम्ही समजले ना ढोल वाजवत होते. लाजाळून ते टॅक्स भरत होते. आता काय अभय योजना आहे. अभय योजना पुढच्यावर्षी येणार. साहेब तुमचा डाटा माझ्याकडे आहे. डाटा आहे. सर्व वर्षाचे डाटा आहे. आणि राहिलेला विकास. विकास होणार नाही. पैसा येणार. डब्यामध्ये जाणार. पैसे वाटले जाणार टक्केवारीमध्ये. काही विकास नाही होणार. मी स्वत: बोलतो. मागील ३ वर्षापासुन कोणताही विकास झालेला नाही. प्रभागमध्ये जावु शकत नाही. आणि त्या प्रभागाच्या पॅनेलमध्ये नक्की फायरस्टेशन निश्चित होणार आहे. मी चपलीने मार खाणार आहे. कारण प्रभागाचा विकास झाला नाही. प्रभागामध्ये जावु शकत नाही. कारण निधी दिलेला नाही. तुम्ही शपथ दिली होती. निधी देणार. अजून दिलेला नाही. निधी देत नाही फक्त दंड घेतात. असे होत नाही. तुम्ही माई—बाप आहे. यू आर द फादर ऑफ द सिटी. मॅडम यू आर बॉस ऑफ द हॉऊस. यू शूड बी कन्सीडर. आय व्हील थॅंकफुल. अभय योजनाचे दुकान बंद करा. पोस्टर बॅनर्स लावा. दंड ५ टक्के ते १० टक्के करून घ्या. कसे येणार नाही लोक पैसे भरायला तुमच्याकडे. का येणार नाही.? मी भरतो, मीनाताई भरते. तुम्ही पण भरत आहे. जीवन भाई भरत आहे. विकास होणार, शहराच्या लोकांसाठी मी मरून जाईन. ९० टक्के लोक टॅक्स भरत आहे. १० टक्के लोक नाही भरत.

<u>**सदस्य श्री अरूण आशानः—**</u> साहेब भावना लक्षात घ्या. डॉ. साहेबांनी सांगितले किशोर वनवारी साहेबांनी सांगितले अभय योजना लागु नाही झाली पाहिजे. अभय योजनेचा लाभ ज्या लोकांना घ्यायचा होता त्यांनी घेतला आहे. आयुक्त साहेब. या अभय योजनेमुळे लोकांमध्ये गैरसमज पसरणार आहे. सभागृह नेता जी काही लोकांकरिता ही अभय योजना लागू व्हायला नव्हती पाहिजे. त्या लोकांना शासन व्हायला पाहिजे त्याच्यावर शासन लागू करा. दंडासह रक्कम वसूल करा. साहेब जपत्या करा. कारण त्यांना संधी देवून सुध्दा त्यांनी जर का पैसे भरले नाही. त्यांना शासन झाले पाहिजे. डॉक्टर चे म्हणणे हेच आहे. मी मगाशी तुम्हाला सांगितले आहे. टॅक्स भरणारे लोक आत्महत्या करतील. त्याचे कारण अस आहे की तुम्ही सांगितल्याप्रमाणे आम्ही अभय योजनेमध्ये टॅक्स भरला. आणि आता परत नविन अभय योजना लागणार टॅक्स भरण्यासाठी तर हे कितपत योग्य आहे. हा जो प्रस्ताव आहे महापौर जी अभय योजनेचा तो रद्द केला पाहिजे.

<u>**सदस्य श्री सुनिल सुर्वेः—**</u> मा. महौपौर जी, म्हणजे कुंपण शेत खायला लागला आहे. असा विषय झाला. मा. नाथानी जी मी आभार मानतो. काही लोकांकरीता हा सुवर्ण काळ आहे. अशी जर अभय योजना आली तर काही कर्मचारी काय काही अधिकारी काय आमच्या सारखे कोणी असतील. अरे आम्ही येत आहे. ४० लाख भरायचे आहे ना. ठिक आहे एक काम करा १२, १५ लाख १८ लाख, २, ३ लाख इकडे दे मी करून देतो. असाच काही तरी प्रकार आहे. माझा सरळ आरोप आहे. साहेब महत्वाच्या विषयाकडे कोणाचे लक्ष नाही. आज असेसमेंट बंद आहे. मोठ मोठया प्रॉर्पटया आहे. आज आमच्या सुरेश जाधव साहेबांच्या मुलाचे लग्न झाले त्या हॉलचे भाडे चार तासाचे भाडे ३ लाख रूपये एका दिवसाचे. आणि टॅक्स किती भरतो जरा माहिती काढा. आज जे उल्हासनगरमध्ये हॉल आहे ज्या बॅका आहे ते तुम्ही करत नाही करायला पाहिजे पैसे आले पाहिजे. म्हणून मी बोललो कुंपण शेत खात आहे. आणि खरी गोष्ट आहे की असिसमेंट होत नाही. बरोबर वेळ बसत नाही जे लोक वेळेवर टॅक्स भरत असतात त्यांना तुम्ही त्रास देता आहे. जे चोर आहे टॅक्स चोरी करतात त्यांना तुम्ही फायदा देत आहे. बरोबर ना मी लगेच एक मिनिटात माफी मागितली आहे. टॅक्सच्या विषय रदद करावा. सर्व सभागृहाला विनंती आहे.

<u>**सदस्य श्री भगवान भालेरावः—**</u> मा. महापौरजी, चार वेळा अभय योजना लावली सभागृहाला तेवढे कळू दया की आपल्या रेगुलर टॅक्स जो येतो ते अभय योजनेमध्ये भरायचे का?

<u>**सदस्या श्रीम.वसुधा बोडारेः—**</u> मा. महापौर मॅडम तुम्ही फक्त टॅक्स वसुली पैसे वसुली आपले महानगरपालिकेत येणेसाठी करतो. हा एकच मार्ग आहे का? भरपूर मार्ग आहे ना तुम्ही सील करायला सुरूवात करा आपोआप टॅक्स येणार. एक अभय योजना हा मार्ग का आहे की वर्षातून दंड माफ होणेसाठी आणि आमचा पूर्ण पटटा स्लम एरिया आहे गरीब प्रत्येक वर्षात टॅक्स भरतो, धनाढय लोकांसाठी आहे ही अभय योजना आहे कृपया त्याच्यासाठी भरपूर मार्ग आहे टॅक्स वसुलीसाठी तुम्ही सील करा आमचे बचट गटाच्या महिला टॅक्स वसुली करून देतात. अभय योजना आम्हाला नामंजूर आहे.

यावेळी सदस्य डॉ. प्रकाश नाथानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>**आयुक्त श्री. अच्युत हांगे :—**</u> मा. महापौर मॅडम, सन्मानिय सर्व सदस्य, मा उप—महापौर साहेब या ठिकाणी अभय योजना हा काय आम्ही प्रशासनाकडून प्रस्ताव दिलेला नाही. आपल्या माहितीस्तव सांगत आहे. आपण फार पोटतिडकीने बोलला त्याच्या पेक्षा जास्त पोटतिडकीने मी बोलत आहे. हा काय प्रशासनाकडून आम्ही प्रस्ताव दिलेला नाही. तुम्ही शांततेने ऐका चौधरी साहेब. ऐका सभागृहाने पण ऐकले पाहिजे. की काय चालले आहे. २०१४—२०१५ मध्ये अभय योजना लावली होती आणि ५० कोटी वसुली झाली. आकडा आपण लिहून घ्यावा. २०१५—२०१६ मध्ये अभय योजना लावली होती. २९ कोटी वसुली झाले फक्त, त्यांच्यानंतर २०१६—२०१७ मध्ये अभय योजना लावली होती. ७२ कोटी रूपये वसुल झाले. तेव्हा नोट बंदी झाली होती. त्यांच्यानंतर २०१७—२०१८ मध्ये अभय योजना लावली होती फक्त ४३ कोटी रूपये वसुल झाले. आणि मी या महापालिकेमध्ये आल्यानंतर वसुलीवर जोर दिला कारण तोंडावर दिवाळी होती. आणि पगाराला पैसे तिजोरीत काही नव्हते. चव्हाण ला बोलवणे की काय परिस्थिती आहे. त्यांनी सांगितले की असा असा खडखडाट आहे. त्याच्यामुळे जर महासभेमध्ये निर्णय घेतला. आणि या ठिकाणी बोनस देण्याची पध्दत आहे. हि सगळी माहिती घेतल्यानंतर मी दिवाळीला गावी जावु शकणार नाही. तर आपल्याला काय करावे लागेल.? वसुली जोरात करावी लागेल. पाहिली मोहिम वसुलीची घेतली आणि वसुलीला सुरूवात केली. आज तारखेला आमची वसुली ४८ कोटी रूपये झाली आहे. आणि मला शंभर टक्के विश्वास आहे. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च अजुन ३ महिने माझ्या हातात आहे. आता सभागृहामध्ये ज्या काही भावना व्यक्त झाल्या. त्याच्यामध्ये गावामध्ये असा मॅसेज गेला. की अभय योजना लागणार आहे. कशाला भरता तुम्ही पैसे. नंतर भरा. हा जो चुकीचा मॅसेज गेला आहे. आणि डॉ साहेब जे बोलले. काही लोकांसाठी आहे. अशा प्रकारे जर सभागृहाची भावना असेल. तर सभागृहाला काय निर्णय घ्यायचा तो

सभागृहाचा अधिकार आहे. परंतु मी आपल्या महासभेमध्ये मला वाटते इथे पाठी माझे कोणी आयुक्तांनी सांगितले आहे की नाही हे मला माहित नाही. पण आपण या सभागृहाचे सन्मानिय सदस्या आहात. काही कायदयाचे नविन माहिती महानगरपालिकेतल्या नगरसेवकांना नगरसेविकांना माहित नसेल तर त्यांना माहित झाले पाहिजे. जुन्या काही असतील त्यांना पण माहित झाले पाहिजे. तर आपला महानगरपालिकेचा जो कायदा आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ त्या कायदयामध्ये एक कराधार नियम म्हणुन एक ८ नंबरचे प्रकरण आहे. आणि त्यांच्यामध्ये कलम नंबर ५१ नुसार तो शंभर टक्के आयुक्तांचा अधिकार आहे. की याच्यामध्ये अभय योजना लावायची की नाही लावायची. लावायची असेल तर चाराने सुट दयायची. का आठाने सुट दयायची, का बाराने सुट दयायची. का एक रूपया सुट दयायची. आणि ती किती दिवसांसाठी लावायची. १५ दिवसांसाठी लावायची का एक महिन्यांसाठी लावायची, का दोन महिन्यांची लावायची का तीन महिन्याची लावायची. की लावायचीच नाही. पण सभागृहाची भावना संयुक्तीत आहे. काही सदस्य म्हणता लावायची काही सदस्य म्हणता लावायची नाही. काही सदस्य एकदम पोट तिडकीने बोलले डॉ साहेब बोलले , अरूण आशान साहेब बोलले. चौधरी साहेब बोलले. दोन चार लोकांनी अशी भावना व्यक्त केली. भगवान भालेराव बोलले गरिबांना फायदा नाही, श्रीमंताला फायदा होणार आहे. म्हणून मी या ठिकाणी सर्वांची भावना ऐकत होतो. आपल्या भावना विचारात घेवून मी सभागृहाचा मान ठेवणारा अधिकारी आहे. मी सभागृहाचा अपमान कधीही करणार नाही. परंतु आपण सर्वेनुमते ठराव जो पास होईल. त्या पध्दतीने ते किती दिवसांसाठी लावायचा आहे. हे तुम्ही माझ्यावर सोडून दया. आणि आपल्याला जास्तीत जास्त वसुली मिळून आपल्या महानगरपालिकेचे पुढचे कामे आपल्याला करायचे आहे. पुढे आचार सहिता आहे. त्यांच्यानंतर मार्चमध्ये आचार सहिता लागली तर वसुलीच्या कामात आपल्याला अडथळा येणार नाही. उदयापासुन आपण जोरात वसुली करू. आताची जी स्पिड असेल त्यांच्या १०० टक्के स्पिड वाढवू. म्हणजे त्या कालावधीमध्ये आम्हाला कोणी आडकाठी करणार नाही. काहीच करणार नाही. त्यांच्यामुळे मला १०० टक्के विश्वास आहे की मी १०० कोटी पूर्ण करणार आहे. आज जरी मी ५० कोटी वर असलो ५० कोटी रूपये मी ३ महिन्यामध्ये वसुल करणार म्हणजे करणार. अशा पध्दतीची मला खात्री आहे. आपल्या सर्वांचे सहकार्य असावे. आणि जो काही ठराव होणार आहे. म्हणजे ठराव करण्याचा आपला अधिकार आहे. हा अशासकिय ठराव आहे. अंमलबजावणी करायची की नाही करायची हा माझा विषय आहे. परंतु आपल्याला ठराव करण्याचा अधिकार आहे. आपण ठराव करू शकतात. त्यांच्यामुळे आपल्याला पास करायच नापास करायच आपण ठरवाव. माझे काही मत नाही याच्याबद्दल, फक्त आपल्या सभागृहाला माहिती असावी. आपण आता ५० कोटी वसुली वर आहोत. गेल्यावर्षी अभय योजना लावुन ४३ कोटी वसुली झाली फक्त, मी आज ५० कोटीवर आहे. ३ महिने माझ्या हातात आहे. मी अजून हत्यार हातामध्ये घेतलेले नाही. म्हणजे आपण जे म्हटला सिल करा. ते ताई म्हटले की असे करा. ते करणारच आहे. त्याची वाट बघू नका. कोणी नंतर फोन करू नका. माझ्या वार्डतला माणूस आहे सोडा म्हणून.

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महपौर जी, मा. आयुक्त साहेब, आजचा हा विषय आला आहे. आमची बहिन दिप्ती दुधानी जी चे धन्यवाद देतो. अभय योजना आज उल्हासनगरमध्ये आर्थिक स्थिती ठिक नाही आहे. आणि आपली महापौर पंचम कालानी यांनी हा विषय गटनेताचा बैठक झाली होती त्यांच्यामध्ये त्यांनी सांगितले होते. अभय योजना आणला पाहिजे. आणि हा विषय महासभेमध्ये दिप्ती दुधानी यांनी आणली आहे. मी सर्व सभागृहाच्या सदस्यांच्या भावनांची कदर करतो की, सर्वांना विनंती करणार की आपण सर्व संमतीने एक महिन्यासाठी किंवा आयुक्त साहेब ठरवणार १५ जानेवारी पासून १५ फेब्रुवारी पर्यंत या कालावधीत आपण प्रचार करू. आम्ही वर्तमान पत्रात प्रसिध्दी देवू. १० जानेवारी ते १० फेब्रुवारी पर्यंत १०० टक्के अभय योजना लागू करावी. आणि आपले लक्ष १०० करोड पर्यत झाले पाहिजे. १०० कोटी वसुली करणार. सर्व सभागृह सदस्याना सोबत घेवून, सभागृहाच्या सदस्यांने ज्या प्रमाणे हा विषय ठेवला आहे. त्यानंतर कोणी वंचित नाही राहणार. आपण प्रचार आणि प्रसार घरोघरी करणार. अभय योजना चालु झाली आहे. तुम्ही पैसे भरा. तुमची काही समस्या आहे. ती दुर करणार. आणि या अभय योजनेत एक महिन्यासाठी १०० टक्के व्याज सुट देऊन लागू करू. आणि त्याच सोबत एम.आय.डी.सी चे जुनी पाण्याची थकबाकी आहे. त्याच्यावर पण अभय योजना लागू झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री किशोर वनवारी:—</u> पाणीवर पण अभय योजना सुरू केली पाहिजे.

<u>सदस्य श्री भगवान भालेराव:—</u> थांबा आमचा विरोध आहे.

<u>सदस्य श्री अरूण आशान:—</u> मा. महापौर जी, मा. आयुक्त साहेब

यावेळी सदस्य श्री. सतरामदास जेसवानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री किशोर वनवारी</u>:— पास पास

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—</u> अरूण आशान जी. माझ्यानंतर बोला. मा. आयुक्त साहेब. काल कॅबिनेटमध्ये बैठकीमध्ये निर्णय झाले कल्याण जे २७ गाव आहे. तिथे एल.बी.टी वर कॅबिनेटने मंजुरी दिलेली आहे. एल.बी.टी वर अभय योजना लावली आहे. कारण की २७ गाव वंचित राहिलेले होते. कल्याण महानगरपालिकेने एल.बी.टीवर अभय योजना लावली होती. मी तुम्हाला विनंती करतो की, दोन तीन महिना झाल्यानंतर टॅक्स आणि पाण्याची अभय योजना नंतर तुम्ही एल.बी.टी चौ थकबाकी आहे त्यावर पण अभय योजना चालू करा. कमीत कमी ५० करोड रूपये एल.बी.टी कडून आपल्या महानगरपालिकेमध्ये वसुली येणार. धन्यवाद. जय हिंद.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> मतदान होईल. कारण की कोणाचे वेगळे मत, कोणचे वेगळे मत आहे. मतदान करा.

<u>महापालिका सचिव:—</u> मतदान.

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—</u> सर्व समतीने पास करा.

<u>सदस्य श्री अरूण आशान:—</u> नाही नाही. साहेब आम्हाला विरोध आहे या विषयावर.

<u>सदस्य श्री सुमित सोनकांबळे:—</u> साहेब आमचा विरोध आहे या विषयावर. कृपया इथे मतदान झाले पाहिजे. अशी आमची सभागृहाला विनंती आहे.

<u>सदस्य श्री किशोर वनवारी:—</u> शहराच्या सोबत रहा.

<u>सदस्य श्री अरूण आशान:—</u> आहे ना शहराच्या सोबत. मा. महापौर जी, कोर्टात दोन लोकांनी केस केली आहे. ते लोक पण याचा लाभ घेणार ना.

<u>सदस्य श्री किशोर वनवारी:—</u> पाणी पुरवठामध्ये पण हि योजना लागू केली पाहिजे. गरीब लोकांना लाभ होणार जे राहिलेले आहे. श्रीमंताना नाही.

<u>सदस्य श्री सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौर जी, मतदानाचा आदेश दया.

**या वेळी काही सदस्य एकत्रित आवाजात बोलत होते त्यामुळे कोण काय कोण काय बोलत होते समजत नव्हते.**

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> जसे अभय योजना लागू होणार. अभय योजनाची वसुली येणार. त्यातून शहरातील विकास कामे होणार.

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी:—</u> मी सर्व सदस्यांना विनंती करतो की हा शहाराच्या हिताचा विषय आहे. हा विषय सर्व समतीने पास करावे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> मला बोलू दया.

<u>महापालिका सचिव:—</u> मा. महापौरांना बोलायचे आहे. कृपया शांत बसा सर्व सदस्य.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> जी पण वसुली येणार ती फक्त,फक्त भविष्यात होणा—या विकास कामे करण्यासाठी उपयोगी होणार. बॅकलॉग कवर नाही होणार. नाही तर आम्ही इथेच बसुन राहणार. नाही तरी शहराचा विकास नाही होणार.

<u>काही सदस्य:—</u> पास पास…

**या वेळी काही सदस्य एकत्रित आवाजात बोलत होते त्यामुळे कोण काय कोण काय बोलत होते समजत नव्हते.**

<u>सदस्य श्री सुनिल सुर्वे:—</u> मतदान,मतदान. करा ना तुम्ही..

<u>महापालिका सचिव:—</u> ठिक आहे. जे या प्रस्तावाच्या बाजुने आहे. अभय योजना लागू करण्याच्या त्यात पाणी पट्टी कर, कर वसुली……..

<u>सदस्य श्री राजेंद्र चौधरी:—</u> लोक बोलतात विरोध करतात, तरी चार लोक ही महासभा चालवतात.

महापालिका सचिवः— ठिक आहे. जे या प्रस्तावाच्या बाजुने आहे. अभय योजना लागू करण्याच्या त्यात पाणी पट्टी कर, कर वसुली. त्यांनी आपले हात वर करावे. मॅडम जे सांगितले आहे ते वाक्य टाकण्यात येईल.

## प्रस्तावाच्या बाजुने २४ मते.

१. श्रीमती पंचम कालानी
२. श्री. जीवन इदनानी
३. श्री. हरेश जग्यासी
४. श्रीमती कविता पंजाबी
५. श्रीमती ज्योती चैनानी
६. श्रीमती दिप्ती दुधानी
७. श्रीमती इंदिरा उदासी
८. श्रीमती ज्योती बठिजा
९. श्री. गजानन शेळके
१०.श्री. शंकर लुंड
११.श्री. महेश सुखरामानी
१२.श्रीमती मिना सोनेजी
१३.श्री. विजय पाटील
१४.श्रीमती छाया चक्रवर्ती
१५.श्री. जमनादास पुरस्वानी
१६.श्री. राजेश वदारिया
१७.श्री. किशोर वनवारी
१८.श्री. रवि जग्यासी
१९ श्रीमती शुभांगीनी निकम
२०.श्रीमती कविता गायकवाड
२१.श्रीमती मिनाक्षी पाटील
२२.श्रीमती सविता तोरणे
२३.श्रीमती ज्योती पाटील
२४.श्री. रविंद्र बागुल

जे या प्रस्तावाच्या विरोधात आहे. कृपया त्यांनी आपले हात वर करावे.

सदस्य श्री राजेंद्र चौधरीः— आम्ही या प्रस्तावाच्या विरोधात नाही आणि सहमतीपण नाही. तटस्थ आहे.

महापालिका सचिवः— तटस्थ.

सदस्य श्री किशोर वनवारीः— ठिक आहे. ठिक आहे. चालेल.

महापालिका सचिवः— विरोधी पक्षातील सदस्यांचे तटस्थ आहेत.

सदस्य श्री किशोर वनवारीः— पाणी पुरवठाची पण अभय योजना सोबत राबविली पाहिजे.

महापालिका सचिवः— हा ठराव बहुमताने पारित झाला नाही, म्हणजे विरोध दर्शविला नाही आणि मतदान केलेले नाही, तटस्थ राहिले त्यामुळे हा ठराव मंजुर झाला.

सदस्य श्री जमनादास पुरस्वानीः— हा ठराव एकमताने झाला. इतिवृत्ताची वाट न पाहता टाका.

महापालिका सचिवः— मंजूर येणार कारण की त्यांनी मतदान केले नाही तथस्त राहिले.

सदस्य श्री राजेश वदारिया :— तटस्थ आहे ना. विरोध म्हणजे काय,?

महापालिका सचिवः— विरोध नाही आहे. तटस्थ आहेत म्हणुन मंजुर येणार. एकमताने नाही येणार. ठरावात मंजुर लिहावे लागेल.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑विषय क्र. १८ :— <u>प्रस्तावाची सुचना</u>

मालमत्ता कर वसुली होणेकरीता विना दंड कर भरणा करुन घेणेसाठी ''अभय योजना'' लागू करण्याकरीता पालिका सदस्या श्रीमती दिप्ती दुधानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त अशासकीय प्रस्तावानुसार विनंतीपूर्वक लक्षवेधू इच्छिते की, उल्हासनगर महापालिकेचे प्रमुख उत्पन्न स्थानिक संस्था कर, मालमत्ता कर (Property Tax) व इतर उत्पन्न असून, या मिळणाऱ्या उत्पन्नावर विकासाची व इतर देणी भागवली जात आहे. परंतु सद्या स्थानिक संस्थाची वसूली देखील कमी प्रमाणात होत आहे. कर वसुलीकरिता महापालिकेमार्फत ''अभय योजना'' एक महिन्याच्या कालावधीकरिता लागु केल्यास महापालिकेच्या उत्पन्नामध्ये भरीव वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच मालमत्ता थकबाकीदारांना थकीत करावरील दंड अथवा व्याज आकारणी माफ केल्यास थकबाकीदार थकीत भरण्यास प्रोत्साहीत होतील.

याकरिता एक महिन्यासाठी अभय योजना लागू केल्यास नागरीक आपला मालमत्तेचा कर भरण्यास तयार होऊन, महापालिकेचे उत्पन्न वाढेल. याकरिता येत्या महासभेमध्ये धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

तरी येत्या महासभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५६ <u>दिनांक:— २/१/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्रीम. दिप्ती दुधारी
श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
श्री. हरेश जग्यासी

ही महासभा सभेत झालेल्या चर्चेअंती व पाणीपट्टी कराची वसुली करणे करिता १० जानेवारी २०१९ ते १० फेब्रुवारी २०१९ पर्यंत किंवा आयुक्तांना योग्य वाटेल त्या कालावधीसाठी "अभय योजना" राबविणेकामी खालीलप्रमाणे मान्यता देत आहे.

१) मालमत्ता करावर १० जानेवारी २०१९ ते १० फेब्रुवारी २०१९ पर्यंत १०० टक्के विलंब शुल्क माफ
२) एम.आय.डी.सी. पाणीपट्टीचे मागील उर्वरीत बिलांवर १० जानेवारी २०१९ ते १० फेब्रुवारी २०१९ पर्यंत १०० टक्के विलंब शुल्क माफ

**तसेच**

या अभय योजनेद्वारे मिळणारे उत्पन्न हे मागील विकास कामाकरीता खर्च न होता भविष्य काळात होणा—या विकास कामासाठी खर्च केला जाईल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—१)

२)

अनुमोदकाची सही/— १)

२)

**मंजुर**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १९ :— <u>प्रस्तावाची सुचना</u>

उल्हासनगर कर्करोग जनजागृती मॅरेथॉन २०१८ करीता ३ लाखाचा निधी उपलब्ध होणेबाबत पालिका सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य श्री राजेश वदारिया :—</u> पास पास.. इतिवृत्ताची वाट न पाहता. पास

<u>सदस्य श्री किशोर वनवारी :—</u> चौधरी साहेबांचा विषय आहे. पास पास.

<u>सदस्य श्री भगवान भालेराव :—</u> इशू पास करायला काही अडचण नाही. सर एक विनंती आहे. मागच्या वेळेस या संस्थेला ३ लाखाचा निधी दिला होता. त्यांच कुठल्या पध्दतीचा कर्करोगाच्या संदर्भात मला तर अठवत नाही निधी येणार आणि खर्च होणार नाही शहरामध्ये, माझी एक स्पष्ट विनंती आहे सभागृहाला. मा. महापौर मॅडम, आपले जे नेटके साहेब क्रिडामध्ये, नेटके जे आहे ते तिन लाखाच्या निधी संदर्भामध्ये, संस्था अणि नेटके यांचे समन्वय साधून जर निधी खर्च करायला सांगावा यात आयुक्तांना प्राधिकृत करा.

<u>सदस्य श्री राजेंद्र चौधरी :—</u> मा. महापौरजी, मा.आयुक्त साहेब, इतिवृत्ताची वाट न पाहता. मा. महापौर जी मी सभा सुरू होण्याच्या अगोदर काही प्रश्नावर चर्चा करत होतो. ते आमचे सदस्य आहे सुमित सोनकांबळे त्यांना मोठा आजार झाला होता पायाला. ऑपरेशन झाले आहे. त्यांना आमच्या तर्फे महानगरपालिकेतर्फे याच्या अगोदर पण महानगरपालिकेतर्फे आपल्या सदस्यांना आजारासाठी पैसे दिलेला आहे. हॉस्पीटलच्या खर्चासाठी

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी :—</u> आमच्या भाजपातर्फे आणि तुमच्यातर्फे पण मानधनातून ५ हजाराचा निधी एक थेट चेक दिला जावा. धन्यवाद.

<u>महापालिका सचिव:—</u> आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे लिहू का.

<u>सदस्य श्री राजेंद्र चौधरी :—</u> ऐकून घ्या. विषय बरोबर आहे. एक सामाजिक संस्था आहे. हि संस्था आपण तर महापालिकेतर्फे तरी कधी घेत नाही. आपल्याला माहिती पण नाही. कशी घ्यायची. ती संस्था घेत असेल तर त्यांच्यामध्ये अडथळा टाकायचे काम करू नका. त्या लोकांना त्यांचा हिशोब घेतला पहिजे त्यांची चौकशी केली पाहिजे. त्या मताशी मी सहमत आहे. परंतु उगाचच आपले काही तरी अटी टाकुन अडथळा आणायचा.

<u>सदस्य श्रीमती. अंजली साळवे :—</u> मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब मी सांगू इच्छिते की, कॅन्सर अव्हरनेस प्रोग्राम आपल्या पालिकेमध्ये सफाई कामगार, महिला पासून ते वरिष्ठ अधिकारी पर्यंत मेमोग्रफी कॅम्प घेण्याबद्‌ल मीी मी पत्र दिले आहे. आणि ते होत आले. संबंधिताना आदेश दयावेत. ताबडतोब करण्यात यावे. कॅम्प ताबोडतोब लावण्यात यावा.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u> ठिक आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सर्व मान्यवरांना अधिकांराना, सर्व पत्रकारांना सर्व उपस्थित अनेक लोकांना नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

<u>सदस्य श्री राजेंद्र चौधरी :—</u> महापौर मॅडम, अभिनंदन.. तुम्ही मराठीत बोलल्याबददल. दुसरा एक विषय असा आहे. महानगरपालिका ही महाराष्ट्रात महानगरपालिका आहे. हा महाराष्ट्राचा नियम आहे कायदा आहे या महानगरपालिकेचे कामकाज मराठीत चालले पाहिजे. तर आज ही पाणी पुरवठा विभाग त्यांच्या टेंडर नोटीस ती इंगजीमध्ये. तुम्ही सार्वजनिक बाधंकाम विभाग बघितले त्यांची टेंडर नोटीस इंग्रजीमध्ये. जन्म दाखला मृत्यू दाखला बघितला ते पण इग्रजीमध्ये. बाजुची महानगरपालिका मराठीमध्ये देते. आपण इंग्रजी मध्ये देतो. तो ही सगळा कारभार मराठीमध्ये झाला पाहिजे.

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी :—</u> सर्व कारभार मराठीमध्ये झाला पाहिजे.

**महापालिका सचिव:—** एक मिनीट माझी विनंती आहे. क्रिडाचा जो ठराव आहे तो काय लिहायचे ते स्पष्ट मला सांगा. चौधरी साहेब म्हणतात आयुक्तांना प्राधिकृत करू नका आणि भालेराव साहेब म्हणतात आयुक्ताला प्राधिकृत करा. मला ठाम निर्णय दया.

**सदस्य श्री राजेंद्र चौधरी :—** ज्या पध्दतीने आधीचे संस्थेंला केला त्या पध्दतीने करा.

**काही सदस्य :—**पास,पास.....

**महापालिका सचिव:—** आपण फक्त मान्यता देत आहे. असा ठराव करते. तुम्ही मला ठराव स्पष्ट दया. नंतर ठरावात बदल करता येत नाही.

**सदस्य श्री प्रदिप रामचंदानी :—** जसा मागच्या वेळी ठराव केला होता तसा नेहमीच्या पध्दतीने करा. धन्यवाद..

**महापालिका सचिव:—** जशी पुर्वी प्रमाणे प्रथा आहे. तशी करते.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १९ :— **प्रस्तावाची सुचना**

उल्हासनगर कर्करोग जनजागृती मॅरेथॉन २०१८ करीता ३ लाखाचा निधी उपलब्ध होणेबाबत पालिका सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त अशासकिय प्रस्तावानुसार विनंती पुर्वक कळवू इच्छितो की, कर्करोग हा गंभीर स्वरूपाचा, जर्जर आजार असून सदर आजाराच्या रूग्णांना अनेक यातनां सहन करून जीवन व्यतीत करावे लागत आहे. या आजारावर उल्हासनगर महापालिका हदद्दीतील नागरीकात जनजागृती व्हावी या करीता मातोश्री सावित्रीबाई फुले ही संस्था सन २००३ पासून कार्यरत असून अनेक सामाजिक शैक्षणीक व आरोग्य, व्यसन मुक्तीवर अनेक उपक्रम राबवित आहे. याचाच एक भाग म्हणून कर्करोग पिडीत रूग्णाच्या मदतीसाठी उल्हासनगर मॅरेथॉन २०१८ चे दिनांक ३० डिसेंबर २०१८ रोजी नियोजन केले आहे. सदर कार्यक्रमात अंदाजे २००० स्पर्धक, व नागरीकांकडून सहभाग घेण्यात येईल अशी संस्थेचा प्रयत्न राहणार आहे.

सामाजिक बांधीलकीच्या दृष्टीने कर्करोग रूग्णांना आर्थिक सहकार्य करणे, कर्करोगाविषयी जनजागृती करणे हे महापालिकेच्या महत्वाच्या कर्तव्यापैकी एक कार्य असल्याने कृपया उल्हासनगर कर्करोग जनजागृती मॅरेथॉन २०१८ या कार्यक्रमासाठी ३ लाखाचा निधी उपलब्ध करून दयावा ही नम्र विनंती. तसेच या बाबत संबधीत विभागास तातडीने कारवाई करण्याच्या आदेश व सुचना होण्यास नम्र विनंती आहे.

**महासभा ठराव क्र:** ५७ **दिनांक:— २/१/२०१९**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर कर्करोग जनजागृती मॅरेथॉन २०१८ करीता ३ लाखाचा निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>**सर्वानुमते**</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>**महापालिका सचिव :—**</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.०६ वाजता महापौर श्रीमती पंचम ओमेश कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>तटस्थ मते १८</u>

१. श्री. रमेश चव्हाण
२. श्री. सुनिल सुर्वे
३. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
४. श्रीमती वसुधा बोडारे
५. श्रीमती राजश्री चौधरी
६. श्रीमती चरणजितकोर सिंह
७. श्रीमती लिलाबाई आशान
८. श्रीमती पुष्पा बागुल
९. श्री. स्वप्नील बागुल
१०.श्री. भगवान भालेराव
११.श्री. सुमित सोनकांबळे
१२.श्री. प्रमोद टाले
१३.श्री. राजेंद्र चौधरी
१४.श्रीमती मिताली चान्पुर
१५.श्रीमती ज्योती माने
१६.श्रीमती ज्योत्स्ना जाधव
१७.श्रीमती अंजना म्हस्के
१८.श्री. कलवंतसिंग सोहता

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– १५/२/२०१९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १५/२/२०१९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

७

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १५/०२/२०१९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता घेण्यात आली. सदर सभेत उप महापौर, श्री.जीवन चंद्रभान इदनानी हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी–– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २७ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ३ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २८ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | २९ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३० | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ६ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३१ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३२ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ८ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३३ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३४ | श्रीमती शितल चंद्रकांत कदम |
| १० | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३५ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| ११ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ३६ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १२ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ३७ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १३ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ३८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| १४ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी ಠ | ३९ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४० | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १६ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४१ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १७ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४२ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| १८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४३ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १९ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ४४ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २० | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ४५ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २१ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ४६ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २२ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४७ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २३ | श्रीमती पुष्पा नाना बागुल ಠಠಠ | ४८ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २४ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ४९ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २५ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५० | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| २६ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ५१ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती पंचम उमेश कालानी, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ४. श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड, ५. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ६. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ७. श्रीमती जया प्रकाश माखिजा, ८. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ९. श्रीमती शुभांगीनी निकम, १०. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ११. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १२. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, १३. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १४.श्री.रवी किंश्नचंद जग्यासी, १५. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), १६. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, १७. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई), १८. श्री. सुमित सागर सोनकांबळे, १९. श्री. चंद्रशेखर केशव यादव, २०. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, २१. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, २२. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, २३. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, २४. श्रीमती कांचन अमर लुंड, २५. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, २६. श्रीमती सुमन राजेश सच्चदेव, २७. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २८. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, २९. श्री. विजय चाहु पाटील, ३०. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१२.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी, आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ.
१३.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१४.श्री. मिलींद सोनावणे, नगररचनाकार
१५.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
१६.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
१७.डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१८.श्री. मंगेश गावडे, लेखा परिक्षक
१९.श्री. विनायक फासे, सहाय्यक लेखा परिक्षक
२०.श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी
२१.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
२२.भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
२३.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
२४.श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त
२५.श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
२६.श्री. दत्तात्रय जाधव, प्र. सहाय्यक आयुक्त
२७.श्री. बी.एस. पाटील, शाखा अभियंता, पा.पु.वि.
२८. श्री. सि.जी. सोनावणे, प्र. कार्यकारी अभियंता, पा.पु.वि.
२९.श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
३०.श्रीम. श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
३१.श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
३२.श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक
३३.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
३४.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
३५.श्रीम. अलका पवार, अधीक्षक, महीला व बालकल्याण विभाग.
३६.बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
३७.श्रीम. निलिमा कदम, प्र. लेखापाल, शिक्षण मंडळ

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१.श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२.श्रीमती नर्गीस खान, लिपीक
३.श्री. बाळू भांगरे, लिपीक

सायंकाळी ४.२५ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

या वेळी मा. महापौरांच्या स्थानी पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी हे आसनस्थ होते.
या वेळी श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी, हे आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होते.

<u>महापालिका सचिवः—</u>मा. पिठासिन अधिकारी यांना विचारून प्रस्ताव आला आहे, दोन प्रस्ताव आले आहेत. शोक प्रस्ताव आले आहेत. विरोधी पक्ष नेता, श्री. धनंजय बोडारे साहेब यांनी दिला आहे. उपरोक्त विषयानुसार विनंती पुर्वक कळवू इच्छितो की दिनांक १४/२/२०१९ रोजी काश्मिर मधील पुलवामा येथे भारतीय सेनेच्या जवानांच्या गाडीवर भ्याड दहशतवादी हल्ला करण्यात आल्याने त्यामध्ये भारतीय सेनेचे ४२ जवान शहिद झाले आहेत.दहशतवादी हल्यात शहिद झालेल्या विर मरण आलेल्या जवानांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने श्रध्दांजली अर्पीत करण्यात यावी. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या मदतीसाठी सर्व नगरसेवकांचे १ महिन्याचे मानधन व उल्हासनगर महानगरपालिकेच्यावतीने रूपयें १० लाखाचा धनादेश शासनाकडे सुपुर्त करण्यास प्रशाासनास निर्देश देत आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u> सचिव मॅडम काश्मिरमध्ये ४८ तासात तीन घटना घडलेल्या आहेत, तसाच त्याच्यामध्ये उल्लेख करा, तीन घटना घडलेल्या आहेत, त्यामध्ये शहीद झालेले आहेत.

<u>महापालिका सचिवः—</u>ठिक आहे आणि दुसरा प्रस्ताव आलेला आहे,मा. कविता पंजाबी मॅडम यांनी दिलेला आहे. त्यांच्या इथे मेमसाहब बिल्डींगचा स्लॅब पडल्यामुळे तीनजण जखमी झालेले आहेत. अनिता मोरया, प्रिया मोरया, नितू शादिजा,

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>निधन झाले आहे, तीन लोकांचे निधन झाले आहे.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—</u>तिघांचे पण निधन झाले आहे, माझी सभागृहाला विनंती आहे की, यांना श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी आणि निधन झालेल्या कुंटूबियांना प्रत्येक ५ लाख रूपयेआणि जखमी लोकांना ५० हजार रूपये धनराशी महापालिकेकडून देण्यात यावी. मी आभार मानते की, मा. खासदार, श्री. श्रीकांत शिंदे यांनी मदत दिलेली आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>दोन शोक प्रस्ताव आले आहेत, या उल्हासनगर शहरामध्ये अशा काही दु:खद घटना झालेल्या आहेत. त्यामध्ये माजी, महापौर यशस्विनी नाईक यांचे पती लहू रामचंद्र नाईक यांचेही निधन झालेले आहे. तो एक शोक प्रस्ताव घेतला पाहीजे. त्याच बरोबर भरत खरे, दलित मित्र त्यांना राज्य सरकारचा पुरस्कार पण मिळाला होता, रूग्ण मित्र भरत खरे यांचे परवाच्या दिवशी त्यांचे, आताच बातमी हाती आलेली आहे, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलेले आहे आणि त्यांचा परवाच्या दिवशी अपघात झाला होता. त्यांचाही शोक प्रस्ताव मांडला पाहीजे. कारण त्यांनी या शहरामध्ये रूग्ण मित्र म्हणून चांगले काम केलेले आहे, गोरगरीब लोकांची चांगली सेवा केलेली आहे. अशा व्यक्तिचा पण शोक प्रस्ताव इथे आला पाहीजे.

<u>उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—</u>तिन्ही शोक प्रस्ताव, जेवढे पण आले आहेत, स्विकारले जात आहेत आणि मा. बोडारे साहेब, यांनी जो प्रस्ताव ठेवला आहे की, त्यांना आर्थिक मदत देण्यासाठी आणि श्रीम. कविता पंजाबी यांनी प्रस्ताव ठेवला आहे, आर्थिक मदत देण्यासाठी माझ्या हिशोबाने ते पण मंजूर करण्यात आले आहेत, धन्यवाद.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—</u>महापौरजी, उप महापौरजी, आज जी मिटींग आहे, तिचा सभा भत्ता, जो १०० रूपये दिले जाते, तो आम्हांला कोणत्याही नगरसेवकांना देऊ नका. मिटींग ऑफिशली असायला पाहीजे, स्वाक्षरी घेतली पाहीजे. तीचे मानधन दिले नाही पाहीजे. माझी ही आपल्याला विनंती आहे.

<u>महापालिका सचिवः—</u>ते पैसे मदतीसाठी दिले जातील. श्री. बोडारे साहेबांचा तसा प्रस्ताव आहे.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—</u>धन्यवाद, चांगली गोष्ट आहे.

<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—</u>एक मिनीट, सेक्शन २५ मध्ये उल्हासनगर—४ इथे सरस्वती शाळेचा विद्यार्थी अपघातामध्ये जागीच मृंत्यू झालेला आहे, त्या शाळेतील विद्यार्थ्यांल पण श्रध्दांजली वाहणे अत्यंत गरजेचे आहे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले</u>:—मा. आयुक्त महोदय, मा. महापौर, आपले रूग्ण मित्र आणि सर्वांचेच मित्र असलेले भरत खरे हे परवा शहरातल्या खड्डयांमुळे त्यांचा अपघात झाला, ही फार दुदैवी घटना आहे. माझे महानगरपालिकेला असे म्हणणे आहे की, भरत खरे यांना पण आर्थिक मदत दिली गेली पाहीजे आणि देणे आवश्यक आहे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>:— मा. महापौर काल पुलगामा आणि काश्मिर खो—यामध्ये जे जे हल्ले झालेत आणि इतर ठिकाणी अतिरेकी हल्ले झालेत त्या जवानांना तसेच तसेच मेम साहब, बिल्डींगमधील रहिवासी दोन मृत पावलेले आहेत, त्यांना आणि त्याच्या नंतर आमचे रूग्ण मित्र श्री. भरत खरे यांचा अपघात तीन दिवसापुर्वी झालेला होता आणि आज त्यांना डी. टी.पी. हॉस्पिटलमध्ये घोषित केलेले आहे की, आज त्यांचे निधन झाले आहे. एक चांगला पायंडा त्यांनी पाडला, त्यांच्या कुटूंबियांनी त्यांचे अवयवदान केले. त्यामुळे तीन ते चार जणांना त्याचा फायदा झालेला आहे. सरस्वती शाळेमध्ये जाणारा ९ वर्षाचा विद्यार्थी असेच सायकलवरून जात असतांना बसच्या टायरखाली आला आणि त्याचा जागीच दुदैवी अंत झाला. त्या नंतर लहू नाईक आणि मराठा सेक्शनमध्ये राहणारे स्वातंत्र्य सैनिक ज्यांना ताम्रपट मिळाले होते, गोवामुक्ती संग्राममध्ये त्यांनी लढा दिला होता, ते उत्तम सातर्डेकर अशा सर्वांना श्रध्दांजली दयावी, अशी मी विनंती करतो.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>:—मा. महापौरजी, सर्वांना श्रध्दांजली देण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u>:—उत्तम वासुदेव सातर्डेकर, हे स्वातंत्र्य सैनिक होते.

<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत</u>:—गोवामुक्ती संग्रामामधले स्वातंत्र्य सैनिक होते.

<u>महापालिका सचिव</u>:—कृपया सर्वांनी दोन मिनीटे मौन पाळून सर्वांना श्रध्दांजली अर्पीत करावी.

या वेळी सर्वांनी दोन मिनीटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित केली.

<u>महापालिका सचिव</u>:—ओम शांती.

---

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे<br>श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया<br>श्री. किशोर वनवारी

## <u>शोक प्रस्ताव</u>

उपरोक्त विषयानुसार विनंती पुर्वक कळवू इच्छितो की दिनांक १४/२/२०१९ रोजी काश्मिर मधील पुलवामा येथे भारतीय सेनेच्या जवानांच्या गाडीवर भ्याड दहशतवादी हल्ला करण्यात आल्याने त्यामध्ये भारतीय सेनेचे ४२ जवान शहिद झाले आहेत. दहशतवादी हल्यात शहिद झालेल्या विर मरण आलेल्या जवानांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने श्रध्दांजली अर्पीत करण्यात यावी. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या मदतीसाठी सर्व नगरसेवकांचे १ महिन्याचे मानधन व उल्हासनगर महानगरपालिकेच्यावतीने रूपयें १० लाखाचा धनादेश शासनाकडे सुपुर्त करण्यास प्रशाासनास निर्देश देत आहे.

दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या, विर मरण आलेल्या जवानांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.   ५७ अ</u>                                        <u>दिनांक:— १५/२/२०१९</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार पुलगांव, काश्मिर येथिल भारतीय सेनेच्या ४२ शहिद जवानांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

तसेच त्या दिवशी तीन घटना घडल्या असून त्यापैकी भारतीय सेनेचे शहिद जवानांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगरसेवकांचे १ महिन्याचे मानधन व उल्हासनगर महानगरपालिकेच्यावतीने १० लाखाचा धनादेश शासनाकडे सुपुर्त करण्यास प्रशाासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सुचकाचे नाव :—श्रीमती कविता पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— १) श्री. प्रमोद टाले
२) श्री. राजेंद्र चौधरी

**शोक प्रस्ताव**

रविवार दिनांक ३/२/२०१९ रोजी उल्हासनगर—३ येथे मेमसाब बिल्डींगचा स्लॅब कोसळून दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले १) श्रीमती अनिता मोर्या २) कु. प्रिया मोर्या ३) श्रीमती नितु शादीजा यांचा दुर्देवी मृत्यु झाला.

तसेच उल्हासनगर शहरातील रुग्णमित्र श्री. भरत खरे यांचे अपघाताने मृत्यु झाला आहे. श्री. भरत खरे हे पत्रकार व सामाजीक कार्यकर्ते होते. ते अपंगांचे व कृष्ठरोगी यांचे मित्र होते. त्यांनी अपंगांसाठी मोठे योगदान दिले आहे.

आणि माजी महापौर तथा सदस्या श्रीमती यशस्वीनी लहू नाईक यांचे पती श्री. लहु नाईक यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी मृत्यु झाला आहे.

व उल्हासनगर शहरातील एक मुलगा कु. प्रजापती हा सायकलवरुन जात असतांना रस्त्यावर पडुन त्याचा मृत्यु झाला आहे.

तसेच श्री. उत्तम वासुदेव सातर्डेकर, स्वातंत्र्य सैनिक यांचे सुध्दा निधन झाले आहे. ते गोवामुक्ती संग्राममध्ये स्वातंत्र्य सैनिक होते.

वर उल्लेख केलेल्या मृत्युमुखी पडलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ५७ ब** **दिनांक:— १५/२/२०१९**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती अनिता मोर्या, कु. प्रिया मोर्या, श्रीमती नितु शादीजा, श्री. भरत खरे, श्री. लहु नाईक, कु. प्रजापती, व श्री. उत्तम वासुदेव सातर्डेकर या मृत्यूमुखी पडलेल्या लोकांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

तसेच मेमसाब बिल्डींगचा स्लॅब कोसळुन मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी रुपये ५,००,०००/— आर्थिक मदत तसेच दुर्घटनेत अपघात झालेल्या लोकांना प्रत्येकी रुपये ५०,०००/— आर्थिक मदत व श्री. भरत खरे यांच्या कुटुंबियांना रुपये ५,००,०००/— आर्थिक मदत म्हणुन देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:—मा. पिठासिन अधिकारीजी, काल पुलवामामध्ये कश्मीर हायवेवर जे दहशतवादयानी सी.आर.पी.एफ. च्या कॅम्पवर एक भ्याड हल्ला केला आहे. त्याची आपण जेवढी निंदा केली तेवढी कमी आहे. अशा प्रकारे आपल्याला हिंदूस्तानची जनता, हिंदुस्तानचे नेता कधीच घाबरणार नाही आणि आपले सैनिक आणि सी.आर.पी. एफ. चे जवान घाबरणार नाहीत आणि त्यांची हिम्मत पण कमी होणार नाही. दहशतवादयानी जी खुप मोठी चुक केली आहे, आपले मा.पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांना सांगितले आहे की, त्यांना आपल्या जवानांची एक एक किमंत चुकवावी लागेल. तर त्यामध्ये आपल्याला संपुर्ण विश्वास आहे की बुरीचा आपण बदला घेतला होता. अशाच प्रकारे आपले सैनिक, सी.आर.पी.एफ. जरूर बदला घेतला जाईल आणि पुलवामाच्या शहीदांना मी नमन करातो आणि श्रध्दांजली अर्पीत करतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— मा. महापौरजी, आताच जो शोकप्रस्ताव ठेवला होता की भरत खरेना आर्थिक मदत केली पाहीजे, असा शोक प्रस्ताव श्री. प्रमोद टाले यांनी ठेवला होता. यामध्ये भरत खरेना ५ लाखाची मदत करायला पाहीजे, असे माझे सजेशन आहे. याच्या पहीले पण असे अपघात झालेल्या लोकांना आपण मदत केली आहे. यासाठी भरत खरेना पण महापालिकेकडून ५ लाखाचा निधी मदत म्हणून देण्यात यावे.

या वेळी सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:—आज संपुर्ण हिंदुस्तानमध्ये एक शोककळा एक चिड आहे. वेगळया प्रकारची भावना जे हिंदुस्तानावर प्रेम करतात, सगळेच हिंदुस्तानावर प्रेम करतात. फार कमी लोक आहेत, हिंदुस्तानमध्ये राहतात आणि पाकिस्तानचे गुण गातात. आज सकाळपासून एक विचार, कालपासून होता, त्या शहीद झालेल्या पैकी एखादा व्यक्ती आपल्या कुटूंबामधला असता तर आपली काय अवस्था झाली असती? पहीले मिलेटरीमध्ये जायचे, सैनिकामध्ये जायचे तर आई—वडीलांना एक अभिमान असायचा, आता काश्मिरमधले हल्ले पाहीले तर जवान वारंवार शहीद होत आहेत, ते पाहील्या नंतर हा देश सुरक्षित कसा काय? जवानांनी संरक्षण कुठे करायचे? सिमेवर की अंतर्गत, अंतर्गत सुरक्षा पण आमची एवढी खालावली आहे. आता आम्ही चीड व्यक्त करतो, प्रत्येक नागरीक चीड करतो की, आमचे इंटेलिजंट कुठे गेले? स्फोटक येतात, स्फोट घडवतात, आतंकवादी हमले होत आहेत आणि करणारे पाकिस्तानमध्ये मजा बघतात. आता पर्यंत कित्येक जवान मारले गेले आहेत. कालचा तर सर्वात मोठा आत्मघातकी हल्ला आत पर्यंतच्या भारताच्या इतिहासात झाला. मी उल्हासनगरच्या तमाम जनतेच्या वतीने ती कारवाई करणा—या जैस मोहम्मद आणि अतिरेकी संघटनांचा निषेध करतो. या उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. पंतप्रधानांना, संरक्षण मंत्रालयाला विनंती करतो की, एक निवेदन देतो, आता “ईट का जवाब पत्थर से” सर्जिकल स्ट्राईक आता नको त्या भावना आहेत. सर्जिकल स्ट्राईक नको आता ओपन स्ट्राईक काय परिणाम व्हायचे ते होतील? परंतु एकदा सारख सारख रोजचे मरण बघण्यापेक्षा एकदा काय होईल ते होईल? अशा प्रकारे संपुर्ण हिंदूस्तान ते काश्मिर ते कन्याकुमारी पर्यंतच्या भारतीयांची भावना आहे. आज आम्ही शिवसेनेच्या वतीने शिवाजी चौकामध्ये पाकिस्तानचा निषेध केला. संध्याकाळी अमर जवान चौकामध्ये आहे. मग आम्ही फक्त निषेध, मेणबत्या लावायच्या , श्रध्दांजली अर्पीत करणे एवढेच करायचे. तर त्या पुढेही जाऊन कारवाई केली पाहीजे जेनेकरून या पुढे कधीही अशा प्रकारचे दु:साहस कोणी करू शकणार नाहीअशा प्रकारची कारवाई भारत सरकारने करावी. प्रत्येक नागरीकांची, उल्हासनगरमधल्या नागरीकांची, आमची सर्वांची भावना आहे. जवळ पास ४२ ते ४४ जवान शहीद झालेले आहेत. कित्येक जवान जखमी झालेले आहेत. सुट्टीवरून जम्मूवरून काश्मिरला जाणारे जवान जवळ पास २५०० वर २७०० च्या आस पासजेव्हा त्या गाडया चालल्या होत्या आणि त्यांचे लक्ष्य फार विचित्र होते. टारगेट त्यांनी केले होते की, जास्तीत जास्त नुकसान व्हावे. हे झालेले नुकसान काय कमी नाही. कधीही एक एक जवान देशासाठी आपल्या जीवाचे बलिदान करतो. असे ४२ जवान, ४४ जवान आमचे नाहक गेले आहेत. तिव्र शब्दात मी त्याचा निषेध करतो आणि त्या जवानांना श्रध्दांजली अर्पीत करतो. शिवसेनेच्या वतीने महापालिकेच्या वतीने आणि प्रत्येक महानगरपालिकेने जे

देशासाठी प्राणाची बलिदान करतात, प्राणाची आहुती देतात. ते निश्िंचत राहण्यासाठी एक मदतकोष निर्माण करा की, शहीद झालेल्या जवानांना भरघोस त्यांच्या परिवाराला भरघोस मदत मिळावी. जेणेकरून त्यांच्या परिवाराला, किंवा माझ्या मागे माझा देश आहे. देशातला, प्रत्येक राज्यातला, प्रत्येक गावातला नागरीक माझ्या पाठिशी उभा आहे, उल्हासनगरचा नागरीक माझ्या पाठिशी उभा आहे. ही भावना त्या जवानांच्या मनात यावी. म्हणून उल्हासनगर महापालिकेच्या वतीने आम्ही सर्व नगरसेवकांनी एक महीन्याचे मानधन आणि महापालिकेकडून १० लाख रूपये मदत ही जो यथोचित असेल, राज्य शासन रिलीफ फंड असेल किंवा तसे विनंती करा की शहीद झालेल्या जवानांच्या मदतीसाठी हा निधी वापरण्यात यावा. तो राज्य शासनाकडे किंवा केंद्र शासनाकडे सुपुर्द करा. अशी मी विनंती करतो तसा प्रस्ताव दिलेला आहे. तो महापौरांनी मंजुरही केला आहे. प्रशासनाला विनंती आहे की तातडीने त्याच्यावर काय आहे, आपण चौकशी करा. संबंधित विभागाकडे राज्य शासन असेल, केंद्र शासन असेल ते तातडीने लवकरात लवकर कसे जाईल. जेणेकरून याचे उदाहरण इतर महानगरपालिका घेतील आणि ग्राम पंचायत त्यांना जसे जमेल मी या कुटूंबाच्या दु:खामध्ये सहभागी आहोतच. पण मी याचा तिव्र निषेध करतो आणि पाकिस्तानला चांगला धडा शिकवावा अशी आग्रहाची मागणी आम्ही या उल्हासगर महापालिकेच्या वतीने करतो, त्याच बरोबर आता बातमी मिळाली की भरत खरे रूग्ण मित्र सगळेच डॉक्टर त्यांचे नाव काढतात. कोणालाही गरज पडली की, भरत खरेकडे जा. अपंग सेनेचे ते शिवसेनेच्या माध्यमातून ते काम करीत होते. अपंगांना मदत करणे, कुष्ठ रोगीयांना मदत करणे. अगदी सगळे त्यांचे पुनर्वसनापासून ते रेशनकार्ड पासून काही त्यांना अडचणी आल्या तर भरत खरे धावत असायचे ते स्वत: अपंग असतांना इतरांना मदत करीत होते एक दुर्दम्य इच्छाशक्ती होती. रूग्ण मित्र, अपंग अशी त्यांची ख्याती होती. उल्हासनगरमध्ये असलेल्या खडयांमुळे नागरीक उघडउघड बोलत आहेत. खड्डयांमुळे, खड्डयांमध्ये त्यांची ॲक्टीव्हा गेली आणि ते पडले, तिथे त्यांचा दुदैवी, कोणी धडक दिली नाही, अपघात पण म्हणता येत नाही, गाडी खड्डयामध्ये गेली. डावा हात त्यांचा कमकुवत असल्यामुळे ते बॅलेन्स करू शकले नाही आणि म्हणून त्यांचा मृंत्यू झाला आणि चौधरीजीनी जे सांगितले की मदत करणे ही आपले नैतिक कर्तव्य आहे आणि त्याला जबाबदार आम्ही आहोत, महापालिका आहे. लोक सांगत असतात परंतु आम्ही काही करू शकत नाही, करीत नाही.लोकप्रतिनिधींना वाटते पण प्रशासनकडून होत नाही. कारणे काय आहेत? माहीत नाही. पण खड्डेमुक्त शहर करण्यासाठी वारंवार वेगवेगळे प्रस्ताव आले आम्ही मंजुरी दिली पण होत नाही. तीन वर्षाचे मेंटेनस असेल. तर खड्डेमुक्त कसे करावे, ते प्रशासनाने ठरवावे. ते नाही झाले आणि म्हणून आज जीव गेले. इथूनपुढे जाणार नाहीत, याची काळजी प्रशासनाने घ्यावी आणि भरत खरे यांना मदत म्हणून ५ लाखाचा धनादेश दयावा. त्याच बरोबर मेमसाहब कविता पंजाबी मॅडमने दिलेले मेम साहब बिल्डीगच्या इमारतीमध्ये जे बळी गेलेत त्यांना सुध्दा आर्थिक मदत दयावी. मी या सर्वांना सातर्डेकर असतील हे तीन आणि भरत खरे यांना ५, ५ लाखांची मदत महापालिकेने दयावी. या सर्वांना मी श्रध्दांजली अर्पीत करतो आणि महापालिकेच्या वतीने शासनाला उल्हासनगरच्या ज्या भावना आहेत, त्या कळवाव्यात, धन्यवाद.

<u>**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—**</u>प्रभारी महापौर, प्रभारी आयुक्त, प्रभारी सचिव, आज प्रश्न विनोदाचा नाही, विनोद करू नका आज आपल्या पुर्ण देशात एक दु:खाचे वातावरण झाले आहे. दु:ख का झाले आहे की, संपुर्ण देशामध्ये मागच्या पाच वर्षामध्ये संपुर्ण शहरामध्ये ऐकायला मिळत होते. कधी पुण्यामध्ये आतंकवादीची घटना झाली, कधी मुंबईमध्ये झाली, कधी बंगलोरमध्ये झाली संपुर्ण देशामध्ये आतंकवादीची चर्चा आपण ऐकत आलो आहे आणि हे आतंकवाद केवळ काश्मिर पर्यंतच मर्यादीत होते, त्याच्या नंतर जेव्हा उरीची घटना झाली, तेव्हा संपुर्ण देश एकत्र आले आणि देशाने सांगितले की, आता त्यांना प्रतिउत्तर दयायलाच पाहीजे आणि धडा शिकवला पाहीजे. त्यांना धडा पण शिकवला सर्जिकल स्ट्राईक झाले. परंतु काल ज्या ४२ जवानांचे मृंत्यू झाले, त्यांच्या परिवारा सोबत मी आपली संवेदना व्यक्त करतो की, भारतीय जनता पार्टीच्या परिवारातर्फे आमच्या मित्र पक्षांनी ज्या सुचना दिल्या गेल्या आहेत, आम्ही त्यांच्या मतांशी सहमत आहेत. परंतु गृहमंत्री आणि प्रधान मंत्र्यानी सांगितले आहे की, जे सी.आर.एफ. चे

जवान आहेत, त्यांचे कार्य अविस्मरणीय आहे आणि ते प्रत्येक वेळी आपल्या देशाच्या हितासाठी काम करीत आहेत. आपली सुरक्षा करण्यासाठी स्वत:चे बलीदान देत आहेत आणि त्यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये सोडले जाणार नाही. आज संपुर्ण देशामध्ये अशी परिस्थिती आहे की, मेणबत्या पेटवून आणि झेंडे जाळून आपण आपली आग विझवू शकत नाही. जो पर्यंत या क्रुर दहशतवादयांना पुर्णपणे समाप्त करण्यात येत नाही, तो पर्यंत प्रत्येक देशप्रेमी/नागरीक शांत बसणार नाही आणि मला आनंद आहे की, प्रधान मंत्र्यानी सुध्दा टिवट्रद्वारे सांगितले आहे की, यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही आणि गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी सुध्दा सांगितले आहे की, याचे सडेतोड उत्तर दिले जातील. आपण जेवढे पण बलिदान दिलेले सैनिक आहेत, त्यांच्या परिवारा बरोबर आपण उभे आहोत आणि संपुर्ण देश त्यांच्या परिवारा बरोबर आहे आणि त्याच बरोबर आपले मित्र भरत खरे ते स्वत: अपंग होते, त्यांच्या प्रति पण संवेदना व्यक्त करतो की, एक चांगली व्यक्ती ज्याची समाजाला गरज होती, त्यांना देवाने हिरावून घेतले आहे. तर मला या गोष्टीचे खुप दु:ख आहे, कारण की, व्यक्तीगत पार्टीच्या जास्त ते कोणत्याही गरीब व्यक्तीचे काम करीत होते. अशा व्यक्ती संसारामध्ये खुपच कमी असतात, जे दुस—याच्या दु:खामध्ये सामिल होतात आणि देवाने त्यांना पण हिरावून घेतले आहे. त्यांचा परिवार आणि जेवढे पण सैनिक शहिद झाले आहेत, त्यांच्यासाठी मी संवेदना व्यक्त करतो की असे लोकांनी परत देशात जन्म घेतला पाहीजे आणि प्रत्येक गरीबांचे दु:ख दुर करायला पाहीजे. तिसरे म्हणजे मेम साहेब अपार्टमेंटमध्ये जी दुर्घटना झाली, ती दुर्घटना पण कोणत्याही आतंकवादी घटनेपेक्षा कमी नाही. मी प्रशासनाला विचारतो की, शेवटी अजून किती इमारत पडत राहणार आहेत, आता पर्यंत आपण अशा इमारतींमुळे २० ते २५ लोक गमावले आहेत. हे पण कोणत्याही आतंकवादी घटनेपेक्षा कमी नाही. निष्पाप लोकांचा जीव जाणे याचे कारण म्हणजे प्रशासन संपुर्णपणे ऑडीट करीत नाही आणि जर ऑडीट केले तर पहीले त्यांनासुरक्षित ठिकाणी ठेवू शकतो. मी आज इथे बसलेल्या प्रभारी आयुक्तांना आव्हान करतो की, तुम्ही या गोष्टीचे ऑडीट करा की, जेवढया पण शहराच्या बिल्डींग आहेत, ज्या सन १९९३ ते १९९६ मध्ये बनल्या आहेत, त्यांचे त्वरीत ऑडीट करण्यात यावे आणि त्या जर मोडकळीस आलेल्या बिल्डींग असतील तर कमीत कमी तिथे माणसांची व मालमत्तेची सुरक्षा करण्यात यावी.

 या वेळी सदस्य, श्री. भगवान भालेराव हे सभागृहाच्या बाहेर गेले व सदस्य, श्री. विकास पाटील यांनी या वेळेस सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सचिव मॅडम, काल पुलवामामध्ये जी दुर्घटना झाली आहे, ती निंदनीय आह. मला वाटते की, देशामध्ये सैनिकांवर सर्वात मोठा हल्ला असेल. त्यांचे टार्गेट तर २५०० लोकांवर हाते, पण तसे झाले नाही. परंतु आपले ४२ सैनिक शहीद झाले ही खुप दु:खाची बाब आहे. त्याचे सडेतोड उत्तर तर आपल्या पंतप्रधानानी दिले आहे आणि पंतप्रधानानी हे पण सांगितले आहे की, जिथे पण दहशतवादी दिसतील त्यांना तिथेच संपवून टाका, मी तर सांगतो की, संपुर्ण पाकिस्तानलाच संपवून टाकले पाहीजे. त्यांनी समोरा समोर सांगितले आहे, जसे की, नैतिक जबाबदरी घेतली आहे. मोहम्मद पाकिस्तानमध्ये लपून बसला आहे, तो देशाचा गददार आहे. अशा गददाराला शोधून आणले पाहीजे नाही तर तिथेच पाकिस्तानमध्ये संपावायला पाहीजे. अशा गददारांना जो पर्यंत संपवणार नाही, तो पर्यंत पाकिस्तान सुधारणार नाही. आपल्या शहीदांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, एक एकाला शोधून मारणार, गद्दारांना मारणार आज हे पंतप्रधानानी सांगितले आहे. त्यांचा बदला घेण्यात येईल, त्याच बरोबर आमचे वरिष्ठ पत्रकार भरत खरे यांचे निधन झाले, त्यांचे निधन कशामुळे झाले? रस्ता दुर्घटना, रस्ता दुर्घटना काय होती? जसे की, बोडारे साहेबांनी सांगितले की, ही रस्ता दुर्घटना नव्हती एक खड्डा होता, खड्डयामध्ये गाडी स्लीप झाली आणि ब्रेन हेमर झाले त्याच्या नंतर ते कोमामध्ये गेले, त्याच्या नंतर ब्रेन डेथ झाले त्याच्या नंतर व्हॅन्टीलेटरवर चार दिवस राहील्या नंतर आज त्यांचे निधन झाले. हे अजून किती दिवस चालणार? महानगरपालिका अजून पाटोलमुळे किती लोकांचे बळी घेणार आहे? शेवटी याच्यावर काही तरी उपाय तर झाले पाहीजे. जर आपण आपला

घरच सांभाळू शकत नाही, प्रधानमंत्री संपुण देश सांभाळत आहेत. आपण आपले शहरच सांभाळू शकत नाही आणि मला निंदा वाटते, शरम वाटते की मी नगरसेवक आहे, शहरामधले खड्डे पण बुजवू शकत नाही आणि आपल्या वरिष्ठ पत्रकार भरत खरे यांचा एका साध्या खड्डयामुळे त्यांचे निधन झाले आहे. आयुक्त साहेबांना निवेदन करतो की, लवकरात लवकर पाटोल भरण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी. आनन फानन काय पण असेल संपुर्ण देशामध्ये ५ (२) (२)मध्ये होत आहेत. यासाठी पण ५ (२) (२) मध्ये करा, त्यासाठी १ करोड लागतील, २ करोड लागतील, ५ करोड लागतील, १० करोड लागतील, ३० करोड लागतील किती पण लागले तरी चालेल आपल्याला काहीच फरक पडणार नाही, परंतु इथून पुढे खड्डयांमुळे भविष्यात कोणाचे जीव जाणार नाही. असे तर सामान्य व्यक्तीचे जीव जातच असतात, आज पत्रकाराचा नंबर आहे, उद्या माझा नंबर येणार, सदस्यांचा नंबर येईल, आयुक्त साहेब, त्यामध्ये तुमचा पण नंबर येऊ शकतो. त्यासाठी मी आपल्याला विनंती करतो की, पाटोलचे काम लवकरात लवकर करण्यात यावे, धन्यवाद.

<u>सदस्या, श्रीमती अंजली साळवे:—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सचिव मॅडम,पाकिस्तानने केलेल्या भ्याड हल्यात जे आपले जवान शहीद झालेले आहेत, त्यांना मी माझ्या पक्षातर्फे पुर्ण श्रध्दांजली वाहते आणि मला वाटते हा आता पर्यंत भारतीय इतिहासातला सर्वात मोठा अतिरेकी हल्ला आहे. त्यामुळे त्यांना खुप प्रतिउत्तर देण्याचे अत्यंत गरजेचे आहे. तसेच आपले आज आपण ज्यांना श्रध्दांजली वाहीली मेमसाहेब बिल्डीगमध्ये जे मृंत्यू पावले आहेत तसेच सातर्डेकर आणि रूग्ण मित्र भरत खरे, रूग्ण मित्र भरत खरे खुप चांगले सामाजिक कार्य करीत होते, अपंगाचे मित्र म्हणून त्यांनी खुप चांगले कार्य केले आहे. सर्वांच्याच दु:खात आम्ही सहभागी आहोत आणि त्यांना सर्वोतोपरी कशी मदत करता येईल, ती करण्यात यावी. हे मी माझ्यातर्फे, माझ्या कॉग्रस पक्षातर्फे आवाहन करते.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडमजी, सन्माननिय सर्व सदस्य, आज ती महासभा आहे, त्यामध्ये ३४, ३५ वेगवेगळे विषय होते, परंतु काल एक दु:खद घटना झाली आहे. ही लक्षात घेऊन संपुर्ण देशामध्ये शोककळा पसरली आहे आणि जे आपल्या देशाचे ४२ सैनिक शहीद झाले आहेत आणि एक भ्याड हल्ला झाला. हे आतंकवादी जर बापाची औलाद असतील, जर मर्दाचे मुले असतील तर समोरा समोर हल्ला केला पाहीजे. जे पाठीमागून लपून हल्ला करतात ही एक कायरता आहे. आपले प्रधानमंत्री पण कमी नाहीत, राजनाथसिंह पण कमी नाही, आपले मित्र पक्ष संपुर्ण भारतामध्ये जे सरकार आहे, आणि जे आपले मेन सल्लागार आहेत डोगलार साहेब ते पण कमी नाहीत. आज आपल्याला आशा आहे की, भारत सरकाने जे उत्तर दिले आहे, त्यापेक्षा असे उत्तर दयायला पाहीजे की, जो पर्यंत आपण जीवंत आहेत, तो पर्यंत त्यांनी मान वर करून पाहण्याची हिम्मत केली नाही पाहीजे. नाही तर या जगातून पाकिस्तानचे नावच संपवून टाकायला पाहीजे. आज पाकिस्तानचा हिंदुस्तानमधून झाला आहे आणि आपल्याला धमकावत आहे, भिक म्हणून त्यांना हा देश दिला आहेआणि ज्यानी भिक दिली आहे ते धमकावत आहेत आणि असे भ्याड हल्ले करीत आहेत, हे खुप निंदनीय आहे. आज आपण सर्वांना श्रध्दांजली दिली आहे आणि कविता पंजाबी यांनी सांगितले की, जे मेमसाहब बिल्डींगमध्ये मृंत्यू झालेले आहेत, त्यांना पण मानधन मिळाले पाहजेत, सातर्डेकर, भरत खरे यांना पण, या सर्वांना सोबत संपुर्ण सभागृह आहे आणि सर्व नगरसेवकांचे जे १० हजार मानधन आहे, ते पण लवकरात लवकर पाठवण्यात यावे आणि डॉक्टरांनी जे सांगितले मिटींगचा भत्ता पण आणि बोडारे साहेबांनी जे सांगितले आहे ते पण लवकर पाठविण्यात यावे. महानगरपालिकेतर्फे पण पाठवायला पाहीजे आणि जेवढे पण लोक मृंत्यू पावले आहेत, त्यांना श्रध्दांजली देण्यात आली आणि आज जो इश्यु आहे, तो घेतला जात नाही. आपल्या नगरसेविका, टेकचंदानी मॅडमच्या घरामध्ये एक मृंत्यू झाले आहे, आज सायंकाळी हरी किर्तन दरबारामध्ये पगडी आहे, ५ ते ५.३० वाजे पर्यंत, त्यांना पण एक दोन मिनीट दयायला पाहिजे आणि एक इश्यु आज मी महासभेमध्ये आणला होता, माझ्या आईच्या नावाने आणला होता, चौकाच्या नामकरणसाठी, परंतु आज या दु:खद घटनेमुळे नको कारण

माझी आई निवडणूकीच्या काळामध्ये १६ फेब्रुवरीला मृत्यू पावली होती. त्यांचा पण इश्यु होता, उद्या त्यांचे वर्षश्राध्द आहे. परंतु आजची महासभा या विषयला फक्त मी लक्षात आणून दिले आहे. आपले चिफ ऑडीटर साहेब, नविन आले आहेत, त्यांचे पण स्वागत करायचे होते. पण आज महासभा न चालवता ती अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करण्यात यावी. आज कोणताही विषय चालला नाही पाहीजे अशी माझी सर्व सदस्यांना विनंती आहे, महापौरांना पण विनंती आहे की, आजची मिटींग स्थगीत करून दुस—या वेळेला ठेवण्यात यावी. तर खुप चांगले राहील असा माझा प्रस्ताव आहे.

यावेळी सदस्य, श्री. रमेश चव्हाण हे सभागृहाच्या बाहेर गेले.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव मॅडम, सभागृहामध्ये उपस्थित सर्व पदाधिकारी, आपले सर्व नगरसेवक, आज संपुर्ण देशामध्ये शोककळा आहे. परंतु आपल्यासाठी, आपल्या उल्हासनगरमध्ये तीन, तीन शोककळा आहेत, तीन, तीन दु:खद घटना बदल आज महासभेमध्ये आपल्या सदस्यांनी चर्चा केली आहे. आज संपुर्ण देशामध्ये सर्व भारतीयांचे रक्त खवळले आहे. जेव्हा आपण टी.व्ही. सुरू करून एखादी बातमी बघत आहेत, तर ती बातमी आपण बघू शकत नाही, आपले रक्त खवळून उठते. किती तरी वेळा आपल्या देशाने पाकिस्तान बरोबर तडजोड करण्याचा प्रयत्न केला आहे, किती तरी वेळा आपण पाकिस्तानला समजवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आज या सभागृहामध्ये जे संपुर्ण देशामध्ये चालले आहे तेच चालले आहे. फक्त आर या पार ची लढाईचा विषय चालला आहे, असे कोणीही या देशाचा, भारत वंशाचा नागरीक नसेल ज्यांना या दु:खामुळे अघात झाला नसेल. आपले सैनिक कालच्या दुर्घटनेमध्ये शहीद झाले आहेत, त्या शहीदांना भारताचा प्रत्येक नागरीक, १३० करोड लोक आज श्रध्दांजली देत आहेत. आपण इथे जेवढे प्रस्ताव ठेवले आहेत, त्या सर्व प्रस्तावाचे मी अनुमोदन केले आहे. त्याच बरोबर सभागृहाच्या माध्यमातून आपल्या देशाचे पंतप्रधान, आदरणीय, श्री. नरेंद्र मोदीजींना हा संदेश दयायचा आहे की, आर या पारची लढाई करायची आहे आणि पाकिस्तानचे तुकडे, तुकडे करायचे आहेत. कारण की, किती तरी तडजोड झाले, मा. अटलबिहारी वाजपेयीच्या काळापासून आपण प्रयत्न केले आहेत की, आपल्या देशा पासून वेगळा झालेला जो अ भाग आहे, तो आपल्या बरोबर मिळूनमिसळून राहीला पाहीजे. परंतु प्रत्यक वेळी तडजोड केल्या नंतरही आपल्या देशाच्या सैनिकांवर भ्याड हल्ला करणे, खुप दु:खाची गोष्ट आहे, आज संपुर्ण देशामध्ये जी परिस्थिती आहे, त्यामुळे हेच संकेत मिळतात की, काही दिवसामध्येच पाकिस्तान या देशाच्या नकाशा वरून समाप्त होऊन जाईल आणि ही आमची सर्वांची इच्छा आहे. या नकाशावरच राहीला नाही पाहीजे, वेगवेगळया देशांनी याची निंदा केली आहे. मी सर्व शहीद झालेल्या सैनिकांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पीत करतो आणि त्याच बरोबर शहरामध्ये ज्या दोन दु:खद घटना झाल्या आहेत, एक दिवस आधी भरत खरेंचा फोटो आला, ते एक सभेमध्ये बसले आहेत, गरीब लोकांची मदत करीत आहेत, दुस—या दिवशी बातमी आली की, त्यांचा अपघात झाला आहे, भरत खरे या जगात राहीले नाहीत. काही लोकांची दुवा त्यांच्या बरोबर होती, परत बातमी आली की, भरत खरे हॉस्पिटलमध्ये भरती झाले आहेत आणि अजून पर्यंत असे चालले होते की, प्रत्येक व्यक्तिच्या मनामध्ये, राजनिती बरोबर जोडलेला व्यक्ती, सामाजिक कार्याशी जोडला व्यक्ती बोलत होते की, भरत खरेंचे काय झाले? रात्री पासून ते सकाळ पर्यंत असे चालले होते. तर आपले आदरणिय भरत खरे यांना सुध्दा आपण श्रध्दांजली दिलेली आहे आणि खरोखर समाजसेवा करणा—याचा सन्मान व्हायला पाहीजे. जो प्रस्ताव इथे चौधरीनी दिलेला आहे. ते मान, धन, राशी त्यांची काहीच किंमत नाही ती छोटीशी आहे, पण सन्मान मिळायाला पाहीजे. त्याच बरोबर माझी बहीण कविता पंजीबी यांनी जो विषय ठेवला आहे, मेम साहेब अपार्टमेंट, त्यामध्ये राहणा—या लोकांना माहीतच नव्हते, खाली दवाखान्यामध्ये औषधे घेणेसाठी गेले होते आणि तिथे त्यांचे मृत्यू लिहीले आहे आणि तिथे एवढी जास्त दु:खद घटना या शहराकसाठी काय होऊ शकते? काही दिवसापासून आपले दुर्भाग्य चालले आहे, दु:खद घटना येत आहेत. या तीन लोकांना इथे श्रध्दांजली देण्यात आली आहे. त्यांना पण मानधन किंवा मदतनिधी त्यांच्या परिवाराला देण्यासाठी

काही मोठी गोष्ट नाही. त्यांची जी हानी झाली आहे, त्याची पुर्ती होणार नाही. परंतु मानवतेच्या आधारावर ज्या लोकांचा दाबून मृत्यू झाला आहे, त्यांच्या परिवाराला राशी दिली जावी, त्याच बरोबर जे लोक जखमी झाले आहेत, त्यांना पण काही ना काही मदत दिली जावी. त्याच बरोबर जे निवेदन आज करायला नाही पाहीजे, नंतर पण करू शकतो, परंतु करतो की, त्या मेम साहब, बिल्डींगच्या आजूबाजूच्या लोकांच्या सुरक्षासाठी जे घरे आजूबाजूला आहेत, त्यांच्या सुरक्षासाठी पण पाऊल उचलले जावेत आणि मेम साहेब, बिल्डींचा विषय घेऊन आपण ती बनवू शकतो किंवा तसेच ठेवायची किंवा बनवण्या लायक नाही आहे. तर त्वरीत तिचे डेमोलेशन करायला पाहीजे आणि बनवण्या लायक आहे तर ती बिल्डींग बनवली पाहीजे. कारण आजूबाजूच्या लोकांची जनहानी झाली नाही पाहीजे. आज सर्व शहीदांना श्रध्दांजली दिली आहे. मी मा. महापौरजी आपल्याला निवेदन करतो की, आजची सभा नंतरच्या नोटीशी पर्यंत अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करण्यात यावी, धन्यवाद, जय भारत!

या वेळी सदस्य, श्री. रमेश च्हाण यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>आयुक्तांच्या स्थानी, मुख्य लेखाधिकारी, श्री. विकास चव्हाणः—</u>सन्माननिय महापौर, सन्माननिय सभागृह काल काश्मिरमध्ये पुलवामा इथे दहशतवादयांनी भ्याड हल्ला करून आपल्या देशाची सुरक्षा करणा—या जवानांची अतिशयपणे निर्घुणपणे हत्या करून त्यामुळे आपला संपुर्ण देश शोकसागरामध्ये बुडालेला आहे. प्रत्येकाच्या मनामध्ये द्वेषाची भावना पसरली आहे. परंतु आपण आज त्या जवानांच्या आत्म्यास शांती मिळावी अशी प्रार्थना आपण इश्वरचरणी करीत आहोत. त्याच बरोबर त्या जवानांच्या सर्व कुटूंबियांनादु:ख सहन करण्याची शक्ती इश्वराने दयावी, अशी मी प्रार्थना करतो प्रशासनाच्या वतीने आणि उल्हासनगरवासीयांच्या वतीने तसेच मेम साहेब बिल्डींगमध्ये ज्या तीन लोकांचे निधन झाले, त्यांना पण मी श्रध्दांजली अर्पण करतो. तसेच रूग्ण मित्र, श्री. भरत खरे मराठीमध्ये एक म्हण आहे, “जो आवडतो सर्वांना, तोची आवडे देवाला” भरत खरेंचे आणि माझे संबंध ज्या वेळेला अपंग कल्याणचा एक कार्यक्रम केला होता, त्यावेळेस आला. अतिशय तळमळीचीव्यक्ती होती आणि सगळयांच्या मनाला चटका लावणारी बाब म्हणजे आदल्या दिवशीच ते आम्हांला आमंत्रण दयायला आले की, साहेब आम्ही पंधरा तारखेला एक कार्यक्रम ठेवला आहे, तुम्ही त्याला उपस्थित रहा. परंतु आम्ही त्यांना सांगितले की १५ तारखेला महासभा आहे, तुम्ही १४ तारखेला कार्यक्रम ठेवा. परंतु नियतीला ते मान्य नव्हते, तर आपण त्यांच्या आत्म्याला शांती लाभावी अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो आणि देशावर जो दु:खसागर लोटलेला आहे, त्यासाठी उल्हासनगरवासीय श्रध्दाजली वाहत आहेत, त्यामध्ये प्रशासनही सहभागी आहे. सर्व देशवासियांच्या दु:खा सोबत आम्ही सहभागी आहोत. सर्व मृत्तांच्या आत्म्यास शांती मिळावी अशी मी प्रशासनाच्या वतीने प्रार्थना करतो.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>मा. महापौर, आयुक्त साहेब, जसे आपण सर्व बोलले परंतु आमची जी मागणी होती, बोडारे साहेबांची आणि कविता मॅडमचीजी मागणी केलली आहे…

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>हे सर्व ठरावामध्ये समाविष्ट करण्यात यावे आणि ही राशी जी दयायची आहे आणि आपण जो पण ठराव केला आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता हे त्वरीत लागू झाले पाहीजे आणि आजचे जे प्रश्नोत्तर आहेत, ते वगळण्यासाठी सांगतो त्याच बरोबर मा. महापौरांना निवेदन करतो की, दोन लक्षवेधी स्वीकारून मिटींग स्थगीत करण्यात यावी.

<u>महापालिका सचिव :—</u>विषय क्र. १ प्रश्नोत्तरे

<u>श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>प्रश्नोत्तराचा तास वगळण्यात यावा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय** :—प्रश्नोत्तराचा तास वगळण्याबाबत.

सूचकाचे नांव :—श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नांव :—श्री. राजेश वदारिया

<u>महासभा ठराव क्र. ५७ क</u> <u>दिनांक :—१५/२/२०१९</u>

ही महासभा आज दिनांक १५/२/२०१९ रोजीच्या महासभेतील प्रश्नोत्तराचा काळ वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>**महापालिका सचिव**:—</u>चार लक्षवेधी सुचना सभेसमोर आलेल्या आहेत, <u>लक्षवेधी सुचना क्र. १ सुचकाचे</u> नाव आहे, श्री. सुरेंद्र सावंत, अनुमोदकाचे नाव आहे, श्री. सुनिल सुर्वे
<u>**विषय**:—</u>भटक्या कुत्र्यांचा बंदाबस्त करण्या बाबतची लक्षवेधी सुचना आहे.

<u>लक्षवेधी सुचना क्र. २</u> सुचकाचे नाव आहे, श्रीम. अंजली साळवे, अनुमोदकाचे नाव आहे, श्रीम. कविता बागुल.
<u>**विषय**:—</u>मे. कोल्ब्रो ग्रुप, नागपुर या कंपनीला देण्यात आलेला ठेका रद्द करण्यात येवुन शासकिय निर्णयानुसार महापालिकेचे कामे महिला बचतगटांना देण्याबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सुचना क्र. ३</u> सुचकाचे नाव आहे, श्री. सुनिल सुर्वे, अनुमोदकाचे नाव आहे, श्री. चंद्रशेखर यादव.
<u>**विषय**:—</u> उल्हासनगर शहरातील रस्ते खड्डेमुक्त करुन नागरीकांच्या जीवाला होणारा धोका टाळणेबाबतची लक्षवेधी सूचना

<u>लक्षवेधी सुचना क्र. ४</u> सुचकाचे नाव आहे, श्री. प्रमोद टाले, अनुमोदकाचे नाव आहे, श्री. सुनिल सुर्वे
<u>**विषय**:—</u> मालमत्तेचे सर्व्हेक्षण करणेकामी काढलेली निविदा प्रक्रिया ताबडतोब रद्द करुन नविन स्पर्धा करणारी नविन निविदा काढुन सक्षमीकरणासाठी कर पावती पावती हे फक्त महिला बचत गटामार्फत करण्यात येवुन संबंधीत अधिका—यावर कारवाई करणेबाबतची लक्षवेधी सूचना.

या पैकी मा. पिठासिन अधिकारी यांनी दोन लक्षवेधी स्विकारल्या आहेत, पहीली लक्षवेधी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी ती स्विकारली आहे.

दुसरी लक्षवेधी उल्हासनगर शहरातील रस्ते खड्डेमुक्त करून नागरीकांच्या जीवाला धोका. या दोन लक्षवेधी स्विकारल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> एक मिनीट ऐकावे आमची जी भटक्या कुत्र्यांची लक्षवेधी आहे, ती सुरेंद्र सावंत आणि आम्ही मागे घेत आहोत. कारण की, ती एवढी महत्वाची नाही, त्याच्या पेक्षा दुसरा विषय महत्वाचा आहे.

<u>उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—</u> कायदयाच्या हिशोबाने मागे घेता येणार नाही, दोन्ही लक्षवेधी मी स्विकारली आहे आणि मी ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगीत करीत आहे. टील फरदर दि नोटीस.

---

☑

सूचकाचे नांव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :—श्री. राजेश वदारिया

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक १५/२/२०१९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ५७ ड</u> <u>दिनांक : १५/२/२०१९</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १५/२/२०१९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>पीठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—</u> कृपया राष्ट्रगीताची सुरूवात करावी.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>महीला बचत गटाचे तुम्ही राजकारण करीत आहेत. शहिदांसारखेच हे काम झाले आहे.

<u>महापालिका सचिव:—</u> मा. पीठासीन अधिकारी राष्ट्रगीत घ्यायला सांगितले आहे, कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ५.०६ वाजता उप महापौर तथा पिठासिन अधिकारी श्री. जीवन इदनानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३०/५/२०१९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३०/५/२०१९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

## ७—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १५/०२/२०१९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदरची सभा स्थगित केल्याने सदर सर्वसाधारण महासभा दिनांक ३०/५/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती पंचम ओमेश कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/ होत्या.

१.श्रीम. पंचम उमेश कालानी—— महापौर

२.श्री. जीवन चंद्रभान इदनानी—— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २८ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २९ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३० | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ६ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३१ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३२ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३३ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ९ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ३४ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १० | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३५ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ११ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३६ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १२ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ३७ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १३ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ३८ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १४ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ३९ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १५ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४० | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १६ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ४१ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| १७ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ४२ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| १८ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| १९ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४४ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २० | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ४५ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २१ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४६ | श्री. विजय चाहु पाटील |
| २२ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ४७ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| २३ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ४८ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ४९ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २५ | श्री. रवि किशनचंद जग्यासी | ५० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २६ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ५१ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २७ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ५२ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१.श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे, २. श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना, ३. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ४. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ५. श्रीमती गीता लालचंद

साधनानी, ६. श्रीमती रेखा अशोक ठाकुर, ७. श्रीम. जया प्रकाश माखिजा, ८. श्री. महेश पहिलराज सुखरामनी, ९. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १०. श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ, ११. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, १२. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, १३. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), १४. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, १५. श्रीमती श्रीमती पुष्पा नाना बागुल, १६. श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे), १७. श्री. रमेश महादेव चव्हाण, १८. श्रीमती मिताली राजेश चान्पूर, १९. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, २०. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे, २१. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, २२. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, २३. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, २४. श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री), २५. श्री. प्रमोद नामदेव टाले, २६. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २७. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, २८. श्री. आकाश परशुराम पाटील, २९. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. अच्युत हांगे, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
४.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
५.श्री. सोनावणे, प्र. कार्यकारी अभियंता, पा.पु.वि.
६.श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता, विदयुत विभाग
७.डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
८.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
९.श्री. दत्तात्र्य जाधव, प्र. सहाय्यक आयुक्त
१०.श्री. अजित गोवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
११.श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१२.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१३. श्रीम.श्रध्दा बाविस्कर, प्रोग्रामर
१४. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
१५. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
१६. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
१७. श्रीम. अलका पवार, अधिक्षक, महीला व बालकल्यण विभाग.
१८. श्रीम. निलम कदम, लेखा पाल, शिक्षण मंडळ

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती नर्गीस खान, लिपीक

सायंकाळी ४.२५ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

या वेळी मा. महापौरांच्या स्थानी श्री. जीवन इदनानी हे पीठासिन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>महापालिका सचिव:—</u>लक्षवेधी सुचना क्र. १ सुचकाचे नाव आहे, श्री. सुरेंद्र सावंत, अनुमोदकाचे नाव आहे, श्री. सुनिल सुर्वे

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक १</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुरेंद्र सावंत
अनुमोदकाचे नाव :—श्री. सुनिल सुर्वे

<u>विषय:—</u>भटक्या कुत्र्यांचा बंदाबस्त करण्या बाबतची लक्षवेधी सुचना आहे.

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत सध्या सर्वत्र भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून रात्रंदिवस ही भटकी कुत्री शहरातील गल्लीबोळात हैदोस घालीत आहेत. त्यामुळे शहरातील नागरीकांचे जीवन मेताकुटीस आले आहे. गुरुवार दिनांक ७/२/२०१९ च्या सर्वच वृत्तपत्रातील बातम्यानुसार शहरात एकाच दिवशी १५ लोकांना श्वानदंश झाला असून त्यांना शासकिय दवाखान्यात उपचार सुरु आहेत.

आपल्या महापालिकेकडे सध्या काही उपाययोजनाही नाहीत मुख्यत: कोंडवाडे नसल्याने भटक्या कुत्र्यावर आपण काही कारवाई करु शकत नाही. कुत्र्यांच्या नसबंदीसाठी आपल्या आरोग्य खात्याकडुन काही उपाययोजनाही होत नाही. परिणामी भटक्या कुत्र्यांची संख्या झपाटयाने वाढत आहे.

तरी या विषयावर पुढील होणा—या महासभेत तातडीची चर्चा होवून त्वरीत उपाययोजना व्हावी अशी मी नम्र विनंती करीत आहे.

---

**<u>सदस्य श्री. सुरेंद्र सावंत:—</u>**मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आणि सर्व सभागृह या शहरात भटक्या कुत्र्यांची एवढी संख्या वाढली आहे की मोजले तर सांगु शकत नाही. रात्री अपरात्री लोकांना उल्हासनगर स्टेशनपासुन घरी जात असतांना खुप त्रास होत असतो. किंवा अनेक प्रकारे त्रास होत असतो. विषय फार गंभीर आहे तर माझी अशी सूचना आहे या सर्व भटक्या कुत्र्यांना पकडुन एकतर जंगलात जावुन सोडावे किंवा आपणाकडे कोठे त्यांना ठेवण्यासाठी जागा नमुद करावी आणि त्यांना शहरात बंदिस्त करावे. त्यामुळे या शहरात भटक्या कुत्र्यांचा त्रास कमी होईल आणि माझी आणखी एक सूचना आहे, डॉक्टर साहेब दोन मिनिटे.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>**डॉक्टर रिजवानी साहेब आपले उत्तर देत आहे.

**<u>सदस्य श्री. सुरेंद्र सावंत :—</u>**डॉक्टर साहेब दोन मिनिटे, मला बोलु दया. फक्त त्यांच्यावर शस्त्रक्रिया करावी, नसबंदी करावी. त्यामुळे कुत्र्यांची संख्या कमी होईल आणि आपला त्रास कमी होईल. धन्यवाद

**<u>डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—</u>**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब आणि सभागृहातील सर्व सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत साहेबांनी जी लक्षवेधी सूचना दिली आहे त्याचे मी असे उत्तर देत आहे की, आम्ही एक सेंटर चालु केले आहे २०१२ च्या पशुगणनेनुसार आम्ही २५०० कुत्र्यांची नसबंदी केली आहे ते काम पुर्ण झाले आहे, स्विमींग पुलच्या बाजुला जो जुना जकात आहे तेथे ऑपरेशन करायचे आहे आणि तीन दिवस कुत्र्यांना तेथे ठेवायचे सुध्दा आहे आणि बाकी आपण जे म्हणालात पकडुन त्यांना दुसरीकडे ठेवायचे तर ते सुप्रिम कोर्टाच्या गाईडलाईननुसार असा कोणताच ॲक्ट नाही की येथुन पकडुन त्यांना दुसरी जागी ठेवणे. जेथुन त्यांना पकडले आहे तेथेच त्यांना नसबंदी करुन सोडायचे आहे. याचे आम्ही फालो करत आहोत आणि याच विषयावर आज सुध्दा चर्चा झाली याच एजन्सीबद्दल परवानगी घेवुन त्यांना सलग ठेवु या. आणि त्याच हिशोबाने २०१९ ची पशुगणणेची सेंन्सस चालु आहे तर त्यावरुन जो अहवाल येईल त्या हिशोाबाने आम्ही हा कार्यक्रम चालु ठेवु.

**<u>सदस्य श्री. सुरेंद्र सावंत:—</u>**नसबंदी विषयी आपण काही सांगितले नाही. त्यास किती रक्कम किती निधी लागणार हे काही सांगितले नाही आपण.

यावेळी सदस्य श्री. शंकर लुंड सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—</u>त्याकरीता ४० लाखाचा निधी आहे व आम्ही २५ लाखाची निविदा मागविली होती. २५०० कुत्र्यांचा आम्ही सहा महिन्यात मिशन केले आहे. आपणांस जर महिन्यानुसार विस्तृत माहिती हवी असेल तर आपणांस सांगु शकतो. जानेवारी मध्ये १४५ कुत्र्यांची नसबंदी केली आहे, फेब्रुवारीमध्ये ५०८, मार्चमध्ये ६५४ चे केले आहे, एप्रिलमध्ये ७३५ चे केले आहे व मे मध्ये ४५५ चे केले आहे असे एवढे कुत्र्यांची आम्ही नसबंदी केली आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>महापौर महोदया, आयुक्त साहेब आणि सचिव महोदया आपल्या डॉक्टर साहेबांनी माहिती दिली आहे २०१२ मध्ये कुत्र्यांची नसबंदी केलेली आहे. तसेच २०११ च्या जनगणनेनुसार आपल्या महापालिकेमध्ये किती मेल कुत्रे होते आणि किती फिमेल कुत्रे होते हा रेकॉर्ड तुमच्याकडे आहे का? २०११ च्या सेन्शच्या आधारे आपल्याकडे मेल कुत्रे किती होते आणि फिमेल कुत्रे किती होते.

<u>डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—</u>२०१२ मध्ये सेन्सस झाले होते त्यानंतर झालेले नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>२०१२ चे मी विचारले

<u>डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—</u>एकुण ३३३६ चे आम्ही मेल व फिकेल कुत्र्यांची माहिती आम्ही २०१२ मध्ये दिली होती. पण असे काही विस्तुत नाही की मेल किती व फिमेल किती होते.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>तुमचे म्हणणे आहे की अंदाजे ३३३६ एकुण मेल आणि फिमेल कुत्रे होते. मी म्हणतो २०१२ च्या प्रमाणे तुम्ही २५०० कुत्र्यांची तुम्ही नसबंदी केलेली आहे. समजा आपण दुप्पट पण धरली कदाचित २०१२ ते २०१९ या सात वर्षात त्यांची जनसंख्या यामध्ये ७००० कुत्रे आपल्या उल्हासनगर शहरात असतील आणि ७००० पैकी तुम्ही २५०० कुत्र्यांची नसबंदी तुम्ही केली. तुमचा पुढचा कार्यक्रम काय आहे आणि तुम्ही एका दिवसात किती नसबंदी करतात. तुमच्याकडे कुत्र्यांच्या नसबंदीची डिमांड काय आहे. तुमचे लोक संपुर्ण उल्हासनगर शहरात फिरत असतील आणि मेल आणि फिमेल दोन्ही नसबंदी असतील तर किती डिमांड आहे आणि पुर्णपणे ७००० कुत्र्यांची नसबंदी तुम्ही किती दिवसात करणार. हे उत्तर तुमच्याकडुन अपेक्षित आहे आणि समजा आपण दिवसाला ५ कुत्र्यांची जर नसबंदी केली आणि महिन्यात दिडशे असे करुन आपण नसबंदी करु शकतो. तुम्ही कसा कार्यक्रम केलेला आहे हे पुर्ण नियोजन आपण आम्हांला सांगावे.

<u>डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—</u>आता एनिमल सेन्सस चालु आहे. मिनिमम उल्हासनगर शहरात १० हजार कुत्रे असणार परंतु यांची जी प्रोसेस आहे ती आम्ही या एका महिन्यात २५ दिवस आम्ही २४ तासात प्रत्येक महिन्यात करत असतो. मला अजुन एक्सटेंशन करायचे आहे तर मी परत फाईल पुटअप केलेली आहे. २५०० ची मी परत फाईल पुटअप केलेली आहे परंतु जेव्हा आम्हांला सेन्ससच्या महिन्यामध्ये २० जुन पर्यंतची मर्यादा आहे सेन्सची तर जेव्हा रिपोर्ट येणार तेव्हा परत आम्ही एक्सटेंशन करणार. अजुन आम्हांला परत एक वर्ष लागेल हे पुढे प्रोसिजर करण्यामध्ये.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>तुमचे असे म्हणणे आहे की २० कुत्रे महिन्याला तर एक वर्षात पुर्ण होणार आहे.

<u>डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—</u>होय.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>मग अडचण काय आहे.

<u>डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—</u>काहीच अडचण नाही.

<u>**सदस्या श्रीमती सुरेखा आव्हाड**:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आता कुत्र्यांची संख्या वाढली आहे. म्हणुन आपण उपचार केले. जी चावणारी कुत्रे आहेत मी दोन वेळा तक्रार दिल्यानंतर तुम्ही ती चावणारी कुत्रे पकडुन नेलीत. आणि परत येथे आणुन सोडलीत, ती कुत्रे परत कोणाला चावली. तर त्यावर आपण काय उपाययोजना करत आहात.

यावेळी सदस्य श्री. विकास पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>**डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :—</u>महोदया, गर्व्हमेंटचे एनिमलसाठी सुप्रिम कोर्टाने दिलेले आदेश आम्ही फालोप करीत आहोत. कुत्रे पकडुन त्यांचे नसबंदी करुन त्यांना परत जेथुन उचलले तेथेच आणुन सोडावेत. बाकी जे आहे इंजेक्शन दिल्यानंतर ९९ टक्के कुत्रे इफेक्टेड होत नाहीत ज्यांना इंजेक्शन दिले जाते ते, इंजेक्शन मेट्रनीटी व सेंट्रल हॉस्पीटलला बंदोबस्त आहे, आमच्याकडे कुत्र्यांचे स्टेलायझेशन होते त्यांना सुध्दा आम्ही इंजेक्शन लावतो. आता आपणाकडे हयुमन टीमसाठी १० हजाराची शासनाने इंजेक्शन सेक्शन केले आहे. ते २—४ दिवसात आपणाकडे येणार तेव्हा आम्ही हयुमन टीमसाठी ते इंजेक्शन चालु करणार. आता सध्या कुत्र्यांना इंजेक्शन दिले जात आहे.

<u>**सदस्या श्रीमती सुरेखा आव्हाड**:—</u>डॉक्टर साहेब, तुम्ही जे सांगता ते आम्हांला मान्य आहे की तुम्ही त्यांच्यावर उपाय केल्यानंतर त्यावर काही इफेक्ट होत नाही परंतु पब्लीक ऐकत नाही ना साहेब.

<u>**सदस्य श्री. मनोज सयानी**:—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, डॉक्टर साहेब, आपण महोदयांचे काय म्हणणे आहे ते समजले नाही. आपण एका जागेतुन चावणा—या कुत्र्यांना उचलुन नसबंदी केली त्यानंतर आपणांस सुप्रिम कोर्टाचा आदेशामुळे तेथेच आणुन कुत्र्यांना सोडायचे आहे. परंतु ते कुत्रे परत लोकांना व मुलांना त्रास देत आहेत. तर त्यांची जी समस्या होती तीच सुटली नाही. काय नसबंदी केल्यानंतर कुत्र्यांची तिव्रता कमी होते? असेच मी सुध्दा आपणांस फोन केला होता एका जागी कुत्रे मुलांना फार त्रस्त करत होते त्यावेळी तेथिल लोक मला व्हिडीओ व फोटो सुध्दा पाठवायचे. त्यावेळी मी आपणांस तक्रार केली तर आपण २४ तासात दखल घेतली. मी सुध्दा फोटो काढले आहे कुत्रे पकडण्याचे. त्यावेळी पेपरात टाकले माझ्यामुळे कुत्रे पकडण्यात आली. परंतु परत तो कुत्रा तेथे आणुन सोडला आपण. तर मी परत फोटो पाठविला की तो कुत्रा परत आला म्हणुन. तर महोदयांचा तीच तक्रार आहे जी समस्या होती ती तेथेच आहे. तर मी असे विचारतो टॅक्कनिकली की जी नसबंदी होते तेथे कुत्र्यांची चावण्याची तिव्रता असते ती तिव्रता कमी होते काय? जर नाही होत तर काही फायदा होत नाही. आपण नसबंदी तर केली परंतु ती कुत्रे परत आपल्या जागेवर येतात व लोकांना त्रास दयायला सुरुवात करतात.

<u>**सदस्य श्री. किशोर वनवारी** :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मी श्री. रिजवानी यांना एक प्रश्न विचारतो, ठिक आहे त्यावेळी सुप्रिम कोर्टातुन त्यांनी हा आदेश आणला होता की कुत्र्यांना मारायचे नाही. हा सुप्रिम कोर्टाचा आदेश आहे, त्याविषयी कोणत्याच महापालिकेने कधी गर्व्हमेंटला असे लिहिले आहे की कुत्रे का नाही मारु. फक्त बकरी सुध्दा मारली नाही पाहिजे, कोंबडी सुध्दा मारली नाही पाहिजे. जे काही मुकी जनावरे आहेत त्यांना मारली नाही पाहिजेत. फक्त एक कुत्रा मुका नाही.

महापालिकेने त्यांच्यासाठी सुध्दा लिहिले पाहिजे की त्यांना मारु नका. आपण जेवढया काही कुत्र्यांची नसबंदी केली आहे परंतु कुत्री जन्म देत आहेत. पंधरा वेळा झाले आहे आता जेव्हा केव्हा कुत्रीला सात—आठ कुत्रे जन्माला आली तर त्याबाबत काय आपणांस शुभेच्छा दयायच्या. तर आपण जेवढया कुत्र्यांची नसबंदी केली आहे तेवढयांची नसबंदी फेल झाली आहे. तर आपण ते कसे केले आहे, कोणत्या ठेकेदाराकडुन केले आहे, की नसबंदी झालीच नाही. याबाबत सुध्दा थोडेफार खुलासा करावा. आणि सुप्रिम कोर्टाचा जो आदेश आहे आपण आता जे सांगत आहात की हा सुप्रिम कोर्टाचा आदेश आहे तर त्या आदेशाची प्रत, असे उल्हासनगरमध्ये बरीचशी कुत्री आहेत ते आम्हांला सुध्दा त्रास देत असतात. साहेब, आपण जरा शांत रहा, आम्ही खरोखरच कुत्र्यांनी त्रस्त आहोत. जे लावारीश आहेत, खुजलीवाले आहेत, आजारी आहेत त्यांच्यासाठी तर कायदा असला पाहिजे. नॉर्मल कुत्र्यांचे जावु दया परंतु जे आजारी, खुजलीवाले कुत्रे आहेत तर त्यांच्यासाठी एक वेगळा मार्ग काढला पाहिजे. तर आपणांस आमची विनंती आहे की तो सुप्रिम कोर्टाचा आदेश आम्हां सदस्यांमध्ये आपण वाटावेत. तर जेणेकरुन आम्ही शासनास लिहु शकु. तर यावर पुर्नविचार करुन आपण कुत्री मारण्याची परवानगी घेवुन येवु. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, ही बरीचशी मागणी आहे की जे आजारी कुत्रे आहेत त्यांच्याबाबत, पुर्वी लोक असा कुत्र्यांना विष देवुन मारुन टाकायचे. जे आजारी कुत्रे आहेत ते आजार पसरविणारे आहेत किंवा चावतात तर त्यांच्यासाठी कोणता ना कोणता मार्ग शोधावा लागणार ना. पुण्यात दोन दिवसाआधी टीव्ही ९ मध्ये दाखविण्यात आले होते. तेथिल लोक डुकरांनी त्रस्त होते त्यासाठी निविदा काढण्यात आली होती ८८ लाखाची, परंतु डुकरांना पकडु शकले नाहीत. लोक त्रस्त झालेत व महापालिकेत डुकरे सोडुन आले, तर अशी काही अडचण निर्माण होवु नये की लोक त्रस्त होवुन नियमाविरुध्द जातील तर कृपया करुन कोणता ना कोणता मार्ग शोधावा, जेणेकरुन शहरातील जनता या समस्येतुन वाचतील. यासाठी आपण महापौर व आयुक्त साहेबांनी विचार करावा, धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवेः—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, डॉक्टर साहेब, जे पागल कुत्रे आपण पकडुन नेतो तर आपण परत तेथेच सोडतात तर ती कुत्रे परत लोकांना चावणारच आहेत. दुसरे म्हणजे साहेब आमच्या एरियामध्ये एका इमारतीत पागल झालेले गाढव घुसले आणि ते लोकांना आत सुध्दा येवु देत नव्हते आणि बाहेर सुध्दा जावु देत नव्हते तर मग असा एनिमलचे काय करायचे? त्या गाढवाला लोकांनी हुसकुन लावले परंतु त्याचा दुसरीकडे त्रासच होता ना. तर मग याबाबत काय करु शकतो आपण. आणि कुत्र्यांच्या बाबतीत तर काहीतरी करायलाच पाहिजे साहेब. आपण याबद्दल काय करु शकतो जरा सांगा.

<u>डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—</u>महोदया, याबाबत स्पेसिफिक गाईडलाईनीतुन कॉर्पोरेशन संस्था ओनली डु वर्क ऑफ इस्टेट ऑफ. ज्यांचे पाळीव कुत्रे आहेत त्याबाबत तर आपण काहीच करु शकत नाहीत. बीकॉज अबोव द इस्टेट ऑफ. पाळीव कुत्र्यांची नसबंदी जर आपण म्हणाल तर करुन देवु शकतो परंतु त्यांना डॉग घरात ठेवणार अशी काही तरतुद नाही. दुसरे म्हणजे दादांनी आता सांगितले की त्यांना मारायचे तर त्यांना मारायचे नाही, डॉगची जी गाईडलाईन आहेत ते रुल्स आहेत २००१ चे त्यात असे लिहिले आहे, डॉगज् शुल्ड बी ट्रायल लाईक हुमनबींग, त्यांचे एक इंजेक्शन आहे ती त्यास दयायची आहे व जोपर्यंत तो डॉग मरत नाही तोपर्यंत त्यास केजमध्ये ठेवायचे आहे. जर तो मरेल तर बायो मेडिकल सीस्टमने त्यास डीस्ट्रॉय करायचे आहे. अशी त्याची गाईडलाईन आहेत.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>आयुक्त साहेब, विषय तसा लहान सुध्दा आहे आणि पाहिले तर मोठा सुध्दा आहे. मला वाटते कुत्र्यांची नसबंदी ही तिस—या वेळेस आपणाकडे होत

आहे, बरोबर? पाटील म्हणुन ठेकेदार होता त्यास आपण ठेका दिला होता कैलास कॉलनीचा. त्यानंतर आता ही चौथ्यांदा नसबंदी आहे. आताच्या प्रोग्रामनंतर नसबंदी होणार आहे का? नाहीतर श्री. किशोर वनवारी यांनी सांगितले की चालत आहे पुन्हा ते प्रवचन चालुच आहे. जनावरांची जी गणती आहे ती आपण किती वर्षानंतर करतो, मागच्या तारखेस आपणाकडे किती कुत्रे होती.

डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—साहेब, यामध्ये आमचे सेन्सस चालु आहे, गर्व्हमेंटच्या गाईडलाईनीच्या हिशोबाने. २०१२ मध्ये सेन्सस झाले होते त्यामध्ये त्यांनी ४००० कुत्रे दाखविले होते. त्यानंतर आपण गणना केली तर ती ८००० पेक्षा जास्त आहे. आता जी संख्या आहे तर आम्ही आता २५०० ची ई—टेंडर केले आहे, त्यानंतर एक्सटेंशन करणार आहोत २५०० चे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आपले पुर्वी जे काम झाले होते त्याचा रेकॉर्ड आहे का?

डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—होय, बिल्कुल.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मला एवढेच माहित की श्रीमती निर्मले महोदया महापौर होत्या त्यावेळी यावर चर्चा झाली होती तेव्हा कुत्र्यांची चावणे, त्यांचा त्रास उल्हासनगर शहरास जास्त होता, तेव्हा पहिल्यावेळेस असे झाले होते कैलास कॉलनी येथे ठेका दिला होता नसबंदी झाली होती. तर पहिले किती कुत्र्यांची झाली, आता किती. त्यावेळी नसबंदीचे प्रयोजन झाले होते की लोकांना त्याचा त्रास होता कामा नये. आपण काय करणार २५ कुत्र्यांचे करणार व बाकी १०० कुत्रे अशीच सोडणार तर फायदा काय त्याचा. त्याचा फायदा काहीच नाही असे प्रयोजन आपण का करत आहात? आणि माझी दुसरी सूचना आहे की आपण त्यांना मारु शकत नाहीत. डुक्करांच्या वेळेस ही पहिली महासभा होती की त्यांनी डुक्करांची विल्हेवाट लावली. त्यावेळी श्री. आर.डी. शिंदे आयुक्त होते तेव्हा डुक्करांचा असाच त्रास होता. उल्हासनगर छोटे शहर आहे १३०० स्केअर मिटरचे आणि त्यामध्ये डुक्कर घाण करत असल्याने त्याची विल्हेवाट लावली. कुत्र्याच्या बाबतीत आपण जशी अश्वशाळा काढतो तशाच प्रकारे भटक्या कुत्र्यांसाठी महापालिकेतर्फे एखादी शाळा काढुन सर्व कुत्रे नसबंदी केल्यानंतर तेथे ठेवायचे असे आपणांस करता येईल असा प्रकारचा प्रस्ताव महापालिकेपुढे ठेवावा. जेणेकरुन त्याला मारायची गरज पडणार नाही. जेणेकरुन लोकांना त्रास होणार नाही. शासनाचे नियम सर्वांना पाळता येईल. मला वाटते अशा प्रकारचे प्लाट एसडीओकडुन भरपुर दिले जात आहेत. महापालिकेच्या जागेवर कोणतेही प्लॉट विकले जात नाहीत. पोलिस डिपार्टमेंटच्या जागेवर प्लॉट विकले जातात, काहीतरी आपण ठरविले पाहिजे. आयुक्त साहेब, आजच पत्र पाठवा की महापालिकेच्या प्रयोजनासाठी ते प्लॉट देण्यात येवु नयेत ती सर्रास वाटली जात आहेत. अगोदरच प्लॉट कमी आहेत. जे आहेत ते प्रायव्हेट बिल्डरांच्या गळयात जातात. तर एक अश्वशाळा जशी असते तशी कुत्र्यांची एक जागा, मोठी जागा उपलब्ध करुन त्याठिकाणी एकत्र आपण ठेवु शकतो, नाहीतर नसबंदी करायची आणि पुन्हा सोडुन दयायची. बरे त्यांचे मल्टीफिकेशन त्यांचे प्रजनन एवढे आहे, एका कुत्र्याला एका वेळी आठ दहा कुत्रे होतात. तर यावर्षी गणना केली तर चार हजार असतील व पुढच्या वर्षी ती १२ हजार होणार. तर मग त्याचा उपयोग काय, ते करुन उपयोग काय? त्यापेक्षा एक कंपाउंड बांधुन त्याठिकाणी त्या कुत्र्यांना ठेवायचे आणि नसबंदी केल्यानंतर रस्त्यावर कशाला सोडायचे.

डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—होय साहेब.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:—रस्ते काय मोठे नाहीत एवढे, लोकांना चालता येत नाही आणि मग कुत्रे कोठुन चालणार आहेत. डॉक्टर राजा यांचा प्रस्ताव आपण तयारीनीशीच करा, महासभेत आमचे श्री. सुरेंद्र सावंत यांनी जी लक्षवेधी आणली त्याने एक निष्पन्न येईल की अशा प्रकारची श्वान शाळा उल्हासनगर महापालिकेतर्फे होईल आणि जेणेकरुन लोकांना त्याचा काही त्रास होणार नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>माझी फक्त एकच शंका होती आपणांस विचारली नाही. आपण जी कुत्र्यांची नसबंदी करतो तर त्यास आपण चिन्हीत कसे करतो की याची नसबंदी झालेली आहे. किंवा डबल डबल नाही झाली पाहिजे.

<u>डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—</u> आपण त्यांच्या कानावर डी मार्क लावतो. डॉक्टर प्रकाश नाथानी यांनी आधीच सोबत तशी भेट देवुन पाहिले आहे.

<u>सदस्य,डॉ. प्रकाश नाथानी:— </u>होय मी पाहणी केली आहे. मा. महापौरजी, आयुक्त महोदय, जसे मी मागील वेळेस पत्र दिले होते. भटक्या कुत्र्याबाबत मी पत्र दिले होते त्यानंतर याबाबत डॉक्टर साहेबांनी अंमलबजावणी केली आहे. मी ब—याच वर्षपासुन सॅनिटेशनचे काम पाहत होतो, मी सॅनिटेशन सभापती होतो. काम होत नव्हते फक्त बजेटमध्ये २५ लाखाची तरतुद असायची. लोकांना कुत्रे चावले की मी एआरव्ही दयायचे म्हणजे त्याचे व्हेक्सीन पेशंटला दयायचे कुत्र्याला नाही. डॉक्टर साहेबांनी मनावर घेतले व मागील महासभेत असे झाले होते की आपणांस हे काम करायचे आहे. पहिले तर त्यांनी केस टाकली ही चांगली गोष्ट आहे, मी स्वत: जावुन तेथे पाहिले होते. त्यांनी काम चालु केले होते नसबंदीचे काम चालु होते. परंतु त्यावेळी काहीतरी अफवा पसरली होती, सभागृहातीलच एक सदस्य आहे, परंतु जावु दया आपणांस काही टिका टिप्पणी करायची नाही. त्यात काय झाले, एनिमल्स लवर्स आले होते त्यात काय झाले तर डॉक्टर साहेबांनी एवढे कुत्रे जमा करुन ठेवले आहे, त्यास अन्नपाणी काही दिले नाही, तर रागाने त्यांनी ज्या एरियाचे जे काम केले होते ते सोडुन टाकले, त्यासाठी तेथिल नसबंदीचे काम थांबले होते. बरोबर ना डॉक्टर साहेब? तर मग काय झाले आम्ही त्या लोकांना परत समजुन सांगितले आणि एनिमल्स लवर्सना समजाविले असे नाही ते चुकीचे आहे. २० ते २१ कुत्रे होते त्यामध्ये आपण दिड लाखाची नसबंदी केली होती. पण आता साहेब माझा असा विषय आहे, डॉक्टर साहेबांनी जसे सांगितले की आपण नसबंदी करुन कानावर त्यांच्या मार्कींग करतो, त्यामध्ये आपण अजुन एक अमेंडमेंट करु शकता. आपण बेल्ट लावु शकता. कारण कुत्र्याचे कान कोणी पाहत नाही, त्यास कोणी हात लावत नाही. ते दिसत नाही. तर मग एक स्पेशल बेल्ट लावले जावे की त्या कुत्र्याची नसबंदी झालेली आहे तर मग याबाबत एक स्पष्टता येईल की त्याची नसबंदी झालेली आहे. राहिला प्रश्न दुसरे म्हणजे आपण म्हणालात की मी २५०० कुत्र्यांची नसबंदी केली आहे. २०१२ मध्ये सेन्ससनुसार आपणाकडे कुत्रे ४००० होते तर आज ८००० झाले आहेत. तर आपण आता २५०० कुत्र्यांची नसबंदी केली आहे आपण कानावर मार्क केले आहे, परंतु जर आपण त्यांना बेल्ट टाकला, नसबंदीचा टॅग लावला, तर मग यात स्पष्टता येईल, त्यावेळी जनतेला कळणार की त्या कुत्र्याची नसबंदी झाली आहे. आपणावर आरोप येणार नाही व आम्ही सुध्दा एरियामध्ये बोलु शकतो. दुसरा प्रश्न माझा असा होता की एखादा कुत्रा आहे त्यास रॅबिज झाले आहे, जर त्यास रॅबिज झाले आहे, साधा कुत्रा चावतो तर इट कॅन नॉट नॅसेसरी की त्यास रॅबिजचा आजार असणार. जर त्या कुत्र्यास काही आजार आहे तो कोणासही चावला तर मग समोरच्यास रॅबिज होणार व त्याचा कोणता इलाज नाही. आपणांस माहित असेल पुण्याला एक केस झाली होती. एक हुशार मुलगा होता त्याने एसएससीमध्ये ९२ टक्के मार्क मिळविले होते त्यास रॅबिज झालेल्या कुत्र्याने चावले मग त्या मुलास रॅबिज झाला व तो १०० दिवसात वारला. त्यानंतर ॲमेंडमेंट आली मेनका गांधीची, आपण सांगत आहात. त्याबाबत आम्ही काही चुकीचे म्हणत नाही आहोत, परंतु आपल्या लेव्हलवर जे एसआय असतील, मुकादम असतील, त्यांना कुत्रा दिसतो की नाही दिसतो, दिसतो ना, तर मग नगरसेवकाचे काम आहे की सिटीजनचे काम आहे. हे मुकादमचे काम आहे की तेथे आजारी कुत्रा दिसत आहे तर त्यास त्वरीत तेथुन हलवुन केजमध्ये ठेवले पाहिजे. जेणेकरुन असा प्रसंग येवु नये. राहिला प्रश्न आपल्या अर्थसंकल्पाचा तो संपतो आणि कुत्रे परत तसेच राहतात. एनिमल लव्हर्स शहरात भरपुर आहेत, देश, विदेश, भारतात, तर आपण त्यांच्यासाठी एक तरतुद ठेवा. बदलापुरमध्ये सुध्दा अशी काही घरे आहेत जे चाळीस ते पन्नास जनावरांना पाळत आहेत. तर मी असे म्हणतो की आपण महापालिकेतर्फे एक प्रस्ताव तयार करावा, रजिस्टर विथ एनजीओ, रजिस्टर विथ चॅरीटी कमिशनर त्यांना आपण

बोलावुन सांगा आपण जेवढे कुत्रे घेवुन जाणार त्यांचा इन्स्पेक्शन केले जाणार त्यांचे जे काही जेवण वगैरे काही असेल त्याचा खर्च आम्ही देणार. तर त्याने काय होईल शहरात जेवढे काही कुत्रे दिसत आहेत ते कमी होती, संख्या कमी होईल तसेच जनतेला जो त्रास होत आहे त्यांची जी तक्रार आहे ती कमी होईल. तर माझे असे म्हणणे आहे, हे आजच करा व एनजीओंना बोलवा, बजेटमध्ये जर प्रावधान करायचे आहे तर त्यास आजच करा. रॅबिजचे इंजेक्शन देण्यासाठी प्रिव्हेंशन बेटर दॅन, आपण काय करता २५ लाखाचे इंजेक्शन ठेवता, एआरव्ही काय आहे, मी शहरास सांगु इच्छितो की हे कुत्र्याने चावल्यानंतर लावतात, जर कुत्रा चावतच नाही तर मग आपण २५ लाख तरतुद का करतात. आपण महापालिकेत तर ठेवतच नाही ते आपण सेंट्रल हॉस्पीटला देवुन टाकता, तर मग तेथे काय होते काय नाही त्याचे तर काही विश्लेषण होत नाही. त्यापेक्षा चांगले होईल की आपण ते एनजीओंना दया. जसे श्री. बोडारे साहेबांनी सांगितले की एक जागा घेवुन जर ते शक्य होईल तर ती एक चांगली गोष्ट आहे. तर त्याबाबत खर्च आपण देणार हे काम एनजीओ करेल. धन्यवाद।

यावेळी मा. महापौर श्रीमती पंचम कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला. व आपल्या स्थानी आसनस्थ झाल्या.

<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>या समितीवर डॉक्टरांना सुध्दा घेतले जावे.

यावेळी सदस्य श्री. राजेश वदारिया, सदस्या श्रीमती ज्योती माने यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—</u>आपल्या सूचना नोट केल्या आहेत त्या सूचनेवरच आम्ही प्रोसेसमध्ये टाकणार.

<u>महापालिका सचिव:—लक्षवेधी सुचना क्र. २ सुचकाचे</u> नाव आहे श्री. सुनिल सुर्वे, अनुमोदकाचे नाव आहे श्री. चंद्रशेखर यादव. जर सूचक नसतील व अनुमोदकही नसेल तर ही लक्षवेधी संपृष्टात येईल. अनुमोदक आहेत तर मग त्यांनी बोलावे.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.......................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक २</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव

<u>विषय:—</u> उल्हासनगर शहरातील रस्ते खड्डेमुक्त करुन नागरीकांच्या जीवाला होणारा धोका टाणेबाबत.

उपरोक्त लक्षवेधी सूचनेनुसार सभागृहाचे विनंती पुर्वक लक्षवेधू इच्छितो की, उल्हासनगर शहरात उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कोटयावधीची विकास कामे करण्यात येत असून शहरातील रस्त्याचे दुरुस्तीसाठी लाखो रुपये खर्च केले जात आहेत. परंतू शहरातील अवस्था आताच दयनिय व बिकट बनली असून रस्त्यांना जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असल्याने नागरीकांना आपल्या प्राणास मुकावे लागल्याच्या घटनात वाढ होत आहे.

शिवसेना पक्षाचे पदाधिकारी, अंध व अपंग व्यक्तीसाठी अपिरत सेवा करणारे श्री. भरत खरे यांचा उल्हासनगर मधील रस्त्यावर असणा—या खड्डयामुळे अपघात होवून गंभीर इजा झालेली असून सदयस्थितीत ज्युपीटर रुगणालयात उपचार घेत आहेत. तसेच यापुर्वीही अपघात होवून लोकांना प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे कुटुंब दण्वस्त

झालेली आहेत. अश्या घटना होवू नये यासाठी उल्हासनगर शहरातील सर्व रस्ते खड्डेमुक्त करण्यात यावेत. यासाठी सदर लक्षवेधी सुचनेवर सभागृहात चर्चा होवून कारवाई करण्यात यावी ही विनंती.

---

<u>सदस्य श्री. चंद्रशेखर यादवः—</u>मा. आयुक्त साहेब, मा. महापौरजी, शहरात ठिकठिकाणी डांबराच्या रस्त्यात खड्डे पडल्याने पायी चालणारे, रिक्षात जाणारे, वाहनाने जाणारे यांना त्रास होतो. शहरात ठिकठिकाणी खुप खड्डे पडले असल्याने त्रास होत आहे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, सन्माननिय सदस्य, याबाबत प्रशासनाने स्थायी समितीपुढे प्रस्ताव पाठविले आहेत, सर्व रस्त्यांचे पृष्टीकरण करण्याबाबत. मात्र चार वेळा निविदा काढल्यानंतर कोणी भरली नाही. त्यानंतर आचारसंहिता लागली, आता पावसाळा सुरु होण्यात आहे. शहरामध्ये खड्डे आहेत याची मला जाणीव आहे. आणि चारही प्रभाग समितीचे इस्टीमेट तयार केले आहे. यामध्ये ५(२)(२) मध्ये मला देता येणार नाही, त्यामध्ये शासनाची हरकत आहे. त्यामुळे ६० दिवसाची अर्जंट टेंडर नोटिस आजच्या आज काढुन त्वरीत खड्डे बुजण्याचा प्रारंभ करता येईल, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. चंदशेखर यादवः—</u>धन्यवाद साहेब.

<u>सदस्य श्री. राजेश वदारियाः—</u>मा. महापौरजी, आज ३० मे आहे, यामध्ये निविदा काढणे, ती उघडणे व परत त्यामध्ये स्थायी समितीपुढे आणणे ही जी प्रोसिजर आहे त्यामध्ये कमीत कमी एक महिना जाईल आणि त्यामध्ये जेव्हा त्यात विलंब होईल तेव्हा पब्लीक आहे ती शिव्या देईल त्यावेळी ते सर्व नगरसेवकांना देणार मी धरुन. त्यासाठी मा. महापौरजी आपणांस आम्ही विनंती करतो की आपण प्रशासनास निर्देश दया की हा विकट विषय आहे, मागील वेळेस सुध्दा असेच होते यावर लोकांनी फार लिहिले, अपघात झाला त्यात काही लोक मृत्युमुखी देखील पडले. तर माझी आपणांस विनंती आहे की आपण प्रशासनास निर्देश दया, अर्जंट यावर उपाययोजना करावी.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>आयुक्त साहेब, आज ३० तारीख आहे १ जुनला पाऊस असतो तसेच मान्सुन पुर्व तो कधीही चालु होईल. आणि डांबराचे काम पाऊस पडल्यानंतर करुन उपयोग नाही. आपण ५(२)(२) मध्ये अत्यावश्यक काम करतो तर हे सुध्दा अत्यावश्यक काम आहे. मा. महापौर महोदया, सभापती महोदय, आपण सुध्दा यामध्ये आचारसंहिता असल्याने यावर काही करु शकलो नाही. आता लवकर करावे अशी माझी विनंती आहे कारण चार वेळा निविदा काढुन लोकांनी रिस्पॉन्स दिलेला नाही, हे प्रशासनाचे काम आहे का केले नाही. हे पब्लीक काम आहे, रस्त्यावर खड्डे पडले आहे हे बोलायचे काम नाही साहेब.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>या उल्हासनगर शहरामध्ये प्रामाणिकपणे काम करण्याचा सात महिन्यापासुन प्रयत्न केलेला आहे. आपल्या मताशी मी सहमत आहे. पावसाळा तोंडावर आलेला आहे. मी यापुर्वीच आपणांस खुलासा केलेला आहे की, चार वेळा प्रशासनाने निविदा कॉल केल्यानंतर देखील त्याला रिस्पॉन्स मिळाला नाही त्यामुळे आपणांस खड्डे मुक्त शहर करता आले नाही. त्यानंतर आचारसंहिता आली व दोन महिने त्यामध्ये गेले. परवा २७ तारखेला आचारसंहिता संपृष्टात आलेली आहे. आणि चार प्रभाग समितीचे ५०—५० लक्ष रुपयाचे जवळपास आपण खड्डे मुक्त करण्यासाठीचे अंदाजपत्रक तातडीने तयार केलेले आहे आणि उल्हासनगर शहरातील काही नागरीकांनी मंत्रालयामध्ये तक्रारींचा पाऊस पाडलेला आहे. मा. सचिव महोदयांचे मला आदेश आहे की ५(२)(२) मध्ये कोणतेही प्रकरण करायचे नाही. त्यामुळे मी त्यांना शब्द दिलेला आहे की माझ्याकडुन अशी चुक होणार नाही. मला वाटते मागील वेळेस सुध्दा अशीच चुकामुक झाली होती. मला असे वाटते आमदार महोदयांना कोणीतरी सांगितले, श्रीमती कालानी महोदयांना सांगितले की ५(२)(२) मध्ये २५—५० प्रकरण केलेले आहेत. श्री.

राजेश वदारिया त्यांची तक्रार माझ्याकडे घेवुन आले होते. त्यावेळेस मी यादी मागविली तर त्यामध्ये फक्त २ प्रकरणे ५(२)(२) मध्ये केली होती. आणि गेल्या ५—७ महिन्यामध्ये जास्तीत जास्त १० प्रकरणे ५(२)(२) मध्ये केली असतील ते सुध्दा चौकाचे सुशोभिकरण केलेले आहे, आपण सर्वांनी केलेले आहे पण चांगल्या कामाची सुध्दा तक्रार होत असेल तर मी कशाला रिस्क घ्यायची त्यासाठी सात दिवसाची निविदा काढुन आजच्या आज निविदा प्रक्रिया प्रसिध्द करुन तर लवकरात लवकर सात दिवसात करु या. ५(२)(२) मध्ये मी करु शकणार नाही. माझी विनंती आहे की लवकरात लवकर पाटोल्सचे काम करण्यासाठी आम्ही आजच करणार. चुकीच्या कामासाठी आग्रह करु नये ही विनंती आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मा. आयुक्त साहेब आपण आता आताच म्हणालात की चार वेळा खड्डे भरणेबाबत निविदा काढली परंतु निविदा भरण्यासाठी कोणी आले नाही. तर आपण कशी आशा करु की आपण ७ दिवसाची अर्जंट नोटिस दिली तर त्यात कोणी येईलच. मी आपणांस विनंती करतो की...

आयुक्त, श्री. अच्युत हांगे :— आपण सभागृहाची दिशाभुल करु नये. एकुण १० कोटीची निविदा होती, त्यास कोणी रिस्पॉन्स दिले नाही. त्यात संपुर्ण रस्त्याचे पृष्टीकरण करण्याचे व खड्डे बुजविण्याचे काम होते. आता ५०—५० लाखाचे खड्डे बुजविण्यासाठी प्रभाग समितीमध्ये ४ निविदा काढल्या आहेत. त्यात कोणी ना कोणी येणारच, त्या चार निविदा वेगवेगळया करणार त्या चारींची एकच रेट करणार व चारींना देणार. असे नाही की १० कोटीस कोणी आले नाही तर २ कोटीस कोणच येणार नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आपण जर पाहल तर यापुर्वीच्या वर्षी सुध्दा हीच चर्चा होती. आपले माजी आयुक्त श्री. निंबाळकर साहेबांनी जेव्हा ५(२)(२) मध्ये आदेश दिले की गणपतीपुर्वी रस्त्यावरील खड्डे भरले पाहिजे तर त्यावेळी त्यांची तक्रार कोणी मंत्रालयात केली होती त्यावेळी त्यांनी त्वरीत हे काम थांबविले. आणि आता तेच काम इतिहास ग्वाही आहे, १०० टक्के वाढीने ६ कोटीचे काम १३ कोटीमध्ये निविदेद्वारे पुर्ण करावे लागले व या शहराचे ७ कोटीने जास्त नुकसान झाले. मा. महापौरजी, मी आपणांस विनंती करतो की आपण ५०—५० लाखाची निविदा करा परंतु कमीत कमी २४ लाख, २५ लाखाचे आपल्या अधिकारात आहे तर चारही प्रभाग समितीमध्ये अर्जंट काम करण्याचे आपण आदेश देवुन जा. जेथे जास्त प्रमाणात खड्डे आहेत, जेथे फार मोठी दुर्घटनेची संभावना आहे तर हे काम आपण १५ दिवसात करावे तोपर्यंत आपले १५ दिवसात दुसरी निविदा होईल, अशी मा. महापौर महोदया आपणांस विनंती आहे, निविदेची प्रक्रिया जोपर्यंत होते, त्यास २० दिवस लागतील, २५ दिवस लागतील, तोपर्यंत चारही प्रभाग समितीमध्ये २५—२५ लाखात काम करण्याचे आपणांस न्रम विनंती करत आहे.

यावेळी सदस्य श्री. शंकर लुंड यांनी सभागृहात प्रवेश केला.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—२५ लाखाला सुध्दा निविदा काढावीच लागणार.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—ही सर्व कामे प्रशासनाकडुन झाली पाहिजेत, लोकांना पाणी मिळाले पाहिजे, रस्ते मिळाले पाहिजेत, लाईट मिळाले पाहिजे ही सर्व प्रशासनाची कामे आहेत. ५(२)(२)मध्ये दया की निविदेमध्ये दया, खड्डे नको आहेत आम्हांला. ५(२)(२) मध्ये नका दया तुम्ही परंतु खड्डे मुक्त करा पावसाळयापुर्वी. शहराला एकच अपेक्षा आहे की शहर खड्डे मुक्त झाले पाहिजे.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—एक मानेरा आशेळा गावाचा रस्ता आहे आपण मंजुरी दिली आहे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>लवकरात लवकर करण्यात येईल असे मी आपणांस सांगत आहे.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आज मी मोठया खेदाने सांगत आहे, इतिहास साक्षी आहे, उल्हासनगर शहराचे इतिहास साक्षी असेल की पावसाळयापुर्वी खड्डे भरले जाणार नाहीत. जेव्हा आम्ही जन्मलो तेव्हापासुन आमचे वडिल सांगायचे तुम्हांला जेथे कोठे भारतात किंवा बाहेर प्रवास करायचा असेल तर मान्सुन नंतर करा, कारण मान्सुनमध्ये रस्ते बनतात. हे खेदाने म्हणावे लागत आहे की येथिल पाटोल्स भरले गेले नाहीत. आयुक्त महोदय, आपले सुध्दा म्हणणे बरोबर आहे सचिव महोदयांनी आपणांस आदेश दिला आहे. परंतु साहेब, आपणांस आज महासभा स्वत: विनंती करत आहे. त्याचे आपणांस कारण मिळू शकते, आपण उत्तर देवु शकता साहेब. आपण दोन महिने काम करु शकला नाहीत कारण आचारसंहिता होती. आचारसंहितेत काम नाही केले परंतु निविदा काढल्यावर कोणी आले नाही तर त्यास कोणी पैसे दिले नसेल. तर साहेब आपण असा मार्ग काढा, आपण त्या ठेकेदारास सांगा की तु जर हे अर्जंट काम केले तर तुझे पगार ६ महिन्यात, ९ महिन्यात देईल. तर आपले काम होईल. जर पावसाळा सुरु झाला तर आपले काम होणार नाही. लोकांना चालणे त्रासाचे होत आहे. लोकांचा मृत्यु होतो, पत्रकारांचा मृत्यु होतो, या खड्डयांमुळे शहर किती भोगणार. कधी काय बोलतात, कधी बोलतात हे करा, कधी बोलतात ते करा, शहरास हा कर लावा, आज मला एक पाणी पुरवठयाचा अधिकारी भेटले ते म्हणाले की मी ज्यांच्याकडे पैसे घेण्यास गेलो तेव्हा ती व्यक्ती म्हणाली की आपण आम्हांला काही सुविधा दिल्या काय. माझे दोन लाखाचे बिल आहे. आपण जर खड्डे भरुन दिले तर मी दोन लाखाचे बिल भरणार. जनता बरोबर आहे. आपण त्यांच्या भावना समजुन घ्या. ठिक आहे मी मानतो आपणावर सुध्दा दबाव आहे परंतु साहेब आज सभागृह बोलत आहे, सभागृहाचे इतिवृत्त घेवुन जा महोदयांकडे. तुम्ही ॲथोरीटी आहात, तुम्ही करु शकता तुमच्या पातळीवर. तुम्ही करु शकता असे शहर सांगतो. तर आय रिक्वेस्ट यु ॲण्ड हाउस अल्सो यु कॅन डु इट.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मुळात कसे आहे की आपल्या या महापालिकेत खड्डे बुजविणे याबाबत आपले लोकप्रतिनिधी सांगत असतात विधानसभेमध्ये की यामध्ये खुप भ्रष्टाचार झाला आहे, म्हणुन मी तुम्हांला सांगत आहे की सध्याची परिस्थिती काय आहे, डांबर आता मुळात मिळत नाही. लोकांचे काम २० दिवसापासुन बंद आहे. आणि तुम्ही निविदा जरी काढली तरी त्यास रिस्पॉन्स का येणार नाही कारण आता आर्थिक परिस्थिती अशी आहे की दोन दोन वर्षापासुन आपले ठेकेदाराचे बिल देणे बाकी आहे. एक मिनिट, मला खुप वाईट वाटते श्री. भालेराव साहेब तुम्ही मध्येच बोलतात जेव्हा मी आपल्यामध्ये बोलतो तर तुम्ही खुप पर्सनल घेता. मी तुम्हांला विनंती करतो की आपली ही संसदीय भावना चांगली ठेवावी. आपण साहेब जर इतर महापालिकेत गेले आणि तेथे निविदा काढली तर कॉम्पीटीशनमध्ये बिलोव मध्ये पण घेतात कारण तेथे त्यांना माहित आहे की पैसे एका महिन्यात किंवा दोन महिन्यात मिळतील. आणि आपणाकडे दोन दोन वर्ष पैसे मिळत नाहीत, जो कोणी व्यापारी काम करणार आहे तो पैसे मिळण्यासाठी करणार आहे. साहेब तुम्ही आज कुठलेही काम दिले आणि त्यास टाईमबॉन्ड पैसे दिले तर आजही ५(२)(२) मध्ये नका देवु मला त्यात रस नाही. तु काम सुरु कर टेंडर तुलाही मिळणार आहे असे आपल्या पीडब्ल्युडी विभागात होते. एखादया इंजिनिअरने सांगितले की निविदा त्याच व्यक्तीला मिळत आहे, लोकांचे काम होत आहे. निविदा असो, ५(२)(२) असो त्यांना काही घेणेदेणे नाही. आपण तयारीत असायला पाहिजे. याचाही निर्णय व्हायला पाहिजे की त्या ठेकेदाराला किती दिवसात आपण पेमेंट दयायला पाहिजे. उल्हासनगरचे जे ठेकेदार आहेत त्यांचे म्हणणे आहे की ठेकेदार संपुर्ण महाराष्ट्रात १००—१०० कोटीचे काम करत आहेत. पण आपल्या येथे ते काम करण्यास तयार नाहीत. आपणाकडे पेमेंट नसल्याने आपणांस अडचण येत आहे. जर आजही तुम्ही ५(२)(२) मध्ये दयायला गेले तर मी तुम्हांला सांगत आहे की आपणांस ठेकेदार भेटणार नाही. अशी परिस्थिती आहे. मार्केटमध्ये डांबर ५० हजारपर्यंत गेले आहे. तर माझी विनंती आहे की कसेही एक

मध्यम मार्ग काढुन लोकांचे कसे काम झाले पाहिजे, हे ठेकेदार कसे काम करतील ही भावना ठेवुन पावसाळयापुर्वी कसे काम झाले पाहिजे, आपण खुप सज्ज आहात आपला एक दिवस अजुन आहे, मी आपले कौतुक करत आहे आपण खुप चांगले काम केले आहे आणि शेवटी तुमचे धन्यवाद ही करतो.

यावेळी सदस्या श्रीमती जयश्री पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. किशोर वनवारी**:—मा. महापौरजी, मी फक्त दोन शब्द बोलु इच्छितो, मागील वेळेस जेवढे ही १३.५० कोटीचे काम झाले होते त्या ठेकेदाराचा गॅरेंटी पिरियड होता. तो ८ डिसेंबरला होता, ८ डिसेंबरला माझा जन्मदिवस आहे. श्री. शितलानी साहेब होते, ज्या ठेकेदारांनी खड्डे भरले होते ते उखडुन गेले होते. तर मी म्हटले होते त्या ठेकेदाराकडुन दररोज दुरुस्ती करुन घेतली पाहिजे. ही फार गंभीर परिस्थिती आहे. जेवढे सुध्दा रस्ते आहेत ते ८० टक्के खराब झाले आहेत. तर पावसाळयात रस्ते बनविणे हा शासनाचा जीआर आहे. एक महिना आधी १० मे पर्यंत डांबरीकरण झाले पाहिजे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे** :—मध्यंतरी आचारसंहिता सुरु होती असे सांगितले ना मी. आपण तरीही सांगत आहात की १० मे पर्यंत झाले पाहिजे. मतदानाचा रिजल्ट आला आणि २७ मे ला आचारसंहिता संपृष्टात आली.

**सदस्य श्री. किशोर वनवारी** :—साहेब, आधीच टेंडर कॉल करायचे होते आणि नंतर अंतिम आपण आचारसंहितेनंतर आर्डर दिली असती ना. शहरातील खड्डे भरण्यासाठी जर निविदा लवकर काढली असती ना, दुस—या कामाची निविदा सुध्दा प्रलंबित आहे, त्या निविदा जर आधी काढल्या असत्या ना तर आचारसंहिता संपल्यावर लगेच ऑर्डर दिल्या असत्या. आणि टाईमावर खड्डे भरले गेले असते आणि मी या गोष्टीशी सहमत नाही की आयुक्त साहेबांनी येथे आल्यावर पेमेंट दिलेले नाही. त्यांचा वर्ल्ड रेकॉर्ड आहे आरटीजीएसचा. आयुक्त महोदयांनी जेवढे पेमेंट ठेकेदारांना दिले आहे तर मला नाही वाटत की आजपर्यंत कोणत्याही आयुक्तांनी एवढे पेमेंट ठेकेदारांना दिले असणार. रस्त्यावरील खड्डे भरल्यावर हे गॅरेंटी टाईमाच्या आधीच उखडले होते, आपण टाईमपास केला. आम्ही १० वेळा येथे ओरडलो होतो.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी** :—मा. महापौर महोदया, आयुक्त महोदय, आम्ही आपणांस लाचारीने विनंती करतो वारंवार कारण लोकांचा जीव गेला आहे या खड्डयांमुळे. शहरातील लोकांचा जीव गेला आहे खड्डयांमुळे, आमचे काही घेणेदेणे नाही ५ (२)(२) मध्ये, आम्ही आपणांस काही जबरदस्ती करत नाहीत, परंतु आम्ही लाचार आहोत. शहरातील जनतेचा त्रास पाहून आपणांस जे काही नियमात बसत असेल, जे काही होईल तसा पावसाळयापुर्वी खड्डे भरण्यात यावे व त्यासाठी काही मार्ग काढण्यात यावा, धन्यवाद।

**महापौर तथा पीठासीन अधिकारी**:—सन्माननिय सभागृह, मी आयुक्त महोदयांना विनंती करते की, ५ (२)(२) मध्ये खड्डे भरण्याचे काम केले जावे. कारण की शासन व कोणीही हेच म्हणतो की शहर खड्डे मुक्त झाले पाहिजे. तर साहेब, मी आपणांस आदेश देते की हे काम ५ (२)(२) मध्ये केले जावे. आणि सर्वांनी बोलण्यासाठील ५—५ मिनिटाची वेळ घ्यावी, बराच वेळ जात असतो त्यासाठी मी सांगते फक्त पाचच मिनिटे बोलावे.

**महापालिका सचिव** :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २** :— दिनांक २०/१२/२०१८ (त्यात २/१/२०१९) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौरजी, हा विषय तर पास करावा, मी हरकतीच्या मुद्दयावर एक सूचना ठेवु इच्छितो, मा. आयुक्त साहेब, काही दिवसांपुर्वी भाजी मार्केटमध्ये एक वृध्द महिला बसली होती तेथे तिच्यावर स्लॅब पडल्यामुळे तिचा मृत्यु झाला होता. आपल्या महासभेने ठराव केला होता, काही लोकांसाठी सुध्दा ज्यांचा आकस्मिक मृत्यु झाला, त्यांच्या कुटुंबियांना ५—५ लाख रुपये मदत देण्याविषयी आणि मा. महापौरजी आपण त्यास अनुमोदन सुध्दा दिले होते. परंतु अदयाप त्यांना ना कुठला चेक वगैरे मिळाला नाही.  तर मी आपणांस विचारतो, सभागृहाने म्हटले होते की अशी दुर्घटना जी झाली आहे त्यासाठी आम्ही ५—५ लाख रुपये मदत देणार, तर याविषयी जरा सभागृहात सांगावे की याबाबत का उशिर झाला.

<u>सदस्य श्री. सुमित सोनकांबळे:—</u>धन्यवाद श्री. जमनुजी, आपण चांगला विषय मांडला, मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, मागील वेळेस जी मेमसाब बिल्डींग होती. त्यात पाच लोक मृत्युमुखी पडले, तसेच सामाजीक कार्यकर्ते त्यांचा देखील मृत्यु झाला ते सुध्दा महापालिकेच्या कर्मचा—यांच्या निष्काळजीपणामुळे अपघात होवुन मृत्युमुखी पडले, काही दिवसांपुर्वी ठराव पारीत झालेला आहे.  त्यांना पाच लाख रुपये अनुदान दिले पाहिजे. परवाच्या सभेत सुध्दा मा. महापौरांनी आपणांस आदेश दिले होते की, त्यांना अनुदान मिळाले पाहिजे, त्या अनुदानाचे झाले काय? यापुर्वी महापालिकेने अशा मृत्युमुखी पडलेल्यांना अनुदान दिले आहे तर मग आता काय?  याचे उत्तर हवे आहे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>मा. महापौर महोदया, जर अशी दुर्घटना गाम्रीण भागात किंवा शहरात घडली याचा पंचनामा महसुल विभागामार्फत मा. तहसिलदार येथुन होतो, तसा अहवाल जातो त्यामध्ये कशाप्रकारची दुर्घटना आहे, त्यात मृत्युमुखी झाला असेल तर मा. मुख्यमंत्रीचा विशेष निधी असतो त्या निधीमधुन जी काही रक्कम ठरली ती दिली जाते. परंतु कायदयामध्ये तशी तरतुद नाही की त्यांना आपण ठराव करुन ५ लाख दयावे की १० लाख दयावे. ठराव करुन आपण माणुसकीच्या दृष्टीकोनातुन व आपल्या सर्वांचा आग्रह घेवुन मी शासनाकडे आजच्या आज पाठवुन देईल, शासनाचे आदेश आल्यानंतर त्यांना ती दिली जाईल, धन्यवाद।

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u>साहेब, याबाबत मी जरा सांगु इच्छितो की की हा अपघात आपल्या कारकिर्दीतच झाला आहे.  होवु शकते पुढील आयुक्त आल्यावर ते म्हणतील की माझ्यावेळेस झाले नाही कसे आहे, काय?

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>डॉक्टर साहेब, मी इतके स्पष्ट सांगीतले आहे.

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी:—</u>जरा ऐकुन घ्या साहेब......

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>मी म्हटले ना आजच्या आज पाठवितो शासनाकडे.

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी</u>:—धन्यवाद, धन्यवाद।

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>आपले म्हणणे आहे ठराव झाला आहे आजच्या आज अंमलबजावणी करा असे नाही.

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. अरुण आशान:—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, जर महासभेत कोणता ठराव पारीत करतो मग त्या ठरावाची किंमत काय? पारीत झालेल्या ठरावावर जर का प्रशासन अंमलबजावणी करत नसेल.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>एक मिनिट, मी आपल्या प्रश्नाचे उत्तर देत आहे. जर महासभेत अशासकिय ठराव असेल तर त्या ठरावावर मला अंमलबजावणी करायची की नाही तो माझा अधिकार आहे, तुम्ही माझा अधिकार हिसकावुन घेवु शकत नाही. मला यावर वाद घालायचा नाही. मी सांगितले आहे, शासनाकडे पाठवितो, शासनाला मान्य असेल तर आपण केलेला ठरावात ५—५ लाख असेल त्याप्रमाणे मदत करता येईल.

<u>सदस्य श्री. अरुण आशानः—</u>जेव्हा ठराव पारीत केला तेव्हा मा. उप—महापौर हे पीठासीन अधिकारी होते, त्यानंतर आचारसंहिता लागली तर मग काय फक्त जनतेला दाखविण्यासाठी हे ठराव होतात काय? का लोकांमध्ये दिलासा दाखविता? जे गरीब असतील तर अशी लोक मरतील, जर आपण त्यांच्याप्रती आदर ठेवु शकत नाहीत तर मग का कागद ठेवता. प्रशासन जर अशाप्रकारे आम्हांला बोलेल, आम्ही आशा करतो मग या ठरावाचा काय अर्थ होतो महापौरजी? यापुढे कोणी ठराव दिला तर त्याचे काही महत्वच नाही. २०१९ मध्ये ठराव क्र. ५७ ब हा पारीत झाला आहे आणि त्यात लिहिले आहे की इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता, मग सर्व ठराव जर का शासनाकडे जात असतील तर काय फायदा, मेलेल्या लोकांच्या टाळुवरचे लोणी खायचे काम आम्ही करणार नाही. ज्या ठरावावर अंमलबजावणी होत नसेल तर आम्ही आमच्या शिवसेना पक्षाच्यावतीने दयायचे ते देवु परंतु आपण महापौर महोदया हा ठराव पारीत केलेला आहे आणि याची अंमलबजावणी झालीच पाहिजे. शासनाकडे आतापर्यंत का नाही पाठविला? कोणाची वाट पाहत होता तुम्ही, शासन तुम्ही एवढी सुध्दा गोष्ट ऐकत नसेल तर मग त्याचा उपयोग काय? महापौर महोदया, आपणाकडे सर्व जग पाहत आहे मी सर्वांना सांगेन जर या ठरावावर पैसे नाही भेटले तर. महापौर महोदयांनी हा ठराव केला आहे फक्त लोकांना सांगण्यासाठी की आम्ही सुध्दा सहानुभुती बाळगतो, तर आम्हांला ही सहानुभुती नको आम्हांला न्याय मिळाला पाहिजे. आपण सांगा कधी शासनाकडे जाणार व कधी यांना मदत मिळणार, आम्हांला आपणाकडुन आशा आहे, आम्ही सर्व उल्हासनगर शहरातील जनतेकडुन बोलत आहे. अपघात तर होतच राहणार याचाच अर्थ आम्ही काहीच नाही? महापालिका फक्त कर वसुलीसाठी आहे. जर हा ठराव झाला आहे, महापौर महादेया मी अपेक्षाने उभा आहे, पाच मिनिटे बोलण्यासाठी आपण संमती दिली, यावर मला उत्तर दया कृपया करुन उत्तर दया.

<u>सदस्या श्रीमती कविता पंजाबीः—</u>श्री. अरुण आशानजी, मी हा ठराव आणला होता. मा. महापौरजी, आपण हा ठराव पारीत केला होता व आपण हो म्हटले होते की मी हे करणार, मला आपणाकडुन संपुर्ण आशा आहे. आधी जे प्रसंग झाले आहेत त्यांना ही मदत देण्यात आलेली आहे. याबाबत मी यादी सुध्दा दिली होती. कोणकोणत्या इमारतीत झाली आहे हे मी आपणांस लिहून दिलेले आहे.

<u>सदस्या श्रीमती शुभांगी बेहनवालः—</u>मा. महापौर, आयुक्त साहेब, श्री. अरुण आशान यांचे म्हणणे बरोबर आहे, कारण की श्री. भरत खरे यांचे जे दुःखद निधन झाले, ते मला असे वाटते आपल्या महापालिकेच्या चुकीमुळे, कारण आपण रस्त्यावर खड्डे बुजविले नाही आता सुध्दा तीच परिस्थिती आली आहे, पावसाळा जवळ आला आहे, ३० तारीख झालेली आहे. माझी एक विनंती आहे तुम्हांला, तुमची आता सेवानिवृत्ती आहे तर मग आपल्या हस्ते एक चांगले काम करु जावे. खड्डे बुजविण्याचे कार्यही लवकरात लवकर करण्यात यावे आणि आता जे श्री. अरुण साहेबांनी सांगितले आहे ते लवकरात लवकर करण्यात यावे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेबांचे म्हणणे बरोबर आहे की आपण शासनाकडे पाठविणार. यापुर्वी देखील असे विषय आले आहेत जेव्हापासुन ही महापालिका स्थापन झाली तेव्हापासुन, मा. आयुक्त महोदयांनी सर्व सभागृहाचा सन्मान ठेवुन असे कार्य केले आहे, हे काही गंभीर विषय नाहीत की शासनाकडे असे ब—याच गोष्टी जातील, जे होण्यासारखे नाही ती महासभा पारीत करते. तेव्हा अशा विषयांना शासनाकडे पाठविण्यात येते. मी आपणांस विनंती करतो की अशा विषयाकडे आपण

नम्रतेने पहावे. हा मानवतेचा विषय आहे, मा. महापौर सुध्दा या विषयावर आदेश देईल. आपण हा विषय मनावर घेवुन करुन गेलेत तर फारच चांगले होईल.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—या</u> विषयाची गंभीरता पाहुन मी आयुक्त महोदयांना आदेश देते की नियमाप्रमाणे आपण लवकरात लवकर या विषयावर उत्तर दयावे.

<u>महापालिका सचिव :—</u>इतिवृत्त पास?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> मागील सभेचे दिनांक २०/१२/२०१८ (त्यात २/१/२०१९) रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २ :—**दिनांक २०/१२/२०१८ (त्यात २/१/२०१९) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

<u>महासभा ठराव क्र. ३ ब</u>　　　　<u>दिनांक :३०/५/२०१९</u>

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक दिनांक २०/१२/२०१८ (त्यात २/१/२०१९) रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ८८ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ३:—** श्रीम. पुर्वा परशुराम इंगळे, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, विषय क्र. ३ पाासुन ते विषय क्र. १० पर्यंत सर्व वैदयकीय प्रतिपुर्तीचे विषय आहेत. तर ते पारीत करुन ११ वा विषय घेण्यात यावा. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ३ :—श्रीम. पुर्वा परशुराम इंगळे, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

**श्रीम. पुर्वा परशुराम इंगळे**, लिपिक, यांनी त्यांच्या स्व:ताच्या वैदयकिय उपचारासाठी मिरा हॉस्पिटल, कल्याण येथील खाजगी रुग्णालयात दिनांक २७/०४/२०१७ ते दिनांक ०४/०५/२०१७ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये १,३५,९३२/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी २१/११/२०१७ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. मिरा हॉस्पिटल, कल्याण हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ७५ टक्के व ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) ह्रदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक ह्रदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, **श्रीम. पुर्वा परशुराम इंगळे**, लिपिक यांच्या स्व:ताचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार—परिशिष्ट १ अ.क्र १४ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,१५,२०४/— इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४ <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजशे वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीम. पुर्वा परशुराम इंगळे, लिपिक यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,१५,२०४/—इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> मी सर्व विषय वाचते. विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ४ :—** कु. मिनाक्षी तुकाराम जोशी, लिपिक यांना वैदयकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

———————————————————————————————————————

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र.** ४:—कु. मिनाक्षी तुकाराम जोशी, लिपिक यांना वैदयकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

**कु. मिनाक्षी तुकाराम जोशी**, लिपिक, यांना त्यांच्या आईच्या वैदयकिय उपचारासाठी कालसेकर हॉस्पिटल, मुंब्रा, येथील खाजगी रुग्णालयात दिनांक ०१/०१/२०१८ ते दिनांक १४/०१/२०१८ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये १,२२,५९०/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी २३/१०/२०१८ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. आयुष हॉस्पिटल, कल्याण हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ७५ टक्के व ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिति ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) हृदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, **कु. मिनाक्षी तुकाराम जोशी**, लिपिक यांच्या आईचा आजार आकस्मिक आजारापैकी आजार—परिशिष्ट १ अ.क्र १ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,०२,५५०/— इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५ <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कु. मिनाक्षी तुकाराम जोशी, लिपिक यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,०२,५५०/—इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—** श्री. आनंदा कृष्णा काळे,लिपिक, यांना वैद्यकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:—**श्री. आनंदा कृष्णा काळे,लिपिक, यांना वैद्यकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

**श्री. आनंदा कृष्णा काळे,लिपिक,** यांना वैदयकिय उपचारासाठी फोर्टीज हॉस्पिटल, मुलुंड येथील खाजगी रुग्णालयात दिनांक २५/३/२०१६ ते दिनांक ३/१२/२०१६ या कालावधीत कॅन्सर या आजारावर उपचार करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये ९,६८,१५४/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी ०२/०७/२०१७ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुज्ञेय ठरतो. आयकॉन हॉस्पिटल,डोंबिवली हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ७५ टक्के व ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव कमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) हृदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॅस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णालयाकडुन अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, **श्री. आनंदा कृष्णा काळे, लिपिक** यांचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार हा अ.क्र ५ या आजारामध्ये मोडतो. त्यांनी सदर आजाराच्या उपचारासाठी १,५०,०००/— अग्रीम घेतलेली आहे. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. ७,११,६६६/— रक्कम मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६ <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. आनंदा कृष्णा काळे,लिपिक, यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये ७,११,६६६/—इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री यांना वैद्यकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

---

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६:—**श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री यांना वैद्यकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, विद्युत विभाग यांना त्यांच्या आईच्या वैद्यकीय उपचारासाठी टाटा स्मारक केंद्र हॉस्पीटल, परेल, मुंबई येथे दिनांक ५/७/१८ रोजी दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रुपये १,००,८७३/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय परतावा बिल जोडले आहते. त्यानुषंगाने त्यांनी दिनांक १६/४/२०१८ रोजीच्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, यांच्या आईचा आजार सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. एमएजी—२००५/९/प्र.क्र. १/आरोग्य —३ दिनांक १९ मार्च, २००५ च्या सहपत्रातील परिशिष्ट अ मध्ये गंभीर आजार— भाग २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे गंभीर आजारापैकी अनुक्रमांक ५ वर मोडतो. तसेच, आकस्मिक परिस्थितीत . मा. टाटा स्मारक केंद्र, मुंबई या शासकीय रुग्णालयात औषधोपचार केला आहे .

शासन निर्णयानुसार श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, यांना एकुण खर्चाच्या १०० टक्के इतकी वैयक्तिक खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे. त्यानुषंगाने त्यांना झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम रुपये १,००,८७३/— इतकी असून महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ मधील नियम ५ टिप—२ नुसार १०० टक्के प्रतिपुर्ती देय आहे.

दिनांक १६/३/२०१६ रोजीच्या टिपणीनुसार रुपये १,००,०००/— पर्यंतची वैद्यकीय प्रतिपुर्तीचे प्रस्ताव मा. आयुक्त सो., यांचे स्तरावर व शासन निर्णय क्र. २०१२/प्र.क्र. ३३३/११/राकावि—२दिनांक १६/११/२०११ अन्वये १,००,०००/—पुढील प्रस्ताव मा. महासभेच्या मंजूरीने पाठविणेचे आदेश देण्यात आलेले आहेत.

श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री, यांना शासन निर्णयानुसार रुपये १,००,८७३/— इतकी वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्तीची रक्कम मा. महासभेच्या मंजुरीसाठी व मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ७ दिनांक:—३०/५/२०१९

सुचकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. अविनाश सुधाकर दुसाणे, तारतंत्री यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,००,८७३/—इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ७ :— श्री. संतोष सुभाष तरे, फायरमन यांना वैद्यकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ७:—श्री. संतोष सुभाष तरे, फायरमन यांना वैद्यकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

प्रस्तावना

श्री. संतोष सुभाष तरे, फायरमन, विद्युत विभाग यांना त्यांच्या स्वत:च्यावैद्यकीय उपचारासाठी पीडी हिंदूजा हॉस्पीटल, मुंबई येथे दिनांक १८/४/१८ ते २४/४/२०१८ रोजी दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रुपये १,५०,४९५/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय परतावा बिल जोडले आहते. त्यानुषंगाने त्यांनी दिनांक ०६/९/२०१८ रोजीच्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

श्री. संतोष सुभाष तरे, फायरमन, यांच्या स्वत:च्याआजार सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. एमएजी—२००५/९/प्र.क्र. १/आरोग्य —३ दिनांक १९ मार्च, २००५ च्या सहपत्रातील परिशिष्ट अ मध्ये गंभीर आजार— भाग २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे गंभीर

आजारापैकी अनुक्रमांक ५ वर मोडतो. तसेच, आकस्मिक परिस्थितीत पीडी हिंदूजा हॉस्पीटल, मुंबई या खाजगी रुग्णालयात औषधोपचार केला आहे .

शासन निर्णयानुसार श्री. संतोष सुभाष तरे, फायरमन, यांना एकुण खर्चाच्या ९० टक्के इतकी वैयक्तिक खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे. त्यानुषंगाने त्यांना झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची रक्कम रुपये १,५०,४९५/— इतकी असून शासन निर्णयानुसार त्यांना रुपये १,३०,२२३/— इतकी अनुज्ञेय ठरते.

दिनांक १६/३/२०१६ रोजीच्या टिपणीनुसार रुपये १,००,०००/— पर्यंतची वैद्यकीय प्रतिपुर्तीचे प्रस्ताव मा. आयुक्त सो., यांचे स्तरावर व शासन निर्णय क्र. २०१२/प्र.क्र. ३३३/११/राकावि—२दिनांक १६/११/२०११अन्वये १,००,०००/—पुढील प्रस्ताव मा. महासभेच्या मंजूरीने पाठविणेचे आदेश देण्यात आलेले आहेत.

श्री. संतोष सुभाष तरे, फायरमन, यांना शासन निर्णयानुसार रुपये १,३०,२२३/— इतकी वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्तीची रक्कम मा. महासभेच्या मंजुरीसाठी व मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र: ८</u> <u>दिनांकः—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. संतोष सुभाष तरे, फायरमन यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,३०,२२३/—इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** श्री. श्याम लक्ष्मण सिंग, मुकादम यांना त्यांच्या आईच्या उपचारार्थ वैद्यकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ८:—**श्री. श्याम लक्ष्मण सिंग, मुकादम यांना त्यांच्या आईच्या उपचारार्थ वैद्यकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

श्री. श्याम लक्ष्मण सिंग, मुकादम, यांची आई श्रीम. किरणबाला लक्ष्मण सिग यांना वैदयकिय उपचारासाठी ॲडवान्स अर्थोपेडिक हॉस्पिटल, उल्हासनगर– ४, येथील खाजगी रुग्णालयात दिनांक ३०/०४/२०१६ ते दिनांक ०७/०५/२०१६ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये १,२६,३४६/– इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी २७/०७/२०१६ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र–२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/–२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुज्ञेय ठरतो. आयकॉन हॉस्पिटल,डोंबिवली हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ७५ टक्के व ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा–यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) ह्रदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक ह्रदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णालयाकडुन अंकित करण्यात येणा–या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. श्याम लक्ष्मण सिंग, मुकादम यांची आईचा आजार शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक १९/१२/१९९२ च्या अंतभुत असलेल्या आकस्मिक आजारातील यादीपैकी अ.क्र ५ या आजारामध्ये मोडतो. सदर आजाराच्या उपचारासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही.

त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,०७,०२९/– रक्कम मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९ <u>दिनांक:–३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :– श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. श्याम लक्ष्मण सिंग, मुकादम यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,०७,०२९/–इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ९ :–** श्री.श्याम व्ही. शर्मा, लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

————————————————————————————————————

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९:—श्री.श्याम व्ही. शर्मा,** लिपिक यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

**श्री.श्याम व्ही. शर्मा**, लिपिक, यांना त्यांच्या स्व:ताच्या वैदयकिय उपचारासाठी फोर्टीज हॉस्पिटल, कल्याण, येथील खाजगी रुग्णालयात दिनांक ०२/०९/२०१८ ते दिनांक १०/०९/२०१८ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये ८,६३,००१/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी २४/१०/२०१८ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क.वैखप्र—२०११/प्र.क.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. फोर्टीज हॉस्पिटल, कल्याण हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ९० टक्के व १०० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) ह्रदयविकारावरील उपचार (२) उपमार्गसाचक ह्रदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४) मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, **श्री.श्याम व्ही. शर्मा**, लिपिक, यांचा आजार आकस्मिक आजारापैकी आजार—परिशिष्ट १ अ.क्र १ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी १,५०,०००/— अग्रीम घेतलेली आहे. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. ७,७९,८५१-१,५०,०००=६,२९,८५१/— इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र: १०</u> <u>दिनांक:— ३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. शंकर लुंड
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री.श्याम व्ही. शर्मा, लिपिक यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये ६,२९,८५१/—इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :—** श्री. सुरेश मरळे, लि. फायरमन, यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १०:—श्री. सुरेश मरळे,** लि. फायरमन, यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

प्रस्तावना

**श्री. सुरेश मरळे,** लि. फायरमन, यांना त्यांच्या आईच्या वैदयकिय उपचारासाठी परद हॉस्पिटल, सांगली, येथील खाजगी रुग्णालयात दिनांक २७/०२/२०१८ ते दिनांक १०/०३/२०१८ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये १,२६,५१७/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी १६/०५/२०१८ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. परद हॉस्पिटल, सांगली, हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) ह्रदयविकारावरील उपचार (२) उपमार्गसाचक ह्रदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॅस्टी (४) मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, **श्री. सुरेश मरळे,** लि. फायरमन, यांच्या आईचा आजार आकस्मिक आजारापैकी आजार—परिशिष्ट १ अ.क्र १ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतेही रक्कम अग्रीम घेतलेली नाहि. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,१३,४९७/— इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ११ दिनांक:—३०/५/२०१९

सुचकाचे नाव :— श्री. शंकर लुंड
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. सुरेश मरळे, लि. फायरमन, यांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,१३,४९७/—इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—मी यापुर्वी सूचना देवु इच्छिते की प्रभाग समिती २ व ५ मध्ये पोट निवडणूका चालु आहे, धोरणात्मक असे काही विषय आले तर आपण निर्णय घेवु शकत नाहीत.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—मा. महापौरजी, आता जे वैदयकीय प्रतिपुर्तीचे विषय क्र. २ ते १० झाले ते इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावेत. कारण दोन महिने आचारसंहिता होती. तर हे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अंतिम समजण्यात यावे.

<u>महापालिका सचिव:—</u>विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. दिपक राजकुमार लोट यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

---

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**पास, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ११**:—उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. दिपक राजकुमार लोट यांच्या भरतीबाबत शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत लाड कमिटीच्या शिफारशीनुसार श्रीम. संतरा राजकुमार लोट, सेवा निवृत्त सफाई कामगार, यांच्या रिक्त जागी नेमणुक मिळण्याबाबत त्यांचा मुलगा श्री. दिपक राजकुमार लोट, यांनी विनंती अर्ज केला आहे त्यांचे दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांचे शिक्षण १ ली पास असे आहे. उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या पदासाठी लागणारी अर्हता खालील प्रमाणे आहे.

अ) इयत्ता ४ थी पास

ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक

शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२००२/१९५२/प्र.क्र.६५/२००२/१६—ब, दिनांक १/१०/२००३ मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे.

लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय/निमशासकीय मंडळे/महामंडळे/स्वायत्त संस्था/महानगरपालिका/नगर परिषद/नगरपालिका/खाजगी संस्था तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर, वाल्मिकी समाजाच्या उमेदवारांची नोकरभरती करताना त्यांच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भसल्यास त्यांचे सेवाभरतीचे नियम शिथील करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

लाड कमिटीचा मुळ उद्देश कुटुंबावर आलेले संकट उपासमार टाळणे असा आहे.

तरी, श्री. दिपक राजकुमार लोट, यांची शैक्षणिक अर्हता सेवा शर्ती नियमावलीनुसार नसल्याने उपरोक्त शासन निर्णयानुसार शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करणेसाठी मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १२ <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. अजित गुप्ता

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिना सोनेजी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगार श्री. दिपक राजकुमार लोट यांचीशासन निर्णयानुसार शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १२ :—** महापालिका आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी यांच्या भत्त्यात वाढ होणेस मान्यता मिळणे.

————————————————————————————————————————

<u>**काही सदस्य :—**</u>पास—पास......

<u>**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १२:—**महापालिका आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी यांच्या भत्त्यात वाढ होणेस मान्यता मिळणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. अध्यक्ष, अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस यांनी महापालिका आसीापनेवरील कर्मचारी/अधिकारी यांच्या भत्यात वाढ होणेबाबत वारंवार मागणी होत आहे.

ठाणे जिल्हातील विविध महापालिकेकडुन अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येणा—या विविध भत्त्यांबाबत माहिती घेतली असुन सदर माहिती सोबत जोडली आहे.

सध्या उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर खालीलप्रमाणे भत्ते देण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने इतर महानगरपालिकांची व उल्हासनगर महानगरपालिका देत असलेले भत्ते यांची माहिती पडताळणी करुन खालील नमुद प्रमाणे भत्ते देणे करीता प्रस्ताव तयार करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | भत्त्याचा तपशिल | सध्या देण्यात येणारे भत्ते रु. | प्रस्तावित भत्ते | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | घाणकाम भत्ता प्रतीमहा | रु. २००/— | रु. ३००/— | सफाई कामगार व सफाई मुकादम यांना घाणकाम भत्ता देण्यासाठी प्रस्तावित. |
| २ | प्रवास भत्ता प्रतीमहा | रु. ४००/— | रु. ५००/— | महापालिकेमध्ये सर्व कार्यरत अधिकारी/कर्मचारी |
| ३ | वैद्यकीय भत्ता प्रतीमाह | रु. १००/— | —— | वैद्यकीय प्रतिपुर्ती देण्यात येत आहे. |
| ४ | प्रवास भत्ता प्रती वर्षी (एल.टी.ए.) | रु. १८००/— | रु. २०००/— | महापालिकेमध्ये सर्व |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | कार्यरत अधिकारी/कर्मचारी |
| ५ | सर्व सफाई कामगार/सफाई मुकादम शिलाई भत्ता | पुरुष रु. ६००/— | रु. ६००/— | सर्व सफाई कामगार व सफाई मुकादम यांना शिलाई भत्ता देय |
| | | स्त्री रु. २५०/— | रु. ४००/— | |
| ६ | सर्व वर्ग—४ मधील विविध संवर्गातील कर्मचारी यांना शिलाई भत्ता | पुरुष रु. २००/— | रु. ६००/— | सर्व वर्ग—४ मधील विविध संवर्गातील कर्मचारी यांना शिलाई भत्ता |
| | | स्त्री रु. १५०/— | रु. ४००/— | |

वरील भत्ते वाढविण्याकरीता मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: १३ दिनांक:—३०/५/२०१९

सुचकाचे नाव :— श्रीमती मिना आयलानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिना सोनेजी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिका आस्थापनेवरील कर्मचारी/अधिकारी यांच्या भत्त्यात वाढ करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३ :—शैक्षणिक अर्हता धारण न करणाऱ्या सफाई कामगार संवर्गातील कर्मचाऱ्यांना एकच पदावर १२/२४ वर्ष झाल्याने कालबध्द पदोन्नतीचा लाभ देणेबाबत.**

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ विषय क्र. १३ :—शैक्षणिक अर्हता धारण न करणाऱ्या सफाई कामगार संवर्गातील कर्मचाऱ्यांना एकच पदावर १२/२४ वर्ष झाल्याने कालबध्द

पदोन्नतीचा लाभ देणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर सफाई कामगार या पदावर काम करण्या—या शैक्षणिक अर्हता धारण न करणाऱ्या सफाई कामगार संवर्गातील कर्मचाऱ्यांना एकच पदावर १२/२४ वर्ष झाल्याने कालबध्द पदोन्नतीचा लाभ दिलेला नाही.

शासन निर्णय क्र.एसआरव्ही—१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ८ जून १९९५ नुसार गट 'क' व 'ड'(वर्ग— ३ व ४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीता घालविण्यासंबंधी योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजनेचे प्रमुख्य वैशिष्टे व अंमलबजावणी कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

अ) ही योजना १ ऑक्टोंबर १९९४ पासुन अंमलात येईल.

ब) या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीसाठी विहित कार्यपध्दती ज्येष्ठता, पात्रता, अर्हता परीक्षा, विभागीय परीक्षा या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

क) सरळ सेवेने प्रविष्ट झालेल्या आथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचा—यांच्यामधील एकवेळ या योजनेअंतर्गत १२ वर्षानंतरच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय असेल.

ड) ज्या कर्मचा—यांना यापूर्वी दोन पेक्षा जास्त पदोन्नती मिळाल्या आहेत अशा कर्मचा—यांना या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणार नाही.

ई) गट 'ड' मधील कर्मचा—यांना या योजनेअंतर्गत गट 'क' मधील वेतनश्रेणी म्हणजे रू. ९५०—१४०० दिली तरी त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० हेच असेल. मात्र गट ''क'' मधील अन्य वरिष्ठ पदांवर त्यांना पदोन्नती मिळाल्यास त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे राहील गट 'क' मधील पदधारकांना गट ब मधील राजपत्रित पदावर पदोन्नती देण्यासाठी या योजनेअंतर्गत विचार केला जाणार नाही.

फ) या पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे वेतननिश्चितीत लाभ देण्यात येईल. मात्र वेतननिश्तिीत मिळालेला हा लाभ त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

न) जर कर्मचा—यांस विशेष्ज्ञ वेतन मिळत असेल तर या योजने खालील पदोन्नतीनंतर कर्मचा—यास मूळ वेतनश्रेणीतील विशेष्ज्ञ वेतन अनुज्ञेय रहाणार नाही.

ग) या योनेअंतर्गत पदोन्नती मिळाली तरी कर्मचा—यांचे नाव कनिष्ठ (मूळ) संवर्गाच्या ज्येष्ठता ययादीत राहील. आणि सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार उपलब्ध रिक्ततेत योग्यवेळी नियमित पदोन्नतीसाठी (Functional Promotion) त्याचा विचार करण्यात येईल. नियमित पदोन्नतीस अपला ठरलेल्या कर्मचा—यास या पदोन्नतीचा लाभ मिळू शकणार नाही. या अधिच त्यांना (In-Sity) पदोन्नती दिली असल्यास मुळच्या पदावर पदावनत करण्यात येईल. तशा असल्याचे बंधपत्र कर्मचा—यांना लिहुन द्यावे लागेल. मात्र देण्यात आलेल्या आर्थिक लाभांची वसुली केली जाणार नाही.

## परिशिष्ट

| अ.क्र. | शासन निर्णय/ मा. महासभा ठराव क्र. /कार्यालयीन आदेश | निर्णय |
|---|---|---|
| १ | शासन निर्णय क्र. एसआरव्ही/१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दिनांक ८ जून,१९९५ | गट 'क' व 'ड'(वर्ग— ३ व ४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासंबंधी योजना लागू करण्यात आली आहे. |
| २ | शासन निर्णय क्र. एसआरव्ही/१०९६/प्र.क्र. ३३/९५/बारा, दिनांक २० मार्च,१९९७ | गट 'क' व 'ड'(वर्ग— ३ व ४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासंबंधी योजना लागू करण्यात आली असुन सदर योजनेच्या मुद्यांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. |
| ३ | शासन निर्णय क्र. वेतन—११०९/प्र.क्र. १/०९/सेवा—३,दि. १५/१०/२००९ | कालबध्द/सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना विहित मुदतीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या कर्मचा—यांना लाभ अनुज्ञेय करण्याच्या संदर्भात सुधारीत स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. |
| ४ | शासन निर्णय क्र. वेतन—११०९/प्र.क्र. ४४/सेवा—३, दि. १ एप्रिल, २०१० | राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत पहिल्या लाभ व दुसऱ्या लाभाबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. |
| ५ | शासन निर्णय क्र. वेतन—११०९/प्र.क्र. १/सेवा—३, दिनांक २१ मे, २०१० | कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना विहित मुदतीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या कर्मचा—यांना लाभ अनुज्ञेय करण्याच्या संदर्भात स्पष्टीकरण. (वरिष्ठ वेतनश्रेणीचे लाभ अनुज्ञेय |

| | | |
|---|---|---|
| | | केल्यानंतर वेतननिश्चिती करताना वरिष्ठ वेतनश्रेणीचे लाभ अनुज्ञेय केल्याच्या दिनांकापासुन या आदेशाच्या दिनांकापर्यंत काल्पनिक वेतननिश्चिती करून प्रत्यक्ष लाभ या आदेशाच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १५/१०/२००९ पासुन देण्यात यावेत. परंतु दिनांक १५/१०/२००९ पूर्वीची थकबाकी अनुज्ञेय होणार नाही. |
| ६ | शासन निर्णय क्र. वेतन–११०९/प्र.क्र. ४१/सेवा–३, दिनांक ५ जुलै, २०१० | सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना एकाकी पदांना लागू करण्याबाबत. |
| ७ | शासन निर्णय क्र. वेतन–१ १११/प्र.क्र. ८/सेवा–३,दिनांक १ जुलै, २०११ | सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसंदर्भातील मुद्यांचे स्पष्टीकरण |
| ११ | शासन निर्णय क्र.आप्रयो/१०१४/प्र.क्र. २१/सेवा–३, दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ | पदोन्नतीच्या संधी नसलेल्या म्हणजेच एकाकी पदांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करणेबाबत. |

उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार सफाई कामगार या संवर्गाची शैक्षणीक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

**अ) इयत्ता ४ थी पास**

**ब) मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक**

तसेच सफाई कामगार संवर्गात पदोन्नती साखलीतील पद हे सफाई मुकादम असुन उल्हासनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

**अ) इयत्ता ७ वी उत्तीर्ण**

**ब) महापालिकेच्या आस्थापनेवरील सफाई कामगार पदाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव**

सुमारे ४६३ सफाई कामगार हे पदोन्नतीसाठी लागणारी अर्हता पुर्ण करीत नाहीत.

शासन निर्णय क्र. वेतन–११०९/प्र.क्र.४१/सेवा–३, दिनांक ५ जुलै, २०१० नुसार सफाई कामगार या संवर्गाला एकाकी पद संबोधल्यास सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ कर्मचाऱ्यांना देता येईल.

सफाई कामगार संवर्गाची वेतनसंरचनारू. ४४४०–७४४०, ग्रेड वेतन रू. १३०० असुन एकाकी पदांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतन १३००+३०० असे होईल.

सफाई कामगार या संवर्गाला वरिष्ठ वेतन श्रेणीतील पदोन्नती साखळीतील सफाई मुकादम हे पद आहे. महापालिका आस्थापनेवर सफाई मुकादमया संवर्गाचे सेवा प्रवेश नियम १०१५ मध्ये अ) इयत्ता ७ वी उत्तीर्ण ब) महापालिकेच्या आस्थापनेवरील सफाई कामगार पदाचा किमान ०५ वर्षाचा अनुभवअशी अर्हता असल्याने सफाई कामगार या संवर्गातील कर्मचा–यांमधील अशिक्षीत कामगाराना १२ वर्षे व २४ वर्षे आश्विासीत प्रगती योजनेचा लाभ देता येत नाही.या करीता उपरोक्त नमुद सेवा प्रवेश नियमामधील अट शिथिल करणे करीता शासनाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मा. महासभेमध्ये चर्चा करून निर्णय घेणेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र: १४ दिनांक:–३०/५/२०१९

सुचकाचे नाव :– श्रीमती मिना आयलानी
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मिना सोनेजी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण न करणाऱ्या सफाई कामगार या संवर्गातील कर्मचा–यांमधील १२ वर्षे व २४ वर्षे आश्विासीत प्रगती योजनेचा लाभ देता येत नाही.या करीता उपरोक्त नमुद सेवा प्रवेश नियमामधील अट शिथिल करणे करीता शासनाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १४ :—** वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना करणे.

---

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**या विषयास वगळण्यात यावे.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १४:—वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१७ नंतर महासभा ठराव क्रमांक ६, दिनांक २४/४/२०१७ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना करण्यात आली होती. यापूर्वी देखील वृक्ष प्राधिकरणाची स्थापना करताना महापालिकेचे सदस्यच नेमण्यात आले बिनसरकारी संघटनेचे सदस्य घेण्यात आले नाही.

तथापि उपरोक्त विषयांकित संदर्भाधीन मा. न्यायालयाच्या आदेशान्वये सदर समिती कायदेशीररित्या गठित नाही. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम, २००९, सह शासन आदेश, अधिसूचनेन्वये आपणांस सविनय सादर करण्यांत येते की, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ यामधील प्रकरण दोन वृक्ष प्राधिकरणाची स्थापना व कार्यपध्दती यामध्ये कलम ३ (१) अन्वये वृक्षप्राधिकरणाची स्थापनेनुसार ''कोणत्याही नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आणल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरण आपल्या सदस्यांमधून ते प्राधिकरण ठरवील अशा रितीने आणि अशा मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या, (अध्यक्ष आणि इतर यांसह) कमीत कमी पाच आणि जास्तीत जास्त पंधरा व्यक्तींचे मिळून बनलेले एक वृक्ष प्राधिकरण घटित करील.'' अशी तरतुद आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये बिनसरकारी संघटनेचे सदस्य घेणे व पालिका सदस्यामधून उच्च शिक्षीत व याविषयी अनुभव असणा—यास प्राधान्य देणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक वृक्ष प्राधिकरणास ज्यांना वृक्षांचे रोपण आणि जतन या क्षेत्रातले विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनांच्या प्रतिनिधींना वृक्ष प्राधिकरणाचे सदस्य म्हणुन नामनिर्देशित करता येईल. अशी तरतुद आहे

तसेच मा उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ९३/२००९, दिनांक २०/९/२०१३ मध्ये बिनसरकारी संघटनेमधून नामर्निदेशित सदस्य घेताना काही मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

१. कृषी/वन/उदयान विदया/विषयाची पदवी किंवा डिप्लोमा तसेच शास्त्र शाखेची पदवी किंवा पदविका असणा—यांना प्राधान्य
२. वृक्षांची लागवड/संवर्धन/स्थलांतरण आधि/क्षकऐवा पर्यावरण सुरक्षा विषयाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असलेल्या पात्र व्यक्तिंना प्राधान्य
३. वृक्ष प्राधिकरणावर बिनसरकारी संघटनांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत बिनसरकारी संघटनेचा सक्रिय सदस्य असणे आवश्यक आहे.
४. वृक्षांचे रोपण, जतन व पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील विशेष ज्ञान व पाच ते दहा वर्षे अगर अधिक प्रत्यक्ष अनुभव
५. राष्ट्रीय पातळीवर कार्यरत बिनसरकारी संघटनांना (प्राधान्य)
६. नामनिर्देशित सदस्य स्वतंत्र बिनसरकारी संघटनेचा प्रतिनिधी असावा.

तरी मा. उच्च न्यायालयाचे आदेश व नियमाची तरतूद पहाता वृक्षप्राधिकरण नव्याने स्थापन करुन ९ लोकप्रतिनिधी व उवर्रित नामनिर्देशित सदस्य घेणेस महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: १४ अ दिनांक:—१५/२/२०१९

सुचकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका नागरी क्षेत्रासाठी वृक्षप्राधिकरणाची पुर्नस्थापना करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :—** दिनांक ०७/०१/२०१९ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीने दिलेल्या मान्यतेनुसार कार्यवाही करणे.

---

सदस्य श्री. राजेश वदारिया :—कोणता क्रमांकाचा विषय आहे,

महापालिका सचिव:—विषय क्र. १५ आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—ठिक आहे, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

काही सदस्य :—पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १५:—**दिनांक ०७/०१/२०१९ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीने दिलेल्या मान्यतेनुसार कार्यवाही करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग—४ मधील विविध संवर्गातील कर्मचारी यांना लिपीक या संवर्गात पदोन्नती देण्याबाबत जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/०३/१९, दिनांक०१/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये विभागीय पदोन्नती समितीची दि. ७/१/२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. आयुक्त यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्यांचे पदनाम | पदनाम | उपस्थित/अनुपस्थित |
|---|---|---|---|
| १ | श्री. अच्युत हांगे,<br>मा. आयुक्त | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | श्री. संतोष देहेरकर,<br>उप आयुक्त (मुख्यालय) | सदस्य | उपस्थित |
| ३ | श्री. विकास चव्हाण<br>मुख्य लेखा अधिकारी | विशेष निमंत्रित सदस्य | उपस्थित |
| ४ | श्री. विनायक फासे,<br>मुख्य लेखा परिक्षक, | सदस्य | उपस्थित |
| ५ | जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | सदस्य | अनुपस्थित |
| ६ | प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य | अनुपस्थित |
| ८ | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | श्री. मनिष हिवरे,<br>सहा. आयुक्त (साप्रवि) | सदस्य सचिव व नियंत्रक व मागासवर्गीय सदस्य | उपस्थित |
| १० | श्री. अच्युत सासे, मुख्य लिपीक विभाग प्रमुख, | सदस्य | उपस्थित |
| ११ | अल्पसंख्यांक प्रतिनिधी<br>श्रीम. नर्गिस खान, लिपीक | सदस्य | उपस्थित |

१) उल्हासनगर महानगरपालिकामध्ये अनेक वर्ष पदोन्नतीबाबत अंतिम निर्णय होत नसल्याने, कर्मचारी व कर्मचारी संघटना यामध्ये असलेली नाराजी विचारात घेउन, त्याअनुशंघाने बैठकीतचर्चा होऊन, वर्ग—४ मधील विविध संवर्गातील कर्मचारी यांना कनिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देणे या विषया व्यतिरिक्त, खालील विषय मान्यतेसाठी ठेवण्याचेश्री. अच्युत हांगे, अध्यक्ष, विभागीय पदोन्नती समिती तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सदस्य सचिव व निमंत्रक यानानिर्देश दिले.

२) सफाई कामगार या संवर्गामधून सफाई मुकादम या पदावर पदोन्नती देण्याबाबत.

३) वर्ग— ४ मधिल विविध संवर्गातील पात्र कर्मचा—यामधुन नळ जोडारी या पदावर पदोन्नतीदेण्याबाबत.

४) श्रीमती श्रध्दा सपकाळ, प्रोग्रामर यांना सिस्टीम ॲनलिस्ट या पदावर पदोन्नती देणे.

**सदर बैठकीमध्ये सदस्य सचिव व नियंत्रक यानी पदोन्नतीसाठी आवश्यक लागणा—या बाबी खालीलप्रमाणे सादर केल्या आहेत.**

१) शासनाकडील युएमसी—२५१३/प्र.क्र.८७३/नवि—२१, दिनांक २४/३/२०१५ च्या पत्रानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत उल्हासनगर सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१५.

२) मा. सहा. आयुक्त (मावक), कोकण भवन, नवि मुंबई यांचेकडील **दिनांक ३१/८/२०१६** रोजी सा.प्र.विभाग शासन निर्णय बीसीसी/१०९३/२१६७/सीआर—१४१/९३/१६ ब, दिनांक १ सप्टेंबर १९९७ नुसार तपासलेली बिंदुनामवली नोंद वही.

३) अधिकारी/कर्मचाऱ्यांचे शैक्षणिक अर्हता व विभागीय चौकशी/निलंबनाबाबत माहिती.

४) वर्ग—४ मधील विविध संवर्गातीलदि. १ जानेवारी, २०१६ ची अंतिम सेवा ज्येष्ठता यादी.

५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही २००२/प्र.क्र.२०/०२/१२, दिनांक २३/१२/२००२ अन्वये वर्ग– ४ मधील संवर्गातील कर्मचारी यांना गोपनीय अहवाल लागू नसल्याबाबतचे शासन निर्देश.

६) पदोन्नती विचार क्षेत्रातील कर्मचारी यांचे सेवा विषयक बाबी तपासल्या असता त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू अथवा निलंबन नाही या बाबत खातर जमा केलीबाबतची माहिती.

७) आरक्षणे संदर्भातील शासन आदेश –– बीसीसी–२०१७/प्र.क्र.३१२ A/१६–ब, दिनांक २९ डिसेंबर, २०१७व पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/२०१५ वर दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर सूचना.

## सिस्टीम ॲनलिस्ट

१. पदोन्नती आरक्षणानुसार मंजूर पदे भरलेली पदे व रिक्त पदांबाबत दि.१/१/२०१८ माहिती.

- पदनाम :– सिस्टीम ॲनलिस्ट
- मंजर पदे :– ०१
- सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार पदोन्नती भरतीचे प्रमाण :– नामनिर्देशन/पदोन्नती
- पदोन्नती पदे :– १
- रिक्त पदे :– ०१
- सेवा प्रवेश नियम:– प्रोग्रामर/कनिष्ठ अभियंता (संगणक) संवर्गातील किमान ५ वर्षाची नियमित सेवा.
- वेतनश्रेणी :– रू ९३००–३४८००, ग्रेडपे ४४००
- सदर पद एकाकी असल्याने आरक्षण लागू नाही.

२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही २००२/प्र.क्र.२०/०२/१२, दिनांक २३/१२/२००२ अन्वये गट – क मधील ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रू. ३४८०० पर्यंत आहे. त्या पदावरील पदोन्नतीसाठी ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची प्रतवारी किमान ब+ म्हणजेच निश्चित चांगला अशी असावी.

३. विचारक्षेत्रातील कर्मचा–यांची ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी समितीने एकमताने निश्चित करून प्रढीलप्रमाणे एकमताने निर्णय घेणेसाठी प्रस्तावित.

सर्वधाधारण (खुला) प्रवर्गातील ०१ पदे रिक्त

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीम. श्रध्दा सपकाले | यांचे ५ वर्षाचे गोपनीय अहवालाची प्रतवारी अ+ अशी आढळून आल्याने ते पदोन्नतीस पात्र आढळले. |
| २ | श्री. संतोष लोणे | यांचे ५ वर्षाचे गोपनीय अहवालाची प्रतवारी अ+ अशी आढळून आल्याने ते पदोन्नतीस पात्र आढळले. |

४. दिनांक १/१/२०१६ अंतिम सेवा ज्येष्ठता यादी दिनांक २५/५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेले नाहीत.

५. उपरोक्त दोनच कर्मचारी पदोन्नतीच्या विचार क्षेत्रात येत असल्यामुळे प्रतिक्षा सुचिमध्ये ज्येष्ठतानुक्रमाने पदांच्या संख्येच्या तिप्पट(१:३) कर्मचाऱ्यांचा विचारक्षेत्रात (Zone of consideration) समावेष करण्यात आलेला नाही.

६. प्रोग्रामर/कनिष्ठ अभियंता (संगणक) संवर्गातील गट – २ मधून वरिष्ठ वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्याबाबत विचार क्षेत्रातील उपरोक्त कर्मचारी यांची शैक्षणिक अर्हता व इतर माहिती खालील प्रमाणे.

**सर्वधाधारण (खुला) प्रवर्गातील ०१ पदे रिक्त**

| अ.क्र. | प्रोग्रामर/कनिष्ठ अभियंता (संगणक) संवर्गातील किमान ५ वर्षाची नियमित सेवा झालेले उमेदवार | दिनांक १/१/२०१६ अंतिम सेवा ज्येष्ठता यादीतील सेवा ज्येष्ठता क्रमांक | शैक्षणिक अर्हता | वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे का ? |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम श्रदा सपकाले | प्रोग्रामर संवर्गातील सेवा ज्येष्ठता क्र. १ | पदवी इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरींग | लागू नाही |
| २ | श्री. संतोष लोणे | कनिष्ठ अभियंता (विद्युत/संगणक) | डिप्लोमा इन कम्प्युटर टेक्नॉलॉजी,एल.जी.एस | लागू नाही |

उपरोक्त तक्तयाप्रमाणे श्रीम. श्रदा सपकाले, प्रोग्रामर या प्रोग्रामर/कनिष्ठ अभियंता (संगणक) संवर्गातील गट—२ मधून सिस्टीम ॲनलिस्ट या पदावर पदोन्नतीसाठी सेवाजेष्ठतेनुसार पात्र ठरत असल्याने विभागीय पदोन्नती समिती ने त्यांची शिफारस करणेबाबत एकमताने निर्णय घेतला आहे.

सिस्टीम ॲनलिस्ट हे पद वर्ग—२ चे असलयाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिय ५३ (१) अन्वये सहा. आयुक्त किवा समतुल्य व त्यापेक्षा उच्च दर्जाच्या अधिकारी संवर्गावरील पदांची नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा असुन सदरचा प्रस्ताव मा. महासभेसमोर ठेवण्यासाठी निवड समिती शिफारस करत आहे.

विभागाने सादर केलेल्या कागदपत्र व सेवाजेष्ठता यादी आधारे लिपीक, सफाई मुकादम, नळ कारागीर,सिस्टीम ॲनलिस्ट या चार पदावर, विभागीय पदोन्नती समितीने पदोन्तीने नियुक्त करणेबाबत एकमताने शिफारस केलेली आहे. सामान्य प्रशासन विभागाने प्रत्यक्ष पदोन्नती आदेश देत असताना पुनश्च शासन निर्णय/निर्देश व संबंधीत नियमातील तरतूदीप्रमाणे तपासणी करून नियुक्त आदेश निर्गमित करावेत.

एकादा कर्मचारी पात्र असूनही त्याचे नाव शिफारसीमध्ये/सेवाजेष्ठता यादीत नसल्यास, त्याची पडताळणी करून पदोन्नतीसाठी सुधारीत निवड सूची करण्याचे अधिकार मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका याना असतील.

श्रीम. श्रदा सपकाले, प्रोग्रामर या प्रोग्रामर/कनिष्ठ अभियंता (संगणक) संवर्गातील गट—२ मधून सिस्टीम ॲनलिस्ट या पदावर पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिय ५३ (१) अन्वये सहा. आयुक्त किवा समतुल्य व त्यापेक्षा उच्च दर्जाच्या अधिकारी संवर्गावरील पदांची नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव मा. महासभेची मान्यतेसाठी सादर.

<u>महासभा ठराव क्र:</u> १५ <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मिना आयलानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिना सोनेजी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक ०७/०१/२०१९ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीने दिलेल्या मान्यतेनुसार श्रीम. श्रध्दा सपकाले, (प्रोग्रामर) या प्रोग्रामर/कनिष्ठ अभियंता (संगणक) संवर्गातील गट—२ मधून सिस्टीम ॲनलिस्ट (वेतनश्रेणी रू ९३००—३४८००, ग्रेडपे ४४००) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १६ :—** उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांना दरमहा शिबीर कार्यक्रमासाठी भगवंती नावानी स्टेजसमोरील मैदान, गोल मैदान, उल्हासनगर—१ व प्रभाग समिती कार्यालय क्र.१ मधील एक दालन भाडेपटटयाने देणेकरीता धोरणात्मक निर्णय होणेबाबत.

---

आचारसंहिता चालु आहे आपल्या निदर्शनास आणुन देत आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>नाही, हे नाही देवु शकत.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी</u> :—यास डिफर करावा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १६**:—उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांना दरमहा शिबीर कार्यक्रमासाठी भगवंती नावानी स्टेजसमोरील मैदान, गोल मैदान, उल्हासनगर—१ व प्रभाग समिती कार्यालय क्र.१ मधील एक दालन भाडेपटटयाने देणेकरीता धोरणात्मक निर्णय होणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात परिवहन कार्यालय नसल्याने बदलापूर,अंबरनाथ व आजुबाजुच्या ग्रामीण परिसरातील नागरिक,विद्यार्थी,महिला व व्यापारी वर्ग यांना कल्याण येथील परिवहन कार्यालयात जावे लागते.त्यामुळे सामान्य नागरिकांच्या सुविधेकरिता उल्हासनगर येथे परिवहन कार्यालय सुरु करुन महिन्यातुन दोन वेळा कॅम्पचे आयोजन करावे अशी मा. महापौर यांनी संबंधित विभागास पत्राद्वारे विनंती केली होती.

यापूर्वी,उल्हासनगर हे कल्याणपासुन जवळ असल्याने नविन कार्यालयाचा प्रस्ताव मा.परिवहन आयुक्त,मुंबई यांचेकडुन नाकारण्यात आला आहे. तथापि, न्यायालयाच्या आदेशानुसार २५० मी. लांबीचा ट्रॅक व वाहन चालक चाचणी केंद्रासाठी पायाभूत सुविधांसह पुरेशी जागा महानगरपालिकेतर्फे उपलब्ध झाल्यास मुख्य कार्यालयात कामानिमित्त येणा—या नागरिकांची गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने तसेच कामाचे विकेंद्रीकरण करण्यासाठीमहानगरपालिका क्षेत्रात आठवडयातील गरजेनुसार दरमहा नियमित शिबीर कार्यालयाचे कामकाज सुरु करण्याचा प्रस्ताव मा. परिवहन आयुक्त,मुंबई कार्यालयात सादर करणे शक्य होईल असे परिवहन कार्यालयाकडून मा. महापौर यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे.

उल्हासनगर शहरातील नागरिकांना योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाच्या अनुषंगाने केल्या जाणा—या वाहन तपासणीसाठी आवश्यक असलेले २५०मी.लांबीचे ट्रॅक गोल मैदान,भगवंती नावानी स्टेज, उल्हासनगर—१ येथे उपलब्ध होवू शकेल.

मा. महासभा ठराव क्र. ८ दिनांक २४.०५.२००२ अन्वये भगवंती नावानी स्टेज,गोल मैदान,उल्हासनगर—१ येथील मैदान विविध सांस्कृतिक/सामाजिक/धार्मिक कार्यक्रम,खेळांच्या स्पर्धा इत्यादीसाठी निश्चित केलेले भाडे शुल्क आकारुन वापरास परवानगी देण्यात येते.

तथापि, उल्हासनगर शहरातील नागरिकांचे सुविधेकरिता भगवंती नावानी स्टेज,गोल मैदान,उल्हासनगर—१ येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,कल्याण यांना दरमहा नियमित शिबीर कार्यक्रमाचे आयोजन करण्यास तसेच प्रभाग ममिती कार्यालय क्र.१,गोल मैदान,उल्हासनगर—१ येथे त्यांचे संबंधित कामकाज करणेसाठी ०१ दालन भाडेपटटयाने उपलब्ध करुन देता येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ मध्ये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करण्यासंबंधी खालिलप्रमाणे तरतुदी दिलेल्या आहेत.

७९ (क):— अन्वये आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पटटयाने देता येईल, विकता येईल, भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल.

७९ (ड):— जो मोबदला घेऊन, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पटटयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला असे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये.

७९ (ग):— या कलमात काहीही अंतर्भुत असले तरी, आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजुरीने व राज्य शासनाच्या मान्यतेने महाराष्ट्र गलिच्छ वस्ती (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम,१९७१ च्या तरतुदी अन्वये गलिच्छ वस्ती म्हणुन घोषित करण्यात आलेली, महानगरपालिकेच्या मालकीची जमिन, गलिच्छ वस्तीतील रहिवांशाच्या सहकारी संस्थेला (किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही विकास योजनांच्या अंमलबजावणीच्या परिणामी बेघर झालेल्या व्यक्तींना किंवा महानगरपालिकेच्या विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या परिणामी बेघर झालेल्या व्यक्तींनीच केवळ निर्माण केलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्थेला किंवा महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या कोणत्याही विभागास किंवा

उपक्रमास किंवा सार्वजनिक प्रयोजनांसाठी किंवा वैद्यकिय आणि शैक्षणिक प्रयोजनांसाठीच केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेल्या सार्वजनिक न्यासाला किंवा संस्था नोंदणी अधिनियम १९५६ अन्वये नोंदणी केलेल्या कंपनीस किंवा व्यक्तीस ) अशा रितीने भाडेपटटयाने देण्याकरीता नियम असलेल्या कमाल भाडयाच्या बाजारमुल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्यापेक्षा कमी असेल अशा भाडयाने व महानगरपालिका लादील अशा शर्तीस अधीन राहून तीस वर्षापेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरीता भाडेपटटयाने देता येईल.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांना आठवडयातील गरजेनुसार दरमहा शिबीर कार्यक्रमासाठी मैदानाची जागा व एक दालन उपलब्ध करून देताना सार्वजनिक प्रयोजन लक्षात घेवून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ मधील कलम (क), (ड) वा (ग) नुसार११ महिन्यांकरीता उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांना गोल मैदान, भगवंती नावानी स्टेजसमोरील मैदान व प्रभाग समिती कार्यालय क्र.१ मधील तळमजल्यावरील एक दालन भाडेपटटयाने देण्याबाबत धोरणात्मक निर्णय होणेकरीता प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: १५ अ दिनांक:—३०/५/२०१९

सुचकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांना दरमहा शिबीर कार्यक्रमासाठी भगवंती नावानी स्टेजसमोरील मैदान, गोल मैदान, उल्हासनगर—१ व प्रभाग समिती कार्यालय क्र.१ मधील एक दालन भाडेपटटयाने देणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १७ :—** गटई कामगारांना व अंध/अपंग यांचे स्वयंरोजगारार्थ महापालिका हद्दीत स्टॉलकरीता जागा उपलब्ध करून देणेबाबत.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौरजी, हा जो विषय आहे याबाबतीत महासभेत संबंधीत अधिकारी यांनी येवुन जरा सांगावे. जेव्हापासुन महापालिका झाली आहे तेव्हापासुन आपण किती स्टॉल आपण संपुर्ण शहरामध्ये दिलेले आहेत. त्याची आजची परिस्थिती काय आहे. याबाबत सर्व गटनेत्यांची बैठक घेतली जाईल या विषयास आज डिफर करु या.

सदस्य श्री. अरुण आशान:—एक मिनिट, मला बोलायचे आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—साहेब, आयटमच डिफर झाला तर काय बोलायचे आहे.

सदस्य श्री. अरुण आशान:—प्लीज, प्लीज.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—पुढील सभेत विषय येणार ना.

<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>मेन आमचा इश्यु आहे, साहेबांच्या समोर व्हायला पाहिजे होता.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १७:**—गटई कामगारांना व अंध/अपंग यांचे स्वयंरोजगारार्थ महापालिका हद्दीत स्टॉलकरीता जागा उपलब्ध करून देणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

शासनाच्या नगरविकास विभागाकडील दिनांक ५ जून, २००० च्या आदेशान्वये गटई कामगारांना महापालिका क्षेत्रात स्टॉल/पीच (जागा) करीता परवाना देणेकामी अ.क्र. १ ते १३ वरील निकष व अटींच्या अधीन राहुन कार्यवाहीचे आदेश दिलेले आहेत. त्यानंतर शासनाचे दिनांक ११/८/२००६ च्या शासननिर्णयान्वये अंध/अपंगाना अ.क्र. १ ते १६ व गटई कामगारांना अ.क्र. १ ते १५ अटी व शर्तींच्या अधीन राहुन स्वयंरोजगारासाठी स्टॉल/पीच करीता जागा उपलब्ध करून देणेबाबत धोरण विहीत केले आहे. त्यामध्ये उपरोक्त अटी व शर्तींव्यतिरिक्त खालिल तीन अटींचाही समावेश आहे.

१. वाहतुक विभागाचे ना—हरकत प्रमाणपत्र घेवुनच जागा वाटप करण्यात यावे.

२. नव्याने काही न्यायालयीन आदेश प्राप्त झाले असल्यास ते विचारात घेवून कार्यवाही करावी.

३. नियमावलीनुसार जागा वाटप करताना शासनाचे आदेश विचारात घेवुन आरक्षण ठरविण्यात यावे. तसेच खालिल १ ते १५ अटीमध्ये महापालिकेस काही बदल करावयाचा असल्यास नगरविकास विभागाच्या सहमतीने करण्यात यावा असे आदेश दिले आहेत.

अंध/अपंगासाठी स्टॉलकरीता जागा देणेबाबत शासन निर्णयामध्ये नमुद अ.क्र. १ ते १६ व गटई कामगारांसाठी नमुद अ.क्र. १ ते १५ अटी व शर्तीमध्ये समान असलेल्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. ज्या रस्त्यांवर ना अंकित क्षेत्र आहे त्या रस्त्यांवर नविन स्टॉलकरीता जागा देण्यात येवू नये.

२. दोन स्टॉल/पीच मध्ये कमीतकमी २५० मी. अंतर असावे.

३. जागेकरीता परवाना देताना वाहतुक शाखेचा अभिप्राय घेण्यात यावा.

४. विधी विभागाकडून अभिप्राय घेवुन परवान्याचे हस्तांतरण कायदेशीर वारसास हस्तांतरण फी आकारून करण्यात यावे.

५. हस्तांतरण फी अंध/अपंगासाठी रू.१०००/— व गटई कामगारांना रू.१५००/— एवढी रक्कम वारसांकडून घेण्यात यावी.

६. अंध/अपंगाना प्रति चौ.फुट रू.५/— प्रतिमहिना किंवा वेळोवेळी ठरविलेले भाडे व गटई कामगारांना रू.६०/— प्रतिमाह भाडे आकारण्यात यावे.

७. अंध/अपंगाकरीता रस्त्यांची रूंदी १० मी. अथवा त्यापेक्षा जास्त असावी. गटई कामगारांसाठी काही नमुद नाही.

८. अंध/अपंगाकरीता १५ वर्षाचा रहिवासी असल्याबाबतचा पुरावा सादर करावा. गटई कामगारांसाठी काही अट नाही.

९. ज्या व्यक्तीस परवाना दिला आहे त्या व्यक्तीनेच व्यवसाय करावयाचा आहे. अन्य व्यक्ती व्यवसाय करताना आढळल्यास परवाना रद्द् करण्यात येईल.

१०. सदरचा स्टॉल/पीच विकता येणार नाही अथवा भाडयाने देता येणार नाही. अन्यथा पुर्वसुचना न देता परवाना रद्द् करण्यात येईल.

११. ज्याठिकाणी स्टॉल/पीचकरीता परवानगी दिली आहे त्याचठिकाणी स्टॉल/पीच उभारण्यात यावा.अन्यथा दिलेली पुर्वसुचना न देता रद्द् करण्याचा अधिकार महापालिका आयुक्तांनी राखुन ठेवला आहे.

१२. सदर स्टॉल शहर अभियंता यांनी दिलेल्या स्पेसिफिकेशननुसार असावा.

परवानगी प्रत्येकवेळी ११ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी राहणार नाही. मुदत संपल्यानंतर अर्जदाराची वागणुक व अटी शर्तीच्या पालनाबाबत पडताळणी करूनच पुढील ११ महिन्याची मुदतवाढ देण्यात येईल.

१३. अस्तित्वातील अधिकृत स्टॉल/पीचची तपासणी करून सदर नियमानुरूप असतील तरच नियमित करण्यात यावेत. अन्यथा परवानगी रदद् करण्यात यावी.

१४. अंध/अपंगाना स्टॉलकरीता जागा ६ X ३ एवढया क्षेत्रफळाची व गटई कामगारांना पीच करीता जागा ४ X ३ क्षेत्रफळाची असावी.

१५.गटई कामगारांकरीता अर्जदार चर्मकार समाजाचा व जातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. व अंध/अपंगाकरीता अपंगत्वाचे प्रमाणपत्राबाबत नमुद नाही.

शासनाचे वरील अटी, शर्ती व निकष पाहता तसेच उल्हासनगर शहराचे १३ चौ.कि.मी मर्यादित क्षेत्रफळ, लोकसंख्येची घनता, कमी रूंदीचे रस्ते, वाहतुकीची समस्या इत्यादी बाबी पाहता महापालिकेकडे अंध/अपंग व गटई कामगार यांना स्टॉल/पीचकरीता जागा उपलब्ध करून दयावयाची झाल्यास अ.क्र. २ व ७ वरील अटींप्रमाणे पुरेशा जागा उपलब्ध होत नाहीत.

सन २००८ पासुन अंध/अपंग व गटई कामगार यांनी स्टॉल/पीचकरीता जागा उपलब्ध करून मिळणेबाबत सादर केलेले अर्ज या विभागाकडे प्रलंबित आहेत. अंध/अपंग व गटई कामगार यांना स्टॉल/पीचकरीता जागा उपलब्ध करून दयावयाची झाल्यास शासन निर्णयातील वरीलप्रमाणे अट अ.क्र. २ व ७ वरील अटी शिथील करणेबाबत निर्णय होवून खालिलप्रमाणे धोरण निश्चित करणे आवश्यक वाटते.

१. कोणत्याही चौकामध्ये किंवा दोन रस्त्याच्या कॉर्नरवर बुथ अनुज्ञेय असणार नाही.

२. प्रस्तावित जागा रहदारीच्या वापरात असलेल्या रस्त्याच्या भागापैकी नसावी.

३. एकापेक्षा जास्त अर्जदारांनी एकाच जागेसाठी मागणी केली असल्यास अपंगांकरीता अपंगत्वाच्या टक्केवारीप्रमाणे अर्जाच्या प्राथम्यक्रमाने जास्तीत जास्त अपंगत्वाला प्राधान्य देण्यात यावी. तसेच गटई कामगारांना अर्जाच्या प्राथम्यक्रमाने प्राधान्य देण्यात यावे.

४. गटई कामगारांकरीता जातीचे प्रमाणपत्र व अंध/अपंगांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

५. महापालिका क्षेत्रात जागा उपलब्ध करून देणेकरीता वर्तमानपत्रात प्रसिध्दी देवुन अर्ज मागविणेची कार्यवाही न करता यापुर्वी वर्ष २००८ पासून मागणी केलेल्या व यापुढे मागणी करणा—या अर्जदारांना स्टॉल/पीचकरीता मागणी केलेली जागा संबंधित प्रभाग समिती कार्यालय व शहर वाहतुक पोलिस विभाग यांची ना हरकत प्राप्त झाल्यावर उपलब्ध करून देण्यात येईल.

६. गटई व अंध/अपंगाना यापुर्वी वर्ष २००३ मध्ये रू.१५०/— प्रतिमहा भाडेशुल्क निश्चित केले होते. परंतु सदर दरात अद्यापपर्यंत भाडेवाढझालेली नसल्यामुळे गटई कामगारांना पीचकरीता दयावयाच्या जागेसाठी आता रू.३००/— प्रतिमहा व अंध/अपंगाना स्वंयरोजगारार्थ दयावयाच्या स्टॉलच्या जागेसाठी रू.५००/— प्रतिमहा प्रमाणे भाडेनिश्चिती करणे योग्य राहिल.

७. मा. महासभा ठरावान्वये गटई कामगार यांना पीचकरीता परवानगी देताना अनामत रक्कम रू. १५००/— घेण्यात येत होती. तथापि, सदर रक्कमेत वाढ करून अंध/अपंगाकडून स्टॉलकरीता रू.६०००/— अनामत रक्कम व गटई कामगारांकडून रू.३६००/— अनामत रक्कम घेण्यात यावी.

८. स्टॉल/पीचसाठी परवाना देताना रू. २००/— परवाना फी आकारली जाईल व परवान्याचा ११ महिन्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर परवान्याचे नुतनीकरण करणे अपरिहार्य आहे. अन्यथा परवाना रदद् केला जाईल व स्टॉलसाठी दिलेली जागा ताब्यात घेण्यात येईल. परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी रू. ५००/— फी आकारली जाईल.

९. स्टॉलधारकास नियमित भाडे कार्यालयात येवुन प्रत्येक महिन्याच्या १० तारेखपर्यंत भरणे बंधनकारक राहिल. अन्यथा तीन महिन्यांपर्यंत थकीत भाडे झाल्यास अनामत रक्कमेतुन सदर भाडे रक्कम कपात करून उर्वरित अनामत रक्कम जप्त करून परवाना रदद् करण्यात येईल.

१०.अर्जदार यांनी स्टॉल/पीचकरीता अर्जात नमुद केलेल्या/मागणी केलेल्या जागांसाठी शहर वाहतुक/पोलिस विभाग/संबंधित प्रभाग अधिकारी यांचेकडून ना हरकत घेवुन तसेच शहर विकास आराखडयामध्ये स्टॉलकरीता दिलेली जागा बाधित होत असल्यास अथवा महापालिकेच्या कोणत्याही प्रकल्पामध्ये सदर स्टॉलची/पीचची जागाबाधित होत असल्यास सदर जागा रिकामी करून देणेची अट नमुद करून परवानगी देण्यात यावी.

११.स्टॉलधारकास/पीचधारकास कोणत्याही कारणास्तव दिलेल्या जागी व्यवसाय करणे बंद करावयाचे असल्यास तशी पुर्वसुचना महापालिकेकडे तीन महिन्यापुर्वी लेखी स्वरूपात सादर करावी लागेल.

१२.सदरची परवानगी दिल्यानंतर भविष्यात कोणत्याही कारणास्तव परवानगी रदद् करून जागा रिकामी करण्याचे अधिकार मा. आयुक्त अथवा मा. आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या अधिका—यांना असतील.

शासनाच्या अंध/अपंग व गटई कामगार यांना स्वयंरोजगारासाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करणेकरीता शासन निर्णयातील अटी व उक्त ११ अटी प्रमाणे धोरण निश्चित करून वर्ष २००८ पासून प्रलंबित अर्जदार यांना त्यांनी मागणी केलेल्या जागी स्टॉल/पीच करीता परवानगी देणेबाबत प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १५ ब <u>दिनांक:–१५/२/२०१९</u>

सुचकाचे नाव :– श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे गटई कामगारांना व अंध/अपंग यांचे स्वयंरोजगारार्थ महापालिका हद्दीत स्टॉलकरीता जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८** :– उल्हासनगर महानगरपालिका कॅम्प नं. १ ते ५ प्रभाग समितीनिहाय उपलब्ध असलेली समाजमंदिरे, प्रचलन व परिरक्षण करणेकामी इच्छुक नोंदणीकृत संस्थांना देणेस धोरणात्मक निर्णय घेणे.

---

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**मा. महापौरजी, या विषयास डिफर केले जावे, कारण की, येथे ना समाजमंदिराची यादी आहे, शहरात आम्ही २०० फुट, ३०० फुटाचे समाजमंदिर बनविले आहे. आम्ही जर त्यांच्याकडुन भाडे वसुल करणार, महापालिका जो खर्च करते समाजमंदिरसाठी तर ते अर्धवट राहणार, त्यासाठी सध्या या विषयास डिफर केले जावे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**डिफर, डिफर, डिफर.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १८**:–उल्हासनगर महानगरपालिका कॅम्प नं. १ ते ५ प्रभाग समितीनिहाय उपलब्ध असलेली समाजमंदिरे, प्रचलन व परिरक्षण करणेकामी इच्छुक नोंदणीकृत संस्थांना देणेस धोरणात्मक निर्णय घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका कॅम्प नं. १ ते ५ मध्ये प्रभागसमितीनिहाय सुमारे १०१ ठिकाणी समाजमंदिरे बांधण्यात आलेली आहेत. सार्व. बांधकाम विभागाकडील दिनांक २५ जुन, २०१५ रोजीच्या पत्रान्वये समाजमंदिरांची प्राप्त यादी सोबत जोडली आहे.

समाजमंदिरांचा सदर परिसरातील नागरीक/संस्था सांस्कृतिक, सामाजिक वा धार्मिक कार्यक्रमासाठी विनामुल्य वापर करतात. सद्यस्थितीत सर्व समाजमंदिरांवर संबंधित प्रभाग समिती कार्यालयामार्फत नियंत्रण ठेवण्यात येत आहे. समाजमंदिरे नागरीकांना विविध कार्यक्रमासाठी महानगरपालिकेच्या परवानगीने वापरता आली पाहिजेत. ब–याचवेळा स्थानिक नागरीक कोणत्याही कार्यक्रमासाठी समाजमंदिर खुले करून देण्याची मागणी करतात, परंतु ते ठराविक कामाकरीता किंवा कालावधीकरीता न वापरता त्याचा कायमस्वरूपी वापर करीत असल्याने समाजमंदिरांचा गैरवापर होत असून त्याची देखभाल, दुरूस्ती व निगा होत नाही अशा तक्रारी वेळोवेळी प्राप्त होत असतात.

महापालिकेची आर्थिक स्थिती नसल्याने समाजमंदिरांची वेळोवेळी रंगरंगोटी, देखभाल व दुरूस्ती करता येत नाही. महापालिकेची समाजमंदिरे विनामुल्य वापरास दिल्यास संबंधित व्यक्ती/संस्था या त्याचा काळजीपुर्वक वापर करीत नाहीत. तेथील वस्तु/उपकरणांची नासधुस होते.
तथापि, महापालिकेच्या समाजमंदिराचे विदयुत देयक, पाणी देयक महापालिकेस अदा करावे लागते. तसेच सदर समाजमंदिरांची रंगरगोटी, दुरूस्ती व देखभाल यासाठीदेखील कोणतेही उत्पन्न मिळत नसताना खर्च मात्र होत असतो. सद्यस्थितीत सर्व समाजमंदिरांवर नियंत्रण प्रभाग कार्यालयांमार्फत ठेवण्यात येत आहे. महापालिकेकडे अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने प्रत्येक समाजमंदिरासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करून समाजमंदिरांची सुरक्षा करता येत नाही. मात्र स्थानिक रहिवाशी लग्नसमारंभ, साखरपुडा, वाढदिवस, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी सदर समाजमंदिरांचा वापर होत आहे. परंतु, त्याची निगा राहत नाही. याकरीता सदर समाजमंदिरे कोणत्याही नोंदणीकृत संस्थेस प्रचलन व परिरक्षण करणेकरीता वार्षिक भाडेशुल्क आकारून दिल्यास सदर समाजमंदिरांवर महापालिकेचा कोणताही निधी खर्च न होता त्याचा काळजीपुर्वक वापर होवुन महापालिकेची मालमत्ता सुस्थितीत राहिल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ मध्ये महानगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग व वापर करण्यासंबंधी खालिलप्रमाणे तरतुदी दिलेल्या आहेत.

७९ (क):— अन्वये आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पटटयाने देता येईल, विकता येईल, भाडयाने देता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरीत करता येईल.

७९ (ड):— जो मोबदला घेऊन, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क विकता येईल, पटटयाने देता येईल, किंवा अन्यथा हस्तांतर करता येईल तो मोबदला असे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांच्या चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये.

७९ (ग):— या कलमात काहीही अंतर्भुत असले तरी, आयुक्तांस महानगरपालिकेच्या मंजुरीने व राज्य शासनाच्या मान्यतेने महाराष्ट्र गलिच्छ वस्ती (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम,१९७१ च्या तरतुदी अन्वये गलिच्छ वस्ती म्हणुन घोषित करण्यात आलेली, महानगरपालिकेच्या मालकीची जमिन, गलिच्छ वस्तीतील रहिवांशाच्या सहकारी संस्थेला (किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही विकास योजनांच्या अंमलबजावणीच्या परिणामी बेघर झालेल्या व्यक्तींना किंवा महानगरपालिकेच्या विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या परिणामी बेघर झालेल्या व्यक्तींनीच केवळ निर्माण केलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्थेला किंवा महराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या कोणत्याही विभागास किंवा उपक्रमास किंवा सार्वजनिक प्रयोजनांसाठी किंवा वैद्यकिय आणि शैक्षणिक प्रयोजनांसाठीच केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेल्या सार्वजनिक न्यासाला किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी केलेल्या कंपनीस किंवा व्यक्तीस ) अशा रितीने भाडेपटटयाने देण्याकरीता नियम असलेल्या कमाल भाडयाच्या बाजारमुल्यापेक्षा किंवा इतर मोबदल्यापेक्षा कमी असेल अशा भाडयाने व महानगरपालिका लादील अशा शर्तीस अधीन राहून तीस वर्षापेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरीता भाडेपटटयाने देता येईल अशी तरतुद आहे.
समाजमंदिरांचे प्रचलन व परिरक्षण करणा—या संस्थांना त्याची रंगरंगोटी करणे, निगा राखणे, देखभाल, दुरूस्ती करणे यासाठी होणारा खर्च भागविण्यासाठी स्थानिक रहिवाशी यांना सांस्कृतिक, धार्मिक व सार्वजनिक कार्यक्रमासाठी वापरास उपलब्ध करून देताना भाडेशुल्क आकारणे आवश्यक आहे. सदर समाजमंदिर महापालिकेची मालमत्ता असल्यानेमहाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ मधील तरतुदीनुसार विनामुल्य देता येत नाहीत. याकरीता समाजमंदिराचे प्रचलन व परिरक्षण करणेकामी दयावयाच्या संस्थेकडून वार्षिक भाडे रक्कम रू.१०,०००/— व सुरक्षा अनामत रक्कम रू. २५,०००/— घेणे ऊचित वाटते.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील समाजमंदिरे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तथापि, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार महापालिकेच्या मालमत्ता विनामुल्य वापरासाठी देता येत नाहीत. सदर मालमत्तांपासुन महापालिकेस उत्पन्न मिळावे व सदर समाजमंदिरांची देखभाल, दुरूस्ती नियमित व्हावी याकरीता खालिलप्रमाणे भाडेशुल्क आकारून धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी उपलब्ध करून देता येईल.
उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील समाजमंदिरे इच्छुक व्यक्ती/संस्था यांना वाणिज्य वापराव्यतिरिक्त धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी भाडयाने देणेबाबत खालिलप्रमाणे भाडे निश्चित करणे योग्य राहिल.

१. ५०० चौ.फुटापर्यंत :— रू.१५००/— प्रतिदिन
२. ५०० चौ.फुटावर :— रू.३०००/— प्रतिदिन

उपरोक्त दर आकारून समाजमंदिरांचे प्रचलन व परिरक्षण करणेकामी इच्छुक संस्था यांचेकडून अर्ज मागविण्यात येत असुन पात्र संस्थांना समाजमंदिरे दिल्यानंतर संबंधित संस्थांनी समाजमंदिराचा वापर करण्याच्या मागणीनुसार वरीलप्रमाणे भाडेशुल्क आकारून वापरास दयावयाचे आहेत.

इतर महानगरपालिकांच्या धर्तीवर उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील समाजमंदिरांचे प्रचलन व परिरक्षण करणेकामी इच्छुक नोंदणीकृत संस्थांकडून अर्ज मागविणेकरीता खाालिल अटी व शर्ती असणे आवश्यक आहे.

<u>अटी व शर्ती</u>

१. मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेल्या सार्वजनिक न्यासाला किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी केलेली संस्था असणे आवश्यक आहे.
२. समाजमंदिर ०३ वर्ष मुदतीसाठी भाडे करारनामा करून देण्यात येईल.
३. समाजमंदिरावर संस्थेने त्यांच्या नावाचा फलकावरील मजकुर महापालिकेकडून मंजूर करून घेवुन प्रसिध्द करावा. तसेच सदर फलकावर उल्हासनगर महानगरपालिकेचे नांव असणे आवश्यक आहे. नामफलकाचे क्षेत्रफळ (साईज ४' लांबी X ३' रूंदी ) असे सर्व समाजमंदिरावर सारखे राहिल.
४. समाजमंदिराची दैनंदिन साफसफाई व सुरक्षाव्यवस्था संस्थेस करावी लागेल. महापालिकेमार्फत कर्मचारी नेमण्यात येणार नाहीत. समाजमंदिर संपूर्णपणे सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.
५. समाजमंदिराची देखभाल, दुरूस्ती व वर्षातुन एकदा रंगरंगोटी ही कामे महानगरपालिकेच्या सुचनेप्रमाणे संस्थेस वेळोवेळी करावी लागतील.
६. सदर ठिकाणी विज जोडणी व पाणी जोडणी महापालिकेमार्फत देण्यात येईल. तथापि, त्याची देयके संस्थेस भरावी लागतील.
७. समाजमंदिराच्या जागेत विनापरवानगी कोणतेही अतिरिक्त बांधकाम संस्थेस करता येणार नाही. अथवा फेरबदल महापालिकेच्या परवानगीशिवाय करता येणार नाही.
८. समाजमंदिराची परवानगी दिलेल्या संस्थेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही संस्थेस अथवा इसमास प्रचलन व परिरक्षण करणेकामी देता येणार नाही.
९. सदर समाजमंदिराची देखभाल, दुरूस्ती कशाप्रकारे करणार याबाबत तसेच संस्थेमार्फत नियुक्ती करण्यात येणा—या कर्मचारीवर्गाची माहिती उदा. कर्मचा—यांचे नांव व निवासी पत्ता, कर्मचारी पदसंख्या, वेतन इत्यादी दयावी लागेल. संस्थेमार्फत नेमलेल्या कर्मचा—यांना किमान वेतन कायदयानुसार वेतन देणे बंधनकारक राहिल.
१०. समाजमंदिराचा वापर करताना कोणत्याही प्रकारचा अपघात/दुर्घटना घडल्यास अथवा जिवीत/वित्त हानी/नैसर्गिक आपत्ती झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहिल.
११. समाजमंदिरे कोणत्याही व्यक्तीस अथवा संस्थेस पोटभाडयाने देता येणार नाही किंवा हस्तांतरीत करता येणार नाहीत व विक्री करता येणार नाही अथवा त्याचा वाणिज्य वापर करता येणार नाही.
१२. समाजमंदिर ज्यास्थितीत त्या स्थितीत संस्थेच्या ताब्यात देण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
१३. समाजमंदिराची जागा हि महापालिकेची असल्याने संस्थेस मालकी हक्क सांगता येणार नाही. सदर जागेबाबत भविष्यात वाद निर्माण झाल्यास करारनामा तात्काळ रदद् करण्याचे अधिकार मा. आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना असतील.
१४. समाजमंदिराचा गैरवापर होत असल्याचे अथवा तक्रार प्राप्त झाल्यास अथवा प्रचलन व परिरक्षण करण्याचे काम समाधानकारक होत नसल्याचे आढळल्यास संस्थेस ०७ दिवसांची नोटीस देवुन करारनामा रदद् करून समाजमंदिर महापालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल.
१५. संस्थेचा मागील तीन वर्षाचा आर्थिक लेखांचा ताळेबंद व आयकर भरणा प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.
१६. समाजमंदिर कोणत्याही एका संस्थेस एक अथवा एकापेक्षा जास्त समाजमंदिरे प्रचलन व परिरक्षण करणेकामी देणेबाबतचा अंतिम निर्णय आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचा राहिल.
१७. समाजमंदिरासाठी सुरक्षा अनामत म्हणुन महानगरपालिकेकडे रू.२५,०००/— धनाकर्षाद्वारे (डि.डि.द्वारे) कार्यादेश देण्यापुर्वी जमा करावी लागेल. समाजमंदिराचे नुकसान केल्यास अथवा नियमित विज व पाणी देयक न भरल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करून संस्थेसोबत केलेला करारनामा रदद् करण्यात येईल.
१८. उल्हासनगर महानगरपालिकेसोबत संस्थेने केलेला करारनामा नियमानुसार नोंदणी करून घेण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.
१९. समाजमंदिरास उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी वेळोवेळी भेट देवु शकतील व भेटीच्यावेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहिल.
२०. समाजमंदिरामध्ये जागेच्या वापराच्या अनुषंगाने आवश्यक असणा—या शासनाच्या/अग्निशमन विभागाच्या परवानग्या अथवा परवाने घेणे संस्थेस बंधनकारक राहिल.
२१. संस्थेसोबत समाजमंदिरासंबंधी केलेल्या करारनाम्याचा उपयोग कुठल्याही बॅक/संस्थेकडून कर्ज घेण्यासाठी करता येणार नाही.
२२. उल्हासनगर महानगरपालिकेने संस्थेसोबत केलेल्या करारनाम्याची मुदत संपण्यापुर्वी एक महिन्याआधी महापालिकेस लेखी कळवुन समाजमंदिर शेवटचे दिवशी रिकामे करून दयावे लागेल.

२३.संस्थेसोबत करारनामा केल्यानंतर करारनाम्याची मुदत संपण्यापुर्वी समाजमंदिर प्रचलन व परिरक्षण करण्यास नकार दिल्यास अथवा वरील अटी व शर्तीचा भंग केल्यास करारनामा रद्द् करून सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व समाजमंदिर महापालिका ताब्यात घेईल.

२४.सदर करारपत्राबाबत उभयपक्षकारांमध्ये मतभेद झाल्यास मा. आयुक्त यांचेकडे लवाद म्हणुन मांडता येईल. याबाबत संस्थेस मा. न्यायालयात दाद मागता येणार नाही. मा. आयुक्तांचा निर्णय बंधनकारक राहिल.

२५.प्राप्त अर्जांपैकी योग्य संस्थेचा अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे याचा अधिकार सर्वस्वी मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचा राहिल.

उल्हासनगर महानगरपालिकेने समाजमंदिराच्या वापरासाठी भाडेशुल्क आकारणी निश्चित केलेली नाही. त्यामुळे इतर महानगरपालिकांच्या धर्तीवर ज्या संस्था समाजमंदिर प्रचलन व परिरक्षण करणेकरीता घेतील त्यांनी इतर नागरीक/संस्था यांना समाजमंदिर वापरास देताना आकारावयाचे वरीलप्रमाणे ५०० चौ.फुटापर्यंतच्या समाजमंदिरास रू.१५००/— प्रतिदिन आणि ५०० चौ.फुटावरील समाजमंदिरास रू.३०००/— प्रतिदिन भाडेशुल्क निश्चित करणे व महापालिकेस संस्थेकडून समाजमंदिराच्या प्रचलन व परिरक्षण करणेस भाडेतत्वावर देणेकरीता घ्यावयाचे अनामत रक्कम रू.२५,०००/— व वार्षिक भाडेशुल्क रू.१०,०००/— निश्चित करून वरील अटी व शर्तीनुसार महापालिका क्षेत्रातील सर्व समाजमंदिरे इच्छुक नोंदणीकृत संस्था यांना प्रचलन व परिरक्षण करणेकामी देणेस धोरणात्मक निर्णय होणेकरीता प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:१५क</u>          <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :—श्री. शंकर लुंड
अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका कॅम्प नं. १ ते ५ प्रभाग समितीनिहाय उपलब्ध असलेली समाजमंदिरे, प्रचलन व परिरक्षण करणेकामी इच्छुक नोंदणीकृत संस्थांना देणेस धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १९ :—** सन २०१९ मध्ये राष्ट्र पुरूष/थोर व्यक्तींचे जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम साजरे करणेबाबत माहिती देणे.

---

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>मा.महापौरजी, उप—महापौरजी, हा विषय मागील महासभेत सुध्दा आला होता त्यावेळी उप—महापौर हे पीठासीन अधिकारी म्हणुन बसले होते त्यांनी शासनास निर्देश दिले होते की सिंधी भाषा दिवस, हेमु कालानी शहिद दिवस, शहिद लेट प्रेम रामचंदानी शहिद दिन,यांचा समावेश केला जावा. कारण मागील वेळेस असे झाले आहे यांचा समावेश करण्यात आला होता परंतु त्यावेळी साजरे केले होते परंतु आता १८—१९ मध्ये शहिद हेमु कालानी यांचा दिवस साजरा केला नाही. ही फार दु:खाची गोष्ट आहे, शहरातील लोकांच्या भावनेला त्रास झाला आहे. या सभागृहात शहिर हेमु कालानीचा फोटो या महापुरुषांसोबत लावला आहे. आपण शहिद हेमु कालानी यांची जयंती साजरी करत नाहीत व असे म्हटले जाते त्यासाठी प्रत्येक वर्षी पारीत करावे लागेल. तर मी असे म्हणतो यात दुरुस्ती केली जावी. सिंधी भाषा दिवस, हेमु कालानी शहिद दिवस, शहिद लेट प्रेम रामचंदानी शहिद दिन, साधु वासवानी जयंती (मिट लेस डे), चेटीचंद (सिंधी न्यु इअर) अशी दुरुस्ती करुन प्रस्ताव पारीत केला जावा.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे हे सर्व ठरावात टाकण्यात येईल.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>यामध्ये सिंधी भाषा दिवसाबरोबर मराठी भाषा दिवस सुध्दा टाकण्यात यावा, त्याचा सुध्दा उल्लेख नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास……

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १९:—**सन २०१९ मध्ये राष्ट्र पुरूष/थोर व्यक्तींचे जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम साजरे करणेबाबत माहिती देणे.

<u>प्रस्तावना</u>

शासनाकडील परिपत्रक क्र.जपुती २२१८/प्र.क्र.१९५/२९, दिनांक २६ डिसेंबर, २०१८ व मागील परिपत्रक क्र.जपुती—२२१७/प्र.क्र. २५७/२९, दि. २९/१२/२०१७ रोजीच्या परिपत्रका अन्वये सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयात राष्ट्र पुरूष /थोर व्यक्तीं यांची जयंती, राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम इंदिरा गांधी पुण्यतिथी, दिन विशेष कार्यक्रम साजरे करणे कामी शासनाचे आदेश आहेत. त्यानुसार खाली दर्शविलेले एकुण ४० कार्यक्रम साजरे करावयाचे आहेत.

| |
|---|
| १) सावित्रीबाई फुले जयंती ……………………………………………………………………०३ जानेवारी, २०१९ |
| २) जिजाऊ मॉसाहेब जयंती ………………………………………………………………………१२ जानेवारी, २०१९ |
| ३) स्वामी विवेकानंद जयंती ……………………………………………………………………१२ जानेवारी, २०१९ |
| ४) नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती ………………………………………………………………२३ जानेवारी, २०१९ |
| ५) संत सेवालाल महाराज जयंती ………………………………………………………………१५ फेब्रुवारी, २०१९ |
| ६) छत्रपती शिवाजी महाराज जयंती ……………………………………………………………१९ फेब्रुवारी, २०१९ |
| ७) संत रविदास महाराज जयंती(तिथीनुसार) …………………………………………………१९ फेब्रुवारी, २०१९ |
| ८) संत गाडगे बाबा महाराज जयंती ……………………………………………………………२३ फेब्रुवारी, २०१९ |
| ९) यशवंतराव चव्हाण जयंती ……………………………………………………………………१२ मार्च, २०१९ |
| १०) शहिद दिन ………………………………………………………………………………………२३ मार्च, २०१९ |
| ११) महात्मा ज्योतिबा फुले जयंती ………………………………………………………………११ एप्रिल, २०१९ |
| १२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ……………………………………………………………१४ एप्रिल, २०१९ |
| १३) महात्मा बसवेश्वर जयंती…………………………………………………………………………२८ एप्रिल, २०१९ |
| १४) संत तुकडोजी महाराज जयंती …………………………………………………………………३० एप्रिल, २०१९ |
| १५) दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस …………………………………………………………२१ मे, २०१९ |
| १६) स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती ……………………………………………………………………२८ मे, २०१९ |
| १७) अहिल्यादेवी होळकर जयंती………………………………………………………………………३१ मे, २०१९ |
| १८) महाराणा प्रतापसिंह जयंती…………………………………………………………………………१६ जुन, २०१९ |
| १९) राजर्षि शाहू महाराज जयंती………………………………………………………………………२६ जुन, २०१९ |
| २०) वसंतराव नाईक जयंती ………………………………………………………………………… ०१ जुलै, २०१९ |
| २१) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती………………………………………………………२३ जुलै, २०१९ |
| २२) साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती…………………………………………………………०१ ऑगस्ट, २०१९ |
| २३) क्रांतीसिंह नाना पाटील जयंती ……………………………………………………………… ०३ ऑगस्ट, २०१९ |
| २४) सद्भावना दिवस………………………………………………………………………………………२० ऑगस्ट, २०१९ |
| २५) राजे उमाजी नायक जयंती …………………………………………………………………………०७ सप्टेंबर, २०१९ |
| २६) पंडीत दिनदयाळ उपाध्याय जयंती……………………………………………………………२५ सप्टेंबर, २०१९ |
| २७) महात्मा गांधी जयंती…………………………………………………………………………………०२ ऑक्टोंबर, २०१९ |
| २८) लाल बहादूर शास्त्री जयंती……………………………………………………………………०२ ऑक्टोंबर, २०१९ |
| २९) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती…………………………………………………………१५ ऑक्टोंबर, २०१९ |
| ३०) महर्षि वाल्मिकी जयंती…………………………………………………………………………२४ ऑक्टोंबर, २०१९ |
| ३१) इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस………………………………………………३१ ऑक्टोंबर, २०१९ |
| ३२) वल्लभभाई जयंती व राष्ट्रीय एकता दिवस……………………………………………………३१ ऑक्टोंबर, २०१९ |
| ३३) पंडीत नेहरू जयंती……………………………………………………………………………………१४ नोव्हेंबर, २०१९ |

| | |
|---|---|
| ३४) बीरसा मुंडा जयंती .......................................................................... | १५ नोव्हेंबर, २०१९ |
| ३५) इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मा दिन..................................................... | १९ नोव्हेंबर, २०१९ |
| ३६) संविधान दिवस.............................................................................................. | २६ नोव्हेंबर, २०१९ |
| ३६) संत जगनाडे महाराज जयंती ........................................................................ | ०८ डिसेंबर, २०१९ |

इतर राष्ट्रीय कार्यक्रम

| | |
|---|---|
| १) प्रजासत्ताक दिन,............................................................................................ | २६ जानेवारी, २०१९ |
| २) स्वातंत्र्य दिन................................................................................................ | १५ ऑगस्ट, २०१९ |
| ३) महाराष्ट्र दिन................................................................................................ | ०१ मे, २०१९ |

उपरोक्त ४० कार्यक्रमासह शासन वेळोवेळी निर्देश देईल त्या प्रमाणे उल्हसनगर महानगरपाकातर्फे सन २०१९ मध्ये येणार आहेत. सदरच्या कार्यक्रमा विषयी सन्मानिय महापालिका पदाधिकारी व सदस्य/सदस्या यांना माहिती करीता मा. महासभेपुढे सविनय सादर.

महासभा ठराव क्र: १६ दिनांक:—३०/५/२०१९

सुचकाचे नाव :—श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सन २०१९ मध्ये राष्ट्र पुरूष/थोर व्यक्तींचे जयंती/पुण्यतिथी दिन व अन्य राष्ट्रीय कार्यक्रम साजरे करणेबाबतची माहिती नोंद करीत आहे.

तसेच

सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे मराठी भाषा दिवस, सिंधी भाषा दिवस, शहिद हेमु कालानी शहिद दिन, शहिद लेट प्रेम रामचंदानी शहिद दिन, साधु वासवानी जयंती (मिट लेस डे), चेटीचंद (सिंधी न्यु इअर) साजरा करण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

यावेळी उप—महापौर श्री. जीवन इदनानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

महापालिका सचिव :— विषय क्र. २० वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. २० :— उल्हासनगर महानगरपालिका, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज—II (RCH Phase-II)अंतर्गत कार्यरत वैदयकीय अधिकारी डॉ. मोहिनी हरेश धर्मा यांना शासन निर्णयानुसार आस्थापनेवर सामावुन घेणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—पास, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. २०:—उल्हासनगर महानगरपालिका, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज—II

(RCH Phase-II)अंतर्गत कार्यरत वैदयकीय अधिकारी डॉ. मोहिनी हरेश धर्मा यांना शासन निर्णयानुसार आस्थापनेवर सामावुन घेणे.

**प्रस्तावना**

१. उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम टप्पा—२(RCH Phase-II) हा कार्यक्रम राबविण्यात येत असून सदर कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जनतेस अत्यआवश्यक आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. मा. महासभा ठराव क्रमांक—३२, दिनांक २०/०७/२००५ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतनाची ५० टक्के रक्कम २००६ व २००७ या दोन वर्षाकरिता व सन २००८ ते २०१० पर्यत १०० टक्के वेतनाची उल्हासनगर महानगरपालिकेने स्वखर्चाची जबाबदारी घेवून प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज—II (RCH-II) प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली होती.

२. मा. महासभा ठराव क्रमांक—३३, दिनांक २०/०५/२०११ अन्वये आर.सी.एच. कार्यक्रमांतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनापोटी दिनांक १ जानेवारी २०११ पासून पुढे कायमस्वरूपी वेतन खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

३. मा. महासभा ठराव क्रमांक—६१, दिनांक ०१/०३/२०१४ अन्वये मा. महासभेने आर.सी.एच. फेज—II कार्यक्रमांतर्गत कार्यरत २ लिपीक, १० प्रसविका व २ वैद्यकिय अधिकारी या कार्यरत कर्मचारी व अधिकारी यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम करण्याकरिता पदनिर्मितीस मान्यता देण्यात आली आहे.

४. त्यानुषंगाने महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक युएमसी—२५१४/प्र.क्र.४४५/नवि—२१ मंत्रालय, मुंबई—४०० ०३२, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका आर.सी.एच. फेज—II कार्यक्रमांतर्गत कार्यरत २ लिपीक, १० प्रसविका व २ वैद्यकिय अधिकारी या कार्यरत कर्मचारी व अधिकारी यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम करण्याकरिता पदनिर्मितीस मान्यता देण्यात आली आहे.

५. त्यानुसार सदर कार्यक्रमांतर्गत खालील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/५५०/१७, दिनांक १४/७/२०१७ व क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/५६९/१७, दिनांक १४/७/२०१७ नुसार दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीम. दर्शना पठारे | अकाऊंटंट |
| २ | श्री. गोविंद खुडे | डी.ई.ओ. |
| ३ | श्रीम. समीक्षा जुवाटकर | ए.एन.एम. |
| ४ | श्रीम. मीना जाधव | ए.एन.एम. |
| ५ | श्रीम. सुनिजा फिलिप | ए.एन.एम. |
| ६ | श्रीम. कौशल्या परदेशी | ए.एन.एम. |
| ७ | श्रीम. सोनाली डोंगरे | ए.एन.एम. |
| ८ | श्रीम. पुनम देशमुख | ए.एन.एम. |
| ९ | श्रीम. रूपाली शिराळकर | ए.एन.एम. |
| १० | श्रीम. दिप्ती मराठे | ए.एन.एम. |
| ११ | श्रीम. हेमलता पाटील | ए.एन.एम. |
| १२ | श्रीम. करूणा खिल्लारे | ए.एन.एम. |

१. त्यापैकी डॉ. मोहिनी हरेश धर्मा, कंत्राटी कार्यरत वैद्यकिय अधिकारी, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम टप्पा—२ (RCH Phase-II) कार्यक्रम यांना सुध्दा महानगरपालिका आस्थापनेवर सामावून घेणेचे आहे. डॉ. मोहिनी हरेश धर्मा यांचे कंत्राटी नियुक्ती संदर्भातील माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | वैद्यकिय माहिती | शेरा |
|---|---|---|---|
| १ | नांव | डॉ. मोहिनी हरेश धर्मा | |
| २ | पदनाम | कंत्राटी कार्यरत वैद्यकिय अधिकारी, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम टप्पा—२ (RCH Phase-II) कार्यक्रम | महिला वैद्यकिय अधिकारी |
| ३ | जन्म दिनांक | ०९/०९/२०६८ | नियुक्ती करते वेळी ४४ वर्षे होते. परंतु मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, यांचे पत्र |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | जा. क्र. राकुकका/ कक्ष–७/ अर्बन आरसीएच / अर्बन/हेल्प पोस्ट पद वयोमर्यादा /न.क्र.१७९/७७३५४– ४५९/ १०, दि. ४/११/२०१० अन्वये वयोमर्यादा कमाल ६५ वर्ष करण्यात आलेली आहे. |
| ४ | नियुक्ती निनांक | २४/११/२०१२ | कंत्राटी कार्यरत वैद्यकिय अधिकारी, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम टप्पा–२ (RCH Phase-II) कार्यक्रम या पदावर मानधन तत्वावर नियुक्ती. |
| ५. | शैक्षणिक अर्हता | एम.बी.बी.एस. व महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलकडे रजिस्टेशन | एम.बी.बी.एस. व महाराष्ट्र मेडिकल कौन्सीलकडे रजिस्टेशन |

७. उल्हासनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१५ नुसार वैद्यकिय अधिकारी या पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता खालीप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम व वेतनश्रेणी | नेमणूकीची पध्दत | वय | नेमणूकीकरिता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रेणी–१ वैद्याकिय सेवा | वैद्यकिय अधिकारी | नामनिर्देशन | ४० वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस./ बी.ए.एम.एस. (आयुर्वेद)/बी.एच.एम.एस. (होमोओपथी) किंवा शासन मान्य समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेतील/ खाजगी रूग्णालयातील संबंधीत विषयातील ३ वर्षाची नियमित सेवा.<br>क) महाराष्ट्र मेडीकल कौन्सील अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक. |

८. सेवा प्रवेश नियमानुसार वैद्यकिय अधिकारी या पदाची शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव डॉ. मोहिनी हरेश धर्मा यांचेकडे आहे. मात्र सेवा प्रवेश नियमानुसार वयोमर्यादा ४० आहे. तर डॉ. मोहिनी हरेश धर्मा यांचे कंत्राटी तत्वावरील नियुक्ती वेळेस वय ४४ वर्षे होत, तर आज त्यांचे वय ४९ आहे. सबब, डॉ. मोहिनी हरेश धर्मा यांना महानगरपालिका आस्थापनेवर सामावून घेणेसाठी वयोमर्यादाची अट शिथिल करणे आवश्यक आहे.

९. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(१) अन्वये सहा. आयुक्त किंवा समतुल्य व त्यापेक्षा उच्च दर्जाच्या अधिकारी संवर्गावरील पदांची नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे. वैद्यकिय अधिकारी हे वर्ग–१ चे पद असल्याने व त्यांचे नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे. तसेच त्यांना सामावून घेणेसाठी वर्यामर्यादा शिथिल करणे आवश्यक आहे.

१०. डॉ. मोहिनी रमेश धर्मा यांची शैक्षणिक अर्हता सेवा प्रवेश नियमानुसार आहे, मात्र सध्याचे वय ४९ वर्षे असून वयाची अट शिथील करण्यासाठी मा. महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, डॉ. मोहिनी हरेश धर्मा यांना वैद्यकिय अधिकारी श्रेणी–१ या पदावर सामावून घेणेसाठी वयोमर्यादा शिथिल करणेबाबत मा. महासभेपुढे मान्यता मिळणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** १७ **दिनांक:–३०/५/२०१९**

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :– श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम फेज–II (RCH Phase-II)अंतर्गत कार्यरत डॉ. मोहिनी हरेश धर्मा यांना वैद्यकिय अधिकारी श्रेणी–१ या पदावर महापालिकेच्या आस्थापनेवर सामावुन घेवुन वयाची अट शिथील करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २१ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २१ :—** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना वर्ष २०१८—१९ करीता प्रस्तावित कामांचा परिपूर्ण प्रस्ताव निधी प्रशासकिय मान्यता व निधी उपलब्धतेकरीता व वर्ष २०१९—२० करीता अंदाजीत प्रस्तावित कामांची यादी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, मा. आयुक्त महोदय, यावर एक छोटीशी माहिती घेवु इच्छितो, हा विषय पारीत करायचा आहे परंतु दलित वस्तीचे जे पॅनल आहे, त्यात त्यांचाच निधी आला आहे. ब—याचशा वस्त्या अशा आहेत, जेथे माझा प्रभाग आहे तेथे सुध्दा दलित वस्ती आहे, तसेच दुसरे सुध्दा प्रभाग असतील तेथे सुध्दा दलित वस्त्या असतील, तेथे सुध्दा काम झाले पाहिजे. त्याचा अर्थ असा नाही की दलित वस्तीचा आरक्षणाचा जो प्रभाग आहे, जेथे दलित वस्ती आहे तेथे सुध्दा प्राकलनाचा समावेश झाला पाहिजे. यात कसे दिले आहे ज्या हायेस्ट दलित वस्त्या आहेत, आमच्या प्रभागात सुध्दा दलित लोक राहतात काय त्यांना सुविधा नाही मिळणार काय? दलित वस्तीचा निधी प्रत्येकास मिळाला पाहिजे, मी म्हणतो या विषयास पारीत करण्यात यावे. यानंतर जर असे विषय येत असतील तर त्यामध्ये अशा सुध्दा दलित वस्तींचा समावेश झाला पाहिजे, जेथे जास्त मात्रेत दलित लोक राहतात, जेथे दलित वस्ती आहे त्यांचा सुध्दा समावेश झाला पाहिजे.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—**मा. महापौरजी, आयुक्त महोदय, यामध्ये करेक्शन करायचे आहे, अनुसूचीत जाती १८ अ पाहिजे साहेब, त्यामध्ये १८ ब लिहिलेले आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**श्री. जमनुजी, तुम्हांला खुप घाई असते.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—**मागच्या वेळेस सुध्दा १८ ब टाकले होते यावर्षी सुध्दा १८ ब च टाकले आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, अण्णाभाऊ साठे दलित वस्ती प्रस्तावाच्या संदर्भामध्ये विषय आला आहे तर तो घेतला पाहिजे, ज्या पध्दतीने आमचे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की इतर प्रभागामध्ये तुम्हांला एक विनंती करायची आहे, मागील डीपीडीसीच्या सभेमध्ये महाराष्ट्र शासन आणि कलेक्टरला पाठवुन आपण सात कोटी आणले, परंतु अदयापपर्यंत त्या सात कोटीचा प्रस्ताव आपण पाठविलेला नाही. आणि त्या कामात महासभेची मंजुरी घेतलेली नाही. तर माझी साहेब आपणांस विनंती आहे, अण्णाभाऊ साठेच्या याच प्रस्तावामध्ये दलित वस्तीची जी कामे आहेत तर ती मंजुर करावी.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, हीच याची शासनाकडे जाईल त्याबाबत आपणांस ७ कोटी मिळणार आहेत. आणि २०१९—२० ची आपण यादी पाठविणार आहोत, आम्ही ठराव पाठविला होता परंतु आचारसंहितेमुळे तो पास झाला नाही. जर ठराव पास होईल तर आम्ही त्यास उदयाच पाठवुन देवु.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**मी तेच म्हणत आहे ना की पास करा म्हणुन.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**ठिक आहे, आभारी आहे साहेब.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, यामध्ये एक सांगायचे आहे की पॅनल नंबर १ व पॅनल नंबर ५ मध्ये आचारसंहिता लागु झाली आहे, तर आपण नियमानुसार करु शकत नाही. तर मी आपणांस विनंती करतो की या यादीमध्ये जर कॅम्प नं. १ व ५ चे काही असेल तर ते जरा पहावे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>कॅम्प नं. १ व ५ चे मायनस करुनच होईल. तेथिल काम होणार नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>मा.महापौरजी, आयुक्त साहेब, हे काम झाले पाहिजे याची शिफारस आपण कलेक्टर महोदयांना करत आहोत. कलेक्टर साहेब याची स्क्रुटनी करतील व त्यांच्याकडे जेवढा निधी उपलब्ध असणार ते आपणांस पाठवतील की ही ही कामे करा. तर ज्या दोन प्रभागात आचारसंहिता चालु आहे तर त्यात काय आज काम होणार नाही किंवा इलेक्शनपर्यंत काम होणारच नाही, तर मग जर तेथिल काम पास नाही केले तर जनतेवर अन्याय होईल, २७ तारखेपर्यंत आचारसंहिता लागली होती, त्यानंतर आता त्यांना आचारसंहिता चालु आहे त्यानंतर आमदारांचे इलेक्शन येणार तेव्हा आचारसंहिता लागणार, तर याचा अर्थ असा आहे का की काम करायचे नाही. आपण सध्या तेथे पाठवियणार हे आपणा शासनाकडे शिफारसीसाठी पाठविणार तर त्यात कोणते पास करायचे कोणते नाही हे कलेक्टर साहेब पाहतील.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>आचारसंहितेमध्ये धोरणात्मक निर्णय घेवु शकत नाही. कॅम्प नं. १ व ५ सोडुनच प्रस्ताव जाईल.

<u>सदस्य डॉ. प्रकाश नाथानी :—</u>वर्कऑर्डरची प्रोसेस चालु होवु शकते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. आयुक्त महोदय, आपण प्रभाग क्र. १ व प्रभाग क्र. ५ चे निविदा सुध्दा उघडण्यासाठी आपण रोखुन ठेवली आहे. तर मग मी आपणांस विनंती करतो की ती निविदा उघडा भले त्यांची वर्कऑर्डर इलेक्शन झाल्यावर दया. कारण आपण काम तर नंतरच करणार ना. तर आपण थांबवु नका.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>प्रोसेस नाही थांबविली जाणार.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>साहेब, असे आहे की ही महासभा जो निर्णय घेते जर त्यात आचारसंहितेचा भंग होतो तर जबाबदार आम्ही राहणार.

<u>आयुक्त श्री. अच्युत हांगे:—</u>आयुक्त मी आहे. आपणांस कोणी विचारत नाही, आयुक्तांवर आरोप येतो. शासनाचा माणुस मी आहे. आपण कोणताही ठराव आणणार व पास करणार असे नाही चालणार.

<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>आयुक्त महोदय, आम्ही आपल्या सोबत आहोत.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>मा. महापौरजी, श्री. राजेश वदारिया यांनी जे म्हटले त्या गोष्टीशी मी सुध्दा सहमत आहे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>आपण जर चुकीच्या कामासाठी आग्रह करत असाल तर चुकीचे आहे. आचारसंहिता चालु आहे.

<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>आपण दोन दिवसात चिडचिडे झाला आहात.

यावेळी एकत्रित आवाजात कोण नेमके काय म्हणत होते हे समजुन येत नव्हते.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**चुकीच्या कामासाठी आग्रह करु नका. ठराव आचारसंहितेनंतर घ्या मग संपला न विषय.

**सदस्य श्री. किशोर वनवारी :—**आपण शासनाचे व्यक्ती आहात, आपण आचारसंहितेनंतर करा. परंतु नंतर परत आचारसंहिता लागणार आहे. साहेबांचा दोन दिवसापासुन मुड चांगला नाही. उदयापर्यंत चांगले होणार.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**अहो, ठराव वाचा, ठराव वाचा. इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

**महापालिका सचिव :—**मी ठराव वाचते.
ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना वर्ष २०१८—१९ करीता प्रस्तावित कामांचा परिपूर्ण प्रस्ताव आचारसंहिता प्रभाग सोडुन प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता व निधी उपलब्धतेकरीता व वर्ष २०१९—२० करीता दोन्ही वर्षो प्रस्तावित कामांची यादी मा .जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणेस मान्यता देत आहे.
**तसेच**

शहरातील ज्या ज्या दलित वस्तीचा समावेश नाही तिथे तिथे त्याचा समावेश करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

**सदस्य श्री. विजय पाटील :—**दरवर्षी दलित वस्तीचे काम उशिरा होत आहे.?

**सदस्य श्री. किशोर वनवारी :—**५ नंबरमधील काम नाही आहे.

**महापालिका सचिव :—**मी यात लिहित आहे, आचारसंहितेचा प्रभाग वगळुन.

**सदस्य श्री. राजेश वानखेडे:—**दलित वस्तीची कामे झाली पाहिजे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २१ :—**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना वर्ष २०१८—१९ करीता प्रस्तावित कामांचा परिपूर्ण प्रस्ताव निधी प्रशासकिय मान्यता व निधी उपलब्धतेकरीता व वर्ष २०१९—२० करीता अंदाजीत प्रस्तावित कामांची यादी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

शासनाचे नगरविकास विभागाकडील संदर्भिय दिनांक ०५/०३/२००२ च्या शासन निर्णयाद्वारे नागरी क्षेत्रासाठी दलित वस्ती सुधारणा योजनेची प्रभावी अंमलबजावणीकरीता मार्गदर्शक तत्वे विहित केलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता सादर केले जातात.

सन २०१८-१९ करिता जिल्हास्तरीय बैठकीचे अनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव व वर्ष २०१९-२० करिता अंदाजित प्रस्तावित कामांची यादी सादर करणेबाबत कळविले आहे.

शासन निर्णय क्र.विघयो-१०२००/१५९२/प्र.क्र.१८९, नवि-०४ दिनांक ०५/०३/२००२ मधील परिच्छेद क्र.४ अन्वये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमधील कामे हाती घेता येणार आहे.

तसेच परिच्छेद क्र.५ अन्वये शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षित प्रभाग तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द नागरीकांचे प्रमाण जेथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने) या योजनेअंतर्गतची अनुज्ञेय कामे हाती घेण्यात यावीत असे स्पष्ट नमुद करण्यात आले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक वर्ष २०१७ फेब्रुवारी रोजी पाड पडली. सदर निवडणूकीमध्ये मा.राज्य निवडणूक आयोगाने महापालिका क्षेत्रातील प्रभागांची प्रभाग रचना अंतिम करुन महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक २५ नोव्हेंबर,२०१६ अन्वये अधिसुचना प्रसिध्द केलेली आहे. सदर अधिसूचनेमध्ये एकूण २० प्रभागांमध्ये खालील १३ प्रभाग "अनुसूचित जाती" प्रवर्गाकरीता राखीव घोषित केलेले आहेत. सदर १३ प्रभागातील एकूण लोकसंख्या व अनुसूचित जातीच्या लोकांची लोकसंख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | प्रवर्ग | एकूण लोकसंख्या | अनुसुचित जातीची लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १ अ | अनुसूचित जाती | २४५९४ | ३२३८ |
| २ | ३ अ | अनुसूचित जाती | २६५८६ | ५४३१ |
| ३ | ४ अ | अनुसूचित जाती | २७४७३ | ८५१६ |
| ४ | ७ अ | अनुसूचित जाती | २८४०२ | १११९५ |
| ५ | ८ अ | अनुसूचित जाती | २६८८७ | २९८९ |
| ६ | १० अ | अनुसूचित जाती | २४१८७ | ५३५४ |
| ७ | १२ अ | अनुसूचित जाती | २६९३६ | ७२८५ |
| ८ | १३ अ | अनुसूचित जाती | २६४३४ | ७१०० |
| ९ | १४ अ | अनुसूचित जाती | २५३३४ | ४४४२ |
| १० | १५ अ | अनुसूचित जाती | २४४८२ | २८१८ |
| ११ | १७ ब | अनुसूचित जाती | २५३३८ | ३५४३ |
| १२ | १८ ब | अनुसूचित जाती | २४०५८ | ९४१३ |
| १३ | २० अ | अनुसूचित जाती | २१५९३ | ४७०० |

उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र.६ मध्ये या योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेली सार्वजनिक हिताची कामे नमुद केलेली आहेत. त्यास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे उक्त अनुसूचित जातीच्या राखीव १३ प्रभागांतील तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा वस्त्यांमधील खालील कामांचे प्राकलने तयार करण्यात आली आहेत.

**<u>वर्ष २०१८-१९ करीता प्रस्ताव</u>**

| अ.क्र | प्रभाग क्र. | कामाचे नाव | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|---|
| | | **प्रभाग क्षेत्र क्र.१** | |
| १ | १ | १) उल्हासनगर- १ वाल्मिकनगर येथील अनिता जाधव यांच्या घरापासुन छाया जगतापयांच्या घरापर्यत सी.सी.पेव्हमेट नाली/नालाबांधणे व चेकर्स टाईल्सबसविणे. | १०००००० |
| २ | १ | ३) प्रभाग क्र.१ येथीलइंदीरानगर येथे समाज मंदीर बांधणेबाबत. | १५००००० |
| ३ | १ | ५) उल्हासनगर-१ सम्राट हर्षवर्धननगर येथे जुने मोकडीस समाजमंदिरच्या जागेवर नवीन समाज मंदिर बांधणे. | १५००००० |
| ४ | १ | १) उल्हासनगर-१ इंदिरानगरयेथे संत ज्ञानेश्वर शाळे जवळ दोनी बाजूसनाली सी.सी वपायऱ्या बनविणे. | २०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | १ | ३) उल्हासनगर-१ वाल्मिकनगर येथे सहदेव साळवे घरापासुन धोबीघाटमुख्य रस्त्यापर्यंत मोठा नाला व कल्वंट बनविणे. | २५०००००० |
| ६ | २ | १) उल्हासनगर-१ मधील पॅनल क्र.२ येथील मुकुंदनगरयेथे नाली व सी.सी.पेव्हेमेट बनविणे. | १५०००००० |
| ७ | ३ | १) उल्हासनगर-१ वाल्मीनगर येथे आणि परिसरात ड्रेन नाली व फुटपाथ बांधणे आणि चेकर्सलादी बसविणे. | १००००००० |
| ८ | ३ | २) उल्हासनगर-१ भीमनगरयेथे नंदजेठानी घरासमोर पुरुष/महिला करीता १० बैठकीचे शौचालय बाधणे. | १५०००००० |
| ९ | ४ | १) उल्हासनगर-३ प्रभुदनगरयेथे सी.सी. पेव्हमेट व नाली बाधणे. | १५०००००० |
| १० | ४ | ३) उल्हासनगर-३ रमाबाईआंबेडकरनगर येथे सी.सी. पेव्हमेट व नाली बांधणे. | १००००० |
| ११ | ४ | २) उल्हासनगर-३ महात्माफुलेनगर येथे हनुमानमंदिर ते बुध्दविहार पर्यंत रस्तेससी.सी.पेव्हमेट बनविणे. | २५०००००० |
| १२ | ४ | १) उल्हासनगर-३ रमाबाईआंबेडकरनगर ते विठ्ठल मंदीपर्यत एम २५० ने रस्ता व नाली बांधणे. | २००००००० |
| १३ | ४ | २) उल्हासनगर-३ डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर परिसरात पाण्याची ४ इंच पाईप लाईन टाकणे. | २००००००० |
| | | **एकुण** | **२१५०००००** |
| **प्रभाग क्षेत्र क्र.२** | | | |
| १ | ७ | प्रभागक्र.७, हद्दीतील रमाबाई आंबेडकर नगरमधील बुध्द विहार समोर दलित वस्ती निधीतुन समाज मंदिर बांधणेबाबत. | २५०००००० |
| २ | ७ | प्रभागक्र.७, हद्दीतील रमाबाई आंबेडकर नगरयेथे आव्हाड यांच्या घराशेजारी दलित वस्ती निधीतुन नाल्यावर स्लॅप टाकणेबाबत. | २००००००० |
| ३ | ७ | हनुमानेनगर, विरु यादव यांच्या घरा मागे नाली/सी.सी. करुन चेकर्स लादी बसविणेबाबत. | १५०००००० |
| ४ | ७ | हनुमाननगरमधील नविन वस्ती यादव तबेला जवळ सी.सी. नाली बनविणे. | १५०००००० |
| ५ | ७ | गांधी नगर मध्ये सी.सी. पॅसेज व चेकर्स लादीबसविणेबाबत. | १५०००००० |
| ६ | ७ | भैय्यासाहेब आंबेडकर नगर मधील आरोग्य केद्रा समोरील अर्धवट समाज मंदिराचे काम करणे बाबत. | १५०००००० |
| ७ | ७ | दुर्गानगर व रामदेव बाबा नगर येथील एम.एम.आर.डी. ए शौचालयाची दुरुस्ती करणे. | २००००००० |
| ८ | ७ | भैय्यासाहेब आंबेडकर नगर येथेबाबा येथील मोडकरीस आललेल्या आरोग्य केंद्राच्या जागेवर नवीन समाज मंदिर बनविणे. | १५०००००० |
| ९ | १२ (अ) | उल्हासनगर-२ येथील पांडे किराणा ते डांगरे यांच्या घरा पर्यंत वइतर ठिकाणी सिमेंट काँक्रिटचा रस्ता व दोन्ही बाजुला नाली बनविण्याबाबत. | २५०००००० |
| १० | १२ (अ) | उल्हासनगर-२ येथील प्रल्हाद गायकवाड यांचे घर ते डांगरे यांच्या घरा पर्यंत वइतर ठिकाणी सिमेंट काँक्रिटचा रस्ता व दोन्ही बाजुला नाली बनविण्याबाबत. | २५०००००० |
| ११ | ७ | नवनाथकिराणा पासून ते प्यारेलाल किराणा पर्यत सी.सी.रोड बनविणे | १५०००००० |
| १२ | ८ | गौतमबुद्ध नगर ते कांबळे हाऊस पर्यंत पेव्हेमेंट रोड व नाली बनविणेबाबत. | १९९३१६१ |
| १३ | ८ | गौतम बुद्ध नगरयेथे ८+२ शिटचे शौचालय बनविणे . | १५०००००० |
| १४ | १२ | सम्राट अशोक नगर मधील रमाबाई शाळेच्या परिसरात संरक्षण भिंत बांधणे. | ६००००००० |
| १५ | ८ | उल्हासनगर-३ येथील गौतमबुध्द नगर येथे नाला, सि.सि.पेव्हमेंट व नाली बनविणे. | २५०००००० |
| १६ | ८ | हरिजनकॉलनीयेथे नाला दुरुस्ती व बनविणे. | ४९९६४६० |
| १७ | ८ | कामगारहॉस्पीटल समोरील रस्ता सी.सी. पेव्हमेंट बनविणे. | ५२८०८१० |
| | | **एकुण** | **४२७७०४३१** |
| **प्रभाग क्षेत्र क्र.३** | | | |
| १ | १० | पंचशीलनगरभय्यासाहेब आंबेडकर सोसायटी येथे विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा बनविणे. | २५०००००० |
| २ | १० | बुध्दनगरनाली,गटार सी.सी.पॅसेज बनविणे. | २००००००० |
| ३ | १४ | गजाननगरयेथील शिवाजी मैदान पासून ते चंद्रमणी बुध्दविहार पर्यत रस्ता एम २५० ने बनविणे ,नाली बांधणे व सी.सी.पॅसेज बनविणे. | ३००००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | १४ | विरसावरकरनगर येथील विर सावरकर चौक ते पप्पू गुजराथी यांचे घरापर्यत रस्ता एम २५० ने बनविणे व नाली बांधणेबाबत. | २५०००００ |
| ५ | १४ | सितारामनगर, मद्रासीपाडा, ते गजाननगर एकविराकॉलनी पर्यत मोठा नाला बांधणे व स्लॅब टाकणे. | ९९८०००० |
| ६ | १४ | उल्हासनगर-४ पॅनल क्र.१४ (अ) मधील भिम कॉलनी येथील उषा तामगाडे ते राजू गवई यांच्या घरापर्यतव आजूबाजूच्या परिसरात सी.सी.पायवाटा व नाली बनविणे. | १०००००० |
| ७ | १५ | महादेवनगर येथेविविध ठिकाणी नाली बांधणे वसी.सी.पॅसेजबनविणे. | ३०००००० |
| ८ | १५ | निळकंठचाळ, नवनाथ राठोड ते नायर यांचे घरापर्यत एम २५० ने रस्ता व नाली बांधणे. | ५०००००० |
| ९ | १५ | श्रीरामनगरयेथे विविध ठिकाणी एम २५० ने रस्ता व नाली सी.सी.पॅसेज बनविणे. | ३०००००० |
| १० | १५ | महादेवनगरपाताळेश्वर शिव मंदिर मागे शौचालय बांधणे. | १५००००० |
| ११ | १५ | मिलिंद नगर, शिवनगर परिसरात सि.सि.पायवाटा बनविणे. | १५००००० |
| | | **एकुण** | **३४९८००००** |
| **प्रभाग क्षेत्र क्र.४** | | | |
| १ | १८ | समतानगर येथे मिलींदशिंदे यांच्या घरापासून गवई यांच्या घरापर्यंत २५० रोड, नाली, व सी सी.सी.बनविणेबाबत. | ६०००००० |
| २ | १८ | रामजी आंबेडकर नगर १० चाळ येथे एकता मित्र मंडळ व आजूबाजूच्यापरिसरात सी.सी. नाला व पायवाटा बनविणेबाबत. | ४०००००० |
| ३ | १८ | कुर्लाकॅम्प चौक त मातारमाई चौकापर्यंत रस्ता २५० व नाली बनविणे. | १०००००००० |
| ४ | १८ | भरतनगर-२ निलेश यांच्या घराजवळ तसेच विविध ठिकाणी सी.सी. नालीबनविणे. | २५००००० |
| ५ | १८ | महात्मा फुलेकॉलनी येथे शारदा आंभोरे यांच्या घराजवळ समाज मंदीरबांधणे. | ३०००००० |
| ६ | १८ | महात्माफुले कॉलनी येथे शारदा आंभोरे यांच्या घरपासून ते रायबोल कॉम्प्लेक्स पर्यत मोठानाला व साकव बनविणे व स्लॅब टाकणे. | ५०००००० |
| ७ | १८ | गुजरातीपाडा येथे मोठा नाला बनविणे. | ६०००००० |
| ८ | १८ | डिफेन्स कॉलनी, महात्मा फुले कॉलनी, रामजी आंबेडकर नगर, समतानगर, येथील शौचालय दुरुस्ती करणे. | ३०००००० |
| ९ | २० अ | महात्मा फुलेनगर येथेनाली, गटार, सी.सी. पॅसेज व रस्ता बनविणे. | २०००००० |
| १० | २० अ | आंबेडकर नगर येथे नाली, गटार, सी.सी. पॅसेज व रस्ता बनविणे. | १५००००० |
| ११ | १९ (ब) | कुर्ला कॅम्प येथे विभिन्नसी.सी. व पायवाटा बनविणे. | ३०००००० |
| १२ | १९ (ब) | वीर तानाजी नगर येथे मोठा नाला बांधणे व स्लॅब टाकणे. | ४,००,००० |
| १३ | १७(अ) | राधेश्याम येथील श्री. डांगेयांचे घरापासून मुख्य रस्त्या पर्यंत नाली चे बांधकाम करणे. | ५००००० |
| १४ | १७(अ) | कैलाशनगरपरिसरात श्री. पाटोळे यांचे घराच्या मागील बाजूस सी.सी.पायवाट बनविणे. | ५००००० |
| १५ | १७(अ) | प्रभाग क्र.१७ मधील कैलाश नगर ते गणेशनगर पर्यंतच्यानाल्यावरीलसरंक्षण भिंतीचे बांधकामकरणे. | ३०००००० |
| १६ | १३ | सुभाष टेकडी मध्ये आम्रपाली ते साईबाबानगर येथेविविध ठिकाणी सी.सी. पायवाटा व नाली बनविणेबाबत. | १०००००० |
| १७ | १३ | पंचशिलनगर येथे विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा व नाली बनविणे बाबत. | १०००००० |
| १८ | १३ | भरत नगर, सोंगेवाडी येथील परिसरात फुटपाथ व नाली बनविणे. | १५००००० |
| १९ | १३ | उल्हासनगर-४ येथील सिताराम नगर शिवाईनगर शाखेच्या आजूबाजूच्या परिसरात सि.सि.पायवाटा बनविणेबाबत. | १५००००० |
| २० | १८ | हनुमान मंदीराच्या मागे श्री. हनुमान फुलोरे यांच्या खदानीलगत रिटनिंग वॉलचे बांधकाम करणे. | १५००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | १८ | नागसेन नगर येथील परिसरात सि.सि.रस्ता व नाली बनविणे. | १५०००००० |
| २२ | १६ | पॅनल क्र.१६ मध्ये प्रेमनगर या ठिकाणी एम.२५० ने सिमेंट रस्ता, सि.सि.व नाली बनविणे. | २५०००००० |
| २३ | १६ | पॅनल क्र.१६ मध्ये योगेशनगर या ठिकाणी एम.२५० ने सिमेंट रस्ता सि.सि.व नाली बनविणे. | २५०००००० |
| २४ | १९ | प्रभाग क्र.१९ मधील नेहरुनगर उल्हासनगर-५ याठिकाणी दलित वस्तीमध्ये रस्ता व नाली बनविणे. | १०००००० |
| | | **एकुण** | **६४४०००००** |

**वर्ष २०१९-२० करीता प्रस्ताव**

| अ.क्र | प्रभाग क्र. | कामाचे नाव | प्राकलनीय किंमत |
|---|---|---|---|
| | | **प्रभाग क्षेत्र क्र.१** | |
| | | | |
| १ | १ | २) उल्हासनगर-१, सम्राट हर्षवर्धन नगर येथील कमल सरवदे घरापासुन तेरुकसाना यांच्या घरापर्यंत सी.सी.नाली, व चेकर्स लादी बसविणे. | ५००००० |
| २ | १ | ४) उल्हासनगर-१ ,इंदिरानगर, टिळकनगर टेकडी परिसरात मध्ये आदेशपाटील घरापासुन ते शोभा जाधव घरापर्यत नाली वपायऱ्या बनविणे. | १०००००० |
| ३ | १ | २)उल्हासनगर-१ हनुमानगरयेथील हनुमान मदिराजवळ खेरुडकर यांच्या घरापर्यत आणि विविध ठिकाणी सी.सी.पेव्हमेट आणि नाली बनविणे. | १०००००० |
| ४ | १ | ४) उल्हासनगर-१ वाल्मिकनगर येथे विविध ठिकाणी सी.सी.पेव्हमेंटआणि नाली बांधणे. | १०००००० |
| ५ | २ | २) उल्हासनगर-१ मधील मुकुंदनगर येथे समाज मंदिराच्या मागे व आजुबाजुच्या परिसरातसी.सी. पॅसेज व नाली बांधणेबाबत. | १५००००० |
| ६ | ३ | १) उल्हासनगर-१ आनंद मुँथु नगर ते वाल्मीकनगर सी.सी. पेव्हमेट आणिनाली बनविणे. | २५००००० |
| ७ | ४ | २) उल्हासनगर-३ डॉ.आबडेकरनगर येथे सी.सी. पेव्हमेट वनाली बांधणे. | २०००००० |
| ८ | ४ | १) उल्हासनगर-३ महात्माफुलेनगर येथील श्री.घनश्याम गुप्ता घरापासुनते बरखत शेखघरापर्यत सी.सी.पेव्हमेंट रोड बनविणे. | २५००००० |
| ९ | ४ | ३) उल्हासनगर-३ महात्माज्योतीबाफुलेनगर येथील बुध्दविहार बाजुला समाज मंदिर बांधणे. | १५००००० |
| १० | ४ | ३) उल्हासनगर-३ रमाबाई आंबेडकरनगर शोभाताई जाधव ऑफीसजवळील महिला शौचालयांची दुरुस्ती करणेबाबत. | ५०००००० |
| | | **एकुण** | **१४००००००** |
| | | **प्रभाग क्षेत्र क्र.२** | |
| १ | ७ | हनुमाननगर, नविन वस्ती बाबुलाल यादव यांच्या घराशेजारी सी.सी. व चेकर्स लादीबसविणेबाबत. | १५००००० |
| २ | ७ | हनुमाननगर, लहू भोईर यांच्या घराशेजारी नाली/सी.सी/ करुन चेकर्स लादी बसविणेबाबत. | १५००००० |
| ३ | ७ | हनुमाननगर, मज्जीद शेजारी सी.सी. पॅसेज व चेकर्स लादी बसविणेबाबत. | १५००००० |
| ४ | ७ | दुर्गा माता नगर, येथे असलेले युसूफ खानयांच्या घरा मागे नाली बनविणे व चेकर्स लादी बसविण्याबाबत. | १५००००० |
| ५ | ७ | हनुमाननगरमाता मंदिर जवळ रस्ता बनविणे. | १५००००० |
| ६ | ७ | वनवारीयांच्या घरा शेजारी नाली/सी.सी. करुन चेकर्सलादी बसविणेबाबत. | १५००००० |
| ७ | ७ | रामदेवनगर येथे नाली/सी.सी. करुन चेकर्स लादी बसविणेबाबत. | १०००००० |
| ८ | ७ | हरिओम दुर्गा नगर, मध्ये मज्जीदच्या मागे नाली/सी.सी.करुन चेकर्स लादी बसविणेबाबत. | १५००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | १२ | सम्राटअशोकनगर आर.पी.या चौक पासून ते सिध्दार्थ बालवाडी व इतर ठिकाणी सिमेंटकाँक्रिटचारस्ता व दोन्ही बाजुला नालीबनविण्याबाबत. | ९१५५९७० |
| १० | ७ | महात्मा गांधीनगर येथे सी.सी. पॅसेज व एम-२५० ने रस्ता बाधणेबाबत. | १५००००० |
| ११ | ८ | गौतम बुद्धनगर येथे संमाज मंदिर बनविणे. | २५००००० |
| १२ | १२ | सम्राट अशोक नगर येथील वालधुनी नाल्यालगत संरक्षण भिंत बांधणे. | १००००००० |
| | | **एकुण** | **३४६५५९७०** |
| **प्रभाग क्षेत्र क्र.३** | | | |
| १ | १० | सरस्वतीनगरनाली, गटार सी.सी. पॅसेज बनविणे. | १५००००० |
| २ | १४ | सितारामनगरयेथील सखारामनगर ते गजानननगरभोले यांचेघरा पर्यत रस्ता एम २५० ने बनविणे, नाली बांधणे व सी.सी.पेसेज बनविणे | २५०००००० |
| ३ | १४ | गजानननगरयेथे विविध ठिकाणी सी.सी पायवाटा, नाली बनविणे. | २५००००० |
| ४ | १४ | उल्हासनगर-४ पॅनल क्र.१४ (अ) मधील माता रमाबई आंबेडकर प्रवेशद्वार ते जया यांच्या घरापर्यतचापरिसरात एम ३५० सिमेंट रोड बनविणेबाबत. | १०००००० |
| ५ | १४ | उल्हासनगर-४ पॅनल क्र.१४ (अ) मधील महात्मा फुलेनगरया परिसरात समाज मंदिर बांधणे बाबत. | १०००००० |
| ६ | १५ | वाल्मिकनगर येथेएम २५० ने रस्ता व नाली व सी.सी.पॅसेज बनविणे. | ५०००००० |
| ७ | १५ | संतोषनगरयेथे विविध ठिकाणी एम २५० ने रस्ता व नाली सी.सी.पॅसेज बनविणे. | ३०००००० |
| ८ | १५ | महादेवनगरमेनरोड ते ठाकूर नामदेव यांचे घरापर्यत मोठा नाला बनविणे व स्लॅब टाकणे. | ३०००००० |
| ९ | १५ | गिताकॉलनी येथे एम २५० ने रस्ता व नाली व सी.सी. पेसेज बनविणे. | २०००००० |
| | | **एकुण** | **४४००००००** |
| **प्रभाग क्षेत्र क्र.४** | | | |
| १ | १८ | रामजीआंबेडकर नगर व आजुबाजुचा परिसर, बुध्द कॉलनी वआजुबाजुचा परिसर येथे सी.सी पॅसेज, नाली व गटारेदुरुस्ती करणेबाबत. | १०००००० |
| २ | १८ | अशोकवनबोर्डापासून ते रायबोले कॉम्प्लेक्स पर्यंत २५० रोड व मोठा नाला बनविणेबाबत. | ८०००००० |
| ३ | १८ | समतानगर येथे मेन रोड साकव पासून ते मदरसा ते आवला हाऊस पर्यत मोठानाला व संरक्षण भिंत बनविणे. | १०००००० |
| ४ | १८ | समतानगर मुख्य रस्ता पासून गॅस गोडाउन पर्यत रस्ता २५० कलवर्ट वनाली बांधणे. | ३०००००० |
| ५ | १८ | हनुमानगर व भरतनगर-२ येथे समाज मंदीर बांधणे. | ३०००००० |
| ६ | १८ | महात्मा फुले कालॉनीयेथेपराग दामले यांच्या घरापासून ते मुख्य रस्त्यापर्यत रस्ता २५० व नाली सी.सी.करण्याबाबत. | ५०००००० |
| ७ | १८ | गुजरातीपाडा येथे सुनिल मोहिते यांच्या घराजवळ व विविध ठिकाणीनालीपायवाटा व सी.सी. बनविणे. | २५००००० |
| ८ | १८ | सिध्दार्थनगर येथे २० सीट चे शौचालय बनविणे, बाजूच्या परिसरातसी.सी. नाली करणे. | ५०००००० |
| ९ | १८ | समतानगर येथे १० सीटचे शौचालय बनविणे व बाजूच्या परिसरात सी.सी.नाली करणे. | २५००००० |
| १० | | आंबेडकर नगर चौकापासून ते कर्मवीर दादा साहेब चौक पर्यंत रस्ता २५० व नाली बनविणे. | १०००००० |
| ११ | २० अ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयापासुन ते शिवमंदिर जुनी खडी मशिनपर्यत नाली, गटार, सी.सी. पॅसेज व रस्ता बनविणे. | २५००००० |
| १२ | १९ (ब) | ५) वीर तानाजी नगर येथे विभिन्न ठिकाणी सी.सी. पायवाटा व नालाबांधणे. | ३०००००० |
| १३ | १७(अ) | गणेशनगर परिसरात श्री. गायकवाड यांचे घरा पासून श्री. साइे यांचे घरा पर्यत नालीचेबांधकाम करणे. | ५००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | १७(अ) | जिजामातानगर परसिरात श्री. आडपवार यांचे घराचे मागील बाजूस नाली चे बांधकाम करणे. | ५००००० |
| १५ | १३ | सुभाष टेकडी गुरुव्दाराच्या मागे येथे विविध ठिकाणी सी.सी. पायवाटाव नाली बनविणे बाबत. | १०००००० |
| १६ | १३ | सिध्दार्थनगर, गायकवाड चाळ येथे विविध ठिकाणी सी.सी पायवाटा वनाली बनविणे. | १०००००० |
| १७ | १३ | उल्हासनगर-४ येथील पंचशिल नगर परिसरात सि.सि.पायवाटा व नाली बनविणे. | २०००००० |
| १८ | १८ | हनुमान नगर जवळील श्री कौड यांचे घरालगत सि.सि.रोड बनविणे. | १५००००० |
| १९ | १८ | सुभाष टेकडी, बुध्द कॉलनी येथील परिसरात सि.सि.रोड बनविणे. | १५००००० |
| २० | १६ | पॅनल क्र.१६ मध्ये वीर सावरकर नगर याठिकाणी एम.२५० सिमेंट रस्ता सि.सि.व नाली बनविणे. | २५००००० |
| | | **एकुण** | **७५००००००** |

**२०१८-१९ गोषवारा (Abstract)**

| **प्रभागक्षेत्र क्र.** | **एकूण कामे** | **एकूण रक्कम** |
|---|---|---|
| प्रभागक्षेत्र क्र.१ | १३ | २१५००००० |
| प्रभागक्षेत्र क्र.२ | १७ | ४२७७०४३१ |
| प्रभागक्षेत्र क्र.३ | ११ | ३४९८०००० |
| प्रभागक्षेत्र क्र.४ | २४ | ६४४००००० |
| **एकूण** | **६५** | **१६३६५०४३१** |

**२०१९-२० गोषवारा (Abstract)**

| **प्रभागक्षेत्र क्र.** | **एकूण कामे** | **एकूण रक्कम** |
|---|---|---|
| प्रभागक्षेत्र क्र.१ | १० | १४०००००० |
| प्रभागक्षेत्र क्र.२ | १२ | ३४६५५९७० |
| प्रभागक्षेत्र क्र.३ | ९ | ४४०००००० |
| प्रभागक्षेत्र क्र.४ | २० | ७५०००००० |
| एकूण | **५१** | **१६७६५५९७०** |

वरील नमुद केल्याप्रमाणे वर्ष २०१८-१९ करीता एकूण ६५ कामांचे रुपये १६,३६,५०,४३१/- (अक्षरी रुपये सोळा कोटी छत्तीस लाख पन्नास हजार चारशे एकतीस मात्र) एवढ्या प्राकलनिय खर्चाचे प्रस्ताव महासभा ठराव, तांत्रिक मान्यता व आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता व निधी उपलब्धतेकरीता मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणे आहे. तसेच त्यांनी त्यांचे संदर्भिय पत्रानुसार कळविल्याप्रमाणे वर्ष २०१९-२० मधील प्रस्तावित कामांची यादीही तयार करण्यात आली आहे.

तरी सदर दोन वर्षाचे प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणेपूर्वी मा.महासभेची मान्यता आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे मान्यतेस्तव प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: १८ दिनांक:—३०/५/२०१९

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना वर्ष २०१८—१९ करीता प्रस्तावित कामांचा परिपूर्ण प्रस्ताव निधी प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता व निधी उपलब्धतेकरीता व वर्ष २०१९—२० करीता दोन्ही वर्षो प्रस्तावित कामांची यादी मा .जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणेस मान्यता देत आहे.

परंतु

पोटनिवडणूकीमुळे ज्या प्रभागात आचारसंहिता लागु झाली आहे त्या प्रभागाची कामे आचारसंहिता संपृष्टात आल्यावर पाठविण्यास मान्यता देत आहे.

<u>तसेच</u>

शहरातील ज्या ज्या दलित वस्तीचा समावेश नाही तिथे तिथे त्याचा समावेश करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २२ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

**विषय क्र. २२ :—** श्री. भगवान यादव कुमावत, प्र. सहा. आयुक्त यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

———————————————————————————————————

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. २२:—**श्री. भगवान यादव कुमावत,** प्र. सहा. आयुक्त यांना वैदयकिय प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

**श्री.भगवान यादव कुमावत, प्र.सहा.आयुक्त,**यांना वैदयकिय उपचारासाठी चोटीवाला हॉस्पिटल, उल्हासनगर—२ येथील खाजगी रुग्णालयात दिनांक ०५/७/२०१७ ते दिनांक ९/७/२०१७ या कालावधीत फॅक्चर झालेमुळे उपचार करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये १,२७,७१८/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी ०६/०९/२०१७ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुज्ञेय ठरतो. चोटीवाला हॉस्पिटल, उल्हासनगर—२ हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ७५ टक्के व ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) ह्रदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक ह्रदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णालयाकडुन अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, **श्री.भगवान यादव कुमावत, प्र.सहा.आयुक्त,**यांचा आजार आकस्मिक आजारापैकी अ.क्र ५ या आजारामध्ये मोडतो. त्यांनी सदर आजाराच्या उपचारासाठी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही.

त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,०६,५४७/— रक्कम मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १९ <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मिना सोनेजी

अनुमोदकाचे नाव :— श्री. शंकर लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. भगवान यादव कुमावत, प्र. सहा. आयुक्तयांना वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,०६,५४७/—इतकी नियमाप्रमाणे वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.
या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २३, २४, २५ व २६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २३** :— महापालिकेच्या ताब्यातील साईट क्र. १०६ नगरपालिका ठराव क्र. ५३९, दिनांक २१/१२/१९९० व महासभा ठराव क्र. २९, दिनांक २०/१२/२००० अन्वये शहिद दुनिचंद तेजनदास कलानी मेमोरीयल ट्रस्ट उल्हासनगर—५ या शैक्षणिक संस्थेस भाडेपट्ट्याने दिलेल्या भाडेकालावधी माहे जुन—२०२० मध्ये संपृष्टात येत असल्याने कराराचे पुढील ३० वर्षासाठी नुतनीकरण करणेकरीता सादर केलेल्या अर्जावर धोरणात्मक निर्णय होणे.

---

---

⇨ **विषय क्र. २४** :— महापालिकेच्या ताब्यातील साईट क्र. १०६ नगरपालिका ठराव क्र. ५३९, दिनांक २१/१२/१९९० व महासभा ठराव क्र. २९, दिनांक २०/१२/२००० अन्वये शहिद दुनिचंद तेजनदास कलानी मेमोरीयल ट्रस्ट उल्हासनगर—५ या शैक्षणिक संस्थेस नुतनीकरणाद्वारे पुढील ३० वर्षासाठी दयावयाच्या जागेचे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या धर्तीवर रु. १/— प्रतिवर्ष नाममात्र भाडे निश्चित करणेबाबत सादर केलेल्या अर्जावर धोरणात्मक निर्णय होणे.

---

---

⇨ **विषय क्र. २५** :— महापालिकेच्या ताब्यातील साईट क्र. ५७ नगरपालिका ठराव क्र. ५३९, दिनांक २१/१२/१९९०, व महासभा ठराव क्र. २९, दिनांक २०/१२/२००० अन्वये शहिद दुनिचंद तेजनदास कलानी मेमोरीयल ट्रस्ट उल्हासनगर—१ या शैक्षणिक संस्थेस दिलेल्या

जागेचा भाडेपट्टयाने देण्यासाठी करारनामा करुन मिळणेबाबत सादर केलेल्या अर्जावर धोरणात्मक निर्णय होणेबाबत.

---

---

⇨ **विषय क्र. २६** :—महापालिकेच्या ताब्यातील साईट क्र. ५७ नगरपालिका ठराव क्र. ५३९, दिनांक २१/१२/१९९०, व महासभा ठराव क्र. २९, दिनांक २०/१२/२००० अन्वये शहिद दुनिचंद तेजनदास कलानी मेमोरीयल ट्रस्ट उल्हासनगर—१ या शैक्षणिक संस्थेस दिलेल्या जागेचे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या धर्तीवर रु. १/— प्रतिवर्ष नाममात्र भाडे निश्चित करणेबाबत सादर केलेल्या अर्जावर धोरणात्मक निर्णय होणे.

---

याबाबत मला प्रशासनाकडुन पत्र आले आहे की आम्ही चारही विषय मागे घेत आहे. तर चारही विषय विषय क्र. २६ पर्यंत मागे घेण्यात आले आहेत. काय करायचे?

<u>काही सदस्य:—</u>ठिक आहे, मान्य.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २७** :— महापालिकेच्या आस्थापनेवर स्वतंत्र प्रदुषण नियंत्रण कक्ष स्थापन करणेस व सदर विभागासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेबाबतच्या प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय होणे.

---

<u>सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>पास, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पास.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २७**:—महापालिकेच्या आस्थापनेवर स्वतंत्र प्रदुषण नियंत्रण कक्ष स्थापन करणेस व सदर विभागासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेबाबतच्या प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय होणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. १७३/२०१० ( महेश बेडेकर विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर )दाखल केलेली आहे. महापालिका क्षेत्रातील रस्त्यांवर/पदपथावर विनापरवानगी उभारण्यात येणारे तात्पुरता मंडप/स्टेज/कमान तसेच ध्वनी प्रदुषण रोखण्यासाठी सदर याचिकेस अनुसरून सन २०१० पासुन मा. उच्च न्यायालयाने शासनास वेळोवेळी निर्देश खालिलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

१. ध्वनी प्रदुषण नियंत्रण नियमांची अंमलबजावणी करणेकरीता शांतता क्षेत्र घोषीत करणे.
२. शहर ध्वनी प्रदुषण नियंत्रण समिती गठीत करणे.
३. ध्वनी प्रदुषण रोखण्यासाठी त्यामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करणे.
४. सण, उत्सव इत्यादी पर्यावरणपूरक पध्दतीने साजरा करणेकरीता समन्वय समिती गठीत करणे.
५. रस्त्यावर/पदपथावर विनापरवानगी उभारण्यात आलेल्या तसेच परवानगी पत्रातील अटींचा भंग करून उभारलेल्या मंडपांवर कार्यवाही करणे.
६. ध्वनी प्रदुषणाबाबत प्राप्त तक्रारींवर कार्यवाही करणे.
७. ध्वनी प्रदुषणाबाबत प्राप्त तक्रारी स्विकारणेसाठी ठेवण्यात आलेल्या टोल फ्री क्रमांकावर प्राप्त होणा—या तक्रारींची नोंदवहीत नोंद घेवुन संबंधित विभागास तक्रारी वर्ग करणे, तशी

नोंद नोंदवहीत ठेवणे तसेच प्राप्त तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महापालिकेच्या संकेतस्थळावरून प्रसिध्द करणे.

८. शहरात साजरे होणारे सण, उत्सव व इतर कार्यक्रमादरम्यान रात्रीचे १०.०० वा. नंतर फटाके फोडणे, बॅंड, म्युझिक वाजवणेस प्रतिबंध करणे. यासंदर्भात प्राप्त तक्रारी संबंधित पोलिस विभाग व प्रभाग कार्यालयांकडे वर्ग करणे.

९. ध्वनी प्रदुषण कमी करण्यासाठी/रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

१०. शहराचा पर्यावरण अहवाल तयार करणे.

तसेच उक्त जनहित याचिका १७३/२०१० व इतर जल प्रदुषण, हवा प्रदुषण इत्यादीसंदर्भात शासनाकडून दिलेल्या आदेश/निर्देशानुसार वेळोवेळी कार्यवाही करून शासनास/मा. न्यायालयास अहवाल सादर करावा लागत असल्याने तसेच प्रदुषणाशी संबंधित कार्यवाहीकरीता त्या विषयाशी संबंधित तांत्रिक कर्मचारी असणे गरजेचे आहे, याकरीता स्वतंत्र प्रदुषण नियंत्रण कक्ष स्थापन करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर कक्षात तांत्रिक व प्रदुषण तज्ञ कर्मचारी असणे आवश्यक आहे. महापालिकेच्या आस्थापेनवर असे तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नसल्याने कंत्राटी तत्वावर नियुक्त करणे आवश्यक आहे.

राज्यातील इतर महानगरपालिका उदा. ठाणे महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका इत्यादी महानगरपालिकांमध्ये स्वतंत्र प्रदुषण नियंत्रण कक्षाची स्थापना केलेली आहे. या महापालिकेत हवा प्रदुषणाबाबत सार्व. बांधकाम विभागाकडून कार्यवाही होते, जलप्रदुषणाबाबत पाणीपुरवठा विभागाकडून कार्यवाही होते, आणि ध्वनी प्रदुषणाबाबत आतापर्यंत मालमत्ता विभागामार्फत संबंधित विभागांना पत्रव्यवहार करणे, तक्रारी वर्ग करणे, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करणे इत्यादी बाबी करण्यात येतात. परंतु मालमत्ता विभागात अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने तसेच प्रदुषणाबाबत मा. न्यायालयांनी दिलेल्या निर्देशानुसार विहीत मुदतीत वेळोवेळी कार्यवाही करून अहवाल सादर करणे आवश्यक असल्याने महापालिकेच्या आस्थापनेवर **स्वतंत्र प्रदुषण नियंत्रण कक्ष** स्थापन करणेस व सदर विभागासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेबाबतच्या प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय होणेसाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: २० — दिनांक:—३०/५/२०१९

सुचकाचे नाव :—श्री. शंकर लुंड
अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिकेच्या आस्थापनेवर स्वतंत्र प्रदुषण नियंत्रण कक्ष स्थापन करणेस व सदर विभागासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २८ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २८ :—प्रस्तावाची सूचना**

ठेकेदारी पध्दतीने कार्यरत कामगार यांचे वेतनभत्ते बॅकेतून अदा करणेबाबत, तसेच संबंधीत कामगारांना देय भविष्य निर्वाह निधी, कामगार राज्य विमा, कमाल निश्चित वेतन, इत्यादी सोयी सवलती मिळणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

प्रस्ताव देणारे सदस्य उपस्थित नसल्याने हा प्रस्ताव संपृष्टात येत आहे. त्यांचा एकटयाचा प्रस्ताव आहे त्यास कोणी अनुमोदक सुध्दा नाही त्यामुळे हा विषय संपृष्टात आला.

विषय क्र. २९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २९ :—<u>प्रस्तावाची सूचना</u>**

श्री. नितेश प्रकाश रंगारी यांना उपकर निर्धारक व संकलक पदी पदोन्नती मिळणेबाबतचा पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

प्रस्ताव देणारे सदस्य उपस्थित नसल्याने हा प्रस्ताव संपृष्टात येत आहे.

विषय क्र. ३० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३० :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

शासनानं प्रस्तावित केलेल्या परिपत्रकान्वये येत्या महासभेमध्ये धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता मयत कुटुंबियांच्या उर्वरीत वारसांना अनुकंपातत्वाने कायम पदावर घेण्याबाबत पालिका सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

प्रस्ताव देणारे सदस्य उपस्थित नसल्याने हा प्रस्ताव संपृष्टात येत आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३१ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३१ :—<u>प्रस्तावाची सूचना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेचा महासभा ठराव क्र. ३६, दिनांक १९/१०/२०१८ रोजीचा ठरावात अंशत: बदल करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय मी आणला आहे, ठराव क्र. ३६, १९/१०/२०१८ हा आपल्या महासभेने केला होता. या अंतर्गत आपल्या महापालिकेतर्फे चालविण्यात येणारी पतपेढी आहे, ज्याचे भाडे आपण वसुल करत आहोत आणि ते भाडे जास्त आहे. ती पतपेढी आपल्या महापालिकेतच एका छोटयाश्या तुकडयात चालत आहे. ज्याचे आपण नाममात्र भाडे घेत होतो परंतु आता जे भाडे आहे ते जास्त आहे. त्या पतपेढीमध्ये उल्हासनगर महापालिकेतील सर्व कर्मचारी आहेत. तर मी आपणांस विनंती करतो की नियमानुसार कमीत कमी भाडे आकारा. कारण बरेचसे असे कार्य आहे, त्यांच्याकडुन आपण १०० रुपये, २०० रुपये भाडे घेवुन कार्य करत असतो. त्यात आपले बरेचसे कर्मचारी व अधिकारी आहेत. तर माझी सभागृहाला अशी विनंती असेल की त्या पतपेढीचे भाडे कमीत कमी जेवढे करु शकतो तेवढे नियमानुसार केले जावे.

**<u>महापालिका सचिव :—</u>**ठरावात काय टाकु, ठराव कसा येईल.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**प्रथम तर माझा असा प्रश्न आहे की किती वर्षापासुन तेथे पतपेढी आहे, केव्हापासुन ती जागा त्यांना हस्तांतरीत केली आहे. तेव्हापासुन ते

आजपर्यंत किती भाडे वसुल केले आहे आणि भाडे वसुलीकामी आपण काय काय कार्य केले आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, १९८५ मध्ये तत्कालीन मुख्याधिकारी, उल्हासनगर नगरपालिका यांनी मोफतमध्ये पतपेढी चालविण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली होती. आपणाकडे ब—याचशा संस्था आहेत त्यांच्याकडुन मोफतमध्ये, १ रुपयात, २ रुपयात भाडे घेतो. १९८५ मध्ये जे मुख्याधिकारी होते त्यांनी यांना मोफत ही जागा उपलब्ध करुन दिली होती. १९८५ पासुन ती लोक येथे आहेत परंतु अचानक आपण २०१८—१९ मध्ये एक ठराव केला आपण त्यांच्याकडुन भाडयाची मागणी केली व महासभेत एक चुक झाली १०० टक्के भाडे दिले आहे ते भरण्यास असमर्थ आहेत. तर मी म्हणतो मोफत नाही परंतु १०००, ५०० असे नाममात्र भाडे घेवु या. आपलेच कर्मचारी आहेत, ते आपल्या शहरासाठी कार्य करत असतात, ते आपल्या शहराच्या विकासासाठी कार्य करीत असतात.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>सन्माननिय महापौरजी, आता श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की त्यांना भाडे नाममात्र केले पाहिजे. ते सामाजिक काम करत असतात त्यांनी सांगितले की सामाजिक कामासाठी ५०० ते १००० रुपये नाममात्र भाडे आहे. ज्या शाळा सामाजिक काम करत असतील, जी मंडळे सामाजिक काम करत असतील, त्याच कामकारांकडुन मला वाटते १२ ते १३ टक्के वसुल करत असेल, जर आपण त्या पतपेढीचा हिशोब काढला तर आज किती करोडोमध्ये आहे, त्याचे चेअरमन येथे बसलेले असतील कामगारांचे. त्याचा खुलासा करावा आणि दर महिन्याला, दरवर्षी उत्पन्न किती आहे, त्याचा त्यांनी अहवाल दयावा. कारण परिस्थिती अशी आहे की तुम्ही व्याज कमी करणार आहात काय? ते जर ते कमी करत असतील तर हे भाडे कमी करण्याचा विचार करु शकतो. त्या पतपेढीकडुन किंवा त्या कामगारांकडुन व्याज जास्त घेत असतील आणि ते वारंवार प्रशासनाची उधळपट्टी करत असतील तर भाडे कुठल्याही प्रकारे माफ करण्यात येवु नये अशी माझी विनंती आहे.
<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>तपासून नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मी सभागृहास विनंती करतो की, आमच्या महापौर महोदया बाहेर जावु इच्छिते तर मी आपले स्थायी समिती सभापती श्री. राजेश वदारिया यांचे नाव सुचवितो.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सभागृह नेताजी आपण या.

<u>महापालिका सचिवः—</u>आपणातील कोणी अनुमोदन दयावे. हे सर्वांनी मिळुन ठरवायचे असते कोण बसायचे ते. आता तर मा. महापौर महोदयांनी आदेश दिले आहे तर कोणीतरी अनुमोदन दया.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>महापौर महोदया, सचिव महोदया, मी तर श्री. राजेश वदारिया यांचे नाव सुचीत केले होते. त्यावर कोणी अनुमोदन दिले तर, मी तर सुचीत केले आहे ना, मी त्यावर अनुमोदन कसे देणार.

<u>सदस्य श्री. शंकर लुंडः—</u>मला मा. महापौर महोदयांनी बोलाविले आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेरावः—</u>मी श्री. शेरी लुंड यांना तात्पुरते पीठासीन अधिकारी म्हणुन त्यांच्या नावाला अनुमोदन देतो.

यावेळी मा. महापौर श्रीमती पंचम ओमेश कालानी सभागृहातुन बाहेर गेल्या. 
यावेळी मा. महापौरांच्या जागी श्री. शंकर गोविंदराम लुंड हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

<u>महापालिका सचिव :—</u>ठराव सांगा.

<u>पीठासीन अधिकारी श्री. शंकर लुंड :—</u>जसे आयुक्त महोदयांनी सांगितले त्याची चौकशी करुन व आयुक्त महोदय नियमानुसार करतील.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे, या ठरावात नियमानुसार कारवाई करण्यात येईल. ठराव असा होईल की प्रशासन नियमानुसार पाहून कारवाई करेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>प्रस्ताव माझा आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>मी त्यांना तेच म्हटले ज्यांचा प्रस्ताव असेल तोच ठराव देतो. मग ज्यांचा प्रस्ताव आहे त्यांनीच ठराव दयावा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ठरावात असे टाका की मिनिमम भाडे, ठराव मी आधीच दिला आहे आपणांस. आपण पुर्वी जो ठराव केला होता त्यात अंशत: बदल करुन पतपेढीचे ५०० रुपये भाडे आकारण्यात यावे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>सांगितले ना की नियमानुसार तपासुन कारवाई करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ठिक आहे, करा तसा.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे, नियमानुसार तपासुन कारवाई करण्यात येईल, मान्य?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ३१:—<u>प्रस्तावाची सूचना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचा महासभा ठराव क्र. ३६, दिनांक १९/१०/२०१८ रोजीचा ठरावात अंशत: बदल करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये अशासकिय प्रस्तावाव्दारे लक्ष वेधुन इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्रमांक ३६ दिनांक १९/१०/२०१८ रोजीच्या ठरावात अशंत: बदल करणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिका पतपेढी ही केवळ महानगरपालिकेतील कर्मचा—यांना त्यांचे अडीअडचणीत ना नफा ना तोटा या तत्वा नुसार आर्थिक मदत करत आहे. सदरील संस्था ही महानगरपालिकेच्या कर्मचा—याची आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील कामगारांच्या पतपेढीच्या कार्यालयासाठी सन १९८५ पासुन तत्कालीन उल्हासनगर नगरपालिका मुख्याधिकारी साहेबानी लेखी स्वरुपात निशुल्क कार्यालय उपलब्ध करुन दिलेले आहे . कोणत्याही प्रकारचे भाडे वसुल करण्यात येत नव्हते.

तरी वर नमुद केलेल्या बाबी लक्षात घेउन महासभा ठराव क्रमांक ३६ दिनांक १९/१०/२०१८ रोजीच्या ठरावात अशंत: बदल करुन कमीत कमी शुल्क कार्यालय वापरा करीता घेणे साठी येत्या महासभे मध्ये विषय घेवून याबाबत चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र:</u> २१ <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतील कामगारांच्या पतपेढीच्या कार्यालयासाठी भाडे शुल्क आकारणेबाबत नियमानुसार तपासून कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३२ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३२ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

श्रीमती वैशाली नरेंद्र चौधरी व श्रीमती अलका कांबळे ठोक वेतन लिपीक यांचे वयोमर्यादेची अट शिथील करुन त्यांना कायम स्वरुपी सेवेत घेणेबाबतचा पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

————————————————————————————————————————

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. आयुक्त महोदय, आपण ३८ लोकांना पदावर समावेश करुन घेतले आहे. श्रीमती वैशाली नरेंद्र चौधरी व श्रीमती अलका कांबळे हे ठोक वेतनावरील लिपिक यांचे वय जास्त असल्याने त्यांना प्रमोशन दिले नाही तर मी आपणांस विनंती करेल की, मी जो विषय ठेवला आहे त्यात त्यांच्या वयोमर्यादेची अट शिथील करुन त्यांना कायम करण्यात यावे. त्यांचे वय जास्त असल्याने त्यांना देत नाही तर मग त्यांची अट शिथील करुन महासभेत मान्यता दयावी. दोन्हींना प्रमोशन देण्यात यावे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>नियमाप्रमाणे तपासुन कारवाई करण्यात येईल. चला पुढे.

<u>महापालिका सचिव :—</u>नियमाप्रमाणे तपासून कारवाई करण्यात येईल असा ठराव करण्यात येईल.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ३२:—<u>प्रस्तावाची सूचना</u>

श्रीमती वैशाली नरेंद्र चौधरी व श्रीमती अलका कांबळे ठोक वेतन लिपीक यांचे वयोमर्यादेची अट शिथील करुन त्यांना कायम स्वरुपी सेवेत घेणेबाबतचा पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये अशासकिय प्रस्तावाव्दारे लक्ष वेधुन इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाने ठोक वेतनावर ४८ लोकांना स्थायी पदावर समावून घेतलेले आहे. परंतु उर्वरित लोकाना अदयाप पर्यत स्थायी पदावर समावून घेण्यात आलेले नाही त्यामध्ये प्रामुख्याने अपात्र कर्मचारी यांचे यादीतील काही कर्मचारी यांची वयोमर्यादा जास्त असल्यामुळे त्यांचे वारसास नोकरी देणे साठी त्यांनी अर्ज दाखल केलेले आहे. परंतु काही कर्मचारी अपात्र आहेत त्यांचे वारस सध्या लहान आहेत त्यामुळे त्यांच्या वयाची मर्यादा शिथील करुन त्यांना स्थायी पदावर समावून घेणे अंत्यत आवश्यक तथा गरजेचे आहे. त्यामध्ये प्रामुख्याने श्रीमती वैशाली नरेंद्र चौधरी , ठोक वेतन लिपीक यांची मुले लहान आहेत म्हणजेचे १४ वर्षाचे आहेत व मुलगी वय वर्षे ६ असे आहेत. तसेच श्रीमती अलका कांबळे, ठोक वेतन लिपीक यांचेहि मुले लहान असल्यामुळे त्यांचे उदरनिर्वाह करण्यासाठी या दोन्ही लिपीकांची वयोमर्यादा शिथील करुन त्यांना कायम स्वरुपी सेवेत समावून घेण्या साठी येत्या महासभे मध्ये विषय घेवून याबाबत चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र:</u> २२ <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती वैशाली नरेंद्र चौधरी व श्रीमती अलका कांबळे ठोक वेतन लिपीक यांचे वयोमर्यादेची अट शिथील करुन त्यांना कायम स्वरुपी सेवेत घेणेचा प्रस्ताव नियमाप्रमाणे तपासून कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३३ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३३ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

उल्हासनगर शहरातील मृत जनावरांची विल्हेवाट विदयुत दाहिनी मार्फत लावण्याकरीता तशी विदयुत दाहिनी उपलब्ध करण्याबाबत पालिका सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

———————————————————————————————————————

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>मा. महापौर महोदया, आयुक्त महोदय, कृपया या विषयात एक ठोस असा निर्णय घेण्यात यावा, जशी उल्हासनगर—५ ची अडचण निघुन जाईल. या मृत जनावरांच्या अग्निसंस्कारासाठी अशी जागा दयावी जेथे जनता राहत नसेल, तेथे आणखी कोणाला त्रास न होवो, तर या विषयावर लवकरात लवकर उपाययोजना करुन काम पुर्ण करावे तर आपले उपकार होतील. आयुक्त महोदय, जर काही अडचण नसेल तर लवकरात लवकर करा. काही आजच्या आज तर होणार नाही, तर लवकरात लवकर करा.

<u>श्री.शंकर लुंड, पीठासीन अधिकारी :—</u>आयुक्त महोदय, दादा श्री. सतरामदास यांनी जो प्रस्ताव मांडला तर त्यावर लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात यावी.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>धन्यवाद साहेब.

<u>महापालिका सचिव:—</u>यात असा ठराव होईल की विदयुत वाहिनी खरेदी करणेस प्रशासनास निदेश देत आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ३३:—<u>प्रस्तावाची सूचना</u>

उल्हासनगर शहरातील मृत जनावरांची विल्हेवाट विदयुत दाहिनी मार्फत लावण्याकरीता तशी विदयुत दाहिनी उपलब्ध करण्याबाबत पालिका सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये आपणांस या प्रस्तावाच्या सुचनेद्वारे विनंती करु इच्छितो की, उल्हासनगर शहरात भटके कुत्रे, जनावरे मेल्यास ते उचलण्यास लागणारा वेळ व त्यामुळे पसरणारी दुर्गंधी तसेच ते उचलल्यानंतर डंपिंग ग्राउंड येथे टाकत असल्याने त्या ठिकाणी देखील दुर्गंधी पसरुन त्याद्वारे पसरणारे आजार याचा विचार करता उल्हासनगर शहरातील मृत जनावरांची विल्हेवाट विद्युत दाहिनी मार्फत लावण्याकरीता तशी विदयुत दाहिनी महापालिकेने घेण्याकरीता तशा प्रस्तावाच्या सुचनेद्वारे लक्ष वेधुन यावर चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा.

<u>महासभा ठराव क्र: २३</u> <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील मृत जनावरांची विल्हेवाट विदयुत दाहिनी मार्फत लावण्याकरीता तशी विदयुत दाहिनी महापालिकेस खरेदी करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३४ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ३४ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

बॅ.नं. २०९६, रुम नं. १०, सेक्शन ३५, मीरा नारायण बंगल्याचे बाजुचे चौकास मीरा नारायणदास वनवारी चौक हे नाव देणेबाबत पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. आयुक्त साहेब, आपली नामकरणाची जी समिती बनली आहे त्यात कोणत्या चौकात, कोणत्या जागेवर कोणाचे नाव दिले पाहिजे, आपण तसा प्रस्ताव पारीत करुन या सभागृहात पाठवितो, परंतु मागील दिड वर्षात बरेचसे अशी प्रस्ताव प्रलंबित आहेत. ते होत नाहीत व ते नाव येत नाहीत, त्यामुळे वेगवेगळे सदस्य

अशासकिय प्रस्तावाच्या माध्यमातुन, जसे आमचे सदस्य श्री. चौधरी यांनी विषय आणला अटलबिहारी वाजपेयी नावाने बोटक्लबचा, असे वेगवेगळे नाव येत आहेत तर मी आपणांस विनंती करेल की, या नामरणाच्या विषयास सर्वसंमतीने पारीत करावे. श्री. किशोर नारायण वनवारी हे आपल्या सभागृहाचे जुने सदस्य आहेत. तसेच त्यांच्या मातोश्रीच्या नावाने तेथे त्यांनी एक मंदिर सुध्दा बनवुन ठेवले आहे. तर मीरा नारायणदास वनवारी असे नामकरण तेथे केले जावे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ३४:—<u>प्रस्तावाची सूचना</u>

बॅ.नं. २०९६, रुम नं. १०, सेक्शन ३५, मीरा नारायण बंगल्याचे बाजुचे चौकास मीरा नारायणदास वनवारी चौक हे नाव देणेबाबत पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये अशासकिय प्रस्तावाव्दारे लक्ष वेधुन इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या निवडणूकीच्या दिवशी स्वर्गीय मीरा नारायणदास वनवारी या दि. १६/२/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता स्वर्गवाशी झाल्या आहेत. बॅ.नं.२०९६/१० सेक्शन ३५ मिरा नारायण बंगल्याचे बाजुला चौकाचे नांव ''मीरा नारायणदास वनवारी'' चौक असा अर्ज दिड वर्षा पासुन श्री. किशोर वनवारी, नगरसेवक यांनी केलेला आहे. महानगरपालिकेच्या महासभेस दि.२२/२/२०१९ रोजी दोन वर्ष निवडून आल्याचा कालावधी झालेला आहे परंतु तदर्थ समेतीची मिटीग अदयाप पर्यत महासभेत लावण्यात आलेली नाही. म्हणुन महासभेत अशासकिय प्रस्ताव देत आहे. दिनांक १६/२/२०१९ रोजी स्वर्गीय मीरा नारायणदास वनवारी यांची पुण्य तिथी आहे.त्याचे पुण्यतीथीचे अगोदर वर नमुद केलेल्या चौकास मीरा नारायणदास वनवारी हे नांव देण्या बाबत चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा..

<u>महासभा ठराव क्र:</u> २४ <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे बॅ.नं. २०९६, रुम नं. १०, सेक्शन ३५, मीरा नारायण बंगल्याचे बाजुचे चौकास मीरा नारायणदास वनवारी चौक हे नाव देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३५ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३५ :—प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाची समस्या गंभीर होत असून नियंत्रण व निर्मुलन करण्यास शासन निर्णय अंमलबजावणी करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३९७ अ कलम २६०, २६१, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये कायदेशीर कारवाई करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. भुल्लर राजेंद्रसिंह यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सन्माननिय महापौरजी, आयुक्त महोदय, सचिव महोदया, या विषयान्वये उल्हासनगर शहरातील अनाधिकृत बांधकाम व अतिक्रमणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे.शासनाने या संदर्भात वेळोवेळी उपाययोजना पुरेशा परिणामकारक दिसुन येत नाही.सदर च्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनाचे योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यात आले नाही.महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक व नगरचना अधिनियमच्या तरतुदीचे सर्रासपणे उल्लंघ्न होत आहे. तत्कालिन आयुक्त श्री.निंबाळकर यांचे बदली नंतर उल्हासनगर शहरात विविध ठिकाणी शेकडो अनधिकृत बांधकामाचे पेव फुटले आहेत.संबंधित सहा.आयुक्त हे बीट मुकादमाद्वारे कामाची पुर्तता करण्यासाठी नोटीस बजावण्याचे काम करतात.परंतु त्या नोटीसची पुढील आवश्यक निष्कासन,एफ.आर.आय.दाखल करणे या नियमानुसार केल्या जात नाही.सहा. आयुक्त त्यांच्या कार्यक्षेत्रातील निदर्शनास आलेल्या अनधिकृत बांधकामे निष्कासन करण्यास चालढकल करत असतात.संबधित अधिकारी व बेकायदेशिर ठेकेदार यांचे लागेबंधे असल्याकारणाने उल्हासनगर शहरात बेधडकपणे कोणालाही न जुमानता अनधिकृत बांधकामे जोमात सुरु आहेत.

काही ठिकाणी रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली तर काही ठिकाणी रिस्क प्लॅानच्या नावाखाली बहुमजली अनधिकृत इमारतीचे बांधकामे सुरु आहेत. सध्या उल्हासनगर शहरात जुन्या/जीर्ण इमारती पडण्याचे सत्र सुरु आहे. सदर बाब अत्यंत गंभीर आहे. सद्यस्थितीत घाईगडबडीत बेकायदेशिर ठेकेदार निकृष्ट दर्जाचे अनधिकृत आर.सी.सी. बांधकाम करीत आहे.त्यामुळे भविष्यात सदर इमारती कोसळण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरी भरडला जात आहे.मंजुर बांधकाम प्रारुप नियंत्रण नियमावलीच्या विसंगत आहेत.महाराष्ट्र महापालिका अधिनियम २५८,महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४८ चे सुध्दा सर्रास उल्लंघ्न होत आहे. उल्हासनगर शहरात सन २००३ जनहित याचिकेच्या सुचनेनुसार अध्याधेश नियमानुसार शहरात कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करण्यात येवु नये.तसेच सन २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ढेवण्यास अपयशी ठरलेल्या संबंधित सहा. आयुक्तांवर कडक कायदेशिर कारवाई करण्याची तरतुद आहे.या महापालिकेतील सध्या कार्यरत काही सहा.आयुक्तांवर एन्टी करप्शनचे गुन्हे दाखल आहेत तर काहींवर निलंबणाची कारवाई झालेली आहे.

तरी येत्या महासभेत महापालिका स्थायी समिती,परिवहन समिती इ.कामकाजाविषयी तयार केलेल्या उल्हासनगर महानगरपालिका नियम १९९७ चे कलम १(जे) तरतुदीनुसार कार्यसुचीवर खालिल प्रस्ताव समाविष्ट करणेबाबत पुरक सुचना उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाची समस्या गंभीर होत असुन नियंत्रण व निर्मुलन करण्यास शासन निर्णय अंमलबजावणी करणेबाबत व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३९७ अ कलम २६०,२६१,२६४,२६७ किंवा ४७८ अन्वये कडक कायदेशिर कारवाई करण्यात यावी ही विनंती.

सदस्य श्री. अरुण आशान :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आता श्री. राजेंद्रसिंह भुल्लर आमचे वरिष्ठ सदस्य यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे, खरोखर विचार करण्यासारखे आहे, कारण की, छोटया मोठया कारणामुळे लोकांना त्रास होत असतो, परंतु अशा कित्येक जागा आहेत रातोरात इमारती, मोठ मोठे गाळे तेथे बांधले जातात. खर म्हटले तर शासनाचे नियम सुध्दा आहेत, आणि मला वाटते महापालिका आज कोठेतरी कमी पडते. आज आमचे वरिष्ठ नगरसेवकांनी तुम्हांला जे लिहून दिलेले आहे त्यामध्ये साहेब, तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे. कारण की असेच चुकीचे काम

होत असेल तर त्यामुळे जिवित हानी होण्याची सुध्दा शक्यता आहे. आणि ती जिवीत हानी झाल्यानंतर आमचा परत शोक प्रस्ताव मग परत त्यांना पैसे दयायचे त्यासाठी आम्ही प्रस्ताव आणतो, विषय आणतो. त्याकरीता प्राथमिकता जर आपण जर पाळली अशा बांधकामास आळा घातला तर मला वाटते की, या शहरास शिस्त लागेल. या शहराचे नाव पुर्वी खराब होते परंतु मध्यंतराच्या काळामध्ये ते सुधारले आणि आपलया काळामध्ये अजुन सुधारण्याचा प्रयत्न झाला, आमचे दुर्देव आम्हांला जास्त कार्यकाळ मिळाला नाही, परंतु एक दिवस तुमच्याकडे आहे त्या एक दिवसामध्ये साहेब, असे काहीतरी परिपत्रक काढा जेणेकरुन एक नंबर ते पाच नंबर प्रभागामध्ये प्लीज, माझी विनंती आहे. महापौर महोदया, आपण आदेश दया, जर अशी काही अनाधिकृत बांधकामे होत आहेत तर त्यावर कारवाई झालीच पाहिजे. धन्यवाद।

**पीठासीन अधिकारी, श्री. शंकर लुंड:—** कायदेशीर कारवाई करा.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**मा. महापौरजी, सन्माननिय नगरसेवकाचा मान ठेवुन त्यांनी आता माझ्याकडे जे निवेदन केलेले आहे, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर महाराज यांनी माझ्याकडे निवेदन केले आहे, श्री. अरुण आशान यांची सूचना विचारात घेवुन आजच आदेश निर्गमित करीत आहे.

**महापालिका सचिव :—**हा ठराव करावा लागेल, कारण अशासकिय सूचना आहे. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाची समस्येवर नियंत्रण व निर्मुलन करण्याकामी शासन निर्णयाची अंमलबजावणी करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३९७ अ कलम २६०, २६१, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये कायदेशीर कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे. ठिक आहे?

**काही सदस्य :—**पास—पास......

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती माने सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ३५:—प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाची समस्या गंभीर होत असून नियंत्रण व निर्मुलन करण्यास शासन निर्णय अंमलबजावणी करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३९७ अ कलम २६०, २६१, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये कायदेशीर कारवाई करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. भुल्लर राजेंद्रसिंह यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे.शासनाने या संदर्भात वेळोवेळी उपाययोजना पुरेशा परिणामकारक दिसुन येत नाही.सदर च्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनाचे योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यात आले नाही.महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक व नगरचना अधिनियमच्या तरतुदीचे सर्रासपणे उल्लंघ्न होत आहे.तत्कालिन आयुक्त श्री.निंबाळकर यांचे बदली नंतर उल्हासनगर शहरात विविध ठिकाणी शेकडो अनधिकृत बांधकामाचे पेव फुटले आहेत. संबंधित सहा.आयुक्त हे बीट मुकादमाद्वारे कामाची पुर्तता करण्यासाठी नोटीस बजावण्याचे काम करतात.परंतु त्या नोटीसची पुढील आवश्यक निष्कासन,एफ.आर.आय.दाखल करणे या नियमानुसार केल्या जात नाही.सहा.आयुक्त त्यांच्या कार्यक्षेत्रातील निदर्शनास आलेल्या अनधिकृत बांधकामे निष्कासन करण्यास चालढकल करत असतात.संबधित अधिकारी व बेकायदेशिर ठेकेदार यांचे लागेबंधे

असल्याकारणाने उल्हासनगर शहरात बेधडकपणे कोणालाही न जुमानता अनधिकृत बांधकामे जोमात सुरु आहेत.

काही ठिकाणी रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली तर काही ठिकाणी रिस्क प्लॉनच्या नावाखाली बहुमजली अनधिकृत इमारतीचे बांधकामे सुरु आहेत.सध्या उल्हासनगर शहरात जुन्या/जीर्ण इमारती पडण्याचे सत्र सुरु आहे.सदर बाब अत्यंत गंभीर आहे.सद्यस्थितीत घाईगडबडीत बेकायदेशिर ठेकेदार निकृष्ट दर्जाचे अनधिकृत आर.सी.सी.बांधकाम करीत आहे.त्यामुळे भविष्यात सदर इमारती कोसळण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरी भरडला जात आहे. मंजुर बांधकाम प्रारुप नियंत्रण नियमावलीच्या विसंगत आहेत.महाराष्ट्र महापालिका अधिनियम २५८,महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४८ चे सुध्दा सर्रास उल्लंघन होत आहे. उल्हासनगर शहरात सन २००३ जनहित याचिकेच्या सुचनेनुसार अध्यादेश नियमानुसार शहरात कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करण्यात येवु नये.तसेच सन २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ढेवण्यास अपयशी ठरलेल्या संबंधित सहा.आयुक्तांवर कडक कायदेशिर कारवाई करण्याची तरतुद आहे.या महापालिकेतील सध्या कार्यरत काही सहा. आयुक्तांवर एन्टी करप्शनचे गुन्हे दाखल आहेत तर काहींवर निलंबणाची कारवाई झालेली आहे.

तरी येत्या महासभेत महापालिका स्थायी समिती,परिवहन समिती इ.कामकाजाविषयी तयार केलेल्या उल्हासनगर महानगरपालिका नियम १९९७ चे कलम १(जे)तरतुदीनुसार कार्यसुचीवर खालिल प्रस्ताव समाविष्ट करणेबाबत पुरक सुचना उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाची समस्या गंभीर होत असुन नियंत्रण व निर्मुलन करण्यास शासन निर्णय अंमलबजावणी करणेबाबत व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३९७ अ कलम २६०,२६१,२६४,२६७ किंवा ४७८ अन्वये कडक कायदेशिर कारवाई करण्यात यावी ही विनंती

तरी येत्या महासभेत चर्चा होवुन निर्णय होवुन ठराव करणे ही विनंती

<u>महासभा ठराव क्र:</u> २५ <u>दिनांक:—३०/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :—श्री. चरणजितकौर भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरामध्ये अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाची समस्येवर नियंत्रण व निर्मुलन करण्याकामी शासन निर्णयाची अंमलबजावणी करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३९७ अ कलम २६०, २६१, २६४, २६७ किंवा ४७८ अन्वये कायदेशीर कारवाई करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३६ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ३६ :—<u>प्रस्तावाची सूचना क्रमांक. २</u>

पियुष फाउंडेशन, उल्हासनगर मॅराथान २०१९ यांना महापालिकेकडुन आर्थिक मदत मिळणेबाबत पालिका सदस्य श्री. भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

यावेळी सदस्या श्रीमती कविता पंजाबी इंदिरा उदासी, श्रीमती जयश्री पाटील हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**मा. महापौर महोदया, विषय असा आहे की या मॅराथान संस्थेने जी मॅरेथान घेतली त्यात उल्हासनगरमध्ये जशी वर्ल्ड लेव्हलला असते तशा प्रकारची मॅराथान उल्हासनगरला झाली आणि त्याची दखल आपल्या देशाच्या पहिलेच्या संस्थेने घेतल आणि अनेक वृत्तपत्रामध्ये आणि अनेक ठिकाणी टिव्ही चॅनलवर उल्हासनगरची मॅरेथान झळकली. एकदम शास्त्रशुध्द पध्दतीने ती मॅराथान झाली होती, मा. महापौर महोदयाही उपस्थित होते आणि त्यांच्या हस्ते पारितोषिक वाटण्यात आले. हे चांगल्या पध्दतीचे आणि जवळ जवळ उल्हासनगरमध्येच नाही तर देशाच्या अनेक ठिकाणावरुन झारखंड, उत्तराखंड यांनी या स्पर्धेमध्ये भाग घेतले. यामध्ये शहरातील नामचिन लोक सकाळी ३.३० वाजेपासुन उपस्थित होते आणि मी स्वत: तेथे ५.३० वाजता गेलो होतो. तेथे मा. महापौर वगैरे सर्व आलेत. तर माझा सांगायचा उद्देश असा आहे की आपल्याकडुन त्यांना आर्थिक मदत मिळावी आणि पुढील वर्षी त्यांनी अजुन चांगलया पध्दतीने खेळावे आणि उल्हासनगरमधुन त्यांना अनुदान मिळावे अशी माझी आपणांस विनंती आहे.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>**नियमाप्रमाणे तपासुन जर देय असेल तर देण्यात येईल.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, साहेब मागील वर्षी सक्शन मशिन मागविण्यात आली होती, मान्सुन आधी आणि ती सुध्दा एक्स्ट्रा होती साहेब तर ३० वर्षापासुन जे अंडरग्राउंड ड्रेनेज जे चोकअप होते ते क्लीअर सुध्दा झाले होते. तर आपणांस विनंती आहे की परत मान्सुनपुर्वी मागविण्यात यावे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**पियुष संस्थेच्या बाबतीत आपण जसा ठराव करत आहोत तसा एक प्रस्ताव महासभेमध्ये झाला. सावित्रीबाई सामाजिक संस्था त्यांनी मॅराथान घेतली होती त्यांचा विषय आला होता परंतु त्यांना अदयाप पैसे दिले नाहीत तर तेही पैसे दिले पाहिजेत.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. ३६:—**<u>प्रस्तावाची सूचना क्रमांक. २</u>**

पियुष फाउंडेशन, उल्हासनगर मॅराथान २०१९ यांना महापालिकेकडुन आर्थिक मदत मिळणेबाबत पालिका सदस्य श्री. भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, पियुष स्पोर्ट फाऊंडेशन, उल्हासनगर यांनी दिनांक १७ फेंब्रुवारी, २०१९ रोजी उल्हासनगर शहरांचे नागरींकासाठी भगवंती नावानी स्टेज, गोल मैदान, उल्हासनगर —२ पासून सांयकाळी ६.०० वाजता धावण्याची स्पर्धाचे आयोजन केले आहे.

सदर कार्यक्रम उल्हानगर शहरातचे नागरीकांचे हित संबंधी अल्यामुळे सदर संस्थेला महानगरपालिकेकडुन ‘उल्हासनगर मॅराथान २०१९’ करीता आर्थिक मदत मिळावी, याकरीता विनंती केली आहे.

तरी पियुष फाऊंडेशन, उल्हासनगर यांना **'उल्हासनगर मॅराथान २०१९'** करीता आर्थिक मदत मिळावी, हि विनंती

महासभा ठराव क्र: २६ दिनांक:३०/५/२०१९

सुचकाचे नाव :—श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पियुष फाउंडेशन, उल्हासनगर मॅरेथान २०१९ यांना नियमाप्रमाणे महापालिकेकडुन आर्थिक मदत देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— मा. आयुक्त साहेब, ही आपली जीवनाची शेवटची महासभा आहे.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—जीवनाची शेवटची महासभा आहे उदया काय होईल माहित नाही.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—जीवनाची नाही महापालिकेतील निवृत्तीपुर्वीची शेवटची महासभा बोलतो. आयुक्त महोदय, ॲज ए कमिशनर म्हणुन आपल्या जीवनातील ही शेवटची महासभा आहे. असे होवु शकते की आपण महापौर बनुन एखादया महापालिकेत खुर्चीवर बसाल. आणि महासभा ही आपल्या भविष्याच्या गर्भात आहे. परंतु आज जेवढया काही महासभा आपण आमच्यासोबत केल्या आहेत, त्यात आपली काम करण्याची जी पध्दत होती जास्त गोड होती. आज जरा कडु होती.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—दोन दिवसापासुन.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—काय गोष्ट आहे की आपणांस असे वाटते की माझी अजुन जवानी आहे मला रिटायर नाही झाले पाहिजे. रिटायर होण्याबाबत आपल्या मनात काही ठेस आहे का ज्यामुळे आपण आज फारच रागात आणि फारच रुढ असे उत्तर देत होते. परंतु आपण जेवढेपण पाच—सहा महिन्यात काम केले, जेवढे पण सदस्यांचे जे काम चार वर्षात झाले नाही, ते काम आपण केले आहेत.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे:— प्रदिपजी, सत्य कडु असते, खरे बोलेले तर त्यांना राग येतो.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—सर काय होते? जेव्हा शेवटची लास्ट ओव्हर असते, तेव्हा सगळयांना सिक्स मारायला लागते. त्यालाच खेळाडू म्हणतात. आज आपण लास्ट ओव्हरमध्ये प्रत्येक बॉलमध्ये सिक्स मारले आहेत. ठिक आहे सर, मी तुम्हांला धन्यवाद देतो, नगरसेवकांचे चार वर्षात जे काम झाले नव्हते, ते आज आपण केले आहेत. परंतु उद्या तुम्ही आयुक्त म्हणून राहणार नाहीत. परतु आमच्या मनामध्ये एक मित्र म्हणून

कायम राहणार आहेत. आज आपण आमचे जीवनभर मित्र राहणार आहेत आणि तुमच्या पुढच्या जीवनासाठी शुभेच्छा देतो.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u> साहेब, आमच्या सगळयांकडून तुम्हांला शुभेच्छा आहेत.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः—</u> सभागृहातर्फे आपल्या ज्या काही गोड कडू आठवणी आहेत, आठवणींमुळे आम्ही तुम्हांला पुढच्या भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u> मी सभागृहाला विनंती करतो की, उद्या आयुक्त साहेबांच्या सेवानिवृत्ती बाबत तरण तलाव इथे एक कार्यक्रम ठेवला आहे, साहेबांनी सगळयांना निमंत्रण पत्रिका दिली आहे, तिथे सगळयांनी उपस्थित राहावे. तिथे भरपूर भाषण करा, फुल गुच्छ दया.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः—</u>सभागृहामध्ये नाही बोलायचे नाही तर इतिवृत्तात येईल, संपुर्ण सभागृहाच्या वतीने तुम्हांला खुप खुप शुभेच्छा.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u>मा. महापौर साहेब, सभागृह नेते, या ठिकाणी उपस्थित, विरोधी पक्ष नेते, श्री. बोडारे साहेब, सन्माननिय नगरसेवक, नगरसेविका, या ठिकाणी उपस्थित अधिकारी/कर्मचारी, या ठिकाणी उपस्थित सर्व माध्यमाचे प्रतिनिधी आणि पत्रकार मित्र आणि या ठिकाणी उपस्थित असलेले सर्व संघटनांचे प्रतिनिधी आणि महानगरपालिकेचे प्रतिष्ठित नागरीक आणि बंधू आणि भगीनीनो, जवळ जवळ ७ महीने आणि २१ दिवसाचा कालावधी आपल्या समोर काम करायला मिळाले. मी आज काही जास्त बोलणार नाही, मला जे काय बोलायचे ते उद्या बोलेल. परंतु आपण या खेळीमेळीच्या वातावरणामध्ये मला इथे काम करण्याची संधी मिळाली आणि फार उशिरा मी या ठिकाणी आलो याचे मला दुःख झाले की, या शहराला आपण काही तरी देवू शकलो असतो. परंतु आपल्याकडे वेळ कमी होता. तरी परंतु मी या सभागृहाला विनंती आहे की, मा. बाळासाहेब ठाकरे यांचा क्रिडांगणाचा प्रस्ताव माझ्याकडे आला आहे, त्याचे टेंडर आपण केले आहे. सर्व स्थायी समितीचे सन्माननिय सदस्य आहेत, मा. भालेराव साहेब, इकडे लक्ष दयावे, आपण सर्वांनी ते लक्षात घेऊन आपल्या शहराला एवढी सुंदर वास्तू देत आहोत, त्या अनुषंगाने तो टेंडर आता पास झालेला आहे. मी त्या वेळेस नसेल, आपण स्थायी समितीमध्ये पास करावे. १० कोटी रूपये तिजोरीत पडलेले आहेत, १० कोटीची रक्कम आपल्याला सहा,सहा महीन्याला २४ कोटी महीन्याला मिळतात. आता आपला जो प्रकल्प आहे, शांतीनगरचा आणि खडेगोळवलीचा तो पुर्ण होत आलेला आहे, जुलै पर्यंत कार्यान्वीत होईल. अशी मला अपेक्षा आहे. सिव्हिल वर्क जवळ पास ८० ते ९० टक्के पुर्ण झालेले आहे आणि मशिनरी बसवायचे बाकी आहे. तिकडे १२ कोटी दर जास्त केले जातात ते थांबेल आणि मा. बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक किंवा क्रिडांगण आपण करणार आहोत, त्या ठिकाणी त्याच्यातील काही रक्कम सहा सहा महीन्यानी दोन दोन, तीन तीन कोटी उरवले तर ही एक चांगली वास्तू होईल. त्या नंतर इंदिरागांधी मार्केटचा सगळा प्लॅन तयार आहे. फक्त टेंडर काढणे बाकी आहे, आचार संहितेमुळे थांबले होते किंवा काही पदाधिका—यां बरोबर चर्चा करायची होती म्हणून थांबली होती. त्या नंतर बोट क्लबचा एक सुंदर प्रोजेक्ट बनवलेला आहे. त्या नंतर चारही स्मशानभुमीचे एकदम सुंदर प्राजेक्ट बनवलेले आहेत. आपल्या काही सन्माननिय सदस्यां बरोबर चर्चा करण्याचा योग आला, मी त्यांना दाखवले आहे आणि मला वाटते गोल मैदानाचे अंडर ग्राउंड पार्किंगचे प्रस्ताव बनवायला दिलेले आहे. तो अंतिम टप्यामध्ये आहे. अशी ही पाच कामे आपण एक वर्षामध्ये १०० टक्के मार्गी लावून अजून सहा महीन्यानी झाली असती. आता मी उद्या सेवा निवृत्त होत आहे. येणारे आयुक्त पण अनुभवी असतील आणि आपल्या सभागृहाला विश्वासात घेऊन सगळयां बरोबर व्यवस्थित काम करतील अशी मला अपेक्षा आहे. आपण जे सहकार्य दिले, तुमच्यामुळे मला या शहरामध्ये चांगल्या पध्दतीने काम करता आले आणि या शहराला काही तरी मला देता आले. काय देवू शकलो ते पण मी उद्या सांगेल, थोडक्यात आताच सांगितले आहे, तर माझी संपुर्ण सभागृहाला, अता मी ज्यांचे ज्यांचे

नाव घेतले आहे, सर्व पदाधिकारी, महापौर, उप महापौर, सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते, महीला बाल कल्याण समितीचे सभापती, सर्व सन्माननिय नगरसेवक, नगरसेविका, या ठिकाणी उपस्थित सर्व अधिकारी/कर्मचारी, पत्रकार मित्र सर्वांना आम्ही निमंत्रण पत्रिका पाठवली आहे. शासनातर्फे हा कार्यक्रम आयोजीत केला आहे, महापालिकेच्या पाठीमागे, तरण तलाव आहे, त्या ठिकाणी कार्यक्रम आयोजित केला आहे. आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे. या ठिकाणी उशिरा कार्यक्रमाला येण्याची प्रथा आहे. तरी माझी विनंती आहे की, सायंकाळी ७.०० वाजता कार्यक्रमाला वेळेवर यावे. एक तास, दोन तास तिथे काय भाषण करायचे ते करावे. ज्याला भाषण करायचे त्याला संधी दिली जाईल आणि सगळयांची यादी बघून थोडा थोडा वेळ दिला जाईल आणि मी सुध्दा भाषण करेल, त्या नंतर भोजनाची व्यवस्था केलेली आहे, कृपा करून भोजनाचा सर्वांनी आनंद घ्यावा, अशी मी सर्वांना विनंती करतो आणि आता पर्यंत केलेल्या सहकार्या बद्दल मी सर्वांचे आभार मानतो, धन्यवाद देतो.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—</u>आयुक्त साहेब, “जब तक सुरज, चांद रहेगा, अच्युत हांगे आपका नाम रहेगा” मी २५ वर्षा पासून राजकारणामध्ये आहे, पहीलेच असे अधिकारी हसरा चेहरा आज या महापालिकेतून जाणार आहेत, आज पहीले आयुक्त आहेत, जे महानगरपालिकेच्या खुर्चीतून सेवा निवृत्त होत आहेत. आज पर्यंत सर्वांची बदली झाली आहे. तर आनंदाची गोष्ट आहे, आपण चांगले काम केले आहे, सहकार्य केले आहे, चांगली पर्सनालिटी मी शासनाला निवेदन करेल किंवा देवाला प्रार्थना करतो की, कुठे ना कुठे आपल्याला ऑफिशली ऑन डयुटी मिळाली पाहीजे, अशी अपेक्षा करतो, धन्यवाद.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u>मला दुःख या गोष्टीचे झाले आहे, काल पर्यंत मी चांगल्या मुडमध्ये होतो. मी सेवानिवृत्त होत आहे आणि इथे तक्रारींचा पाऊस पडला आहे, सेक्रेटरीच्या बिलामध्ये तक्रार होत आहेकी, उल्हासनगरमध्ये काय चालले आह? इथून तक्रारी जात आहेत, ५ (२) (२) मध्ये मान्यता देत आहेत, एस्टिमेट मंजूर केले जात आहेत. हे करीत आहेत, ते करीत आहेत, करीत तर काहीच नाही, मला या गोष्टीचे दुःख वाटत आहे. त्यामुळे माझा मुड थोडा खराब झाला आहे.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—</u>“सर दिया बुजानेवाले बहुत होते है, दिया जलानेवाले बहुत कम होते है”तुम्ही दिवा विजवणा—यांच्या बोलण्याकडे लक्ष देवू नका, सत्य वरती देवाकडे पुस्ताकामध्ये लिहील जाते, तुम्ही काळजी करू नका, तुमचे भविष्य उज्वल आहे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> आयुक्त साहेब, प्रशासकीय सेवेमधील उद्याचा तुमचा शेवटचा दिवस कामकाज असेल तर आजचा शेवटची महसभा म्हणून आज या ठिकाणी त्याचा ऊआपोह होणे गरजेचे आहे. तसेही उद्या माझ्या मित्राच्या मुलीचे नाशिकला लग्न आहे, त्या ठिकाणी उपस्थि राहणे गरजेचे आहे, ५.३० चे लग्न आहे, त्यामुळे इकडे पोहचू शकत नाही. म्हणून मी सभागृहाला विनंती केली की, मला आज बोलू दया. मी संपुर्ण सभागृहाच्या वतीने आपले आभार व्यक्त करतो. कारण सात महीन्यापुर्वी या महासभेमध्ये उल्हासनगरच्या महानगापालिकेच्या पुर्वीच्या आयुक्तांचे काम करतांना लोकां विषयी दृष्टीकोन, लोकां विषयी असलेला संपर्क किंवा लोकां विषयी सिधेपण या शहराने तीन वर्षा पासून अनुभवले आहे आणि आल्या नंतर तुमच्याकडून ज्या अपेक्षा होत्या, त्या अपेक्षा प्रमाणे लोकांशी तुम्ही वागले आहेत. किती झाले किती नाही झाले या पेक्षा आमचे डॉ. नाथानी, डॉक्टर इंजेक्शन काय देतो, त्या पेक्षा ते कसे आहते, ते लोकांशी कसे बोलतात? डॉक्टरचे अप्रोच पॉझीटीव्ह असेल तर त्या रूग्णाचा आजार तसाच निघून जातो. तसेच आयुक्तांनी किती काम केली? या पेक्षा गेल्या नंतर आदराने दिले काय? हे रिस्पेक्टीव्ह आहे, तुम्ही लोकांना दिले, लोकांनी तुम्हांला दिले. या अगोदरच्या आयुक्तांनी काम केले नाही केले, ती नंतरची गोष्ट झाली. पण त्यांनी लोकांशी सुध्दा संपर्क ठेवला नाही. काही काही अधिकारी असतात, म्हणजे बोलतात ना खुर्चीवर बसले म्हणजे त्यांना माज येतो. मस्ती येते, खुर्ची त्यांना पचत नाही, जमत नाही. मी म्हणजे कोणी तरी, मग खालचे कर्मचारी असतील, पब्लिक असेल त्यांच्याशी कसेही वागायचे? काम करायचे नाही, काम कसे होणार नाही, असे बरेच अधिकारी असतात. काम कसे होणार नाही ते

बघतात. पण आपण काम कसे होईल? याकडे लक्ष दिले. काही लोकांचा पायगुण असतो, तुम्ही आलात बाळासाहेब नावाने क्रिडा संकुल, इंदिरा गांधी मार्केट किंवा महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली जागा या कागदोपत्री ताब्यात येण्यासाठी किती तरी वर्षे पासून पाठपुरावा करीत आहेत. पण दुदैवाने होत नाही, आपण आलात, लगेच दुस—याच दिवशी आपल्याला ताबा पावती मिळाली, एक पायगुण सुध्दा आहे. काम करण्याची आपली इच्छा होती, प्रबळ इच्छा होती. कामे थांबवली नाहीत. दुदैवाने तुमचे आणि आमचे दिवस कमी मिळाले नाही तर नक्कीच या उल्हासनगरमध्ये काम चांगले करू शकलो. काम करतांना काही लोकं असे असतात की, मी मागे एक उदाहरण दिले होते की, चालूही देत नाही आणि घोडयावर बसूनही देत नाही. खड्डे पडले तर ५ (२) (२) मध्ये करू पण नका, खड्डे पडले तर ओरडतात की, नगरसेवक काय करतात? अधिकारी काय करतात? म्हणून आपल्याला याच्यातून मार्ग काढायचा असतो. चांगले काय आणि वाईट काय हे आपल्याला घ्यायचे असते. सचिवांना आम्ही सांगितले की, आम्ही खड्डयासाठी केलेले आहे. उद्या खड्डयामध्ये पडल्या नंतर, अपघात झाला, भरत खरेंचा अपघात खड्डयांमुळे झाला होता. जबाबदार कोण? एक जीव जर गेला तर त्याला जबाबदर तुम्ही आणि आम्ही आहेत. जे लिहीतात ते जबाबदार नसतात, ते पुन्हा हात वर करून बोंबलायला मोकळे असतात. लोक दोन्ही बाजूनी बोलतात पण खरोखर आपण काम केले आहे ते चांगले आहे. पुर्वीच्या अधिका—यांचा अनुभव एक वाईट होता, विचित्र होता. वारंवार सांगून सुध्दा काम कसे होणार नाही? याकडे दुर्लक्ष होते, निगेटीव्ह होत, नकारात्मक विचार अशा प्रकारचे होते. आपण सर्वांना विश्वासात घेतले आणि उल्हासनगरमधले वातावरण बदलले. आपण आलात तेव्हा तुमचे स्वागत करतांना मी सांगितले होते की, आमचे आर.डी.शिंदे साहेब, त्यांनी या ठिकाणी तसेच वातावरण ठेवले होते. आयुक्त, श्री. आर. के. सोनावणे साहेब, आयुक्त आले आणि गेले. महापौर येतील आणि जातील पण जो ठसा उमटवला पाहीजे तो ठसा तुम्ही उमटवला. कामाच्या रूपाने पण उमटवला आणि आपल्या वागणूकीने लोकांच्या मनात सुध्दा उमटवला. जसे की, आमच्या प्रदिप रामचंदानी साहेबांनी सांगितले की, ही मैत्री शेवट पर्यंत राहील. असे फार कमी असतात. बरेचसे अधिकारी आले आणि गेले. पण काही अधिकारी होते, शेवट पर्यंत येतात, ते अधिकारी कुठेही असले तरी ते भेटायला जातात, हे उल्हासनगरचे वातावरण आहे. लोक प्रेम देतात, आपण ते घेतले, लोकांना ते दिले, खरोखर धन्यवाद. तुमचे आयुष्य तुम्ही मनाने निवृत्त कधी होणार नाहीत. कारण लहान पणा पासून एक परिस्थिती पाहीली होती, ती परिस्थिती, एक प्रसंग होता. एका व्यक्तिने मदत मागितली होती, ती केली. त्या बाबत तुमच्यावर एलिगेशन झाले. त्या वेळेस तुमच्या डोळयांमध्ये एक करूणा आली होती, एक वेगळा भाव आला होता की, मी चांगले करीत आहे, तरी दोष देतात. कोणासाठी काय केले होते? मला नक्की आठवत नाही काय प्रसंग होता तो? असे चांगले करतांना लोक दोष देतात, ज्या झाडाला फळे असतात, त्या झाडाला लोक दगडे मारतात आणि जी फळे नसतात तिकडे दुर्लक्ष केले जाते ती फळे देत नाहीत. तिकडे बघतच नाहीत आणि त्याच्या सावलीलाही जात नाहीत. त्याच्यामुळे आपण काम केले आहे, म्हणून कदाचीत अशा प्रकारच्या तक्रारी असतात. सगळया प्रकारची लोक आहेत. त्यामुळे विचलित होऊन अशा प्रकारचा त्रास होत आहे, असा मनात विचार न आणता संपुर्ण सभागृह आपल्या पाठीशी आहे, पुन्हा एकदा धन्यवाद मानतो आणि उर्वरीत आयुष्य मनाने निवृत्त न होता, एक असेच उदान एक चांगले व्यक्तीमत्व आपण साकाराल. तुमची पुढची निवृत्त नंतरची वाटचाल चांगली होईल, अशी प्रार्थना, अशी अपेक्षा या ठिकाणी करतो, तुम्हांला चांगले आयुष्य मिळावे अशी प्रार्थना करतो, धन्यवाद.

<u>पीठासीन अधिकारी, श्री. शंकर लुंड:—</u> मिटींगचे विषय पुर्ण झाले आहेत, कोरम नाही झाले आहे. परंतु एक सेंकदासाठी मी साहेबांच्या विषयी दोन शब्द बोलू इच्छितो. साडे सहा महीन्याचा कालावधी खुपच चांगल्या प्रकारे, सुंदरतेने सर्वांशी मिळून मिसळून शहरासाठी साहेबांनी जे काम केले आहे. त्यासाठी मी साहेबांना खुप खुप धन्यवाद देतो आणि साहेब अजून आपल्या बरोबर राहीले असते तर शहराचा अजून जास्त विकास झाला असता. परंतु आमचे नशीब कमी आहेत, म्हणून साहेब आपल्याकडे थोडया कालावधीसाठी राहीले. पुढे जाऊन तुमचे भविष्य, मला वाटते की, पुढे तुम्हांला सेवा करण्याची जेवढी तुमची क्षमता आहे, तर राजकारणामध्ये येऊन भरपुर काम करू

शकतात. सर्वच पक्ष साहेबांना वेलकम देण्यासाठी तयार आहेत. तर जाता जता आता आपल्याकडे २४ तास आहेत, तर माझी बहीण श्रीम. मिना सोनेजी यांनी जो प्रस्ताव दिला आहे की सक्शन मशिन पाहीजे. तर माझ्या माहीतीनुसार सोनावणे साहेबांनी जो प्रस्ताव तयार करून ठेवला आहे. तो ५ (२) (२) मध्ये किंवा त्यांच्या प्रस्तावावर जी पण अंमलबजावणी करायची आहे, ती तुम्ही करून जावे, धन्यवाद.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**ठिक आहे, आभारी आहे.

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.१६ वाजता पीठासीन अधिकारी श्री. शंकर लुंड यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ०२/०५/२०१९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०२/०५/२०१९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक ०२/०५/२०१९ रोजी सायंकाळी १२.३० वाजता घेण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीम. पंचम उमेश कालानी या पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीमती पंचम उमेश कालानी — महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | २३ | श्री. राजेश नानिकराम वधारिया |
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी श |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | २५ | श्री. रवी किशनचंद जग्यासी |
| ५ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | २६ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ७ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | २८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ८ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | २९ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ९ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ३० | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १० | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ३१ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| ११ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ३२ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १२ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ३३ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १३ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३४ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १४ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ३५ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| १५ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी | ३६ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १६ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ३७ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १७ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ३८ | श्री. विजय चाहु पाटील |
| १८ | श्रीमती शुभांगीनी निकम | ३९ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| १९ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४० | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २० | श्री. भगवान शंकर भालेराव | ४१ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २१ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ४२ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| २२ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. उप—महापौर, श्री. जीवन चंद्रभान इदनानी, २. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ३. श्रीमती आशा नाना बिराडे, ४. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ५. श्री. स्वप्नील मिलींद बागुल, ६. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ७.श्रीमती जया प्रकायश माखिजा, ८.श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ९. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकूर (कुमारी), १०. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, ११.श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता, १२.श्रीमती पुष्पा नाना बागुल, १३.श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, १४., १५. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १६. श्रीमती इंदिरा जमनादास उदासी, १७. श्रीमती कविता लाल पंजाबी, १८. श्री. गजानन प्रल्हाद शेळग, १९. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, २०. श्री. सुमित सागर सोनकांबळे, २१. श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव, २२. श्रीमती ज्याती शामराव माने, २३. श्रीमती मिताली

राजेश चान्पूर, २४. श्री. सुनिल मुकूंद सुर्वे, २५. श्रीमती संगिता नितीन सपकाळे, २६.श्रीमती शितल चंद्रकांत कदम,२७. श्रीमती वसुदा धनंजय बोडारे, २८. श्रीमती दिप्ती नविन दुधानी, २९. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे, ३०. श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी, ३१. श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे, ३२. श्रीमती कविता सुधिर बागुल, ३३. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, ३४. श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी, ३५. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ३६. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, ३७. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी, ३८. श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत, ३९. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय),
२. श्रीमती प्राजक्ता मिलिंद कुलकर्णी, महापालिका सचिव
३. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी तथा प्र. उप आयुक्त, कर विभाग
४. श्री. वानखेडे, शाखा अभियंता, पा.पु. वि.
५. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त.

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्री. बाळू भांगरे, लिपीक

या वेळी श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय) हे मा. आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होते.
दुपारी १२.५१ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १** :—दिनांक १ एप्रिल २०१९ पासुन निवृत्त ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणूक करणे.

---

मा. महापौरांकडे सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, गट नेता यांनी त्याची नावे दयायची आहे. नावे आलेली आहेत. सर्व प्रथम भाजपाकडून आलेली नावे वाचून दाखवत आहे. स्थायी समिती सदस्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

१. श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद, २. श्री. विजय चाहू पाटील, ३. डॉ. प्रकाश नाथानी,

शिवसेना गट नेता यांच्याकडून नावे आलेली आहेत, १. श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड, २. श्री. राजेंद्रसिंग भुल्लर, ३. श्रीम. लिलाबाई आशान.

राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी, श्री. भारत राजवानी यांच्याकडून नावे आलेली आहेत, १. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री)

रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया यांच्याकडून नाव आले आहे, १. श्रीम. अपेक्षा भगवान भालेराव,

अशा प्रकारे आठ सदस्यांची नेमणूक करण्यात येत आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** भारतीय जनता पार्टीतर्फे श्री. शंकर लुंड यांची सभागृह नेता पदी १ वर्षासाठी निवड करण्यात येत आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १** :—दिनांक १ एप्रिल २०१९ पासुन निवृत्त ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नेमणूक करणे.

**प्रस्तावना**

महापालिकेच्या स्थायी समितीतून दिनांक १/४/२०१९ पासून निवृत्त होणा—या ८ सदस्यांच्या जागी ८ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवुन महापालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या

प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. पुर्वी प्रत्येक गटाचे संख्याबळ खालीलप्रमाणे होते.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | भाजपा | ३२ ——X १६ ७८ | ६.५६ | (५) | आर.पी. आय(ए) | ०२ ——X १६ ७८ | ०.४१ |
| (२) | शिवसेना | २५ ——X १६ ७८ | ५.१२ | (६) | पीपल रिपब्लीकन पार्टी | ०१ ——X १६ ७८ | ०.२० |
| (३) | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई पक्ष) | १२ ——X १६ ७८ | २.४६ | (७) | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ०१ ——X १६ ७८ | ०.२० |
| (४) | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | ४ ——X १६ ७८ | ०.८२ | (८) | भारीप बहुजन महासंघ | ०१ ——X १६ ७८ | ०.२० |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ नुसार जेव्हा १६ पदे रिक्त होती त्यावेळी स्थायी समितीवर प्रत्येक पक्षाचे प्रतिनिधीत्व खालीलप्रमाणे होते.

| भाजपा | शिवसेना | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | आरपीआय (ए) | पीपल रिपब्लीकन पार्टी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | भारीप बहुजन महासंघ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०५ | ०३ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | १६ |

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे १६ सदस्यांपैकी ८ सदस्य ०१ एप्रिल, २०१८ रोजी चिठ्ठीद्वारे ८ सदस्य निवृत्त करण्यात आले. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | भारतीय जनता पक्ष | ३ |
| २ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | भारतीय जनता पक्ष | |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | भारतीय जनता पक्ष | |
| ४ | श्रीमती कांचन अमर लुंड | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | ३ |
| ५ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | |
| ६ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | |
| ७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | शिवसेना | २ |
| ८ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | शिवसेना | |

एप्रिल २०१९ च्या सभेत उर्वरित ०८ सदस्य निवृत्त होणार असून त्यांची नावे व त्यांचा पक्ष इत्यादीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | भारतीय जनता पक्ष | ४ |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | भारतीय जनता पक्ष | |
| ३ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | भारतीय जनता पक्ष | |
| ४ | श्रीमती पंचम उमेश कालानी | भारतीय जनता पक्ष | |
| ५ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | श्री. धनंजय बोडारे | शिवसेना | ३ |
| ७ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | शिवसेना | |
| ८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | शिवसेना | |

शासनाच्या मार्गदर्शनानुसार '' कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणा—या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यता प्राप्त पक्षाचा/नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यता प्राप्त पक्षाच्या नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रन्टच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे. मात्र अशा वेळेस पुर्वीच्या तुलनेने पक्षाच्या/गटाच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा''.

परंतु सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेले भाजपाचे दोन सदस्य अनर्ह झाले आहेत. तसेच मा. विभागीय आयुक्त यांच्याकडुन आरपीआय (ए) मध्ये पीपल रिपब्लीकन पार्टी यांनी पाठींबा दिल्याने आरपीआय (ए) मध्ये एकुण संख्या ३ झाली आहे. तौलनिक संख्याबळात बदल झाल्याने एकुण ७८ सदस्यांऐवजी ७६ संख्या झाली आहे. तरी एकुण १६ सदस्यांच्या तुलनेत ठरविल्यास स्थायी समितीवर तौलनिक संख्याबळानुसार पक्षनिहाय प्रमाणशीर प्रतिनिधीत्व खालीलप्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | भाजपा | ३०<br>——X १६<br>७६ | ६.३१ | (५) | आर.पी. आय(ए) | ०३<br>——X १६<br>७६ | ०.६३ |
| (२) | शिवसेना | २५<br>——X १५<br>७६ | ५.२६ | (६) | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | ०१<br>—— X १६<br>७६ | ०.२१ |
| (३) | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई पक्ष) | १२<br>——X १६<br>७६ | २.५२ | (७) | भारीप बहुजन महासंघ | ०१<br>——X १६<br>७६ | ०.२१ |
| (४) | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | ४<br>——X १६<br>७६ | ०.८४ | | | | |

वरील गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पुर्णांकांच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील प्रमाणे प्रतिनिधीत्व होईल.

| भा.ज.पा | शिवसेना | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | एकूण |
|---|---|---|---|
| ०६ | ०५ | ०२ | १३ |

यानंतर रिक्त राहणा—या आठ जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल. आणि खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ पुढील प्रमाणे आहे.

(१) भा.ज.पा. .३१ (२) शिवसेना .२६

(३) सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट .५२ (४) रा.का.पा. .८४

(५) भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस .२१ (६) आरपीआय (ए) .६३

(७) भारीप बहुजन महासंघ .२१

वरील परिस्थिती पहाता राष्ट्रवादी कॉग्रेस, आरपीआय ए, व सेक्युलर अलायंस ऑफ इंडिया या गटाचे अपुर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. परंतू स्थायी समिती मध्ये यापुर्वीच सेक्युलर अलायंन्सचे ०३ सदस्य आहेत. निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये सेक्युलर अलायंन्स सदस्याचे नाव नाही.

तरी माहे ०१ एप्रिल २०१९ मध्ये निवृत्त होणा—या ०८ सदस्यांच्या जागी येणा—या सदस्यांचे प्रमाणशिर प्रतिनिधीत्व खालीलप्रमाणे आहे.

| भाजपा | शिवसेना | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | आरपीआय (ए) | एकूण |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | ०३ | ०१ | ०१ | ०८ |

सबब निवृत्त झालेल्या सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा/नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीचा किंवा रिक्त होणा—या जागांवर फ्रन्टचा असेल त्याच मान्यता प्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांस नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त तक्त्यात विर्निदिष्ट केलेल्या संख्येप्रमाणे स्थायी समिती सदस्य पदाच्या ८ रिक्त जागांवर नविन ८ सदस्य नेमणे प्रस्तावित.

म्हणुन योग्य त्या कायदेशिर निर्णयास्तव महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र:०१ दिनांक:— २/५/२०१९

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :—श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक १ एप्रिल २०१९ पासुन निवृत्त हाणो-या ८ स्थायी समिती सदस्यांच्या जागी खालील ८ सदस्यांची नेमणूक करीत आहे.

१) श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी

२) श्री. विजय चाहू पाटील

३) डॉ. प्रकाश नाथानी

४) श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड

५) श्री. राजेंद्रसिंग भुल्लर

६) श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान

७) श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री)

८) श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारणमहासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १.४४ वाजता महापौर श्रीमती पंचम ओमेश कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका